




# जनमाध्यम

e paper www.janmadhyam.com

एक प्रतिष्ठित सवय

✦ अमरावती, गुरुवार १० सप्टेंबर २०२६ ✦ मूल्य ४.०० ✦ पृष्ठ १०


## एआयमुळे मानवजातीचा होणार विनाश?

**नवी दिल्ली :** एआय अर्थात कृत्रिम बुद्धिमत्तेचा जवळपास सर्वच क्षेत्रात वेगाने विस्तार होत असल्याचे पाहायला मिळते. मनोरंजनापासून वैद्यकीय उपचारांपर्यंत आणि शेअर बाजारापासून खासगी ते सरकारी प्रशासनापर्यंत सर्वच क्षेत्रांमध्ये या आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर होत असल्याचे दिसून येते. एआयचे फायदे आणि त्यासंबंधित धोके याविषयीच्या अनेक बातम्या दररोज आपल्या कानावर पडतात. यादरम्यान जगभरात एआयचा झपाट्याने विस्तार होत असला तरी या तंत्रज्ञानामुळे मानवी अस्तित्वाच्या खुणा पुसल्या जाउ शकतात, असा इशारा एका वरिष्ठ संशोधकाने दिला. एआयमुळे पुढील दशकात संपूर्ण मानवजातीचा विनाश होण्याची शक्यता १० टक्क्यांपेक्षा जास्त असल्याची भीतीही त्यांनी व्यक्त केली.



**सर्व शेतकरी बांधवांना बैल पोळा सणाच्या हार्दिक शुभेच्छा!**

# 5 राज्यांच्या निवडणुकीत भाजपला 1,473 कोटींचा निधी

## काँग्रेसपेक्षा 7 पट जास्त; आसाममध्ये 96 कोटी खर्च केले, 22 जागा जास्त जिंकल्या

**नवी दिल्ली/वृत्तसंस्था :** या वर्षी एप्रिलमध्ये झालेल्या ५ राज्यांच्या विधानसभा निवडणुकांदरम्यान भाजपला सुमारे १,४७२.८ कोटी रुपयांची देणगी मिळाली. ही रक्कम काँग्रेसला मिळालेल्या २०७.१७ कोटी रुपयांपेक्षा ७ पट जास्त आहे. निवडणूक आयोगाने बुधवारी ही माहिती दिली. आसाम, केरळ, तामिळनाडू, पश्चिम बंगाल आणि पुद्दुचेरीमध्ये निवडणुका झाल्या होत्या. ४ मे रोजी आलेल्या निकालांमध्ये आसाम, बंगाल आणि पुद्दुचेरीमध्ये एनडीएचा विजय झाला होता. तर, केरळममध्ये इंडिया आणि तामिळनाडूमध्ये टीव्हीके आणि काँग्रेसने सरकार स्थापन केले होते.

**भाजपची शिल्लक ९०४.६ कोटी रुपयांनी वाढली-** भाजपच्या केरळम आणि पश्चिम बंगालमधील निवडणुकांच्या खर्चाचे विवरण अद्याप सार्वजनिक झालेले नाही. त्यामुळे पक्षाची एकूण पावती यापेक्षा जास्त असण्याची शक्यता आहे. या दोन्ही राज्यांचे पूर्ण आकडे कधी सार्वजनिक होतील, हे अद्याप माहीत नाही. निवडणुकीच्या काळात भाजपच्या केंद्रीय मुख्यालयाची शिल्लकही लक्षणीय वाढली. १५ मार्च रोजी ती ६,७२२.६ कोटी रुपये होती, जी ६ मे रोजी वाढून ७,६२७.२ कोटी रुपये झाली. म्हणजेच या काळात ९०४.६ कोटी रुपयांची वाढ झाली.

तर, काँग्रेसच्या केंद्रीय मुख्यालय आणि ५ राज्य युनिट्सकडे निवडणुकीच्या कालावधीच्या सुरुवातीला सुमारे १६९.०६ कोटी रुपये होते. यामध्ये २२.९ कोटी रुपये रोख आणि




१४६.१ कोटी रुपये बँक खात्यांमध्ये होते. ६ मे पर्यंत काँग्रेसकडे सुमारे १०३.२ कोटी रुपये शिल्लक राहिले. म्हणजेच निवडणुकीच्या काळात त्यांच्या निधीत ६५.८६ कोटी रुपयांची घट झाली.

**भाजपने आसाममध्ये सर्वाधिक खर्च केला**-भाजपने आसाम, तामिळनाडू आणि पुद्दुचेरीमध्ये सुमारे १५९.७ कोटी रुपये खर्च केले. यामध्ये सुमारे १३०.४ कोटी रुपये सामान्य पक्ष प्रचारावर आणि उर्वरित रक्कम उमेदवारांवर व संबंधित खर्चावर खर्च झाली. आसाममध्ये भाजपने सर्वाधिक ९६.२७ कोटी रुपये खर्च केले. यामध्ये ७६.७३ कोटी रुपये सामान्य पक्ष प्रचारावर आणि १९.५४ कोटी रुपये उमेदवारांवर खर्च झाले. तामिळनाडूमध्ये भाजपचा एकूण खर्च ५१.५६ कोटी रुपये राहिला. यामध्ये ४४.५१ कोटी रुपये सामान्य प्रचारावर आणि ७.०५ कोटी रुपये उमेदवारांवर खर्च झाले.

तामिळनाडूमध्ये मीडिया जाहिरातींवर सुमारे २३.९६ कोटी रुपये, स्टार प्रचारकांच्या प्रवासावर सुमारे १०.०४ कोटी रुपये आणि प्रचार सामग्रीवर सुमारे ५.८५ कोटी रुपये खर्च करण्यात आले. पुदुच्चेरीमध्ये भाजपने ११.९० कोटी रुपये खर्च केले. यामध्ये ९.१९ कोटी रुपये सामान्य प्रचारावर आणि २.७१ कोटी रुपये उमेदवारांवर खर्च झाले. काँग्रेसने पाचही राज्यांमध्ये सामान्य पक्ष प्रचारावर १४३ कोटी रुपये आणि उमेदवारांवर १०५.५५ कोटी रुपये खर्च केले. अशा प्रकारे त्यांचा एकूण निवडणूक खर्च २४८.५५ कोटी रुपये राहिला. काँग्रेसच्या केंद्रीय मुख्यालयाने पाचही राज्यांमध्ये सामान्य प्रचारावर ४०.५२ कोटी रुपये खर्च केले. राज्य आणि स्थानिक युनिट्सनी याच मदतीवर १०२.४९ कोटी रुपये खर्च केले. काँग्रेसच्या सामान्य प्रचार खर्चात केरळचा वाटा सर्वाधिक होता. तेथे पक्षाने ५९.२८ कोटी रुपये खर्च केले. केरळमध्ये काँग्रेसने लेफ्ट फ्रंटला सत्तेतून हटवले होते. त्यानंतर आसाममध्ये सामान्य प्रचारावर २२.६२ कोटी रुपये खर्च केले.

## विश्वासाचा टिळा लावून येणा-यांना नवरात्री-गरब्यात सहभागी करा

**नागपूर :** नवरात्रीतील गरब्यामध्ये विशिष्ट धर्मातील लोकांना प्रवेश नाकारण्यावरून विविध आरोप प्रत्यारोप सुरू झाले असताना मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या पत्नी व सामाजिक कार्यकर्त्या अमृता फडणवीस यांनी यावर भूमिका मांडली आहे. दहीहंडी,



नवरात्र, गरबा हे आपले अतिशय चांगले सण आहेत. श्रद्धेने कोणत्याही जातीचा व्यक्ती त्या ठिकाणी अडचणी निर्माण न करता कुटुंबासोबत विश्वाासाचा टिळा लावून येत असेल, तर त्याला येउ द्यावे. उत्सवाच्या माध्यमातून धर्माची ओळख आणि संस्कृती इतरांपर्यंत पोहोचविण्याची संधी मिळते, असे फडणवीस म्हणाल्या. अजनी चौकातील दहीहंडी कार्यक्रमात बुधवारी त्या सहभागी झाल्या होत्या. त्यावेळी त्या बोलत होत्या. हिंदू धर्मात विविध रंग आणि परंपरा आहेत. त्यामुळे आपल्या सण-उत्सवांमध्ये इतर धर्मीयांचाही समावेश करून घेण्याची व्यापक भूमिका हिंदू समाजाने ठेवली पाहिजे. ख्रिश्चन समाज ज्या पद्धतीने आपल्या सणांमध्ये सर्व धर्मीयांना सहभागी करून घेतो, त्याच पद्धतीने हिंदू धर्मातील दहीहंडी, नवरात्र, गरबा यांसारखे उत्सवही सर्वांना सहभागी करून घेणारे असावेत, असे त्या म्हणाल्या. लव्ह जिहादच्या मुद्द्यावर बोलताना त्यांनी कठोर कायद्यांबरोबरच तरुण पिढीला आपल्या धर्माची ओळख करून देण्याची गरज व्यक्त केली. मुलामुलींना वेद, पुराणे, महाभारत यांची माहिती असावी आणि आपल्या धर्माबद्दल अभिमान असावा. त्यामुळे अशा घटनांमध्ये भविष्यात घट होउ शकते, असे त्या म्हणाल्या. दहीहंडी असो वा गरबा-नवरात्रोत्सव, महिलांना केवळ नृत्यासाठी उभे करण्याऐवजी त्यांनाही पुरुषांप्रमाणे उत्सवात सक्रिय सहभागाची संधी मिळाली पाहिजे, असेदेखील त्यांनी सांगितले.

## आंदोलनासमोर 'एमपीएससी'ची माघार!

### राज्यसेवा मुख्य परीक्षेच्या गुणांची फेरपडताळणी होणार

**नागपूर/प्रतिनिधी :** राज्यसेवा मुख्य परीक्षा २०२५च्या निकालानंतर गुणांकन प्रक्रियेवर प्रश्नचिन्ह उपस्थित करीत विद्यार्थ्यांनी सुरू केलेल्या आंदोलनाची अखेर महाराष्ट्र लोकसेवा आयोगाने (एमपीएससी) दखल घेतली आहे. उमेदवारांच्या वाढत्या आक्षेपांच्या पार्श्वभूमीवर आयोगाने राज्यसेवा मुख्य परीक्षेतील गुणांची फेरपडताळणी करण्याचा निर्णय घेतला आहे. त्यामुळे विद्यार्थ्यांच्या आंदोलनासमोर आयोगाला माघार घ्यावी लागल्याची भावना उमेदवारांमध्ये आहे.

राज्यसेवा मुख्य परीक्षा २०२५चा लेखी परीक्षेचा निकाल २५ ऑगस्ट रोजी जाहीर झाल्यानंतर अनेक उमेदवारांनी पेपरनिहाय मिळालेल्या गुणांबाबत आक्षेप नोंदविले. काही




उमेदवारांना एका पेपरमध्ये अपेक्षेपेक्षा मोठ्या प्रमाणात गुण मिळाले, तर दुस-या पेपरमध्ये अत्यल्प गुण मिळाल्याचा दावा करण्यात आला. त्यामुळे उत्तरपत्रिकांचे मूल्यांकन नेमके कोणत्या पद्धतीने करण्यात आले, याबाबत उमेदवारांकडून प्रश्न उपस्थित करण्यात आले. विशेष म्हणजे, राज्यसेवा मुख्य परीक्षेच्या कटऑफबाबतही उमेदवारांमध्ये मोठ्या प्रमाणात संभ्रम आहे. मूल्यांकनातील कथित अनियमिततेची चौकशी करावी, उत्तरपत्रिकांची फेरतपासणी करावी आणि संपूर्ण प्रक्रियेत पारदर्शकता आणावी, या मागण्यांसाठी विद्यार्थ्यांनी आंदोलनाची भूमिका घेतली होती.

केंद्रीय लोकसेवा आयोग आणि एमपीएससीचा मुख्य परीक्षेचा अभ्यासक्रम एकच (१७५० गुण) असताना, दोन्ही संस्थांच्या मुख्य परीक्षेच्या कटऑफ मधील तफावत थक्क करणारी आहे असा आरोप आहे. यूपीएससी मुख्य परीक्षा २०२५ कटऑफ


➪(पान २ वर)




### 62 वा महाराष्ट्र राज्य चित्रपट पुरस्कार सोहळा;

## हृदयनाथ मंगेशकरांना जीवनगौरव, राणी मुखर्जी-प्रसाद ओकचा विशेष सन्मान

**मुंबई/प्रतिनिधी :** मुंबईत नुकताच ६२ वा महाराष्ट्र राज्य चित्रपट पुरस्कार सोहळा पार पडला. यावेळी ज्येष्ठ गायक-संगीतकार पं. हृदयनाथ मंगेशकर यांना सन २०२५चा चित्रपती व्ही. शांताराम जीवनगौरव पुरस्कार प्रदान करण्यात आला. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि सांस्कृतिक कार्यमंत्री अड. आशीष शेलार यांच्या हस्ते त्यांचा गौरव करण्यात आला.ज्येष्ठ लेखक सलीम खान यांना जाहीर झालेला स्वर्गीय राज कपूर जीवनगौरव पुरस्कार त्यांच्या पत्नी आणि अभिनेत्री हेलन यांनी स्वीकारला. तर अभिनेता-दिग्दर्शक प्रसाद ओक याला चित्रपती व्ही. शांताराम विशेष योगदान पुरस्काराने सन्मानित करण्यात आलं. पुरस्कार स्वीकारताना प्रसाद ओकने हा सन्मान आपल्या दिग्दर्शकांना समर्पित केला. व्ही. शांताराम यांच्या १२५व्या जन्मजयंती वर्षात आणि माझ्या १२५व्या चित्रपटाच्या उंबरठ्यावर हा पुरस्कार मिळतोय. त्यामुळे माझी जबाबदारी आता आणखी वाढली आहे. महाराष्ट्र राज्य निर्मित पहिल्या मराठी सिनेमाचा मी नायक आहे. संत तुकडोची महाराज यांची व्यक्तिरेखा मी साकारतो आहे. माझी जबाबदारी आता अधिक वाढली आहे. हा पुरस्कार मी माझ्या सर्व दिग्दर्शकांना समर्पित करतो. माझे पहिले दिग्दर्शक अरुण सुर्वे ते प्रवीण तरडे, अनंत महादेवन., असं तो यावेळी म्हणाला. दरम्यान, अभिनेत्री राणी मुखर्जीला स्वर्गीय राज कपूर विशेष योगदान पुरस्कार प्रदान करण्यात आला. .

## इंजिनिअरिंग प्रवेशावेळी अतिरिक्त शुल्क आकारल्यास संस्थेवर कारवाई

**मुंबई :** राज्यातील काही शैक्षणिक संस्थांकडून विद्यार्थी आणि पालकांची अतिरिक्त फी, किंवा इतर फीच्या नावाखाली पिळकवणूक



होत असते. गेल्या काही दिवसांपूर्वी पुण्यातील इंजिनिअरींगच्या कालेजकडून तशी शैक्षणिक फी शिवाय अधिकची रक्कम आकारली जात असल्याचे काही व्हिडिओ सोशल मीडियातून समोर आल होते. तर, महाराष्ट्र राज्य सामाईक प्रवेश परीक्षा कक्षास इंजिनिअरींगच्या विद्यार्थी, व पालकांनीही तक्रारी केल्या आहेत. त्याच, पार्श्वभूमीवर मंजूर नसलेले नियमबा शुल्क आकारताना आढळल्यास, संबंधित संस्थेवर कडक कायदेशीर कारवाइ केली जाणार असल्याचे शुल्क नियामक प्राधिकरणाने म्हटले आहे. महाराष्ट्र राज्य सामाईक प्रवेश परीक्षा कक्षास इंजिनिअरींगच्या विद्यार्थ्यांचे पालक आणि काही लोकप्रतिनिधींकडून प्राप्त झालेल्या निवेदनांच्या अनुषंगाने अनेक संस्था अभियांत्रिकीच्या विद्यार्थ्यांकडून अवाजवी नियमबा शुल्क आकारत आहेत. पालकांनी आपल्या तक्रारी इंजिनिअरींग कालेजकडून रोख स्वरुपात किंवा इतर कारणास्तव अवाजवी पैशांची मागणी केली जात असल्याचं तक्रारीत म्हटलं आहे. त्यानंतर, सीईटी सेलने संबंधित तक्रारींची दखल घेत महाविद्यालयांना कायदेशीर कारवाई करण्यात येईल, असा इशारा दिलाय.

## मी मुंबई-गोवा महामार्गाच्या उद्घाटनाला येणार नाही -गडकरी

**पणजी/प्रतिनिधी :** मुंबई-गोवा राष्ट्रीय महामार्गाच्या कामाला झालेल्या प्रचंड विलंबाबाबत केंद्रीय रस्ते वाहतूक आणि महामार्ग मंत्री नितीन गडकरी यांनी तीव्र नाराजी व खंत व्यक्त केली आहे. 'या महामार्गाच्या कामाला झालेल्या विलंबाची मला लाज वाटते, हे काम बरेच आधी पूर्ण व्हायला हवे होते; त्यामुळे मी या महामार्गाच्या उद्घाटनाच्या कार्यक्रमाला येणार नाही,' असे स्पष्ट आणि थेट विधान नितीन गडकरी यांनी केले. गोव्यातील पर्वरी येथे सहापदरी उड्डाणपुलाच्या उद्घाटनप्रसंगी ते बोलत होते.मुंबई-गोवा महामार्गाचे काम सध्या ९३ ते ९४ टक्के पूर्ण झाले आहे. कामाचा आढावा घेण्यासाठी ऑक्टोबर महिन्यात स्वतः वाहनाने प्रवास करत मुंबई ते गोवा या संपूर्ण मार्गाची थेट पाहणी करणार असल्याचे गडकरींनी जाहीर केले. या दौ-यात



नितीन गडकरी यांच्या हस्ते झुवारी पुलावर बांधण्यात येणा-या दोन ऑब्झर्व्हेटरी टावर्सचा नारळ वाढवून औपचारिक शुभारंभ करण्यात आला. झुवारी पुलावर प्रत्येकी १२० मीटर उंचीचे दोन टावर्स उभारले जाणार असून, हा देशातील अशा प्रकारचा एकमेव अभिनव प्रकल्प ठरणार आहे. हा प्रकल्प गोव्यात येणा-या देशी-विदेशी पर्यटकांसाठी एक मोठे आकर्षण ठरेल, असा विश्वास मुख्यमंत्री डा. प्रमोद सावंत यांनी व्यक्त केला.

**गोव्यासाठी केंद्राकडून २२ हजार कोटींचा निधीः** मुख्यमंत्री

कार्यक्रमात बोलताना मुख्यमंत्री प्रमोद सावंत यांनी सांगितले की, केंद्रातील डबल इंजिन सरकारमुळेच गोव्यातील राष्ट्रीय महामार्ग कनेक्टिव्हिटीसाठी तब्बल २२,००० कोटी रुपयांचा निधी उपलब्ध झाला आहे. याशिवाय, राज्याने प्रस्तावित केलेल्या 'ग्रीन कारिडोअर'साठी केंद्राने ६५ कोटी रुपये मंजूर करावेत, अशी विनंती मुख्यमंत्र्यांनी गडकरी यांच्याकडे केली असून हा निधीही लवकरच राज्याला प्राप्त होईल, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.

## साखर हंगाम १५ ऑक्टोबरपासून सुरू होणार

**मुंबई :** साखरेचे दर अचानक वाढल्यामुळे ग्राहकांना मोठा फटका बसत आहे. राज्याचा साखर हंगाम यंदा १५ ऑक्टोबरपासून सुरू होणार आहे. मुख्यमंत्री फडणवीस यांच्या उपस्थितीत पार पडलेल्या सह्याद्री अतिथिगृहात विविध कारखान्यांच्या संघटनांचे प्रतिनिधी सहकार मंत्री बाबासाहेब पाटील, उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार, माजी मंत्री दिलीप वळसे पाटील यांच्यासह विविध आमदारांच्या बैठकीत या संदर्भात निर्णय घेण्यात आल्याची माहिती आहे.

### गणेशोत्सवावर महागाईचे सावट


## डेकोरेशन साहित्याच्या किमतीत 20 ते 30 टक्के वाढ

**पुणे /प्रतिनिधी-** गणेशोत्सवाच्या पार्श्वभूमीवर बाप्पाच्या आराससाठी यंदा पारंपरिक सजावटीसोबत आधुनिक डेकोरेशनला पसंती मिळत आहे. आकर्षक कागदी मंदिरे आणि विविध प्रकारच्या एलईडी लायटिंगला



ग्राहकांकडून मागणी वाढली आहे. यंदा वाढत्या महागाईमुळे बाप्पाची आरास सर्वसामान्य नागरिकांच्या खिशाला कात्री लावणार आहे. डेकोरेशन साहित्याच्या किमतीत २० ते ३० टक्के वाढ झाली आहे. गणरायाच्या आगमनाची तयारी सुरू झाली असून, गणेशोत्सवाच्या पार्श्वभूमीवर घरगुती तसेच सार्वजनिक गणेश मंडळांच्या आरास सजावटीसाठी आधुनिक साहित्याला यंदा ग्राहकांची विशेष पसंती मिळत आहे. मात्र, गेल्या वर्षीच्या तुलनेत सजावटीच्या साहित्याच्या दरात २०-३० टक्क्यांहून अधिक वाढ झाल्याची माहिती व्यापा-यांनी दिली. इलेक्ट्रानिक व इलेक्ट्रिकल साहित्याबरोबरच कापड, प्लास्टिक आणि इतर कच्च्या मालाच्या किमती वाढल्याने सजावटीच्या वस्तू महागल्याचे जुने नाशिकमधील होलसेल सजावट साहित्य विक्रेत्यांनी सांगितले. यंदा थ्रीडी फोल्डेबल मखर, मखमली मखर, कागदी व पुठ्ठ्याचे रेडिमेड मंदिर, विविध धार्मिक व ऐतिहासिक थीमचे बॅकड्राप, गोवर्धन पर्वत, राम मंदिर तसेच शिवकालीन गड-किल्ल्यांच्या प्रतिकृतींना मागणी आहे. कमी जागेत सहज बसणारे आणि वापरल्यानंतर साठवून ठेवता येणारे फोल्डेबल मखर ग्राहकांच्या पसंतीस उतरले आहे. सजावटीमध्ये एलईडी चक्र, लायटिंग तोरण, मल्टीकलर लाईट्स, लेझर लाईट्स, फेरी लाईट्स आणि डिजिटल लाइटिंग बॅकड्राप यंदाचे प्रमुख आकर्षण ठरत आहे. पारंपरिक सजावटीसोबत कृत्रिम झेंडूच्या माळा, मोग-याच्या कळ्यांचे लटकन, विविध रंगांच्या कापडी व प्लास्टिकच्या वेली यांनाही मागणी वाढली आहे. गणेशभक्तांकडून कमी खर्चात आकर्षक आरास करण्याला प्राधान्य दिले जात आहे. त्यामुळे तयार सजावटीचे किट, कागदी मखर, कापडी बॅकड्राप आणि रेडिमेड मंदिराच्या डिझाईनला चांगली मागणी असल्याचे व्यापा-यांनी सांगितले. थर्माकोलच्या वापरावर निर्बंध आल्यापासून ग्राहकांचा कल कापडी बॅकड्राप, मखमली मखर आणि कागदी रेडिमेड मंदिरांकडे वाढला आहे.


## परीक्षा केंद्रांवरील छेडछाड आता महागात पडणार!



**मुंबई/प्रतिनिधी :** कर्मचारी निवड आयोगाने संगणक आधारित भरती परीक्षेत सहभागी होणा-या उमेदवारांसाठी आणि परीक्षा केंद्रांवर तैनात असलेल्या कर्मचा-यांसाठी एक महत्त्वाची ॲडव्हायजरी जारी केली आहे. आयोगाने परीक्षा केंद्रावरील काम्प्युटर सिस्टीमबाबत काही हालचालींवर बंदी घातली आहे. आता परीक्षेदरम्यान उमेदवार किंवा परीक्षा कर्मचारी स्वतःहून काम्प्युटर रिस्टार्ट, शटडाउन किंवा सिस्टीम बदलू शकणार नाहीत. या कामांसाठी अधिकृत परीक्षा स्टाफची परवानगी आणि ठरवून दिलेली प्रक्रिया पाळणे बंधनकारक राहणार आहेत.वास्तविक आयोगाच्या मते मागील काही परीक्षांमध्ये असे प्रकार समोर आले होते, जेव्हा कोणतीही तांत्रिक अडचण नसताना उमेदवारांनी स्वतः किंवा परीक्षा कर्मचा-यांच्या मदतीने काम्प्युटर सिस्टीम रिस्टार्ट करणे, बदलणे किंवा त्यात इतर प्रकारे हस्तक्षेप करण्याचा प्रयत्न केला होता. यानंतर आयोगाने अशा प्रकारच्या हालचालींमुळे परीक्षा आणि निष्पक्षतेवर परिणाम होउ शकतो, असे मानले आहे. नवीन ॲडव्हायजरीनुसार परीक्षा केंद्रावर उमेदवार स्वतःहून काम्प्युटर सिस्टीम रिस्टार्ट किंवा शटडाउन करू शकणार नाहीत. याशिवाय काम्प्युटर किंवा मानिटर बदलण्यावरही प्रतिबंध असेल. जर अशा कोणत्याही प्रक्रियेची गरज भासली, तर ती केवळ अधिकृत परीक्षा कर्मचा-यांमार्फत ठरवून दिलेल्या नियमांनुसारच


➪(पान २ वर)


## नेपाळमध्ये मुसळधार पाउस आणि वादळाचा इशारा



**काठमांडू-** नेपाळमध्ये बुधवारी मुसळधार पाउस आणि वादळाचा इशारा आहे. हवामान विभागाच्या मते, मधेश, कोशी, बागमती, गंडकी आणि लुंबिनीच्या डोंगराळ आणि तराई प्रदेशात जोरदार पाउस पडू शकतो. तर, हिमालयीन प्रदेशात बर्फवृष्टी आणि वीज पडण्याची शक्यता आहे.कोशी, बागमती आणि गंडकीच्या हिमालयीन प्रदेशात पाउस किंवा बर्फवृष्टीसह गडगडाट आणि विजा चमकू शकतात. लुंबिनी, कर्णालीच्या काही हिमालयीन प्रदेशातही बर्फवृष्टीचा अंदाज आहे. दरम्यान, २६ ऑगस्टच्या पुरात आतापर्यंत १,३७७ लोकांचा मृत्यू झाला आहे आणि ५,३२६ लोक बेपत्ता आहेत. या पुरात ६,८२७ लोक जखमी झाले आहेत आणि ७,५७० घरे तुटली किंवा खराब झाली आहेत.




# अमरावतीच्या गौरव तेटू यांचे व्हीसीएच्या स्टेट पॅनल अंपायर परीक्षेत घवघवीत यश

**अमरावती /प्रतिनिधीः-** अमरावती शहरातील क्रिकेटपटू व अंपायर गौरव तेटू यांनी विदर्भ क्रिकेट असोसिएशन म्हणजेच (व्हीसीए) तर्फे आयोजित स्टेट पॅनल अंपायर परीक्षेत उल्लेखनीय यश संपादन केले आहे. या परीक्षेत १५० पैकी तब्बल १३२ गुण मिळवत त्यांनी स्टेट पॅनलसाठी पात्रता मिळविली आहे. या यशामुळे गौरव तेटू यांना आता देशांतर्गत क्रिकेट स्पर्धांमध्ये अंपायरिंग करण्याची संधी मिळणार आहे. घवघवीत यशाबद्दल अमरावतीच्या आमदार - सौ.सुलभाताई खोडके व विधान परिषद आमदार - संजय खोडके यांनी गौरव तेटू यांचा सत्कार करीत अभिनंदन केले आहे. व्हीसीएच्या वतीने गेल्या जुलै महिन्यात स्टेट पॅनल अंपायर परीक्षेपूर्वी विशेष कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यशाळेत गौरव तेटू यांनी सहभाग घेतला. आंतरराष्ट्रीय क्रिकेट अंपायर - विनीत कुलकर्णी तसेच अभिजीत देशमुख यांच्या मार्गदर्शनाखाली अंपायर होऊ इच्छिणाऱ्या उमेदवारांना विविध महत्त्वपूर्ण टिप्स देण्यात आल्या. कार्यशाळेदरम्यान क्रिकेटच्या नियमांची सविस्तर माहिती देण्यासोबतच मैदानावर निर्माण होणाऱ्या विविध परिस्थितींमध्ये निर्णय घेण्याची क्षमता, अंपायरिंगमधील बारकावे



तसेच प्रत्यक्ष मैदानावरील व्यावहारिक बाबींवर विशेष मार्गदर्शन करण्यात आले. कार्यशाळेनंतर घेण्यात आलेल्या परीक्षेत गौरव तेटू यांनी उत्कृष्ट कामगिरी करत स्टेट पॅनलमध्ये स्थान मिळविले. गौरव तेटू यांनी आपल्या या यशाचे श्रेय संत गजानन क्रिकेट अकादमीचे प्रशिक्षक - संदीप गावंडे यांना दिले आहे. अमरावतीच्या क्रीडा नगरीतून राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय दर्जाचे उदयोन्मुख खेळाडू तयार होत असून त्यांनी आपल्या कार्यकुशलतेने क्रीडा विश्वात आपला डंका वाजविला आहे. आता क्रिकेटच्या मैदानात अमरावतीचा गौरव तेटू थेट पंचगिरी करतांना दिसणार असल्याने क्रिकेटच्या मैदानात अंपायर म्हणून गौरव ने दिलेला निर्णय महत्वाचा राहणार आहे.

यासाठी आमदार महोदयांनी गौरव तेटू यांचे अभिनंदन करून शुभेच्छा प्रदान केल्यात. यावेळी श्री. यश खोडके, योगेश सवाई, संकेत बोके, आदींसह क्रीडाप्रेमी उपस्थित होते. अमरावतीच्या क्रिकेट क्षेत्रासाठी गौरवास्पद ठरलेल्या या यशाबद्दल गौरव तेटू यांच्यावर विविध स्तरातून अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.

# वाघिणीच्या मृत्यूप्रकरणी वन विभागाच्या कार्यपद्धतीवर गंभीर प्रश्नचिन्ह !

## वन्यप्रेमीचे वनविभागाच्या कार्यालयासमोर मुंडन आंदोलन

**अमरावती /प्रतिनिधीः-** शिरजगाव कसबा परिसरात चार नागरिकांचा बळी घेणाऱ्या वाघिणीला जेरबंद केल्यानंतर उपचारादरम्यान झालेल्या मृत्यूने वन विभागाच्या संपूर्ण कार्यपद्धतीवरच गंभीर प्रश्नचिन्ह निर्माण केले आहे. वाघिणीला पकडण्यापासून तिची वाहतूक, उपचार आणि अखेरच्या शवविच्छेदनापर्यंत नेमकी कोणती प्रक्रिया राबविण्यात आली, याचा खुलासा वन विभागाने करावा, अशी मागणी वन्यजीवप्रेमींनी केली आहे. बुधवारी वन्यप्रेमींनी वनविभागाच्या कार्यालयासमोर मुंडन आंदोलन करून या घटनेचा निषेध नोंदविला. वाघिणीला पकडण्यासाठी खासगी अशासकीय संस्थांच्या चमूला पाचारण करण्यात आले होते. मात्र, तिच्या पकडण्यानंतर पुढील व्यवस्थापनात अनेक गंभीर त्रुटी झाल्याचा दावा वन्यजीवप्रेमींनी केला आहे. त्यामुळे हा केवळ वाघिणीच्या मृत्यूचा विषय नसून, वन्यजीव व्यवस्थापन, अधिकाऱ्यांचे निर्णय आणि शासकीय यंत्रणांमधील समन्वयाचा गंभीर प्रश्न असल्याचे त्यांचे म्हणणे आहे. बोर अभयारण्यातून बाहेर पडलेल्या या वाघिणीने चार नागरिकांसह अन्य प्राण्यांचा बळी घेतला होता. त्यानंतर तिला पकडण्यासाठी अथवा ठार करण्यासाठी नेमके कोणते शासकीय निर्देश देण्यात आले होते? संबंधित आदेश सार्वजनिक का करण्यात आले नाहीत? निर्देशांमध्ये स्पष्टता नसेल तर वाघिणीला जिवंत पकडण्याऐवजी तिच्या जीवितास धोका निर्माण करणारी प्रक्रिया का राबविण्यात आली, असा सवाल वन्यजीवप्रेमींनी उपस्थित केला. वाघिणीला पकडल्यानंतर जवळचा उपलब्ध पर्याय असताना तिला सुमारे ४० किलोमीटर अंतरावरील मोर्शी येथे नेण्याचा निर्णय का घेण्यात आला? खानापूर येथे वाहन तब्बल दीड तास कोणत्या अधिकाऱ्याच्या प्रतीक्षेत थांबले होते? या विलंबादरम्यान वाघिणीच्या प्रकृतीवर काय परिणाम झाला, याची चौकशी झाली का? वाघिणीला मोर्शी येथे नेण्याचा निर्णय झाला होता, तर संबंधित वनपरिक्षेत्र अधिकारी आणि



पोलिस यंत्रणेला त्याची पूर्वकल्पना का देण्यात आली नाही? संवेदनशील वन्यप्राण्याची वाहतूक करताना स्थानिक यंत्रणांमध्ये समन्वय ठेवणे आवश्यक असताना तो का झाला नाही, असा प्रश्न उपस्थित होत आहे. मोर्शी येथील झेनिथ शाळा सुरू असताना बेशुद्ध अवस्थेतील वाघिणीला त्या परिसरात नेण्यात आल्याचा आरोप आहे. बेशुद्ध प्राण्याची प्रकृती अचानक बिघडू शकते किंवा तो अनपेक्षितपणे आक्रमक होऊ शकतो. अशा परिस्थितीत शाळकरी मुले परिसरात असताना हा धोका का पत्करण्यात आला? एखादा अनर्थ घडला असता तर त्याची जबाबदारी कोणाची असती. वाघिणीचा मृत्यू मोर्शी येथेच झाल्याचे सांगितले जात असेल, तर तिचा मृतदेह पुन्हा परतवाडा येथील टीटीसी केंद्रात का आणण्यात आला? मृत्यूनंतर मृतदेह हलविण्याचा निर्णय कोणी घेतला आणि त्यामागील अधिकृत कारण काय, याचा खुलासा करावा, अशी मागणी आहे. वाघिणीच्या उपचारासंदर्भात नागपूर येथील गोरेवाडा वन्यजीव केंद्राशी नेमका कोणता पत्रव्यवहार करण्यात आला? त्यामध्ये कोणते निर्देश देण्यात आले? आणि वाघिणीला परतवाडा येथील टीटीसीमध्ये आणल्यानंतर या केंद्राशी उपचार व पुढील कार्यवाहीबाबत आवश्यक समन्वय का करण्यात आला नाही? या प्रश्नांची उत्तरे अद्याप स्पष्ट झालेली नसल्याचा आरोप वन्यजीवप्रेमींनी केला आहे. वाघिणीच्या शवविच्छेदनावेळी संबंधित अधिकारी व कर्मचाऱ्यांना प्रक्रियेपासून का दूर ठेवण्यात आले? शवविच्छेदनाची संपूर्ण प्रक्रिया पारदर्शकपणे झाली का? त्याचे व्हिडिओ रेकॉर्डिंग, नमुने आणि अहवालाची नोंद उपलब्ध आहे का, याचाही खुलासा करावा, अशी मागणी करण्यात आली आहे. वाघिणीच्या मृत्यूचे नेमके वैद्यकीय कारण काय होते, तिला कोणती औषधे व उपचार देण्यात आले, भूल देण्याची प्रक्रिया कशी झाली, वाहतुकीदरम्यान कोणती खबरदारी घेण्यात आली आणि तिची प्रकृती कोणत्या टप्प्यावर खालावली, याची सविस्तर माहिती सार्वजनिक करण्याची मागणी वन्यजीवप्रेमींनी केली आहे. ही संपूर्ण घटना केवळ एका वाघिणीच्या मृत्यूपुरती मर्यादित न ठेवता, तिच्या पकडण्यापासून मृत्यूपर्यंतच्या प्रत्येक टप्प्याची स्वतंत्र आणि निष्पक्ष चौकशी करावी. चौकशीत वन विभागाचे अधिकारी, कर्मचारी किंवा संबंधित अशासकीय संस्थांची हलगर्जीपणा अथवा नियमबाह्य कार्यवाही आढळल्यास संबंधितांवर कठोर कारवाई करावी, अशी मागणी जोर धरत आहे. वाघिणीच्या उपचारासंदर्भात नागपूर येथील गोरेवाडा वन्यजीव केंद्राशी वन विभागाने नेमका कोणता पत्रव्यवहार केला, याचा तपशील सार्वजनिक करण्याची मागणी वन्यजीवप्रेमींनी केली आहे. गोरेवाड्याकडून काही वैद्यकीय अथवा उपचारासंबंधी निर्देश देण्यात आले होते का? असल्यास त्यांची अंमलबजावणी झाली का, याचेही उत्तर आवश्यक आहे. विशेष म्हणजे वाघिणीला उपचारासाठी परतवाडा येथील टीटीसी (वन्यजीव) केंद्रात आणण्यात आले होते. पुढील कार्यवाहीबाबत आवश्यक अधिकृत पत्रव्यवहार व समन्वय का करण्यात आला नाही, असा सवाल उपस्थित करण्यात आला आहे. गोरेवाडा आणि टीटीसी यांच्यातील समन्वय नेमका कसा झाला? कोणाच्या आदेशाने वाघिणीला कुठे हलविण्यात आले? उपचाराचा निर्णय कोणी घेतला? या सर्व बाबींची कागदपत्रांसह चौकशी झाली तरच वाघिणीच्या मृत्यूमागील वस्तुस्थिती स्पष्ट होईल, असे वन्यजीवप्रेमींचे म्हणणे आहे. संबंधित पत्रव्यवहार, आदेश, वैद्यकीय नोंदी आणि निर्णय प्रक्रियेची तपासणी करून नेमकी जबाबदारी निश्चित करावी, अशी मागणी करण्यात आली.

# १ व १० वरिल उर्वरित

## आश्रमशाळेत विद्यार्थिनीचा मृत्यू;

दिल्यानंतर प्रशासनाने तातडीने हस्तक्षेप करत तीन कर्मचा-यांच्या निलंबनाचे आदेश दिले. कळवण एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्पांतर्गत विसापूर शासकीय आश्रमशाळा येते. श्रु तीला शाळेत असताना ताप आल्याने प्राथमिक उपचार करण्यात आले. त्यानंतर तिला मोकभगणी येथील प्राथमिक आरोग्य केंद्रात उपचारासाठी दाखल करण्यात आले. उपचारानंतर प्रकृती सुधारल्याने ती पुन्हा शाळेत आली. मात्र, त्याच रात्री तिची प्रकृती पुन्हा खालावली आणि तिचा मृत्यू झाला.श्रु तीचा मृतदेह शवविच्छेदनासाठी नाशिकच्या जिल्हा शासकीय रु ग्णालयात आणण्यात आला. या घटनेची माहिती मिळताच पालक आणि आदिवासी युवक मोठ्या संख्येने रु ग्णालयात दाखल झाले. श्रु तीच्या मृत्यूस कारणीभूत अधिकारी आणि कर्मचा-यांवर तातडीने कारवाई करावी, अशी मागणी करत कारवाई होईपर्यंत मृतदेह ताब्यात घेणार नसल्याची भूमिका पालकांनी घेतली. मृतदेह थेट आदिवासी आयुक्तालयात नेण्याची तयारीही व्यक्त करण्यात आली.

## राज्यातील भरती परीक्षांमध्ये

(विभागीय आयुक्त, नाशिक विभाग) - सदस्य, एअर मार्शल अजित शंकरराव भोसले (सेवानिवृत्त) (माजी सदस्य, छच्छ्व) - सदस्य, प्रा. श्यामप्रसाद करगट्टु (प्राध्यापक, आयआयटी मुंबई) - सदस्य यांची या समितीमध्ये नियुक्ती करण्यात आली आहे.प्रश्नपत्रिका छपाई, डिजिटल वितरण, वाहतूक, परीक्षा केंद्रांवरील सुरक्षा आणि ऑडिट ट्रेल तपासणीसाठी कडक मानके ठरवणे. तसेच तोतया उमेदवारांना रोखण्यासाठी प्रवेश नियंत्रण, बायोमेट्रिक प्रमाणीकरण आणि डिजिटल देखरेखीबाबत शिफारसी करणे. देशातील इतर राज्यांमध्ये आणि परदेशात राबवल्या जाणा-या सर्वोत्तम परीक्षा प्रणालींचा अभ्यास करणे. यासह समिती राज्यातील प्रत्येक महसुली मुख्यालयाला भेट देउन स्पर्धा परीक्षेतील विद्यार्थी, शैक्षणिक संस्था आणि संबंधित घटकांशी थेट चर्चा करून त्यांच्या सूचना जाणून घेणार आहे. हा अभ्यास आणि सल्लामसलत पूर्ण झाल्यानंतर समिती आपला अंतिम अहवाल राज्य शासनास सादर करणार आहे.

## धोत्रा शेतशिवारात बिबट्याने केली

महिला मजुरांची रस्त्याने वर्दळ असते. रात्रीच्या वेळी सुद्धा पिकांची वन्यप्राण्यांपासून सुरक्षा करण्यासाठी शेतकऱ्यांना शेतात यावे लागते. त्यामुळे वन विभागाने तातडीने सुरक्षेच्या उपाययोजना राबवण्याची मागणी केली आहे. शिवाय धोत्रा गाव सुद्धा घटनेच्या स्थळापासून जवळच असल्याने ग्रामस्थांनी सुरक्षेच्या दृष्टीने खबरदारी घेण्याचे आवाहन माळेगाव वन कर्मचाऱ्यांनी केले आहे. यावेळी सामाजिक कार्यकर्ते प्रशांत कांबळे,धोत्रा ग्रामपंचायतीचे सरपंच भूषण गाठे, पोलीस पाटील राम सावंत, ग्रामस्थ प्रवीण काळे, सूरज काळे, नितीन इंगोले, गजानन ठाकरे, प्रकाश काळे, मंगेश ढोबळे, मुकुंदराव काळे, अशोकराव निंभोरकर, विवेक ठाकरे यांच्यासह ग्रामस्थांची मोठी गर्दी होती.

## सहकारी संस्था नियमाला

न्यायालयासमोर मांडण्यात आला. याचिकाकर्त्यां तर्फे ज्येष्ठ विधिज्ञ एम.जी. भांगडे यांनी बाजू मांडली. पुढील सुनावणी २२ सप्टेंबर रोजी होणार आहे.महाराष्ट्र सहकारी संस्था कायद्यातील कलम ७३एएए(३) हे निवडून आलेल्या व्यवस्थापन समितीच्या कार्यकाळाशी संबंधित आहे. यापूर्वी, समितीची मुदत संपल्या नंतरही निवडणूक ही समिती सदस्यांच्या चुकीमुळे रखडलेली नसेल, तर नवीन समिती स्थापन होईपर्यंत विद्यमान समितीला कामकाज सुरू ठेवण्याची तरतूद होती. मात्र, १५ एप्रिल २०२६ रोजी करण्यात आलेल्या दुरुस्ती नंतर ही सवलत ‘टाइप-ए’ सहकारी संस्थांच्या व्यवस्थापन समित्यांना लागू राहणार नाही. त्यामुळे अशा संस्थेच्या समितीची मुदत संपल्यानंतर तिच्या सदस्यांना नवीन समिती येईपर्यंत पदावर कायम राहण्याचा पूर्वीचा लाभ मिळणार नाही. याच बदलालाच याचिकेत आव्हान देण्यात आले आहे. याचिका कर्त्यांचा मुख्य आक्षेप आहे की, ‘टाइप-ए’सह सहकारी संस्थांचे वर्गीकरण २०१४ च्या निवडणूक अधिसूचनेमध्ये करण्यात आले आहे. त्यामुळे त्यातील वर्गीकरणाच्या आधारे केवळ एका प्रकारच्या संस्थांना कायद्यातून वेगळी वागणूक देता येईल का, हा प्रश्न न्यायालयासमोर उपस्थित करण्यात आला आहे.

## शेत विहिरीत आढळला मनोरुग्ण

सध्या काट आमला येथे आपले मामा सुधीर वाडे यांच्या घरीच राहत होता. सर्वात धक्कादायक आणि दुःखद बाब म्हणजे ज्या शेताच्या विहिरीत त्याचा मृतदेह आढळला आहे, ते शेत दुसऱ्या कोणाचे नसून त्याच्याचे मामा सुधीर वाडे यांचेच असल्याचे सांगण्यात येत आहे. घराजवळच असलेल्या शेतातील विहिरीत मृतदेह आढळल्याने कुटुंबावर दुःखाचा डोंगर कोसळला असून नातेवाईकांचा आक्रोश सुरू आहे.घटनेची माहिती मिळताच स्थानिक प्रशासन आणि सुरक्षा यंत्रणा तात्काळ सक्रिय झाली. घटनास्थळी पोहोचलेल्या अग्निशमन दलाच्या पथकाने अथक परिश्रम करून विहिरीच्या पाण्यातून मृतदेह बाहेर काढला आणि पोस्टमार्टम साठी पाठवला आहे. पोस्टमार्टम अहवाल आल्यानंतर मृत्यूचा नेमका कारण स्पष्ट होणार. बडनेरा पोलिसांनी या प्रकरणी मर्ग दाखल करून सखोल तपास सुरू केला आहे. बडनेरा ठाण्याचे पोलीस कर्मचारी प्रमोद सायरे आणि रोशन निसर्ग यांनी घटनास्थळावर पोहोचून परिस्थितीचा आढावा घेतला.

## आरोग्य उपसंचालक, सीएस,

दरम्यान शासन नियुक्त ११ सदस्यीय समितीने घटनास्थळाची पाहणी, चौकशी, संबंधितांचे जबाब नोंदविले व २६ पानांचा अहवाल सोमवारी सचिवांना व मंगळवारी आरोग्य मंत्री प्रकाश आबिटकर यांना सादर केला. शासन नियुक्त समितीमध्ये पहिल्यांदा एका अशासकीय सदस्याचा समावेश करण्यात आला आहे. उच्चस्तरीय चौकशी समितीच्या अहवालात रुग्णालय प्रशासन, सार्वजनिक बांधकाम विभाग आणि उपकरण पुरवठादार कंपनी यांच्यावर गंभीर ठपका ठेवून कारवाईची शिफारस केली होती. त्याअनुषंगाने आरोग्य विभागाने ही कारवाई केली आहे. ही दुर्घटना शिलर कंपनीची सदोष उपकरणे, फायर सिस्टीमच्या वापरा बाबत रुग्णालय प्रशासनाचा हलगर्जीपणा, उपकरणे देखभाल दुरुस्तीसाठी नियुक्त सेवा पुरवठादाराचा हलगर्जीपणा, आपत्कालीन परिस्थिती हाताळण्यासाठी रुग्णालयीन कर्मचाऱ्यांना आवश्यक प्रशिक्षणाचा अभाव यामुळे घडल्याचे मत समितीने नोंदवले आहे. याशिवाय उपकरण पुरवठाधारक शिलार कंपनी व देखभाल कंत्राटदार एओवी कंपनी वरही कायदेशीर व करारात्मक कार्यवाही ची शिफारिश केली आहे.

**कर्मचाऱ्यांनी बंद केला फायर अलार्म सिस्टीम**

चौकशी दरम्यान एक धक्कादायक बाब समोर आली. रुग्णालयात वारंवार वाजणाऱ्या अलार्ममुळे कामात व्यत्यय येतो म्हणून कर्मचाऱ्यांनी ‘फायर अलार्म सिस्टीम’ व ‘स्प्रिंकलर’ बंद करून ठेवले होते. याच बेफिकिरीमुळे २४ ऑगस्टच्या पहाटे भीषण आग लागूनही अलार्म वाजलाच नाही आणि स्प्रिंकलरमधून पाणी मारले गेले नाही.

**दोन कंपन्यांवर ‘ब्लॅकलिस्ट’ची कारवाई**

चौकशी समितीच्या अहवाला नुसार मेसर्स एओव्ही इंटरनॅशनल एलएलपी ही कंपनी दोषी आढळल्याने तिला काळ्या यादीत टाकण्याची कारवाई करण्याचे निर्देश देण्यात आले आहेत. तसेच शिलार कंपनीच्या सेवां मध्येही प्रथमदर्शनी दोष आढळून आल्याने फॉरेन्सिक अहवाल तातडीने प्राप्त करून संबंधित कंपनीलाही काळ्या यादीत टाकण्याची कारवाई करण्याचे निर्देश देण्यात आले आहेत.

## अमरावतीतील वाघिणीच्या

होते. दूरदृश्य प्रणालीद्वारे आमदार राजेश वानखडे, प्रवीण तायडे, केवलराम काळे, अमरावतीचे जिल्हाधिकारी आशिष येरेकर, अमरावती वन विभागाचे मुख्य वनसंरक्षक जयोती बॅनर्जी तसेच वरिष्ठ अधिकारी सहभागी झाले होते. वन्यप्राण्यांच्या हल्ल्यांमुळे नागरिकांमध्ये निर्माण होणारी भीती आणि संभाव्य जीवितहानी टाळण्यासाठी वन विभागाने अतिरिक्त मनुष्यबळासह २४ तास कार्यरत ‘स्मार्ट स्क्वाड’ तयार करावे. नागरिकांकडून किंवा सोशल मीडियाच्या माध्यमातून वन्यप्राण्यांच्या वावराची माहिती प्राप्त होताच वन विभागाची यंत्रणा तातडीने सतर्क होऊन घटनास्थळी पोहोचली पाहिजे. यासाठी केंद्रीकृत नियंत्रण कक्ष आणि तात्काळ माहिती पोहोचविणारी प्रभावी यंत्रणा उभारण्याची गरज असल्याचे वनमंत्री नाईक यांनी सांगितले. बिबट्या अथवा वाघाच्या बचावासाठी आवश्यक असलेले पिंजरे, मनुष्यबळ आणि इतर साधने युद्धपातळीवर उपलब्ध करून द्यावीत. संभाव्य घटना घडण्यापूर्वीच वन्यप्राण्यांचा बचाव व सुरक्षित स्थलांतर करण्यासाठी प्रभावी कार्यवाही करावी. वन्यप्राण्यांच्या हालचालींची माहिती मिळाल्यानंतर विलंब न करता संबंधित पथकांनी घटनास्थळी पोहोचून परिस्थिती नियंत्रणात आणावी, असे निर्देशही त्यांनी दिले. नागरिकांच्या जीवितहानीनंतर मदत देण्यापेक्षा दुर्घटना रोखणे अधिक महत्त्वाचे आहे. भविष्यात अशा प्रकारचा कोणताही अनुचित प्रकार घडू नये, यासाठी वन विभागाने आवश्यक ती सर्व प्रतिबंधात्मक कार्यवाही करावी. या कार्यवाहीसाठी शासन वन विभागाच्या पाठीशी पूर्णपणे उभे आहे, अशी ग्वाही वनमंत्री गणेश नाईक यांनी दिली.

## रेस्क्यू व सुरक्षिततेला प्राधान्य

दरम्यान नागरिकांच्या सुरक्षिततेची विशेष काळजी घ्यावी आणि कोणत्याही परिस्थितीत नागरिकांवर हल्ला होणार नाही, यासाठी यंत्रणा पूर्णपणे सतर्क ठेवावी, असे त्यांनी सांगितले. वडाडा येथील रेस्क्यू सेंटर तातडीने सक्रिय करावे. वन्यप्राणी रेस्क्यू मोहिमेसाठी आवश्यक मनुष्यबळ, सुरक्षा व्यवस्था आणि इतर साधनसामग्री पुरेशा प्रमाणात उपलब्ध करून द्यावी. कोणत्याही परिस्थितीत मनुष्यबळ किंवा सुरक्षा व्यवस्थेत कमतरता राहणार नाही, याची दक्षता घ्यावी, असेही त्यांनी निर्देशित केले. रेस्क्यू मोहिमेदरम्यान ज्या शेतकऱ्यांचे नुकसान झाले आहे, त्या नुकसानीचे पंचनामे करून नुकसानभरपाईचा प्रस्ताव तयार करावा. जिल्हाधिकारी आणि संबंधित मुख्य वनसंरक्षक यांनी संयुक्तपणे नुकसानीचा प्रस्ताव तयार करून शासनाकडे तातडीने पाठवावा. रेस्क्यूदरम्यान झालेल्या नुकसानीची क्षेत्रनिहाय व हेक्टरनिहाय माहिती प्रस्तावासोबत सादर करावी, असेही महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी सांगितले. नागरिकांची सुरक्षितता, वन्यप्राण्यांचा तातडीने बचाव आणि बाधित शेतकऱ्यांना योग्य नुकसानभरपाई या तिन्ही बाबींना प्राधान्य देऊन संबंधित यंत्रणांनी समन्वयाने तातडीने कार्यवाही करावी, असे निर्देश बैठकीत देण्यात आले.

## आझाद हिंद मंडळात साकारणार

साकारल्या होत्या. उत्सव काळात सांस्कृतिक कार्यक्रम, नाटक, कवी संमेलन, व्याख्यान, वाद-विवाद स्पर्धांचेही आयोजन केले जाते. पत्रकार परिषदेला माजी महापौर विलास इंगोले, नगरसेवक दीपक शाहू सम्राट, अनिल अग्रवाल, डॉ. किशोर फुले, माजी खासदार अनंत गुढे, विवेक कलोती, संतोष बद्रे, सुरेश रतावा शैलेश अग्रवाल, गणेश मालोकार, चंद्रशेखर डोरले यांच्यासह पदाधिकारी उपस्थित होते.**१४ सप्टेंबरला भव्य शोभायात्रा**गणेश स्थापनेची भव्य शोभायात्रा १४ सप्टेंबर रोजी दुपारी ३ वाजता निघणार आहे. राजकमल चौक येथे महाआरती होणार असून, महागायक अनिरुद्ध जोशी यांच्या हस्ते गीताचे महालाँचिंग होणार आहे. याशिवाय १०० स्वयंसेवकांचे लेझीम पथक, १०० मुलींचा टिपरी नृत्य, १०० महिलांचे पायी भोजन पथक, ढोल-ताशे, दिंडी हे शोभायात्रेचे प्रमुख आकर्षण असणार आहे. १५ सप्टेंबर गुरुवार रोजी सायंकाळी ७ वाजता झांकीचे शुभारंभ करण्यात येईल.**१९ सप्टेंबरला श्याम कीर्तन**उत्सवाअंतर्गत १६ सप्टेंबर रोजी सायंकाळी ६ वाजता मंत्री संजय राठोड यांच्या हस्ते महाआरती होईल. त्यानंतर सायंकाळी ७.३० वाजता ’सुर ताल भक्तीरंग’ कार्यक्रम सादर होईल. शनिवार १९ सप्टेंबर रोजी सायंकाळी श्याम कीर्तन, रविवार २० सप्टेंबर रोजी हिंदी-मराठी कविता सादरीकरण, सोमवार २१ सप्टेंबर रोजी हिंदी-मराठी गीतांचा कार्यक्रम तर २२ सप्टेंबर रोजी नाट्य महोत्सवाचे आयोजन करण्यात आले आहे. २५ सप्टेंबर रोजी तीर्थप्रसादाने उत्सवाचे समापन होणार.

## अमरावतीच्या विद्यार्थ्याचा पुण्यात

झाला. अपघाता नंतर त्याला तात्काळ जवळच्या रुग्णालयात उपचारासाठी नेण्यात आले, मात्र डॉक्टरांनी तपासणीनंतर त्याला मृत घोषित केले. रात्री २.३० वाजता रुग्णालयातील डॉक्टरांनी फोन करून अर्पितचे वडील प्रवीण येवतीकर यांना अपघाताची माहिती दिली. मुलाच्या मृत्यूची बातमी मिळताच कुटुंबावर दुःखाचा डोंगर कोसळला. पुण्यातील रुग्णालयात शवविच्छेदन झाल्यानंतर आज बुधवार, ९ सप्टेंबर रोजी दुपारी अर्पितचे पार्थिव अमरावतीला आणले. त्यानंतर चिमोटे लेआऊट, दस्तुर नगर येथील त्यांच्या निवासस्थानापासून, गोंडबाबा मंदिराच्या मागे, गुणवंत लॉन समोरील निवासस्थानापासून अंत्ययात्रा काढण्यात आली. त्याच्या पार्थीवर सायंकाळी अंतिम संस्कार करण्यात आले. या घटनेमुळे चिमोटे लेआऊट परिसर आणि विद्यापीठात शोक व्यक्त केला जात आहे.

**गणेशोत्सवासाठी येणार होता अर्पित घरी**

कुटुंबीयांच्या माहिती नुसार, अर्पित येत्या शनिवारी गणेशोत्सवासाठी पुण्याहून अमरावतीला येणार होता. कुटुंब आणि नातेवाईक त्याच्या घरी परतण्याची वाट पाहत होते, मात्र त्यापूर्वीच त्याच्या मृत्यूची दुःखद बातमी आली. अर्पितच्या अकस्मात मृत्यूमुळे कुटुंब, मित्र आणि परिचितांमध्ये शोककळा पसरली आहे.

## पॅराडाईज कॉलनी मध्ये आढळला

कामा निमित्त अमरावतीत आला होता. नितीन पॅराडाईज कॉलनी चौका जवळील एका बंद दुकानासमोर आराम करत होता. त्याच दरम्यान त्याचा मृत्यू झाला. काही वेळाने नागरिकांचे लक्ष त्याच्या मृतदेहाकडे गेले, त्यानंतर पोलिसांना याची माहिती देण्यात आली.माहिती मिळताच नागपुरी गेट पोलिसांनी घटनास्थळी धाव घेत पंचनामा केला व मृतदेह ताब्यात घेऊन शवविच्छेदना साठी इर्विन रुग्णालयात पाठवला आहे.युवकाचा मृत्यू नेमका कशामुळे झाला हे अद्याप स्पष्ट झालेले नाही. शवविच्छेदन अहवाल आल्यानंतरच मृत्यूचे खरे कारण समोर येणार आहे. सध्या नागपुरी गेट पोलीस या प्रकरणाचा अधिक तपास करत आहेत.

MAHATRANSCO

**E-TENDER NOTICE**

MSETCL invites online bids (SRM e-Tender) from registered agencies on MSETCL's e-Tendering website. For further details please visit our website: https://srmetender.mahatransco.in

| Sr. No. | Tender No. & Description of Work |
|---|---|
| 1 | Work of Construction of revetment/protection wall at location no. 08 and 07 of 220 kV Balapur - Malkapur Line under EHV LMSD, Khamgaon under EHV O&M Division, Buldhana. (1st Call) RFX No. 7000041463<br>Tender No.: MSETCL/SE/EHV/O&M/CRL/AKL/Tech/2026-27/T-14-Revetment/protection wall<br>Estimated Cost = Limited to Rs. 34,18,189.00/- |

| Publicity period of tender | Tender Available at |
|---|---|
| Start Date:- From:- 10/09/2026 @ 00:00 Hrs onwards | https://srmetender.mahatransco.in |
| Submission Deadline :- | Tender Opening Date : - |
| 19/09/2026 @ up to 23:59 Hrs. | Technical Bid: Date : 20/09/2026, 11:00 Hrs. if possible.<br>Price Bid: Date : 20/09/2026, 12:00 Hrs, if possible. |

Contact Person: The Dy. Executive Engineer, EHV O&M Circle, AKOLA.
Contact No.: 8554989534 (Dy. Executive Engineer), e-mail id: se1200@mahatransco.in

1. Relevant portions of the tender which the bidders have to fill up, would be available online on above said website.
2. EMD amount of Rs. 34,181.89/- and Tender Fees Rs. 500 + GST as applicable (per tender & non refundable) should be paid on-line only. Payment in cash/DD will not be accepted. Bidder can pay through credit card/Debit Card/ Net Banking. The payment confirmation will be done by the Corporate Office.
3. Tender documents can be downloaded only online from above-said website.
4. Eligible bidders shall submit their bids well in advance instead of waiting till last date. MSETCL will not be responsible for non-submission of Bid due to any website related problems.
5. If the payment of tender fee and EMD by a bidder is not confirmed, then the bidder will be straight-way disqualified and his bids will not be considered for further tendering process.

Note: All eligible & interested bidders are mandated to get enrolled on SRM e-Tendering portal. (https://srmetender.mahatransco.in/)

Sd/-
SUPERINTENDING ENGINEER
EHV O&M CIRCLE, AKOLA

**निवासी नायब तहसिलदार, चांदूर बाजार यांचे कार्यालय**
**मेन रोड, अमरावती, ता.चांदूर बाजार, जि.अमरावती - ४४४८०४**

**जाहीरनामा**

ज्याअर्थी या महसुल न्यायालयात अर्जदार **श्री मुकुंद रामराव उर्फ नानासाहेब मोहोड रा.कुरळ पुर्णा** यांनी मौजा-कुरळपुर्णा ता.चांदूर बाजार, जि.अमरावती येथील शेत स.नं. ६२, गट नं.५४ मधील क्षेत्र १.१९ हे.आर. भोगवटदार वर्ग -१ सदर जमीन श्री गुणवंतराव मारोतराव मोहोड रा.कुरळपुर्णा यांचे नावे होती. सदर जमीन खरेदी आधारे सन १९७९ मध्ये श्री रामराव बापुराव मोहोड रा.कुरळपुर्णा यांनी पुर्ण क्षेत्र १.१९ हे आर. खरेदी केली असून रामराव बापुराव मोहोड यांचे नावे ७/१२ वर १.१९ हे.आर.एवढे क्षेत्र असणे अपेक्षित होते.परंतु आज रोजी गट क्र.१४, तत्का.स.नं.६ वर रामराव बापुराव मोहोड यांचा मुलगा मुकुंद रामराव उर्फ नानासाहेब मोहोड यांचे नावे ०.९५ आर व **हिम्मत पंजाबराव देशमुख** यांचे नावे ०.२४ आर.एवढे क्षेत्र आहे. सदर ७/१२ वरील **हिम्मत पंजाबराव देशमुख** हे नाव चुकीने आले आहे असे अर्जदार यांचे म्हणणे आहे. करिता **हिम्मत पंजाबराव देशमुख** हे नाव ७/१२ वरुन कमी करण्याबाबत अर्जदार यांनी तहसिल कार्यालय, चांदूर बाजार येथे प्रकरण दाखल केले आहे. त्याकरिता संबंधितांनी अर्जासोबत शेत स.नं. ६२, गट नं.१४ या शेताचा हस्तलिखीत ७/१२, ऑनलाईन ७/१२,फेरफार नक्कलची प्रत, हक्क,नोंदणी प्रत, जमीन एकत्रिकरण पत्रक,आधार कार्ड च्या छायांकित प्रती इ.दस्ताऐवज दाखल केले आहे.

त्याअर्थी या बाबतीत ज्या कोणालाही काही आक्षेप/हरकत असेल, तर त्यांनी जाहीरनामा प्रसिध्द झाल्यापासून १५ (पंधरा) दिवसाचे आंत आपले आरोप/हरकत लेखी स्वरुपामध्ये कार्यालयीन वेळेवर कार्यालयामध्ये दाखल करावे. मुदतीनंतर प्राप्त झालेल्या आक्षेप/हरकतीचा विचार केला जाणार नाही याची नोंद घ्यावी.

**सही/-**
शिक्का
**नायब तहसीलदार,चांदूर बाजार**

# जाहीर नोटीस

सर्व सामान्य लोकांना सुचित करण्यात येते की मी, माझे पक्षकार नामे **श्री.जितेश जगदीश साहू** यांचे वतीने सदर जाहीर नोटीस देतो ती येणेप्रमाणे,

**मिळकतीचे वर्णन - मौजे - गावठाण, अमरावती, नझुल शीट क्र.69-D मधील नझुल क्र.28 10/1, मालमत्ता क्र.92/37, वार्ड क्र.19, लेआउट प्लॉट क्र.4-A. यावर असलेले अग्रवाल टॉवर्स मधील तिस-या मजल्यावरील फ्लॅट क्र.303 , ता.आणि जिल्हा.अमरावती .**

सदर मिळकत माझे पक्षकार नामे **श्री. जितेश जगदीश साहू हे निकीता देवेंद्र साहू** यांच्याकडून विकत घेण्याचा सौदा झालेला आहे. त्यानंतर जितेश जगदीश साहू यांनी **ICICI HFC LTD.** येथे गृह कर्जासाठी अर्ज केला असता, **सदर मिळकतीचे मूळ खरेदीखत दि.13/02/2006 रोजीचे दस्त क्र.424 हे मूळ दस्त गहाळ झालेले आहे.** तसेच सदर खरेदीखत कोणाला सापडल्यास किंवा कुठे गहाण, पतसंस्था/राष्ट्रीयकृत/सहकारी अथवा खाजगी बँक, संस्था बोजा, या मालमत्तेविषयी शासकीय-निमशासकीय काही भानगड, कोणाचा मालकी किंवा वारस हक्क असल्यास, इतर कोणती हरकत असल्यास त्यांनी खाली दिलेल्या माझ्या मोबाईल क्र.वर ही जाहीरात प्रसिध्द झाल्याच्या **7 दिवसांच्या** आत पुराव्यानिशी हरकत नोंदवावी. तद्नंतर कोणतीही हरकत ग्राह्य धरल्या जाणार नाही, आणि सदर दोन्ही मालमत्ता हया **ICICI HFC LTD.** येथे गहाण करण्यात येईल करीता ही जाहीर सूचना देत आहे.

**ठिकाण- अमरावती**
**दि.08/09/2026**

शिक्का

**आपला,**
***ADVOCATE***
**रवींद्र रु.वाटाणे,**
**स्नेहगंधा कॉलनी, अमरावती**
**मो.नं. 9823698745**

**दिवाणी न्यायालय, वरिष्ठ स्तर, अमरावती**
**वि.श्री.आर.आर.खामतकर, ३ रे सह दिवाणी न्यायाधीश वरीष्ठ स्तर**
**अमरावती यांचे न्यायालयात**

**किरकोळ अर्ज क्र.१७०२/२०२६**
**रुखसाना वि निरंक**
**पुढील ता.१९.०९.२०२६**

**जाहीरनामा/सायटेशन**

**अर्जदार :-** १. **रुखसाना बी राजीक खान**
वय ५१ वर्षे, व्यवसाय- गृहिणी
रा.बकरा कमला जवळ, कमेला ग्राउंड,
अमरावती- ४४४६०१

**विरुध्द**

**निरंक**

सर्वत्र लोकांस सुचित करण्यात येते की, **मयत जयतून बी रफिक खा** हया **दि.२३.०३.२०२५** रोजी अमरावती येथे मयत झाल्या. अर्जदार **रुखसाना बी राजीक खान** यांनी वरीलप्रमाणे या कोर्टात सदर्हु मयत यांचे वारसाचे प्रमाणपत्र मिळण्याबाबत **APPLICATION UNDER SECTION 2 OF BOMBAY REGULATION ACT CLAUSE VIII OF 1827 FOR GRANT OF LEGAL HEIRSHIP CERTIFICATE** प्रमाणे अर्ज दाखल केलेला आहे.

त्यापेक्षा **रुखसाना बी राजीक खान** वरीलप्रमाणे सदर्हु मयतांचे वारसदार नव्हे असे कोणास समजावण्याचे असेल तर या जाहीरनाम्याचे प्रसिध्दीच्या तारखेपासून एक महिन्याचे आत त्याने या कोर्टात हजर होवून आपल्या हरकती कळवाव्यात आणि या लेखावरुन असे कळविण्यात येते की, जर सदर्हु मुदतीत कोणी योग्य हरकत न दाखविल्यास सदर्हु कोर्ट अर्जदार यांचे हक्काबद्दल लागलीच पुरावा घेवून त्यांचा हक्क साबीत दिसल्यास त्यांना सदर्हु मयत यांचे वारसाचे प्रमाणपत्र देण्यात येईल.

आज दिनांक **२४.०८.२०२६** रोजी माझ्या सहीने व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले.

शिक्का

**आदेशानुसार,**
**सहायक अधीक्षक**
**दिवाणी न्यायालय वरिष्ठ स्तर,**
**अमरावती**

# जनमाध्यम

एक प्रतिष्ठित सवय

अकोला । वाशिम । बुलडाणा

■ गुरुवार, १० सप्टेंबर २०२६ ■ मूल्य ३.०० ■ पृष्ठे ४

paper : www.janmadhyam.com
mail : Jmakola.thakur@gmail.com


# जलसंधारणात पहिला क्रमांक : तरी रुधाडी तहानलेली!

## पुरस्काराच्या गावात पाण्यासाठी ६०० मीटरची पायपीट; 'विकास' नेमका कुठे थांबला?



■ प्रतिनिधी | अकोट ■

फोटोमध्ये विकासष्ठ पुरस्कारात गौरवष्ठ आणि प्रत्यक्षात डोक्यावर हंडा! अकोट तालुक्यातील पोपटखेड गट ग्रामपंचायतीअंतर्गत येणाऱ्या रुधाळी गावातील सध्याचे चित्र विकासाच्या दाव्यांना आरसा दाखवणारे ठरत आहे.

जलसंधारणाच्या कामासाठी पाणी फाउंडेशनच्या उपक्रमात तालुक्यात प्रथम क्रमांक मिळविणाऱ्या रुधाळी गावातील नागरिकांवर आज पिण्याच्या पाण्यासाठी ५०० ते ६०० मीटर दूर असलेल्या विहिरीवर जाण्याची वेळ आली आहे. गेल्या सात ते दहा दिवसांपासून गावात पाणीटंचाई निर्माण झाल्याने महिलांसह नागरिकांची पाण्यासाठी अक्षरशः वणवण सुरू आहे.

एकीकडे जलसंधारणाच्या कामाचा पुरस्कार मिरवायचा आणि दुसरीकडे गावकऱ्यांनी पाण्यासाठी विहिरीपर्यंत पायपीट करायची हा विकासाचा कोणता नमुना? असा यक्षप्रश्न या निमित्ताने उपस्थित झाला आहे.

रुधाळीच्या जलसंधारणाच्या कामाचे कौतुक झाले. पुरस्कार मिळाला. गावाच्या विकासाची प्रतिमा तयार झाली. मात्र आज मूलभूत गरज असलेल्या पिण्याच्या पाण्यासाठीच ग्रामस्थांना संघर्ष करावा लागत असेल, तर पुरस्कारानंतर गावाच्या जलव्यवस्थापनाची प्रत्यक्ष स्थिती तपासण्याची गरज निर्माण झाली आहे. शंभर टक्के आदिवासी लोकवस्ती असलेल्या गावातील नागरिकांना पाण्यासारख्या मूलभूत सुविधेसाठी संघर्ष करावा लागत असल्याने प्रशासनाच्या नियोजनावर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे.

पाणीटंचाई निर्माण होऊन सात ते दहा दिवसांचा कालावधी उलटला. तरीही कायमस्वरूपी उपाययोजना झाल्या नसल्याचा ग्रामस्थांचा आरोप आहे. तात्पुरते पाणी आणणे हा उपाय नाही. गावातील उपलब्ध जलस्त्रोत, विहिरींची पाणीपातळी, पाणीपुरवठा यंत्रणा आणि भविष्यातील पाण्याचे नियोजन याचा प्रशासनाने एकत्रित आढावा घेणे गरजेचे आहे. कारण प्रश्न केवळ आजच्या हंड्याचा नाही; उद्या गावात पाणी उरणार आहे का, हा खरा प्रश्न आहे.

### पाणीटंचाईमागे खदानींचा 'हात' तर नाही ना?

रुधाळीतील पाणीटंचाईचा प्रश्न केवळ पाणीपुरवठा यंत्रणेपुरता मर्यादित आहे का, याबाबतही आता चर्चा सुरू झाली आहे. परिसरातील खदान उत्खनन आणि ब्लास्टिंगमुळे भूजल पातळीवर परिणाम होत असल्याचा आरोप स्थानिक नागरिकांकडून करण्यात येत आहे. रुधाळी आणि गाजीपूर परिसरातील काही खदानी मंजूर मर्यादेपेक्षा अधिक खोलीपर्यंत खोदल्या गेल्याचा आरोप करण्यात येत आहे. त्याचबरोबर खदान परिसरात होत असलेल्या ब्लास्टिंगमुळे भूगर्भातील पाण्याच्या प्रवाहावर परिणाम झाल्याची शक्यता ग्रामस्थ व्यक्त करीत आहेत. परिसरातील अनेक विहिरींची पाणीपातळी खालावली असून, काही विहिरी आटल्याचे तर काही आटण्याच्या मार्गावर असल्याचे ग्रामस्थांचे म्हणणे आहे.

### ब्लास्टिंगचा पोपटखेड धरणालाही धोका?

रुधाळी व गाजीपूर परिसरातील खदानांमध्ये सुरू असलेल्या ब्लास्टिंगमुळे जवळच असलेल्या पोपटखेड धरणावरही परिणाम होत असल्याचा आरोप नागरिकांनी केला आहे. धरणाच्या सुरक्षेवर प्रत्यक्ष परिणाम झाला आहे किंवा नाही, हे तांत्रिक तपासणीतूनच स्पष्ट होऊ शकते. मात्र नागरिकांकडून असा आरोप होत असल्याने प्रशासनाने याची गांभीर्याने दखल घेण्याची गरज आहे. खदानांची खोली, उत्खननाची परवानगी, ब्लास्टिंगसाठीच्या अटी, भूजल पातळीतील बदल आणि धरणाची सुरक्षितता याबाबत संबंधित विभागांनी संयुक्त पाहणी करून वस्तुस्थिती समोर आणावी, अशी मागणी होत आहे.

### सात प्रश्न, ज्यांची उत्तरे आता प्रशासनाने द्यावीत!

१. रुधाळी परिसरातील खदानी किती खोलीपर्यंत खोदल्या आहेत?
२. त्यांना मंजूर उत्खनन मर्यादा किती आहे?
३. ब्लास्टिंगसाठी आवश्यक परवानग्या आणि सुरक्षा निकष पाळले जात आहेत का?
४. गेल्या काही वर्षांत परिसरातील विहिरींच्या भूजल पातळीत किती घट झाली?
५. खदान उत्खनन व भूजल पातळी यांचा काही संबंध आहे का?
६. पोपटखेड धरणावर ब्लास्टिंगचा काही परिणाम झाला आहे का?
७. पाणी फाउंडेशनच्या पुरस्कारानंतर गावातील जलस्त्रोतांची प्रत्यक्ष स्थिती काय आहे? या सात प्रश्नांची उत्तरे कागदावर नव्हे, तर अधिकृत तांत्रिक अहवालातून समोर आली पाहिजेत.

# आडोळी–अटकळी पांदण रस्त्यासाठी जलसमाधी आंदोलन सुरू!

■ प्रतिनिधी | वाशिम ■



आडोळी ते अटकळी पांदण रस्त्याची गेल्या अनेक दिवसांपासून झालेली दुरवस्था, पावसाळ्यात रस्त्यावर साचणारे पाणी, तसेच रस्त्यावरील पुलाची अपुरी उंची यामुळे परिसरातील शेतकऱ्यांना शेतात ये-जा करण्यासाठी मोठ्या अडचणींचा सामना करावा लागत आहे. या गंभीर प्रश्नाकडे प्रशासनाचे लक्ष वेधण्यासाठी क्रांतिकारी शेतकरी संघटनेच्या वतीने जलसमाधी आंदोलन सुरू करण्यात आले आहे.

शेतकऱ्यांच्या शेतमालाची वाहतूक, शेतीची मशागत, पेरणी, फवारणी तसेच दैनंदिन शेतीची कामे करण्यासाठी पांदण रस्ता हा अत्यंत महत्त्वाचा आहे. मात्र रस्त्याची दुरवस्था आणि पुलाची कमी उंची यामुळे पावसाळ्यात हा मार्ग वापरणे अत्यंत धोकादायक व त्रासदायक बनले आहे.

### शेतकऱ्यांच्या प्रमुख मागण्या

१. आडोळी ते अटकळी पांदण रस्ता तात्काळ खुला करून दुरुस्तीचे काम सुरू करावे.

२. रस्त्यावरील पुलाचे तातडीने उंचीकरण (ंग्गहु) करावे.

३. पुलावरून पावसाचे पाणी जाण्यासाठी योग्य जलनिस्सारण व्यवस्था करावी.

४. रस्त्यावर आवश्यक त्या ठिकाणी मुरूम टाकून रस्ता मजबूत व वाहतुकीस योग्य करावा.

५. पावसाळ्यात रस्ता पुन्हा खराब होऊ नये यासाठी कायमस्वरूपी व टिकाऊ काम करावे.

६. शेतकऱ्यांना ट्रॅक्टर, बैलगाडी व शेतीची वाहने घेऊन शेतात जाण्यासाठी अडथळामुक्त मार्ग उपलब्ध करून द्यावा.

७. रस्त्याच्या कामासाठी मंजूर निधी असल्यास त्याची माहिती सार्वजनिक करून कामाची तातडीने अंमलबजावणी करावी.

८. रस्त्याच्या कामात दिरंगाई किंवा निष्काळजीपणा करणाऱ्या संबंधित अधिकाऱ्यांची जबाबदारी निश्चित करावी.

९. रस्त्याच्या कामाची प्रत्यक्ष पाहणी करून तांत्रिकदृष्ट्या योग्य आराखडा तयार करावा.

१०. शेतकऱ्यांच्या मागण्यांकडे दुर्लक्ष न करता प्रशासनाने आंदोलनस्थळी येऊन ठोस लेखी आश्वासन द्यावे.

### 'शेतकऱ्यांना रस्ता मिळालाच पाहिजे!'

शेतकऱ्यांच्या जमिनीपर्यंत पोहोचण्यासाठी रस्ता उपलब्ध असणे हा त्यांच्या शेतीच्या हक्काशी निगडित प्रश्न आहे. रस्ता नसल्यामुळे किंवा रस्ता खराब असल्यामुळे शेतकऱ्यांना आपल्या शेतात जाण्यासाठी मोठा वळसा घ्यावा लागत आहे. त्यामुळे वेळ, पैसा आणि श्रम यांचा मोठ्या प्रमाणात अपव्यय होत आहे.

पावसाळ्यात परिस्थिती आणखी गंभीर होत असून पुलावरून पाणी जाणे, रस्त्यावर चिखल होणे आणि वाहतूक बंद पडणे यामुळे शेतकऱ्यांच्या शेतीच्या कामांवर परिणाम होत आहे. शेतकऱ्यांचा प्रश्न केवळ रस्त्याचा नसून त्यांच्या उपजीविकेचा प्रश्न आहे, त्यामुळे प्रशासनाने याची गांभीर्याने दखल घेणे आवश्यक आहे.

क्रांतिकारी शेतकरी संघटनेने यापूर्वीही संबंधित प्रशासनाकडे रस्ता दुरुस्ती व पुलाचे उंचीकरण करण्याची मागणी केली आहे. मात्र ठोस कार्यवाही होत नसल्याने अखेर शेतकऱ्यांना आंदोलनाचा मार्ग स्वीकारावा लागला आहे.मागण्या तातडीने मान्य करून प्रत्यक्ष कामाला सुरुवात होईपर्यंत आंदोलन मागे घेतले जाणार नाही, अशी भूमिका क्रांतिकारी शेतकरी संघटनेने घेतली आहे. यावेळी जिल्हाध्यक्ष बालाजी मोरे पाटील,युवा जिल्हाध्यक्ष सतीश इढोळे, महिला आघाडी जिल्हाध्यक्ष सोनू ताई मुळे, हिंगोली जिल्हा अध्यक्ष नामदेव पतंगे, सेनगाव तालुका अध्यक्ष प्रवीण मते ,विशाल गोटे, राम बोरकर समस्त शेतकरी व गावकरी मंडळी उपस्थित होते

# पाईपलाईन फुटली, रस्ता खचला; मनपाच्या कारभाराविरोधात युवक काँग्रेस रस्त्यावर!

- मनपा प्रशासनाच्या विरोधात घोषणाबाजी
- कायमस्वरूपी व्यवस्था न झाल्यास तीव्र आंदोलचा इशारा



■ प्रतिनिधी | अकोला ■

शहरातील डाबकी रोड परिसरात पाईपलाईन लिकेजमुळे रस्त्यावर मोठा खड्डा पडून नागरिकांच्या जीवितास धोका निर्माण झाला झाल्याने युवक काँगेस रस्त्यावर उतरली आहे. युवक काँग्रेसच्या आंदोलनकर्त्यांनी थेट खड्ड्यात उतरून महानगरपालिकेच्या कारभाराचा निषेध करत मनपा प्रशासनाच्या विरोधात घोषणाबाजी करण्यात आली.

डाबकी रोडवरील पाईपलाईन लिकेजमुळे मोठ्या प्रमाणात पाणी रस्त्याखाली व परिसरात झिरपत असून, त्यामुळे रस्त्याची अवस्था धोकादायक झाली आहे. या खड्ड्यामुळे वाहनचालक, पादचारी तसेच परिसरातील नागरिकांना मोठ्या प्रमाणात त्रास सहन करावा लागत असून नागरिकांच्या सुरक्षेचा प्रश्न गंभीर बनला आहे. वारंवार तक्रारी करूनही महानगरपालिका प्रशासनाचे याकडे दुर्लक्ष होत असल्याचा आरोप करत युवक काँग्रेसचे जिल्हाध्यक्ष नगरसेवक आकाश कवडे यांच्या नेतृत्वाखाली संतप्त आंदोलन करण्यात आले. पाईपलाईनमधून मोठ्या प्रमाणात पाणी गळती होत असल्याने रस्ता खचत असून, प्रशासनाने केवळ कागदोपत्री पाहणी न करता तातडीने लिकेज दुरुस्त करून खड्डा बुजवावा, अशी मागणी युवक काँग्रेसच्या कार्यकर्त्यांनी केली. शहरातील मूलभूत सुविधांच्या देखभालीकडे मनपाचे दुर्लक्ष होत असल्याचा आरोप करत, नागरिकांच्या जीवाशी खेळणारा हा ढिसाळ कारभार आणखी किती दिवस सहन करायचा? असा संतप्त सवाल आंदोलनकर्त्यांनी उपस्थित केला. केवळ आश्वासने न देता प्रत्यक्ष काम करून दाखवावे, रस्ता दुरुस्ती आणि पाईपलाईन लिकेजची कायमस्वरूपी व्यवस्था तातडीने न झाल्यास आंदोलन अधिक तीव्र करण्याचा इशाराही युवक काँग्रेसच्या वतीने देण्यात आला. यावेळी युवक काँग्रेसचे जिल्हाध्यक्ष आकाश कवडे, जिल्हा उपाध्यक्ष राहुल सारवान, पूर्व विधानसभा अध्यक्ष अंकुश तायडे, पश्चिम विधानसभा अध्यक्ष, मो. शारीक, विद्यार्थी काँग्रेस जिल्हाध्यक्ष अभिजीत तवर, विजय धामणिक, अंकुश गावंडे, शेख अर्षद, ऋषिकेश जामोदे, अंकुश भेंडेकर, राम कोकाटे, साहिल, पवन खत्री, कार्तिकी इंगोले, अजय खंडारे, मंदार इंगोले, अथर्व ढोरे, साहिल तेलगोटे आदींसह पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.

### खड्डा बुजविण्याऐवजी प्रशासन झोपेत?

डाबकी रोडवरील पाईपलाईन लिकेजमुळे निर्माण झालेला जीवघेणा खड्डा नागरिकांसाठी धोक्याची घंटा ठरत असताना महानगरपालिका प्रशासन नेमके कोणत्या दुर्घटनेची वाट पाहत आहे, असा संतप्त सवाल अकोला युवक काँग्रेसने उपस्थित केला आहे. खड्ड्यात उतरून आंदोलन करण्याची वेळ नागरिकांवर येत असेल, तर मनपाच्या यंत्रणेचे अस्तित्व नेमके कशासाठी? असा सवाल करत तातडीने दुरुस्ती न झाल्यास प्रशासनाविरोधात आणखी तीव्र आंदोलन छेडण्याचा इशारा देण्यात आला आहे.

# सणाला गावी जाण्यावरून वाद पत्नीवर चाकूहल्ला !

■ प्रतिनिधी | मालेगाव ■

महालक्ष्मी सणासाठी मूळ गावी जाण्याच्या कारणावरून झालेल्या वादातून पतीने पत्नीवर चाकूने वार केल्याची घटना मंगळवारी (८ सप्टेंबर) दुपारी १ वाजताच्या सुमारास मालेगाव शहरातील गाडगे नगर येथे घडली. या हल्ल्यात पत्नी गंभीर जखमी झाली असून, तिच्यावर खासगी रुग्णालयात उपचार सुरू आहेत.

विजय विठ्ठल दुधाटकर (४०)असे गुन्हा दाखल झालेल्या पतीचे नाव असून, नितु उर्फ राणी विजय दुधाटकर (रा. गाडगे नगर, मालेगाव) असे जखमी पत्नीचे नाव आहे. दोघे गेल्या चार वर्षांपासून गाडगे नगर येथे वास्तव्यास असल्याची माहिती आहे.

प्राप्त माहितीनुसार, रिद्धी राहुल विश्वकर्मा (२२) यांनी मालेगाव पोलिस ठाणे, मालेगाव दिलेल्या तक्रारीत नमूद केले आहे की, ८ सप्टेंबर रोजी दुपारी विजय याने पत्नी नितुला महालक्ष्मी सणासाठी मूळ गावी खामगाव येथे जाण्यास सांगितले. मात्र, मुलीला सध्या सुट्या नसल्याने एवढ्या लवकर गावी जाऊन काय करायचे, असे नितु हिने सांगितले. यावरून पती-पत्नीमध्ये वाद झाला. वाद वाढल्यानंतर नितु घराबाहेरील ओसरीवर आली. त्यावेळी विजय याने चाकूने तिच्या पोटावर, पाठीवर, डोक्यावर, कपाळावर, छातीवर आणि डोळ्यावर वार केल्याचा आरोप तक्रारीत करण्यात आला आहे. गंभीर जखमी झालेली नितु रक्ताच्या थारोळ्यात पडल्यानंतर विजयने चाकू गेटजवळ टाकून घटनास्थळावरून पलायन केल्याचेही तक्रारीत नमूद आहे.

### हत्येच्या प्रयत्नाचा गुन्हा

घटनेची माहिती मिळताच पोलिसांनी घटनास्थळी धाव घेत जखमी नितुला उपचारासाठी खासगी रुग्णालयात दाखल केले. तिच्या बहिणीच्या तक्रारीवरून मालेगाव पोलिस ठाणे, मालेगाव विजय दुधाटकर याच्याविरुद्ध भारतीय न्याय संहितेच्या कलम १०९ अंतर्गत हत्येच्या प्रयत्नाचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे. घटनेचा पुढील तपास पोलिस निरीक्षक राजेश खेरडे यांच्या मार्गदर्शनाखाली सहायक पोलिस निरीक्षक पांडुरंग इंगळे करीत आहेत.

# पीरियाचे राष्ट्रीय कार्याध्यक्ष जयदीप कवाडे एकदिवसीय जिल्हा दौऱ्यावर

■ प्रतिनिधी | अकोला ■

पीपल्स रिपब्लिकन पार्टीचे राष्ट्रीय कार्याध्यक्ष तथा महाराष्ट्र लघुउद्योग विकास महामंडळाचे उपाध्यक्ष, राज्यमंत्री दर्जा प्राप्त जयदीप जोगेंद्र कवाडे हे दिनांक १२ सप्टेंबर रोजी एकदिवसीय अकोला जिल्हा दौऱ्यावर येत आहेत..

दुपारी १२ वाजता शासकीय विश्रामगृह येथे त्यांचे आगमन होणार असून, त्यानंतर पत्रकार परिषद, पीआरपीच्या जिल्हास्तरीय महत्त्वपूर्ण बैठकीस संबोधन, डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्यास पुष्पहार अर्पण करून अभिवादन तसेच या खा. अनुप धोत्रे, मा. आ. रणधीर सावरकर व मा. आ. अमोल मिटकरी यांच्याशी चर्चा करून विविध पक्षांतील पदाधिकाऱ्यांचा पीपल्स रिपब्लिकन पार्टीमध्ये पक्षप्रवेश व नियुक्तीपत्र वितरणाचा कार्यक्रम होणार आहे.

या कार्यक्रमास जिल्ह्यातील सर्व पदाधिकारी व कार्यकर्त्यांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे, असे आवाहन जिल्हाध्यक्ष नागसेन क्षिरसागर व शहराध्यक्ष हिम्मतराव हिवराळे उपाध्यक्ष अनिल गवई यांनी केले आहे.

# थेट वाहतूक धोरणाविरोधात माथाडी कामगारांचा एल्गार

## २८ सप्टेंबरपासून पुण्यात बेमुदत धरणे



दरमहा मजुरी व लेव्ही देण्याची कायदेशीर तरतूद असतानाही काही ठिकाणी सहा-सहा महिने मजुरी थकीत असल्याचा आरोप समितीने केला आहे. प्रलंबित (२७३) मजुरी तसेच 'आनंदाचा शिधा' किटची हमाली तातडीने देण्याची मागणी करण्यात आली आहे.

................

माथाडी कामगारांच्या मागण्यांवर शासनाने तातडीने सकारात्मक निर्णय घ्यावा. कामगारांवर आंदोलन करण्याची वेळ येऊ नये, अशी अपेक्षा संयुक्त कृती समितीने व्यक्त केली असून, मागण्या मान्य न झाल्यास २८ सप्टेंबरपासून पुण्यात बेमुदत आंदोलन करण्यात येणार असल्याचे स्पष्ट करण्यात आले आहे.

■ प्रतिनिधी | मालेगाव ■

शासकीय धान्य गोदामांमध्ये कार्यरत हमाल-माथाडी कामगारांच्या विविध प्रश्नांवर शासनाचे लक्ष वेधण्यासाठी शासकीय धान्य गोदाम हमाल-माथाडी कामगार संघटनांच्या संयुक्त कृती समितीने आंदोलनाचा इशारा दिला आहे. मागण्यांची पूर्तता न झाल्यास २८ सप्टेंबर २०२६ रोजी सकाळी ११.३० वाजता पुणे येथील कौन्सिल हॉलसमोर राज्यव्यापी बेमुदत धरणे आंदोलन सुरू करण्यात येणार आहे.

या संदर्भातील निवेदन मालेगाव तहसीलदार तसेच आमदार अमित सुभाष झनक यांना देण्यात आले. शासनाने माथाडी कामगारांच्या मागण्यांची दखल घेऊन तातडीने सकारात्मक निर्णय घ्यावा, अशी मागणी निवेदनातून करण्यात आली आहे. थेट वाहतूक धोरणामुळे राज्यातील सुमारे दहा हजार माथाडी कामगारांच्या रोजगारावर संकट निर्माण होण्याची शक्यता असल्याचा दावा समितीने केला आहे. त्यामुळे हे धोरण राज्यात लागू करू नये, अशी प्रमुख मागणी करण्यात आली आहे.

थेट वाहतूक धोरणातील टप्पा १ व २ मध्ये धान्य हाताळणीचे काम संबंधित गोदामातील नोंदीत माथाडी कामगारांकडूनच करून घेण्याचे बंधन वाहतूक कंत्राटदारांवर घालावे. तसेच माथाडी मंडळाने निश्चित केलेल्या दरानुसार मजुरी व लेव्ही दरमहा मंडळाकडे जमा करण्याचे आदेश द्यावेत, अशी मागणी करण्यात आली आहे. महागाई निर्देशांकाचा फरक थेट माथाडी मंडळाकडे जमा करून तो कामगारांना देण्यात यावा, तसेच अनेक जिल्ह्यांत प्रलंबित असलेला महागाई निर्देशांकाचा फरक तातडीने अदा करावा, अशी मागणीही केली आहे.


# नगर परिषद कार्यालय, वाशिम

## निविदा सूचना २०२६-२७ क्र. १३ (Open Tender)

वाशिम नगर परिषद, वाशिम जि. वाशिम कडून नगर परिषद निधी अंतर्गत खालील नमूद कामांसाठी टक्केवारी स्वरुपात दोन लिफाफा पध्दतीने मोहरबंद निविदा दिनांक १७.०९.२०२६ रोजी सांय ५.०० वा. पर्यंत न.पा. आवक जावक शाखेत मागवित आहे.

| अ. क्र | कामाचे नांव | अंदाजपत्रकीय किंमत रुपये | बयाणा रक्कम रुपये | निविदा संचाची किंमत | कंत्राटदाराचा वर्ग | कामाची मुदत पावसाळा धरुन |
|---|---|---|---|---|---|---|
| | **नगर परिषद निधी अंतर्गत** | | | | | |
| १ | न.प निधी अंतर्गत प्रभाग क्र. ७ मंत्री पार्क येथील मध्ये कड यांचे घर ते चौधरी यांच्या घरापर्यंत सिमेंट कॉंक्रेट रोड बांधकाम करणे | ७८०९४२ | ७९०० | ५९० | ७ व त्यावरील | १०० दिवस |
| २ | न.प निधी अंतर्गत राजाभैय्या पवार यांचे घरा समोर नगर परिषदेच्या जागेवर सभागृहाचे बांधकाम करणे | ८१०२०४ | ८२०० | ५९० | ७ व त्यावरील | १०० दिवस |

**अटी व शर्ती**

१) वरील कामाबाबतच्या कोरे निविदा प्रपत्र प्राप्त करणे करिता लेखी स्वरूपात अर्ज करून आवश्यकत्या रक्कमेचा भरणा करुन दि. १६.०९.२०२६ साय. ५.०० वाजेपर्यंत न.पा. रोखपाल विभागा मधुन कोरे निविदा प्रपत्र प्राप्त करता येतील,

२) बयाणा रक्कम रोख स्वरुपात अथवा धनाकर्ष (D.D.) स्वरुपात स्विकारल्या जाईल. निविदा बयाणा रक्कम नगदी स्वरुपात भरावयाची असल्यास दि. १७.०९.२०२६ रोजी दुपारी २.०० वाजेपर्यंत न.पा. रोखपाल विभागात स्विकारण्यांत येईल

३) शक्य झाल्यास निविदा दि. १८.०९.२०२६ रोजी दुपारी ३.०० वाजता उपस्थित कंत्राटदार अथवा त्यांचे प्रतिनिधी यांचे उपस्थीतीत उघडण्यांत येतील.

४) निधीचे उपलब्धते नूसार देयकाची अदायगी करण्यात येईल.

५) वरील कामा संबंधी इतर शर्ती व अटी कार्यालयीन वेळेत नगर परिषद बांधकाम विभागात पहावयास मिळतील.

-स्वा-
(अरविंद मुंढे)
**मुख्याधिकारी,** नगर परिषद, वाशिम

# जनमाध्यम

paper www.janmadhyam.com

एक प्रतिष्ठित सवय

■ वर्धा ■ वर्षे १४ ■ अंक २८४ ■ गुरुवार, १० सप्टेंबर २०२६ ■ पृष्ठे ४ ■ मुल्य ३.०० रु.


# शेतातून परतणाऱ्या शेतकऱ्यावर वाघाची झडप

## ६५ वर्षीय भगवान धुर्वे यांचा जागीच मृत्यू; रायपूर जंगली परिसरात दहशत, वन विभागाच्या कारभारावर संताप

**सेलू जनमाध्यम :** शेतातून काम आटोपून घराकडे परतणाऱ्या ६५ वर्षीय शेतकऱ्यावर दबा धरून बसलेल्या वाघाने अचानक हल्ला केला. या थरारक हल्ल्यात भगवान धुर्वे यांचा जागीच मृत्यू झाला. सेलू तालुक्यातील रायपूर जंगली परिसरात बुधवारी सायंकाळी चारच्या सुमारास ही घटना घडली. घटनेने परिसर हादरला असून शेतकऱ्यांच्या जीविताचा प्रश्न पुन्हा ऐरणीवर आला आहे.

रायपूर जंगली परिसरात गेल्या काही दिवसांपासून वाघासह वन्यप्राण्यांचा वावर वाढला आहे. जंगलालगतच्या शेतांमध्ये काम करणाऱ्या शेतकरी आणि मजुरांना जीव मुठीत धरून वावरावे लागत आहे. दिवसाढवळ्या तसेच सायंकाळच्या वेळीही शेतातून ये जा करणे धोकादायक बनले आहे.



वन्यप्राण्यांच्या वाढत्या वावराबाबत वन विभागाकडे वारंवार तक्रारी करूनही प्रभावी प्रतिबंधात्मक उपाययोजना होत नसल्याचा आरोप ग्रामस्थांनी केला आहे. शेतकऱ्यांनी शेती करायची तरी कशी, असा प्रश्न आता उपस्थित होत आहे.

भगवान धुर्वे यांच्या मृत्यूमुळे गावात शोककळा पसरली असून नागरिकांमध्ये प्रचंड दहशत आहे. परिसरात तातडीने कॅमेरे बसवून गस्ती पथक तैनात करावे आणि वाघाचा बंदोबस्त करावा, अशी मागणी होत आहे.

मृत शेतकऱ्याच्या कुटुंबाला शासनाने तातडीने भरीव आर्थिक मदत द्यावी, तसेच कुटुंबातील एका व्यक्तीला शासकीय नोकरी द्यावी, अशी मागणी ग्रामस्थांनी केली आहे. घटनेची माहिती मिळताच बप्पर झोनचे वनक्षेत्र अधिकारी खेडकर व वन विभागाच्या अधिकाऱ्यांनी घटनास्थळी धाव घेतली.

### मृतदेह शवविच्छेदनासाठी नेण्यास तीव्र विरोध; आधी वाघाचा बंदोबस्त करा, ग्रामस्थांची मागणी

भगवान धुर्वे यांच्या मृत्यूनंतर संतप्त झालेल्या ग्रामस्थांनी वन विभागाच्या अधिकाऱ्यांना मृतदेह शवविच्छेदनासाठी घेऊन जाण्यास मज्जाव केला. परिसरात वाघाचा वाढता वावर असताना शेतकऱ्यांच्या सुरक्षेसाठी ठोस उपाययोजना का केल्या जात नाहीत, असा प्रश्न ग्रामस्थांनी उपस्थित केला. वाघाचा तातडीने बंदोबस्त करावा, त्यानंतरच मृतदेह हलवू द्यावा, अशी भूमिका घेत ग्रामस्थांनी वन विभागाच्या अधिकाऱ्यांना रोखले. त्यामुळे काही काळ घटनास्थळी तणावाचे वातावरण निर्माण झाले.

# पावडे चौकाच्या नावावर राजकीय वरवंटा

## वर्षानुवर्षांची नागरिकांची ओळख पुसण्याचा घाट; दत्ताजी मेघे नामकरणाचा अट्टहास नेमका कुणासाठी

### चौकाशी संबंध नाही, योगदानाचा ठोस दाखलाही नाही; मग नामकरणाची एवढी घाई कशासाठी

**वर्धा जनमाध्यम :** वर्धा शहरातील बॅचलर रोड परिसरातील वर्षानुवर्षे नागरिकांच्या तोंडी असलेल्या पावडे चौक या नावाला आज राजकीय निर्णयामुळे विराम मिळणार आहे. बैलपोळ्याच्या पार्श्वभूमीवर सार्वजनिक बांधकाम मंत्री शिवेंद्रराजे भोसले, राज्यमंत्री ?ड. आशिष जयस्वाल आणि पालकमंत्री डॉ. पंकज भोयर यांच्या उपस्थितीत या चौकाचे 'स्व. दत्ताजी मेघे चौक' असे नामकरण केले जाणार आहे. मात्र या निर्णयाने शहरात उत्साहापेक्षा संताप आणि प्रश्नांची धग अधिक जाणवत आहे.

नागरिकांच्या वापरातून वर्षानुवर्षे रूढ झालेले नाव पुसण्यामागे नेमका राजकीय अजेंडा काय असा प्रश्न उपस्थित होत आहे.

डॉ. अरुण पावडे यांचे रुग्णालय या परिसरात असल्याने नागरिकांनी या ठिकाणाला पावडे चौक म्हणून ओळख दिली. कोणत्याही राजकीय फलकापेक्षा लोकांच्या व्यवहारातून निर्माण झालेली ही ओळख होती. आता तीच ओळख बदलून दत्ताजी मेघे यांचे नाव देण्याचा निर्णय घेण्यात आला आहे.

दत्ताजी मेघे हे जिल्ह्याचे खासदार आणि मंत्री राहिले, हे वास्तव आहे. त्यांच्या राजकीय योगदानाबाबत स्वतंत्रपणे चर्चा होऊ शकते. पण या विशिष्ट चौकाशी त्यांचा संबंध काय, या चौकाच्या विकासासाठी त्यांनी काय केले, नागरिकांच्या सोयीसाठी कोणते काम उभे केले, या प्रश्नांची उत्तरे मात्र नागरिक मागत आहेत.

**नाव बदलायचे की राजकीय वारसा ठसवायचा**

शहरात अनेक महत्त्वाची ठिकाणे, रस्ते आणि चौक नामकरणाच्या प्रतीक्षेत असताना याच चौकाची निवड का करण्यात आली, यावरूनही चर्चेला उधाण आले आहे. लोकांच्या स्मृतीत रुजलेले नाव पुसून राजकीय वारशाचा ठसा उमटविण्याचा हा प्रयत्न तर नाही ना? अशी कुजबुज आता उघडपणे संतापात बदलत आहे.

आज मंत्र्यांच्या उपस्थितीत नामकरणाचा फलक उभा राहील.



मात्र फलकावर नाव बदलणे सोपे आहे, पण नागरिकांच्या मनातील पावडे चौकाची ओळख पुसणे इतके सोपे आहे का, हा प्रश्न या नामकरण सोहळ्याला उपस्थित राहणाऱ्या सत्ताधाऱ्यांसमोर नागरिकांनी उभा केला आहे. नामकरण करा, पण कारण तरी सांगा, राजकीय सोय की शहरहित, याचे उत्तर आता वर्धेकरांना हवे आहे.

# डॉक्टर नाहीत, सुविधा नाहीत; मग १०० बेडचे रुग्णालय कशासाठी

## आर्वी उपजिल्हा रुग्णालयातील गलथान कारभाराविरोधात काँग्रेस-प्रहार आक्रमक

### -सात दिवसांत सुधारणा करा, अन्यथा जनआंदोलनाचा इशारा -बाळा जगताप यांच्या नेतृत्वात वैद्यकीय अधीक्षकांना निवेदन

**आर्वी जनमाध्यम :** आर्वी उपजिल्हा रुग्णालयातील ढासळलेल्या आरोग्य व्यवस्थेविरोधात काँग्रेस व प्रहार सोशल फोरमने आक्रमक भूमिका घेतली आहे. बाळा जगताप यांच्या नेतृत्वात वैद्यकीय अधीक्षकांना निवेदन देत रिक्त पदे तातडीने भरण्याची आणि बंद पडलेल्या आरोग्य सुविधा सुरू करण्याची मागणी करण्यात आली.



२०१८ ते २०२२ या काळात रुग्णालयात दोन स्त्रीरोग तज्ज्ञ, बालरोग तज्ज्ञ, सर्जन आणि दोन भूलतज्ज्ञ कार्यरत होते. महिन्याला १५० ते २०० प्रसूती, ३० ते ३५ सिझेरियन आणि ५० ते ६० कुटुंब नियोजन शस्त्रक्रिया होत होत्या. ब्लड स्टोरेज, डिजिटल एक्स रे आणि ऑक्सिजन प्लांटसह विविध सुविधा उपलब्ध होत्या.

मात्र २०२२ नंतर परिस्थिती ढासळल्याचा आरोप करण्यात आला. तज्ज्ञ डॉक्टरांची पदे रिक्त असून प्रसूती आणि सिझेरियनची संख्या मोठ्या प्रमाणात घटली आहे. एक्स रे टेक्निशियन नाही, दोन सोनोग्राफी मशीन बंद आहेत, ब्लड स्टोरेज युनिट बंद आहे. ऑक्सिजन प्लांट भंगारात काढल्याचा आरोपही निवेदनात करण्यात आला. २०२३ पासून नियमित वैद्यकीय अधीक्षक नसल्याने प्रभारी अधिकाऱ्यांकडून कारभार सुरू आहे.

५० बेडचे रुग्णालय १०० बेडचे झाले; मात्र डॉक्टर आणि कर्मचारी वाढले नाहीत. मग हा विस्तार कोणासाठी, असा प्रश्न उपस्थित करण्यात आला.

सात दिवसांत ठोस कार्यवाही न झाल्यास मोठे जनआंदोलन उभारण्याचा इशारा बाळा जगताप यांनी दिला. यावेळी प्रा. पंकज वाघमारे, गोविंद उईके, प्रियंका भिमके, वेदांत वानखेडे यांच्यासह नागरिक व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# गांजाची वाहतूक करणाऱ्या सराईत गुन्हेगाराला अटक

## १ किलो ८३ ग्रॅम गांजासह १.६४ लाखांचा मुद्देमाल जप्त

### हिंगणघाटात एलसीबीची धडक कारवाई

**हिंगणघाट जनमाध्यम :** अंमली पदार्थांची विक्री आणि वाहतूक करणाऱ्यांविरुद्ध स्थानिक गुन्हे शाखेने धडक मोहीम सुरू केली आहे.

या मोहिमेत हिंगणघाट परिसरात गांजाची विक्री करण्याच्या उद्देशाने वाहतूक करणाऱ्या एका सराईत गुन्हेगाराला स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने रंगेहाथ पकडले. त्याच्याकडून १ किलो ८३ ग्रॅम गांजा, मोबाईल आणि मोपेड असा एकूण १ लाख ६४ हजार १५० रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला.

पोलीस अधीक्षक सौरभ कुमार अग्रवाल यांनी अंमली पदार्थ बाळगणाऱ्या तसेच विक्री करणाऱ्या गुन्हेगारांविरुद्ध कठोर कारवाई करण्याचे आदेश स्थानिक गुन्हे शाखेला दिले आहेत. त्यानुसार पथकाला हिंगणघाट पोलीस ठाण्याच्या हद्दीत गस्त घालत असताना खबऱ्याकडून गांजाच्या वाहतुकीबाबत माहिती मिळाली.



माहितीच्या आधारे जाम ते हिंगणघाट राष्ट्रीय महामार्ग क्रमांक ४४ वरील सर्व्हिस रोडवर हॉटेल रायगडसमोर सापळा रचण्यात आला.

यावेळी सुझुकी बर्गमन मोपेड क्रमांक एमएच ३२ एडब्ल्यू ७४४२ वर आलेल्या साहिल उर्फ नायडू सतीश माणिके वय २४ रा. भीमनगर वॉर्ड हिंगणघाट याला ताब्यात घेण्यात आले. त्याच्याकडे तपासणी केली असता १ किलो ८३ ग्रॅम गांजा आढळून आला.

चौकशीत सदर गांजा शेख अलीम शेख रमजान रा. बडा ताजबाग, आदर्शनगर नागपूर याने पुरविल्याचे निष्पन्न झाल्याचे पोलिसांनी सांगितले. याप्रकरणी दोन्ही आरोपींविरुद्ध हिंगणघाट पोलीस ठाण्यात एनडीपीएस कायद्यान्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

ही कारवाई अपर पोलीस अधीक्षक सदाशिव वाघमारे यांच्या मार्गदर्शनाखाली स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक विनोद चौधरी, पोलीस उपनिरीक्षक सिनूकुमार बानोत तसेच पोलीस अंमलदार अरविंद येनुरकर, रोशन निंबोळकर, रवि पुरोहित आणि सागर भोसले यांच्या पथकाने केली.

# चिमुकल्यांच्या नंदीमधून संस्कृतीचा जागर

## उद्या रामनगरात भव्य तान्हा पोळा

**वर्धा जनमाध्यम :** बैलपोळ्याच्या परंपरेची नाळ नव्या पिढीशी जोडत पं. दीनदयालजी उपाध्याय अंत्योदय फाऊंडेशन, वर्धा यांच्या वतीने शुक्रवार, ११ सप्टेंबर रोजी रामनगरातील तुळजा भवानी मंदिर परिसरात भव्य तान्हा पोळ्याचे आयोजन करण्यात आले आहे. सायंकाळी ४ वाजता होणाऱ्या या उत्सवात चिमुकल्यांचा उत्साह आणि सुशोभित नंदीबैलांचे आकर्षण पाहायला मिळणार आहे.

तान्हा पोळा हा केवळ बालकांचा उत्सव नसून शेतकरी आणि बैल यांच्यातील जिव्हाळ्याचे नाते पुढील पिढीपर्यंत पोहोचविणारा संस्कृतीचा जागर आहे. यानिमित्त सुशोभित नंदी तसेच आकर्षक वेशभूषा स्पर्धेचे आयोजन करण्यात आले आहे. विजेत्यांना रोख पारितोषिके देऊन गौरविण्यात येणार आहे. प्रथम क्रमांकासाठी ५ हजार ५५५ रुपये, द्वितीय ४ हजार ४४४, तृतीय ३ हजार ३३३, चतुर्थ २ हजार २२२ यासह पुढील क्रमांकांसाठीही आकर्षक बक्षिसे ठेवण्यात आली आहेत. सर्व सहभागी बालकांना ५१ रुपयांचा प्रोत्साहन पुरस्कार दिला जाणार आहे,

तान्हा पोळ्याच्या कार्यक्रमाला महाराष्ट्र राज्याचे राज्यमंत्री तथा वर्धा जिल्ह्याचे पालकमंत्री पंकज भोयर उपस्थित राहणार आहेत. नागरिकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून चिमुकल्यांचा उत्साह वाढवावा आणि पारंपरिक संस्कृतीच्या या सोहळ्यात सहभागी व्हावे, असे आवाहन आयोजक गिरीश अग्निहोत्री यांनी केले आहे. नंदीबैल घेऊन येणाऱ्या बालकांनी सायंकाळी ४ वाजण्यापूर्वी उपस्थित राहावे. त्यानंतर स्पर्धेत सहभाग घेता येणार नसल्याचे आयोजकांनी स्पष्ट केले आहे.

# कापूस विकला; पैसा अडकला जिनिंगविरोधात फसवणुकीचा गुन्हा

### शेतकऱ्यांना चेकची थाप, ९१ लाखांचा हिशेब साफ

### आर्थिक गुन्हे शाखेकडून तपास सुरू

**सेलू जनमाध्यम :** शेतकऱ्यांकडून कापूस खरेदी करून त्याची रक्कम धनादेशाद्वारे देण्याचे आश्वासन दिले. मात्र खात्यात पुरेशी रक्कम नसल्याने धनादेश वटलेच नाहीत. त्यानंतर धनादेश परत घेऊन आरटीजीएसद्वारे पैसे देतो, असे सांगूनही रक्कम न दिल्याचा धक्कादायक प्रकार सेलू तालुक्यात उघडकीस आला आहे. या प्रकरणी मे. सर्वज्ञ जिनिंग अँड प्रेसिंगचे मालक तथा संचालक प्रविण भास्करराव बोरकुटे यांच्याविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

१७ मार्च ते ६ ऑगस्ट २०२६ या कालावधीत मोजा हिंगणी येथील संबंधित जिनिंगने परिसरातील तसेच इतर भागातील शेतकऱ्यांकडून तब्बल ११०३.७० क्विंटल कापूस खरेदी केला. या कापसाची एकूण किंमत ९१ लाख २१ हजार ४९६ रुपये असल्याचे पोलिसांनी सांगितले.

कापूस खरेदीच्या पावत्या देऊन शेतकऱ्यांना धनादेश देण्यात आले. मात्र धनादेश खात्यात पुरेशी रक्कम नसल्याने वटले नाहीत. त्यानंतर धनादेश परत घेत आरटीजीएसने पैसे देण्याचे आश्वासन देण्यात आले. प्रत्यक्षात मात्र शेतकऱ्यांच्या पदरी पैसे पडले नाहीत.

या तक्रारीवरून सेलू पोलिस ठाण्यात अपराध क्रमांक ६३४/२०२६ अन्वये भारतीय न्याय संहिता कलम ३१६(५), ३१८(४) तसेच निगोशिएबल इन्स्ट्रुमेंट्स अ‍ॅक्टच्या कलम १३८ अंतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला आहे. आर्थिक गुन्हे शाखा, वर्धा पुढील तपास करीत आहे. इतरही शेतकरी पुढे या! संबंधित जिनिंगला कापूस विकूनही पैसे मिळाले नसल्यास कापूस खरेदी पावती, धनादेश, बँक मेमो व आरटीजीएससंबंधी कागदपत्रांसह आर्थिक गुन्हे शाखा, वर्धा येथे संपर्क साधण्याचे आवाहन पोलिसांनी केले आहे.


## जाहिर नोटिस

सर्व आम जनतेस सुचित करण्यात येते कि माझे पक्षकार भारती प्रकाश झोरे यांच्या मालकी व कब्जातील खालिल नमुद मालमत्ता आहे.

मालमत्तेचे वर्णन येणे प्रमाणे: मौजा वर्धा, ता. जि. वर्धा येथील नगर परिषद हद्दितील वार्ड कं. ६ मधील शिट कं. ४९, भुखंड कं. १२७८ ज्याची एकूण आराजी ११८.०० चौ. मी. म्हणजेच १२६९.६८ चौ. फुट इतकी असुन त्याची

चतुःर्सिमा :-

पुर्वेसः उगेमुगे यांचे घर,

पश्चिमेसः रोड,

उत्तरेसः खोबे जमादार व मोहन मते यांचे घर,

दक्षिणेसः उगेमुगे यांचे घर,

वर नमुद मालमत्ता माझे पक्षकार ईक्वीटास स्माल फायनान्स बँक यांचेकडे गहाण ठेवून त्यावर रक्कम रू. २०,०१,०००/- चे कर्ज घेत आहे. वर नमुद मालमत्ता कोणत्याही बँकेकडे, कंपनीकडे अथवा संस्थेकडे गहाण असल्यास अथवा इतर कोणत्याही स्वरूपाचा बोझा असल्यास तसेच कोणाचाही हक्क वा अधिकार असल्यास वा इतर काही भानगड असल्यास खालिल नमुद पत्यावर लेखी दस्तऐवजासह सदर नोटिस प्रकाशित झाल्यापासून ३ दिवसाच्या आत लेखी उजर नोंदवावा. त्यानंतर कोणाचाही आक्षेप ग्राहय धरल्या जाणार नाही.

अ‍ॅड. सचिन एस. कुरझडकर

साई नगर वर्धा

मो. नं. ९८६००४१३६१


# प्रभागनिहाय वर्धा शहराच्या सर्वांगीण विकासावर भर- पालकमंत्री डॉ. पंकज भोयर

### नगरपरिषद पदाधिकारी व अधिकाऱ्यांसोबत बैठक

**वर्धा जनमाध्यम :** वर्धा शहराचा सर्वांगीण व समतोल विकास होणे आवश्यक असून प्रत्येक प्रभागातील विकासकामांचा एकत्रित प्रस्ताव सादर करावा. त्यासाठी आवश्यक निधी उपलब्ध करून देऊ, असे पालकमंत्री डॉ. पंकज भोयर यांनी सांगितले.

वर्धा शहराचा विकास, प्रलंबित विषय व अपेक्षित बाबींवर चर्चा करण्यासाठी पालकमंत्र्यांच्या अध्यक्षतेखाली नगरपरिषद पदाधिकारी व अधिकाऱ्यांची बैठक झाली. यावेळी जिल्हाधिकारी वान्मथी सी, जिल्हा पोलिस अधीक्षक सौरभ कुमार अग्रवाल, नगराध्यक्ष सुधीर पांगूळ, उपाध्यक्ष प्रदीप ठाकूर, विषय समिती सभापती, नगरसेवक व अधिकारी उपस्थित होते.शहरातील अंडरग्राऊंड ड्रेनेज व पाणीपुरवठा व्यवस्थेतील त्रुटींची कंत्राटदार, सल्लागार व नगरपरिषदेने प्रभागनिहाय पाहणी करून आवश्यक उपाययोजना कराव्यात, अशा सूचना पालकमंत्र्यांनी केल्या. विद्यार्थ्यांसाठी सुरू करण्यात आलेली वाचनालये नियमित सुरू राहण्यासोबत त्यांची योग्य देखभाल करण्याचेही त्यांनी सांगितले.

स्वच्छ भारत मिशन अंतर्गत जिल्ह्यातील सर्व नगरपरिषदांचे प्रस्ताव शासनाकडे सादर करून जास्तीत जास्त निधी मिळविण्यासाठी प्रयत्न करण्याचे निर्देश देण्यात आले. वाढती वाहतूक लक्षात घेता प्रमुख चौक अतिक्रमणमुक्त ठेवावेत.



### विकासकामांसाठी प्रत्येक प्रभागाला निधी

जिल्हा नियोजन समितीच्या तीन लेखाशिर्षांतर्गत नगरपरिषद क्षेत्रातील विकासकामांसाठी निधी उपलब्ध करून देण्यात येणार आहे. नगरसेवकांनी अध्यक्ष, उपाध्यक्ष व मुख्याधिकाऱ्यांशी समन्वय साधून प्रभागातील प्राधान्याची कामे सुचवावीत. सर्व प्रस्ताव एकत्र करून याच आठवड्यात जिल्हा नियोजन समितीकडे सादर करण्याचे निर्देश देण्यात आले. बैठकीत नगराध्यक्ष, उपाध्यक्ष व नगरसेवकांकडून प्रभागातील समस्या, अपेक्षा व प्रलंबित विषय जाणून घेण्यात आले. यावेळी अतिक्रमण, मोकाट जनावरे, अवैध धंदे, शाळांमध्ये सीसीटीव्ही व विविध विकासकामांबाबत सूचना करण्यात आल्या.

फेरीवाल्यांमुळे वाहतुकीला अडथळा निर्माण होणार नाही, यासाठी नगरपरिषद व पोलिसांनी संयुक्त व्यवस्था करावी, असेही त्यांनी सांगितले. मोकाट जनावरे व कुत्र्यांची समस्या सोडविण्यासाठी नगरपरिषदेने कायमस्वरूपी यंत्रणा उभी करावी. गरज भासल्यास पोलिसांनी सहकार्य करावे, असे निर्देश देण्यात आले. शहरात कचरा संकलनासाठी जागा उपलब्ध नसल्याने कचरा दररोज इंझापूर येथे नेणे आवश्यक आहे. वाहने अपुरी असल्याने मागणी करण्यात आलेली आणखी २० वाहने उपलब्ध करून देण्यात येतील. कचरा संकलन व विल्हेवाटीसाठी एवोनिथचे सहकार्य घेण्यात येणार आहे. आयुष्मान भारत कार्डधारकांची संख्या वाढविण्यासाठी नगरसेवकांनी वार्डनिहाय शिबिरे घ्यावीत. धाम प्रकल्पात यावर्षी पुरेसा पाणीसाठा नसल्याने संभाव्य पाणीटंचाई टाळण्यासाठी आराखडा तयार करण्याच्या सूचनाही पालकमंत्र्यांनी दिल्या.


## कार्यालय नगर पंचायत समुद्रपूर, जि.वर्धा मेन रोड, झेंडा चौक

### जाहीरात सुचना (पहिली वेळ)

**नगर पंचायत समुद्रपूर कडून सुचित करण्यात येते की, नगर पंचायत, समुद्रपूर क्षेत्रामध्ये रोगप्रतिबंधात्मक उपाययोजना राबविण्यासाठी नगर पंचायत हद्दीतील एकुण १७ वार्डामध्ये फॉगिंग मशिनद्वारे धुरळणी करावयाचे आहे. करीता सर्व ईच्छुक तसेच फर्म/कंपनी/कंत्राटदार यांचेकडून सदर कामाकरीता दोन लिफाफा पध्दतीने सिलबंद पाकिटामध्ये दिनांक १०.०९.२०२६ ते दिनांक १६.०९.२०२६ पर्यंत दुपारी ३.०० वाजेपर्यंत निविदा मागविण्यात येत आहे. तसेच सदर निविदेचा विस्तृत नमुना व सदर कामासाठी आवश्यक असलेल्या सर्व अटी व शर्ती कार्यालयीन वेळेत नगर पंचायत, समुद्रपूरमधील आरोग्य विभाग येथे पहावयास उपलब्ध आहे.**

स्वा/-

मुख्याधिकारी,

नगर पंचायत, समुद्रपूर

जनमाध्यम
एक प्रतिष्ठित सवय

महाराष्ट्र शासन

उपजिल्हाधिकारी (भूसंपादन),(अ.व.प्र.क्र.४), अमरावती यांचे कार्यालय,
जि.अमरावती
दुरध्वनी क्र.०७२१-२६६३४४९
Email-SLAOUWP4@gmail.com

क्र. म.अ./उपजि/भू.सं.अ.व.प्र.क्र.४/कावि-२०६/२०२६ दिनांक २८.०८.२०२६

## "कलम-११" अधिसूचना

(भूमीसंपादन, पुनर्वसन व पुनर्स्थापना करतांना वाजवी भरपाई मिळण्याचा व पारदर्शकतेचा हक्क अधिनियम २०१३)

भूसंपादन प्रकरण क्र.७४/४७/२०२५-२६
मौजा- मालखेड, ता.चांदूर रेल्वे, जि.अमरावती

**ज्याअर्थी, भुमीसंपादन, पुनर्वसन व पुनर्स्थापना करतांना वाजवी भरपाई मिळण्याचा आणि पारदर्शकतेचा हक्क अधिनियम, २०१३ (२०१३ चा ३०) यांच्या कलम ३ च्या खंड (इ) परंतुकाद्वारे प्रदान करण्यात आलेल्या अधिकाराचा वापर करुन काढण्यात आलेली अधिसूचना महसूल व वन विभाग क्र.**संकीर्ण-११/२०१४/प्र.क्र.७७/अ-२, दि.११ सप्टेंबर २०१५ **(यात यापुढे जिचा निर्देश** उक्त अधिसूचना **असा करण्यात आला आहे.) त्याद्वारे असे अधिसुचित केले आहे की, उक्त अधिनियमाच्या कलम ३ च्या खंड (झेड-अे) मध्ये व्याख्या केलेल्या एखाद्या सार्वजनिक प्रयोजनासाठी, एखाद्या जिल्ह्यातील १०००० हेक्टरपेक्षा अधिक नसेल इतक्या क्षेत्राकरीता जमीन संपादन करण्याच्या संबंधात, अशा जिल्ह्याचा जिल्हाधिकारी हा उक्त अधिनियमाच्या प्रयोजनासाठी समुचित शासन असल्याचे मानण्यात येईल.**

**आणि ज्याअर्थी, उक्त अधिसुचनेनुसार समुचित शासन असलेल्या अमरावती जिल्ह्याच्या जिल्हाधिकारी यास यासोबत जोडलेल्या अनुसूची-एक मध्ये अधिक तपशीलवार वर्णन केलेली जमीन (यात यापुढे जिचा निर्देश** उक्त जमीन **असा करण्यात आला आहे.) सार्वजनिक प्रयोजनासाठी (यात यापुढे ज्याचा निर्देश उक्त** सार्वजनिक प्रयोजन **असा करण्यात आला आहे.) आवश्यक आहे, अथवा तिची आवश्यकता भासण्याची शक्यता आहे असे वाटते, ज्याच्या स्वरुपाचे विवरण यासोबत जोडलेल्या अनुसूची-दोन मध्ये दिलेले आहे, आणि म्हणून उक्त अधिनियमाचे कलम ११ च्या पोटकलम-१ च्या तरतुदीन्वये याद्वारे असे अधिसुचित करण्यात येते की, उक्त जमिनीची उक्त सार्वजनिक प्रयोजनासाठी आवश्यकता भासण्याची शक्यता आहे.**

**आणि ज्याअर्थी, प्रस्तावित भुमीसंपादनाच्या अनुषंगाने बाधित व्यक्तीचे विस्थापन करण्यास भाग पाडणारी कारणे, यासोबत जोडलेल्या अनुसूची-तीन मध्ये दिलेली आहेत. (विस्थापन होणार असेल तर या अनुसूचीमध्ये कारणे नमुद करावीत).**

**आणि ज्याअर्थी, सामाजिक परिणाम निर्धारण सारांश यासोबत जोडलेल्या अनुसूची-चार मध्ये दिलेला आहे.**

**आणि ज्याअर्थी, कलम ४३ च्या पोटकलम (१) अन्वये पुनर्वसन व पुनर्वसाहत या प्रयोजनासाठी नियुक्त केलेल्या प्रशासकाचा तपशील, यासोबत जोडलेल्या अनुसूची-पाचमध्ये दिलेला आहे. (नियुक्ती करणे आवश्यक असेल तर, या अनुसूचीमध्ये तपशील नमुद करावा.)**

**त्याअर्थी आता, असे घोषित करण्यात येत आहे की, उक्त अधिनियमाच्या कलम ११ च्या पोटकलम (४) अनुसार कोणतीही व्यक्ती, ही अधिसूचना प्रसिध्द दिनांकापासून ते उक्त अधिनियमाच्या प्रकरण चार खालील कार्यवाही पूर्ण होईल त्या कालावधीपर्यंत उक्त जमिनीचा अथवा तिच्या भागाचा कोणताही व्यवहार करणार नाही किंवा उक्त जमिनीवर कोणताही भार निर्माण करणार नाही.**

**परंतु, उक्त जमिनीच्या अथवा तिच्या भागाच्या मालकाने अर्ज केल्यावर जिल्हाधिकाऱ्यास विशेष परिस्थितीची कारणे लेखी नमुद करुन अशा मालकास उपरोक्त तरतुदीच्या प्रवर्तनातून सूट देता येईल,**

**परंतु, आणखी असे की. कोणत्याही व्यक्तीने या तरतुदीचे बुध्दीपरस्पर उल्लंघन केल्यामुळे तिला झालेल्या कोणत्याही हानीची किंवा क्षतीची जिल्हाधिकारी यांच्याकडून भरपाई दिल्या जाणार नाही.**

**तसेच उक्त अधिनियमाच्या कलम ११ च्या पोटकलम (५) अनुसार जिल्हाधिकारी भूमीसंपादन, पुनर्वसन व पुनर्वसाहत करतांना वाजवी भरपाई मिळण्याचा व पारदर्शकतेचा हक्क (महाराष्ट्र) नियम २०१४ (यात यापुढे ज्यांचा निर्देश** उक्त नियम **असा करण्यात आला आहे) यांच्या नियम १० च्या उपनियम (३) द्वारे विहित केल्याप्रमाणे भूमी अभिलेखाच्या अद्यावतीकरणाचे काम हाती घेणार असल्याचे व पूर्ण करणार असल्याचे देखील घोषित करण्यात येत आहे.**

**आणि ज्याअर्थी, उक्त अधिनियमाच्या कलम ३ च्या खंड (ग) अन्वये, समुचित शासन असलेले जिल्हाधिकारी, उक्त अधिनियमाखालील जिल्हाधिकारी यांची कार्ये पार पाडण्यासाठी** उपजिल्हाधिकारी (भूसंपादन), अ.व.प्र.क्र.४, अमरावती **यांना पदनिर्देशित करीत आहे.**

**तसेच मा.जिल्हाधिकारी, अमरावती यांचे परिपत्रक** क्र. **अ.का/प्र.अ/भूसंपादन/कावि-३१८/२०२५ दिनांक ०८.०७.२०२५ अन्वये भुसंपादन प्रस्तावाशी निगडीत कलम ११ अधिसुचनेची कार्यववाही संबंधित भूसंपादन अधिकारी यांचे स्तरावरुन करण्याकरीता आदेशित करण्यात आले आहे.**

अनुसूची-एक
जमिनीचे वर्णन
मौजा- मालखेड तालुका - चांदूर रेल्वे, जि.- अमरावती

| अ.क्र. | सर्व्हे नंबर/ गट नंबर | अंदाजित क्षेत्र हे.आर.मध्ये |
|---|---|---|
| १. | ७२ | ०.५१ |
| २. | ८९ | १.७४ |
| ३. | ९० | ०.४४ |
| ४. | ९१/१, ९१/२ | ०.००४ |
| ५. | ९३ | ०.९९ |
| ६. | ११४ | १.०४ |
| ७. | ११६ | ०.०१ |
| ८. | ११७ | १.०७ |
| ९. | ११८ | ०.९८ |
| १०. | ११९ | १.३४ |
| ११. | १२० | १.४५ |
| १२. | १२८/१ | ०.०८ |
| १३. | १२९ | ०.६७ |
| १४. | १३० | ०.७१ |
| १५. | १३४ | ०.१३ |
| १६. | १३८ | २.०३ |
| १७. | १३९ | २.६१ |
| १८. | १४२ | ०.०१ |
| १९. | १४४ | ०.५४ |
| २०. | १४५ | २.१३ |
| २१. | १४७ | ०.४६ |
| २२. | १४८ | ०.५१ |
| २३. | १८८ | ०.४४ |
| २४. | १८९ | ०.७६ |
| २५. | १९० | ०.५७ |
| २६. | १९३ | १.१५ |
| २७. | २२९ | १.६० |
| २८. | २३० | १.४९ |
| २९. | २३१ | ०.२० |
| ३०. | २३२ | ०.०९ |
| ३१. | २३४ | ०.६८ |
| ३२. | २३५ | ०.५० |
| ३३. | २३६ | ०.६६ |
| ३४. | २३७ | १.०१ |
| ३५. | २३८ | ०.५१ |
| ३६. | २५५ | ०.०३ |
| ३७. | २५६ | ०.३२ |
| | एकुण क्षेत्र हे.आर. | २९.४६ |

अनुसूची-दोन
सार्वजनिक प्रयोजनाच्या स्वरुपाबाबत विवरण

प्रकल्पाचे नांव - **वैनगंगा नळगंगा नदीजोड प्रकल्पांतर्गत मुख्य जोड कालवा-२ चे कामाकरीता**

प्रकल्प कार्याचे वर्णन - **वैनगंगा नळगंगा नदीजोड प्रकल्पांतर्गत मुख्य जोड कालवा-२ चे कामाकरीता**

सामाजिक मिळणारे लाभ - **वैनगंगा नळगंगा नदीजोड प्रकल्पा अंतर्गत मुख्य जोडकालवा-२ कामाचे निर्मितीमुळे जवळपासच्या क्षेत्रात पाणी पातळीत वाढ होऊन सिंचनासाठी, पिण्यासाठी पाणी उपलब्ध होईल. तसेच मत्स्य व्यवसाय, पशुसंवर्धनामध्ये वाढ, कुटीर उद्योगास फायदा व रोजगार निर्मिती इत्यादी ग्रामीण पायाभूत सुविधा उपलब्ध झाल्यामुळे राष्ट्रीय उत्पन्नात भर पडून शेतकऱ्यांच्या आर्थिक स्थितीत सुधारणा होणार आहेत.**

अनुसूची-तीन
बाधित व्यक्तिचे विस्थापन करण्यास भाग पाडणारी कारणे
विस्थापनाची आवश्यकता नाही. सबब माहिती निरंक

अनुसूची-चार
**(सामाजिक प्रभाव निर्धारण अभ्यास करणाऱ्या अभिकरणाने दिलेला)**
सामाजिक प्रभाव निर्धारण सारांश

**विभागीय आयुक्त कार्यालय, अमरावती यांचे पत्र क्र.सहआ/पुनर्व/समअ/भुस-२/१०-कावि/१०२३/२०२६, दिनांक २७.०७.२०२६ अन्वये नियम २०१३ च्या प्रकरण २ (सामाजिक आघात निर्धारण) व प्रकरण ३ (अन्न सुरक्षा विषयक तरतुदी लागू होत नाहीत.) त्या अनुषंगाने प्रस्तावित प्रकल्पास नव्याने सूट देण्याची आवश्यकता नाही.**

अनुसूची-पाच
(नियुक्त केलेल्या प्रशासकाचा तपशील)

अ. **प्रशासक म्हणून नियुक्त करण्यात आलेल्या अधिकाऱ्याचे पदनाम** - **प्रशासक नियुक्तीची आवश्यकता नाही.**
ब. **प्रशासनाच्या कार्यालयाचा पत्ता** - **निरंक**
क. **ज्या अधिसुचनेद्वारे प्रशासकाची नियुक्ती करण्यात आली आहे त्या अधिसुचनेचा तपशील.** - **निरंक**

टीप - उक्त जमिनीच्या आराखड्याचे उपजिल्हाधिकारी, अ.व.प्र.क्र.४ अमरावती यांच्या कार्यालयामध्ये निरिक्षण करता येईल.

दिनांक - २०.०८.२०२६
ठिकाण - अमरावती
(जिमाका/अम/जाही/१११/२०२६)

(प्रसन्नजीत प्रतिभा प्रकाश चव्हाण)
उपजिल्हाधिकारी (भूसंपादन)
(अ.व.प्र.क्र.४, अमरावती

# आरएसएस कार्यालयावर युवक काँग्रेसचा मोर्चा !

## मनुस्मृतीची प्रत जाळून निषेध

**नागपूर/प्रतिनिधी :**मनुस्मृतीच्या निषेधार्थ महाराष्ट्र प्रदेश युवक काँग्रेसने बुधवारी नागपुरात संविधान सन्मान यात्रा काढली. आक्रमक घोषणाबाजी करीत कार्यकर्त्यांनी मनुस्मृतीची प्रत जाळून निषेध नोंदविला. संविधानाच्या मूल्यांच्या समर्थनार्थ आणि सामाजिक समतेचा संदेश देण्यासाठी ही यात्रा काढण्यात आली. महाराष्ट्र प्रदेश युवक काँग्रेसच्या वतीने आयोजित करण्यात आलेली संविधान सन्मान यात्रा एनआयटी कर्मचारी सांस्कृतिक भवन, एस. डी. हास्पिटलसमोर, ग्रेट नाग रोड येथून सुरू झाली. तेथून ही यात्रा राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या रेशीमबागेतील हेडगेवार स्मृती भवन परिसरातील कार्यालयाच्या दिशेने नेण्यात आली. मनुस्मृतीच्या निषेधार्थ आयोजित या आंदोलनात युवक काँग्रेसचे पदाधिकारी आणि कार्यकर्ते मोठ्या संख्येने सहभागी झाले होते. यात्रेदरम्यान कार्यकर्त्यांनी हातात संविधान आणि विविध फलक घेत मनुस्मृतीविरोधात घोषणाबाजी केली. सामाजिक समता, संविधानाचे संरक्षण आणि लोकशाही मूल्यांच्या समर्थनार्थ घोषणांनी परिसर दणाणून गेला.



आरएसएस कार्यालयाच्या दिशेने मोर्चा नेण्यात आल्याने रेशीमबाग परिसरात काही काळ राजकीय वातावरण तापले. आंदोलनादरम्यान युवक काँग्रेसच्या कार्यकर्त्यांनी मनुस्मृतीची प्रत फाडली. त्यानंतर तिची प्रत जाळून निषेध व्यक्त करण्यात आला. मनुस्मृतीतील सामाजिक विषमतेला प्रोत्साहन देणाऱ्या विचारांना विरोध करणे आणि संविधानाने दिलेल्या समता व सामाजिक न्यायाच्या अधिकारांबाबत जनजागृती करणे, हा आंदोलनाचा उद्धेश असल्याचे युवक काँग्रेसकडून सांगण्यात आले. संविधानाच्या माध्यमातून देशातील प्रत्येक नागरिकाला समान अधिकार मिळाले असून, संविधानाच्या मूल्यांवर कोणत्याही प्रकारे गदा येउ नये, अशी भूमिका आंदोलकांनी मांडली. युवक काँग्रेसच्या पदाधिका-यांनी मनुस्मृतीच्या विचारसरणीला विरोध करत संविधानाच्या मूल्यांचा प्रसार करण्याची गरज व्यक्त केली.

**शिवराज मोरे, नवज्योत सिंग संधू यांची उपस्थिती-**

महाराष्ट्र प्रदेश युवक काँग्रेसचे अध्यक्ष शिवराज दादा मोरे आणि प्रदेश सहप्रभारी नवज्योत सिंग संधू यांच्या प्रमुख उपस्थितीत ही यात्रा काढण्यात आली. युवक काँग्रेसच्या पदाधिका-यांनी संविधानातील समता, स्वातंत्र्य, बंधुता आणि सामाजिक न्याय या मूल्यांच्या समर्थनार्थ आंदोलनाची भूमिका स्पष्ट केली. युवक काँग्रेसच्या माध्यमातून राज्यभर संविधानाच्या मूल्यांबाबत जनजागृती करण्यात येणार असल्याचे पदाधिका-यांनी सांगितले. युवकांनी संविधान समजून घेउन त्यातील मूलभूत मूल्यांच्या रक्षणासाठी पुढाकार घ्यावा, असे आवाहनही करण्यात आले. संविधान सन्मान यात्राच्या माध्यमातून संविधानाचा सन्मान आणि सामाजिक न्यायाचा मुद्दा युवकांपर्यंत पोहोचविण्याचा प्रयत्न करण्यात आला. मनुस्मृतीच्या निषेधासोबतच संविधानाच्या मूल्यांचे महत्त्व अधोरेखित करण्यात आले. महाराष्ट्र प्रदेश युवक काँग्रेसचे महासचिव अक्षय अरुण हेटे यांनी दिलेल्या माहितीनुसार, मनुस्मृतीच्या निषेधार्थ आणि संविधानाच्या सन्मानार्थ ही यात्रा आयोजित करण्यात आली. संविधानाच्या मूल्यांबाबत युवकांमध्ये जागृती निर्माण करणे हा या उपक्रमामागील प्रमुख उद्धेश असल्याचे त्यांनी सांगितले.

## ग्रामपंचायतींवर प्रशासक म्हणून विस्तार अधिका-यांची नियुक्ती




**नागपूर/प्रतिनिधी :** राज्य शासनाने ग्रामपंचातींवर माजी सरपंचाना प्रशासक म्हणून नियुक्त केले होते. परंतु आता त्यांना पदावरून हटवण्यात आले असून त्यांच्या जागी जिल्हा परिषदचे मुख्य कार्यकारी अधिकारी यांच्या अधिनस्त असलेल्या विस्तार अधिका-यांची नियुक्ती करण्याचे सुधारित आदेश काढलेत. आरक्षण ५० टक्क्यांवर गेल्याने सर्वोच्च न्यायालयात याचिका दाखल करण्यात आली होती. त्यामुळे राज्य निवडणूक आयोगाने ५० टक्केच्या मर्यादेत आरक्षण असलेल्या जिल्हा परिषदांच्या निवडणुका घेण्याचे आदेश दिलेत. राज्यातील अनेक ग्रामपंचायतींमध्येही आरक्षणाची टक्केवारी ५० वर गेली. त्याच प्रमाणे सरपंच पदाच्या आरक्षणाची टक्केवारी ही ५० वर गेले होती. त्यामुळे यांच्या निवडणुका न घेता प्रशासकाची नियुक्ती करण्यात आली होती. तर प्रशासकाचा कारभार माजी सरपंचांकडे देण्यात आला होता.

**५० टक्केच्या मर्यादेत आरक्षण ठेवण्याचे आयोगाचे आदेश**

सर्वोच्च न्यायालयाने ५० टक्केच्या मर्यादेत आरक्षण ठेवण्याचे आदेश दिले आहेत. परंतु राज्य निवडणूक आयोगाने निश्चित केलेल्या पद्धतीमुळे अनेक स्थानिक स्वराज्य संस्थामध्ये आरक्षणाची टक्केवारी ५० वर गेली. दरम्यानच्या काळात राज्य निवडणूक आयोगाने ग्रामपंचायतींमध्ये ओबीसींना २७ टक्के आरक्षण निश्चित करताना कमाल आरक्षण ५० टक्क्यांवर जाता कामा नये, असे आदेश दिलेत. त्यामुळे हजारो ग्रामपंचायतींमध्ये ओबीसींच्या जागा कमी करून त्या खुल्या प्रवर्गात वर्ग करण्याची वेळ आली. नुकतीच ही प्रक्रियाही काही ठिकाणी पूर्ण करण्यात आली.

**प्रशासक म्हणून नियुक्त केले होते माजी सरपंच-**आरक्षणाचा मुद्दा सर्वोच्च न्यायालयात प्रलंबित असल्याने राज्यातील २० जिल्हा परिषदांसह, पंचयात समित्या व हजारो ग्रामपंचायतींच्या निवडणुका झाल्या नाहीत. त्यामुळे ग्रामपंचायतींवर प्रशासक म्हणून माजी सरपंचांची नियुक्ती करण्याचा राज्य शासनाने घेतला होता. त्याला विरोध झाला. परंतु सरकार आपल्या निर्ययावर ठाम होती. त्यामुळे सरपंचाचे पद गेले असले तरी प्रशासकाच्या माध्यमातून संपूर्ण ग्रामपंचायतीची धुरा त्याच्याकडेच होती. त्याच्या सूचनांवरच कारभार चालत होता. सरकारने प्रशासक बदलण्याचा निर्णय घेतला आहे. त्यामुळे आता माजी सरपंच हे प्रशासक राहणार नसून विस्तार अधिका-याकडे ही जबाबदारी असणार आहे. सरकारने कायद्यात पुन्हा साधारणा केली आहे. जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी यांना त्यांच्या अधिकारी क्षेत्रासाठी कृषी, शिक्षण, पंचायत, आरोग्य आदी विभागातील विस्तार अधिका-यांची प्रशासक म्हणून नियुक्ती करता येणार आहे. याबाबतची अधिसूचना ग्रामविकास विभागाने काढली आहे.

## तहसीलदार, जिल्हाधिका-यांनी दररोज ३ ते ५ जनतेला भेटावे- मंत्री बावनकुळे

**मुंबई/प्रतिनिधी ::** नायब तहसीलदार ते जिल्हाधिकारी यांनी जनतेला कार्यालयीन कामकाजाच्या दिवशी दुपारी ३ ते ५ वेळेत भेटावे आणि तसे फलक कार्यालयाबाहेर लावावे, अशी तंबी महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी महसूल विभागाच्या सर्व क्षेत्रीय कार्यालयांना दिली आहे.नायब तहसीलदार, तहसीलदार, प्रांत, जिल्हाधिकारी हे क्षेत्रीय अधिकारी त्यांच्या कार्यालयात भेटत नाहीत, जनतेची गा-हाणी ऐकत नाहीत, अशा तक्रारी आहेत. परिणामी, आपल्या समस्या सोडवण्यासाठी जनतेला मंत्रालयात यावे लागते. त्यामुळे या अधिका-यांनी दैनंदिन कामकाजाच्या दिवशी दुपारी ३ ते ५ या वेळेत कार्यालयामध्ये भेटावे. तसे सूचना फलक कार्यालयाच्या दर्शनी भागात लावण्यात यावे. दुपारी ३ ते ५ या वेळेत दृरदृष्यप्रणालीच्या बैठका टाळाव्यात, अशी तंबी महसूल विभागाने बुधवारी आदेश काढत दिली आहे.महसूल विभागाचे मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी कामांचा सपाटा लावला आहे. अनेक प्रलंबित विषय त्यांनी मार्गी लावले आहेत. महसूल विभागात शासनाची प्रतिमा लोकभिमुख करण्यासाठी त्यांनी मोहीम उघडली आहे. महसूल विभागाची सर्वाधिक क्षेत्रीय कार्यालये असून जनतेशी थेट संबंध या विभागाचा येतो. मात्र अधिकारी कार्यालयात उपलब्ध नसतात, अशा मोठ्या संख्येने तक्रारी होत्या. त्यामुळे जनतेला भेटण्यासाठी महसूलच्या क्षेत्रीय अधिका-यांनी वेळ राखून ठेवण्याबाबत बजावण्यात आले आहे.



## सौदी अरेबियाचा हुथींवर मोठा हल्ला !

### २४ तासांत ३२ एअर स्ट्राईक; येमेनच्या ४ प्रांतांत भीषण बॉम्बवर्षाव

**नवी दिल्ली/वृत्तसंस्था :** येमेनमधील संघर्ष पुन्हा एकदा वाढला आहे. सौदी-समर्थित सैन्याने येमेनच्या चार प्रांतांमध्ये - तैझ, होदेदाह, जौफ आणि मारिब - रात्रभरात एकूण ३२ हवाई हल्ले केले, असा दावा हुथी प्रवक्ते नसरेद्दीन आमेर यांनी केला. हुथींनी सौदीच्या अनेक तेल शुद्धीकरण कारखाने आणि सार्वजनिक सेवा केंद्रांवर हल्ला करून ७३ लोकांना जखमी केल्यानंतर अवघ्या एका दिवसाने ही प्रत्युत्तरात्मक कारवाई करण्यात आली आहे. सौदी-समर्थित येमेनी सैन्याने हल्ला केलेले हे चार प्रांत हुथी बंडखोरांच्या नियंत्रणाखाली आहेत.सौदी अरेबियाने प्रत्युत्तर दिले आहे. या हल्ल्यांमुळे झालेल्या नुकसानीची किंवा जीवितहानीची कोणतीही माहिती उपलब्ध नाही. सौदी अधिका-यांकडून कोणतीही अधिकृत प्रतिक्रिया आलेली नाही.

# संपादकीय

प्रबंध संपादक : प्रदीप देशपांडे

## निष्पापांचा बळी

दिल्ली विद्यापीठाच्या दक्षिण टोकाला असलेल्या सत्य निकेतन परिसरात पाच मजली इमारत कोसळली. या दुर्घटनेत पाच निष्पाप तरुणांना आपला जीव गमवावा लागला. तीन जण गंभीर जखमी झाले, तर अनेक विद्यार्थी ढिगाऱ्याखाली गाडले गेल्याची भीती आहे. ही घटना जितकी वेदनादायी आणि संतापजनक आहे, तितकीच डोळे उघडायला लावणारी आहे. आपल्या उज्ज्वल भविष्याची स्वप्ने रंगवत असलेल्या तरुणांना अनधिकृत आणि धोकादायक इमारतीच्या ढिगाऱ्याखाली गुदमरून मृत्यूला सामोरे जावे लागणे, ही आपल्या सामाजिक व्यवस्थेसाठी, प्रशासकीय व्यवस्थेसाठी अत्यंत लाजिरवाणी बाव आहे. तळागाळातील पालक आपल्या मुलांना शिक्षणासाठी बाहेर पाठवतात. मात्र शिक्षण संस्था निवासाची सुविधा पुरवत नसल्यामुळे या मुलांना खर्चाचा विचार करून नाईलाजास्तव अशा अनधिकृत, धोकादायक आणि कोंदट ठिकाणी राहणे भाग पडते. एकतर आपल्या देशात विद्यार्थ्यांना जातीच्या किंवा आर्थिक आधारावर शिक्षणात सवलत दिली जाते, मात्र या विद्यार्थ्यांच्या निवासाचे काय? त्याबद्दल कधीच विचार केला जात नाही. शैक्षणिक अर्थसंकल्पात विद्यार्थ्यांच्या हॉस्टेलसाठी तरतूद का केली जात नाही? दुसरे असे, की देशातील मोठ्या शहरांमध्ये जेव्हा एखादी इमारत कोसळते, तेव्हा ती केवळ विटा-सिमेंटचा सांगाडा नसते, तर त्यासोबत प्रशासकीय दिरंगाई, भ्रष्टाचाराचे जाळे आणि सुरक्षेकडे केलेले अक्षम्य दुर्लक्ष हे सगळे ढिगाऱ्याखाली दबले जाते. या घटनेने पुन्हा एकदा तेच जुने, पण अत्यंत महत्त्वाचे प्रश्न उपस्थित केले आहेत. अनधिकृत आणि धोकादायकबांधकामांकडे प्रशासनाचे आधी लक्ष का जात नाही? परवानग्या नसतानाही शहरांच्या उरावर अनधिकृत मजले कसे उभे राहतात? आणि सर्वात महत्त्वाचे म्हणजे, अशा गंभीर बाबींवर कारवाई करण्यासाठी नेहमी एखाद्या मोठ्या दुर्घटनेचीच वाट का पाहिली जाते? ३६ वर्षे जुन्या असलेल्या या इमारतीला केवळ तळमजला आणि पहिल्या मजल्याची परवानगी होती; परंतु नियमांची पायमल्ली करत त्यावर तीन अनधिकृत मजले उभारण्यात आले. इतकेच नव्हे, तर कमजोर पाया असतानाही भर पावसाळ्यात तळ मजल्याखाली अनधिकृत खोदकाम सुरू होते. भुसभुशीत झालेली जमीन, साचलेले पाणी आणि त्यात पिलर ढासळल्यामुळे संपूर्ण पाच मजली इमारत पत्त्यांच्या बंगल्यासारखी कोसळली. या दुर्घटनेमागील कारणांची साखळी पाहिली, तर प्रत्येक टप्प्यावर निष्काळजीपणा स्पष्टपणे दिसून येतो. सत्य निकेतन हा परिसर दिल्ली विद्यापीठातील हजारो विद्यार्थ्यांचे राहण्याचे ठिकाण आहे. देशाच्या कानाकोपऱ्यांतून; विशेषतः केरळ, हरियाणा, उत्तर प्रदेश आणि विहारसारख्या राज्यांतून आलेले तरुण येथे शिक्षण घेण्यासाठी राहतात. संकीण गल्लीबोळांमध्ये उभ्या असलेल्या या तंग इमारतीमध्ये एका एका खोलीत २ ते ३ विद्यार्थ्यांना कोंबले जाते. इमारतींचे मालक भाड्यापोटी मोठी रक्कम वसूल करतात; परंतु इमारतीची दुरुस्ती, मेंटेनन्स किंवा विद्यार्थ्यांच्या सुरक्षेकडे पूर्णपणे दुर्लक्ष पूर्णपणे दुर्लक्ष करतात. मालक दूरवर राहून केवळ ऑनलाईन भाडे गोळा करण्यात धन्यता मानतात, तर दुसरीकडे पालिका प्रशासन अशा अनधिकृत पीजी (पेईंग गेस्ट) कडे दुर्लक्ष करते. शिक्षणाच्या आणि रोजगाराच्या मुख्य केंद्रांजवळ राहण्याची योग्य व्यवस्था नसल्यामुळे विद्यार्थ्यांना अशा असुरक्षित आणि कोंदट जागांचा आसरा घ्यावा लागतो. याच असहाय्यतेचा गैरफायदा घरमालक घेतात. या दुर्घटनेनंतर नेहमीप्रमाणे राजकीय आरोप प्रत्यारोपांची राळ उडाली आहे. काँग्रेसच्या मते ही इमारत महिनाभरापूर्वीच धोकादायक म्हणून सील करण्यात आली होती, तर महापालिका अधिकारी असा कोणताही अधिकृत पुरावा नसल्याचा दावा करत आहेत. मुख्यमंत्र्यांनी न्यायिक चौकशीचे आदेश दिले आहेत, मालकावर गुन्हे दाखल झाले आहेत आणि पंतप्रधान व इतर वरिष्ठ नेत्यांनी शोक व्यक्त केला आहे; परंतु प्रत्येक दुर्घटनेनंतर सुरू होणारा हा 'ॲक्शन ड्रामा' केवळ एक तात्पुरती प्रतिक्रिया असतो. काही दिवस तपास चालेल, काही अधिकारी निलंबित होतील आणि काही जणांना अटक होईल; परंतु याने मूळ समस्येचे निर्मूलन होणार आहे का? गेल्या मे महिन्यात साकेत भागात घडलेली घटना असो. वा आताची सत्य निकेतनची ही दुर्घटना; प्रत्येक अपघातानंतर सुरक्षेचे ऑडिट करण्याचे दावे केले जातात; परंतु काही दिवसांतच हे सगळे विसरले जाते आणि पुन्हा नवीन अपघाताची वाट पाहिली जाते. महानगरांवर आज लोकसंख्येचा प्रचंड ताण आहे. मर्यादा ओलांडलेल्या या शहरांमध्ये केवळ नवे बृहत् आराखडे किंवा नियम कागदावर करून चालणार नाही, तर त्यांची कठोर अंमलबजावणी आणि सतत पाळत ठेवणे गरजेचे आहे. शिक्षणासाठी घरापासून दूर आलेल्या प्रत्येक विद्यार्थ्यांचा जीव अमूल्य आहे. पालकांनी विश्वासाने आपल्या मुलांना शहरात पाठवलेले असते, ते अशा प्रशासकीय दुर्लक्षामुळे ढिगाऱ्याखाली गाडले जाण्यासाठी नक्कीच नाही. शिक्षण संस्थांनी विद्यार्थ्यांसाठी हॉस्टेलची सुविधा उपलब्ध करून देणे बंधनकारक करायला हवे. तसेच, दिल्ली महापालिका आणि इतर नागरी संस्थांनी केवळ दुर्घटना घडल्यानंतर जागे न होता, वेळीच सर्व अनधिकृत, धोकादायक आणि नियमबाह्य इमारतींचे तातडीने स्ट्रक्चरल ऑडिट करून कठोर कारवाई केली पाहिजे. सत्य निकेतनच्या दुर्घटनेतून योग्य तो धडा घेऊन जर प्रशासनाने तत्काळ सर्वंकष सुधारणा केल्या नाहीत, तर अशा निष्पाप जीवांचा बळी जातच राहील आणि ही निष्काळजीपणाची साखळी कधीही तुटणार नाही.

# अर्थव्यवस्था चमकदार कामगिरी करत आहे?




राज्यकर्त्यांना जशी देशाची अर्थव्यवस्था सर्व जगात चमकणारी दिसते तशी राज्यकर्त्या वर्गाचा अविभाज्य भाग असणाऱ्या भारतातील श्रीमंत लोकांना देखील दिसली पाहिजे की नको ?

देशाची तुफान आर्थिक प्रगती होत असून देखील अनेक श्रीमंत भारतीय नागरिक कायमचे (पर्यटक म्हणून नव्हे) आपला भारतीय पासपोर्ट सरेंडर करून दुसऱ्या विकसित देशात स्थायिक होण्यासाठी जातात असे सांगितल्यावर दोन मित्रांनी तुम्ही डावी मंडळी पुरावे न देता सरकारवर टीका करता अशी टीका केली

ही आकडेवारी खालील प्रमाणे ; संदर्भ परराष्ट्र मंत्रालय; लोकसभा उत्तरे (कोणीही नेटवर क्रॉसचेक करू शकतात)

२०१८ : १,३४,०००
२०१९ : १,४४,०००
२०२०: ८५,०००
२०२१: १,६३,०००
२०२२: २,२५,०००
२०२३ : २,१६,२१९
२०२४: २,०६,३७८
२०२५: २,५६,१८४

वर्षाला सरासरी २,२५,००० व्यक्ती भारतीय नागरिकत्व सोडतात म्हणजे दिवसाला ६०० व्यक्ती ; तासाला २५. दोन मिनिटाला एक. म्हणजे ही पोस्ट वाचून होईपर्यंत एक! जीडीपी चे आकडे वाढत आहेत. त्याच काळात देश सोडणाऱ्याचे आकडे देखील दरवर्षी वाढत आहेत. पिरियड.

१. भारत देश कायमचा सोडून जाणारे नागरिक काही मेक्सिको मधून कुंपण ओलांडून अमेरिकेत घुसणारे गरीब नाहीत किंवा आफ्रिकेतून लाकडी होडीतून समुद्रात जीव धोक्यात घालून युरोपियन देशात प्रवेश करू पाहणारे निर्वासित नाहीत.

२. भारतातून कामासाठी वर्क व्हिसा वर, विशेषतः आखाती देशात, जाणाऱ्यांचे प्रमाण अनेक दशके मोठे आहे. पण ही मंडळी नागरिकत्व भारतीयच ठेवतात. अलीकडच्या केरळम मधील निवडुकांमध्ये मतदानाचा हक्क गाजवण्यासाठी विमानाचे तिकीट खर्च करून अनेक जण आखाती देशातून आल्याच्या बातम्या होत्या. त्यांचे कुटुंब, मुले इथेच असतात. त्यामुळे ही कॅटेगरी वेगळी. त्यांना आज ना उद्या मायदेशी नक्की परत यायचे आहे

३. भारतीय नागरिकत्व कायमचे सोडणारी कुटुंबे एलिट वर्गातील आहेत. कायमचे जाण्याचा निर्णय घेण्यापूर्वी त्यांनी अनेक वर्षे परकीय देशात रियल इस्टेट , इतर वित्तीय गुंतवणुकी केलेल्या असतात. रिझर्व्ह बँकेची Liberalized Remittance Scheme आहे. त्या अंतर्गत भारतीय नागरिक दर वर्षाला अडीच लाख डॉलर्स पर्यंत विविध कारणासाठी परदेशात पाठवू शकतो. त्यात परदेशात गुंतवणुकी करण्यासाठी डॉलर्स विकत घेता येतात. ही आकडेवारी गोळा केल्यावर अधिक प्रकाश पडेल.

४. यातील बहुसंख्य अमेरिका , ऑस्ट्रेलिया , कॅनडा , ब्रिटन , सिंगापूर अशा प्रगत देशात नागरिकत्व घेत आहेत ; भले भारतीय एलिट वर्गाला नागरिकत्व घ्यायचे असेल पण यजमान देशाने द्यावयास हवे ना. ते यजमान देश ऐऱ्यागैऱ्याला नागरिकत्व देत नसतात , फक्त मलदारांनाच देतात उदा. यजमान देशात रियल इस्टेट विकत घेणारे , यजमान देशात भांडवली गुंतवणूक करणारे इत्यादी

५ भारतीय नागरिकत्व कायमचे सोडून देण्यारांचा जात / धर्म / प्रदेश / भाषा / राज्य / कौटुंबिक पार्श्वभूमी / धन्दा / व्यवसाय / शिक्षण / आणि राजकीय / सामाजिक विचारधारा या संबंधातील माहिती मिळाली तर एका चांगल्या संशोधन प्रबंधाचा विषय होईल.उघड आहे यातील जवळपास सर्व नागरिकांच्या आधीच्या पिढ्या या देशातच जन्मलेल्या / वाढलेल्या / मातीत मिसळलेल्या असणार. अशी कुटुंबे आपला देश कायमचा सोडून जाण्याच्या निर्णयाप्रती कशी येत असतील ?

या लोकांकडे एवढे पैसे , सोशल कॅपिटल , सामाजिक , राजकीय नेटवर्क आहे की ते भारतात ते ठरवतील ता शहरात, ठरवले तर छानपैकी राहू शकली असती. म्हणजे त्यांनी घेतलेला निर्णय प्रचंड डिस्ट्रेस मधून घेतलेला नाही. सजग, शांत मनाने विचारपूर्वक घेतलेला निर्णय असणार. मग काय असतील यांची देश कायमचा सोडून जाण्याची कारणे ?

त्यांच्या जाण्याचे बिलकुल दुखः नाही. त्यांच्या जाण्याचा उल्लेख अर्थव्यवस्था चमकदार कामगिरी करत आहे की नाही यासाठी साक्ष काढण्यासाठी आहे..गेले त्यांना जाण्याचे दुःख नाही, राज्यकर्त्यांना ते गेले तर दुःख नाही. आपण तर म्हणतच असतो की 'जे उडून गेले ते कावळे' !

संजीव चांदोरकर

# नियोजन दुष्काळ निवारण्याचे !

*यंदाच्या आठ लाख हेक्टर पेरणी घटीकडे केवळ 'पेरणी कमी झाली' म्हणून पाहता कामा नये. त्यामागे पावसातील तूट, पावसाचा खंड, मृद्‌र्द्रतेची घट, पाण्याची अनिश्चितता आणि शेतकऱ्याच्या वाढलेल्या जोखमीची मानसिकता आहे. म्हणूनच आज महाराष्ट्रासमोरचा प्रश्न 'दुष्काळ पडला आहे का?' हा नसून 'दुष्काळाची शक्यता निर्माण होत असताना आपण किती आधी कृती करणार?' हा आहे.*



महाराष्ट्रात जलसंधारणाची मोठी कामे झाली. जलयुक्त शिवार, शेततळी, बंधारे, नाला खोलीकरण, गाळ काढणे अशा उपक्रमांमुळे अनेक भागांत पाणीसाठा वाढण्यास मदत झाली. मात्र प्रश्न असा आहे, की या पाण्याचा वापर किती शाश्वत आहे? महाराष्ट्र जलसंपत्ती नियमन प्राधिकरणानुसार कृष्णा, गोदावरी, तापी आणि नर्मदा या चार खोऱ्यांत राज्याच्या सुमारे ९२ टक्के लागवडी योग्य क्षेत्राचा समावेश होतो; परंतु या खोल्यांतील सुमारे ४९ टक्के क्षेत्र पाणीटंचाईग्रस्त किंवा अतिटंचाईग्रस्त मानले जाते. म्हणून 'पाणी अडवा, पाणी जिरवा' नंतरचा पुढचा मंत्र 'पाणी मोजा, पाणी वाटा आणि पाणी वाचवा' असा असला पाहिजे.

प्रत्येक तालुक्याचे जललेखा तयार करणे, भूजल पुनर्भरणाच्या तुलनेत उपशाचे प्रमाण मोजणे, पिकांना लागणारे पाणी आणि उपलब्ध पाणी यांची सांगड घालणे, तसेच पाण्याच्या उपलब्धतेनुसार पीकनियोजन करणे आवश्यक आहे. पाणीटंचाईच्या भागात अधिक पाणी लागणाऱ्या पिकांचा विस्तार आणि दुसरीकडे कडधान्ये, तेलबिया, ज्वारी-बाजरी यांसारख्या तुलनेने कमी पाण्यात येणाऱ्या पिकांकडे दुर्लक्ष, ही विसंगती दूर करावी लागेल. याचा अर्थ ऊस किंवा अन्य नगदी पिकांवर बंदी नव्हे; तर प्रदेशाच्या जलक्षमता, माती, बाजारपेठ आणि हवामानाचा विचार करून पीकरचना ठरवणे होय. राष्ट्रीय कृषी धोरणातील पीकविविधीकरणाची दिशा आणि आर्थिक सर्वेक्षणातील हवामान सक्षम पीकरचनेचा आग्रह याच कारणामुळे महत्त्वाचा आहे. आर्थिक सर्वेक्षणाने ठिबक, तुषार सिंचन, हवामान सहिष्णू पिके आणि स्थानिक कृषी हवामान परिस्थितीनुसार पीकनिवडीवर भर दिला आहे. भारतीय कृषी संशोधन परिषददेखील महाराष्ट्रासाठी जलसंधारण, पावसाचे पाणी साठवणे, संरक्षित सिंचन आणि पीकविविधीकरण यांना महत्त्व देते. हवामान विभागाचा अंदाज उपलब्ध असणे आणि तो शेतकऱ्याच्या निर्णयात उपयोगी पडणे यात फरक आहे. 'पुढील पाच दिवस पाऊस पडेल' एवढी माहिती पुरेशी नाही. शेतकऱ्याला सांगावे लागेल पेरणी करावी की थांबावे? खत द्यावे की नाही? फवारणी पुढे ढकलावी का? पुनर्पेरणीची वेळ आली आहे का? पावसाचा खंड किती धोकादायक आहे? यासाठी हवामान अंदाज, मुद्‌आर्द्रता, उपग्रह चित्रे, पीकस्थिती आणि स्थानिक कृषी विद्यापीठांचा सल्ला एकत्र करून गावपातळीवर कृषी सल्ला पोहोचविणे आवश्यक आहे.

आयसीएआर-सीआरआयडाए आणि महाराष्ट्रातील कृषी विभागाने यापूर्वीच कृषी आकस्मिक नियोजनात पावसाची स्थिती, पेरणीच्ची प्रगती आणि कोरडया खंडांचे निरीक्षण करून स्थानिक पातळीवर उपाय सुचविण्याची पद्धत विकसित केली आहे, उशिरा पेरणी झाल्यास अल्पावधीच्या वाणांचा वापर, पिकांची फेरनिवड आणि पेरणीच्या वेळेतील बदल यावरही भर देण्यात आला आहे. आता ही यंत्रणा कागदावरील 'कृषी आकस्मिक योजना' न राहता प्रत्यक्ष शेतकऱ्याच्या मोबाइलपर्यंत पोहोचणारी निर्णयव्यवस्था बनवण्याची गरज आहे. पावसातील अनिश्चितता वाढत असताना पीकविमा अधिक महत्त्वाचा ठरतो. मात्र विमा हा नुकसान झाल्यानंतर पैसे देणारी यंत्रणा एवढया पुरता मर्यादित राहता कामा नये. उपग्रहाधारित पीकनकाशे, हवामान केंद्रे, मृद्‌आर्द्रता आणि कृत्रिम बुद्धिमत्तेच्या साह्याने नुकसानाचे अधिक अचूक व वेगवान मूल्यांकन करता येऊ शकते. यामुळे नुकसानभरपाईतील विलंब कमी होईल आणि 'शेतात झालेले नुकसान' आणि 'कागदावरील नुकसान' यातील दरी कमी करता येईल.

**सरकारने काय करावे?**

- यंदाच्या परिस्थितीत तातडीच्या आणि दीर्घकालीन अशा दोन्ही उपायांची गरज आहे.
- पावसाची तूट असलेल्या तालुक्यांमध्ये मद्‌अर्द्रता, पिकांची अवस्था आणि जलसाठ्यांचे तातडीने संयुक्त सर्वेक्षण करावे.
- खरीप पिकांच्या संवेदनशील अवस्थेतील जिल्ह्यांसाठी स्वतंत्र हवामान-कृषी कृती आराखडा तयार करावा.
- पावसाचा खंड वाढल्यास पुनर्पेरणी, पर्यायी पिके, चारा आणि संरक्षित सिंचनासाठी आगाऊ व्यवस्था करावी.
- रब्बी हंगामाच्या दृष्टीने सप्टेंबरमधील मुद्‌आर्द्रता आणि धरणांतील पाणीसाठ्याचे जिल्हानिहाय नियोजन करावे.
- जलसंधारणाच्या प्रत्येक कामाचे 'पाणी साठवण क्षमता-भूजल पुनर्भरण-प्रत्यक्ष उपयोग' या तीन निकषांवर मूल्यमापन करावे.
- पाण्याच्या उपलब्धतेशी विसंगत पीकरचनेऐवजी कडधान्ये, तेलबिया, भरड धान्ये, पशुपालन, फळबागा आणि इतर पूरक व्यवसाय यांचा समन्वयीत कृषी आराखडा तयार करावा.
- हवामान बदलाच्या पार्श्वभूमीवर कृषी विद्यापीठे, आयसीएआर संस्था, हवामान विभाग आणि राज्य प्रशासन यांच्यातील संशोधन सल्ला-प्रसार यंत्रणा अधिक मजबूत करावी.

महाराष्ट्रासाठी २०२६-३१ या कालावधीतील संशोधन आराखड्यातही हवामान-सक्षम शेती, मृद्‌आरोग्य, पीकवाण सुधारणा, अचूक शेती, कृत्रिम बुद्धिमत्ता आणि कृषी तंत्रज्ञान यांना महत्त्व दिले जात आहे. महाराष्ट्राने दुष्काळाच्या संकटाशी लढण्याचा दीर्घ अनुभव घेतला आहे. परंतु हवामान बदलाच्या युगात दुष्काळाची जुनी व्याख्या आणि जुने प्रतिसाद पुरेसे ठरणार नाहीत. यंदाच्या आठ लाख हेक्टर पेरणीघटीकडे 'केवळ पेरणी कमी झाली'. म्हणून पाहता कामा नये. त्यामागील पावसातील तूट, पावसाचा खंड, मृद्‌आद्रतेची घट, पाण्याची अनिश्चितता आणि शेतक-याच्या वाढलेल्या जोखमीची मानसिकता आहे आणि म्हणूनच आज महाराष्ट्रासमोरचा प्रश्न दुष्काळ पडला आहे का?' हा नसून 'दुष्काळाची शक्यता निर्माण होत असताना आपण किती आधी कृती करणार?' हा आहे. कारण दुष्काळ जाहीर झाल्यानंतर मदत करणे ही प्रशासनाची पारंपरिक भूमिका आहे; पण दुष्काळ येण्यापूर्वी त्याची चाहूल ओळखून पिके, पाणी आणि शेतकरी यांना वाचवणे ही भविष्यातील प्रशासनाची खरी कसोटी असेल.

आज महाराष्ट्राच्या शेतकऱ्याला आभाळाकडून केवळ पावसाची अपेक्षा नाही; त्याला विश्वसनीय हवामान माहिती, उपलब्ध पाण्याचे शास्त्रीय नियोजन, हवामान सक्षम पीकपध्दती, प्रभावी विमा आणि संकटाच्या आधी मिळणारा सरकारी हात हवा आहे. पाऊस हा महाराष्ट्राच्या शेतीचा आधार आहे पण पावसावरचे अवलंबित्व कमी करणे, पाण्याचा कार्यक्षम वापर वाढवणे आणि हवामानाच्या अनिश्चिततेशी जुळवून घेणे हीच आता महाराष्ट्राच्या कृषी धोरणाची खरी दिशा असली पाहिजे.(उत्तरार्ध)

सत्यसाई पी. एम.
७२४८९९२३२३

# देवाला 'प्रमाण' असते, मग आवाजाला का नाही?



९ सप्टेंबर २०२२. कोल्हापूर. गणपती विसर्जनाची मिरवणूक. त्यानंतरच्या दिवसांत डोळ्यांच्या दवाखान्यात ३४ तरुण येऊन बसले. वय अठरा ते सत्तावीस. सगळ्यांची तक्रार एकच 'एका डोळ्याने नीट दिसत नाही.'तपासणीत सगळ्यांच्या डोळ्यांत, नेमके दृष्टीच्या मध्यबिंदूवर मॅक्युलावर रक्तस्राव झालेला होता. कारण मिरवणुकीतला लेझर बीम.हे ३४ रुग्ण Indian Journal of Ophthalmology या शास्त्रीय नियतकालिकात रीतसर नोंदवले गेले आहेत. आणि त्यातले आकडे असे :

दवाखान्यात आले तेव्हा त्या डोळ्याची सरासरी दृष्टी २०/५६० पर्यंत घसरली होती.३४ पैकी ३० जणांच्या डोळ्यावर प्रक्रिया करावी लागली.२९ जणांना लेझर हायलॉयडोटॉमी, एकाला शस्त्रक्रिया.चार आठवड्यांनी सरासरी दृष्टी २०/२५ पर्यंत सुधारली. पण एका डोळ्याला मॅक्युलर होल पडले, आणि चार आठवड्यांनंतरही त्याची दृष्टी २०/२०० वरच होती.म्हणजे एका रात्रीच्या 'मजे'साठी तीस तरुणांच्या डोळ्यांवर उपचार करावे लागले.

आता बापटांचा विषय.पुण्यात विद्यानंद बापटांनी हा विषय लावून धरला, आणि सध्या राज्यभर तोच गाजतो आहे. महापालिकेच्या गणेशोत्सव बैठकीत त्यांनी आवाजाचा मुद्दा मांडला, त्यांना बैठकीतून बाहेर जायला सांगण्यात आले, तो व्हिडिओ व्हायरल झाला. पुढे त्यांच्यावर 'नक्षली मानसिकते'चा आरोपही झाला.बापटांबद्दल तुमचे-माझे मत काहीही असू शकते.ते नास्तिक आहेत, डाव्या विचारांचे आहेत म्हणून त्यांचा राग येणारेही खूप आहेत.पण मुद्दा बापट नाहीत. मुद्दा आवाज आहे.आणि इथेच तुमची-माझी खरी अडचण सुरू होते.जे स्वतःला हिंदुत्ववादी म्हणवून घेतात, त्यांनी जे चुकीचे आहे ते चुकीचे म्हटले नाही,तर त्याचा अर्थ एकच निघतो, आपली त्याला संमती आहे. आणि प्रामाणिकपणे सांगायचे तर तो अर्थ चुकीचाही नाही. मौन ही सुद्धा एक भूमिका असते.विरोधकाने बरोबर मुद्दा मांडला म्हणून तो चुकीचा होत नाही. आणि आपल्या माणसाने चूक केली म्हणून ती बरोबर होत नाही.

आवाजाचे गणित समजून घेऊ.'आवाज जरा जास्त होता' या वाक्यात एक फसवणूक आहे. डेसिबल हा साधा आकडा नाही तो लॉगरिदमिक आहे. १० डेसिबल वाढले की आवाजाची ऊर्जा दहापट होते.आता आकडे बघा.ञ्दगे इद्त्त्लूग्दह ल्ते, २००० नुसार निवासी भागात रात्रीची मर्यादा ४५ डेसिबल, दिवसा ५५. रुग्णालय-शाळेच्या शांतता क्षेत्रात ४० आणि ५०.डीजेची भिंत सहज ११० डेसिबल गाठते.फरक ६५ डेसिबलचा. लॉगरिदमिक हिशेबात याचा अर्थ ध्वनी-ऊर्जा कायदेशीर मर्यादेच्या सुमारे तीस लाख पट. कानाला जाणवणारा मोठेपणा सुमारे नव्वद पट.दुसरा आकडा त्याहून बोलका आहे. ञ्ध्ध्ए च्या निकषानुसार ८५ डेसिबलला माणूस सुरक्षितपणे आठ तास राहू शकतो. पुढे प्रत्येक ३ डेसिबलला ही मुदत निम्मी होते. १०० डेसिबलला ती पंधरा मिनिटे उरते. ११० डेसिबलला दोन मिनिटांच्या आत.मिरवणूक चालते सहा तास.आणि कानाच्या आतल्या ज्या पेशी यात मरतात, त्या पुन्हा उगवत नाहीत. ऐकू कमी येणे हे एकच नुकसान असते असेही नाही रक्तदाब, झोप, हृदयावरचा ताण या सगळ्यावर याचा परिणाम नोंदवला गेला आहे.मुख्यमंत्र्यांनी स्वतः याचे वर्णन 'भूकंपासारखा हादरा' असे केले आहे.हे सगळे आपण कोणाच्या डोक्यावर सोडतो? घरात परीक्षेला बसलेला मुलगा, हृदयाचा त्रास असलेले आजोबा, तीन महिन्यांचं बाळ, आणि रस्त्यालगतच्या आयसीयूतला रुग्ण. कालच्या दहीहंडीचे रील्स.काल दहीहंडीचे रील्स बघितले, तर एक प्रश्न स्वतःला विचारावा लागतो यात सांस्कृतिक काय आहे आणि धार्मिक काय आहे?कर्णकर्कश आवाज. डोळ्याला इजा करू शकतील असे लेझर. भक्तिगीत म्हणून लावलेली गाणी आणि त्यावर स्टेजवर चाललेले अश्लील अंगविक्षेप.आणि या सगळ्याच्या मागे बॅनरवर कृष्णाचा फोटो. त्याच्या शेजारी पंतप्रधानांचा आणि मुख्यमंत्र्यांचा फोटो.गोविंदा पथकाच्या त्या स्टेजवर श्रीकृष्ण नेमका कुठे आहे, हे मला प्रामाणिकपणे सांगता येणार नाही.आपल्या परंपरेत 'प्रमाण' हा शब्द आहे.हे लक्षात घ्या आपल्या पूजेत प्रत्येक गोष्टीला माप आहे.अभिषेकाला किती पाणी, नैवेद्याला काय आणि किती, मुहूर्त कोणता, आरतीची वेळ कोणती, उपवास किती दिवसांचा सगळ्याला प्रमाण आहे. 'जास्त केले म्हणजे जास्त भक्ती' असे आपल्या परंपरेने कधीच म्हटलेलं नाही. उलट अतिरेकाला परंपरेत नेहमीच दोष मानला गेला आहे.देवघरातली घंटा ही देवघरापुरतीच वाजायची असते. तिला दहा हजार वॅटचा हॉर्न लावला की ती भक्ती राहत नाही ती दहशत होते.मग आवाजाला मात्र प्रमाण नको, हे कोणत्या धर्मशास्त्रात लिहिले आहे?खरं समीकरण खरा प्रश्न श्रद्धेचा नाहीच. तो साधा गणिती आहे.पक्ष चालवायचा तर कार्यकर्ते लागतात. कार्यकर्ते सांभाळायचे तर त्यांना काहीही परवानगी द्यावी लागते.हेच जर समीकरण असेल, तर हे दरवर्षी वाढतच जाणार. यंदा चार बास-चार टॉप, पुढच्या वर्षी आठ. यंदा लेझर, पुढच्या वर्षी आणखी काहीतरी.कारण या स्पर्धेत वरची मर्यादा कोणीच ठरवलेली नाही.आणि याचं बरं-वाईट फळ शेवटी मतदाराच्या घरातच पडते.. कार्यकर्त्यांच्या नाही.तरीही आशेची एक जागा आहे.यंदा काही ठिकाणी दहीहंडीला डीजेऐवजी ढोल-ताशा वाजला. काही मंडळांनी स्वतःहून स्पीकरची संख्या मर्यादित ठेवली. नागपूर, नवी मुंबई, सोलापूर, पुणे इथे प्लाझ्मा-प्रेशर मिड सिस्टिम आणि लेझरवर बंदी आली.म्हणजे हे शक्य आहे. फक्त कोणीतरी ठामपणे 'नाही' म्हणायची गरज आहे.आणि ते 'नाही' प्रशासनाकडून येण्यापेक्षा राजकीय पक्षाकडून आले, तर त्याचा परिणाम शंभरपट जास्त असेल. कारण मंडळं पोलिसांना घाबरत नाहीत..ती आपल्या नेत्याला घाबरतात.एका तरी राजकीय पक्षाने याला लगाम घातला पाहिजे.आणि जे स्वतःला 'पार्टी विथ अ डिफरन्स' म्हणवून घेतात, त्यांच्याकडून ही अपेक्षा जास्त आहे. कारण 'डिफरन्स' हा शब्द फक्त निवडणुकीच्या जाहीरनाम्यात नाही, तर अशा वेळी दाखवायचा असतो.

साहेब, आपल्या श्रद्धेला दुसऱ्याच्या कानाची आणि डोळ्याची किंमत मोजावी लागत असेल, तर ती श्रद्धा नाही ती सोय आहे.तुमच्या भागातल्या मंडळाला 'आवाज कमी करा' असे तुम्ही कधी प्रत्यक्ष सांगितले आहे का? आणि नसेल, तर का नाही भीती म्हणून, की 'आपल्याच लोकांचे आहे' म्हणून?

मनोज देशमुख

# सणवार, मुलांना घडवण्यासाठी चालून आलेली संधी

आजच्या डिजिटल आणि आधुनिक युगात आपली नवीन पिढी पाश्चात्त्य संस्कृतीकडे वेगाने आकर्षित होत आहे. अशा वेळी सण आणि उत्सवांच्या माध्यमातून मुलांमध्ये भारतीय संस्कृती रुजवण्याचा प्रयत्न पालकांनी करणे अत्यंत आवश्यक झाले आहे. आपले सण केवळ सुट्ट्या घालवण्याचे साधन नसून, ते समृद्ध परंपरा आणि मानवी मूल्यांचा वारसा आहेत. प्रत्येक सणामागे एक विशिष्ट वैज्ञानिक, सामाजिक आणि आध्यात्मिक दृष्टिकोन असतो, जो मुलांपर्यंत पोहोचणे गरजेचे आहे.पालकांनी घरात सण साजरे करताना मुलांना त्यात प्रत्यक्ष सहभागी करून घ्यावे. जसे की, सणांची खरेदी करणे, घर सजवणे, आणि पारंपारिक पदार्थ बनवताना त्यांना सोबत ठेवल्याने त्यांच्यात आपलेपणाची भावना निर्माण होते. सणांच्या निमित्ताने एकत्र येणाऱ्या कुटुंबामुळे मुलांना आदर, प्रेम आणि सहकार्याची शिकवण मिळते. मुलांना सणांचे महत्त्व आणि त्यामागील रंजक कथा गोष्टींच्या रूपात सांगाव्यात, जेणेकरून त्यांची उत्सुकता वाढेल. थोरामोठ्यांना नमस्कार करणे, नातेवाईक शेजारी यांच्याशी आदराने आपण बोलावे आणि त्यांनाही जोडून द्यावे. या निमित्ताने मोबाईल स्क्रीनपासून दूर राहून मुले प्रत्यक्ष समाजजीवनाचा आणि नातेसंबंधांचा आनंद घेऊ शकतात. सण-उत्सव हे मुलांमध्ये सामाजिक बांधिलकी, पर्यावरणपूरक वृत्ती आणि नैतिक मूल्ये रुजवणारी एक उत्तम संस्कारशाळा आहेत. आपल्या दैनंदिन व्यस्ततेतून वेळ काढून पालकांनी हा सांस्कृतिक वारसा पुढच्या पिढीकडे सोपवण्याची जबाबदारी प्राधान्याने पार पाडायला हवी.

प्रणाली कोचरेकर,
पनवेल

गुरूवार, दि. १० सप्टेंबर २०२६
E-mail:-ytljanmadhyam@gmail.com

# जनमाध्यम

एक प्रतिष्ठित सवय

# भूदानच्या जमिनींवर महसूल चा ‘हातोडा’ 800 प्लॉटधारकांना नोटिसा

**सहा ले-आउट एसडीओंच्या रडारवर आठ शर्त भंग प्रकरणांनी खळबळ, ३२ हेक्टर जमीन वाटप झालेली संस्थाच अस्तित्वात नसल्याचे उघड**

✦जनमाध्यम | प्रतिनिधी

**यवतमाळ, दि. ९ : भूदानाच्या मूळ उद्देशालाच हरताळ फासून जमिनींचे ले-आउट पाडून प्लॉट विक्री करण्यात आल्याच्या संशयाने महसूल प्रशासनाने आता कारवाईचा मोर्चा थेट प्लॉट धारकांकडे वळविला आहे. मोहा परिसरातील भूदान जमिनींच्या तपासणीत सुमारे ७५ हेक्टर क्षेत्रावरील १५ जमिनी अकृषक झाल्याची नोंद आढळली असून, त्यापैकी सहा प्रकरणे ले-आउटशी संबंधित असल्याचे समोर आले आहे.**

### २०१२-१३ च्या नोंदीही तपासणीच्या भोवऱ्यात

**गट क्रमांक ५१, ५०, ३१०, ३०४, ३०५, २९७ पैकी, ३४२, ३४३, ३४५, ११९, १८३, १५९, १६०, १४४ आणि १४० मधील काही जमिनींना अकृषक परवानगी अथवा सनद देण्यात आल्याची नोंद आहे. ही प्रक्रिया २०१२-१३ दरम्यान झाल्याचे सांगितले जाते. भूदान यज्ञ मंडळाकडून उपलब्ध झालेल्या यादीच्या आधारे या नोंदींची फेरतपासणी सुरू आहे.**

### इतर उपविभागांतही तपासणीला वेग


**यवतमाळ जिल्ह्यात साडेसहा हजार हेक्टरपेक्षा अधिक भूदान जमीन असल्याची नोंद आहे. राळेगाव उपविभागात दोन प्रकरणांत वर्ग-२ जमीन वर्ग-१ करण्यात आल्याचे आढळले असून, ती पुन्हा वर्ग-२ करण्याची प्रक्रिया सुरू आहे. दारव्हा उपविभागातही तपासणी सुरू झाली असून, तालुक्यात १६७ हेक्टर भूदान जमीन असल्याची नोंद आहे. आता ८०० प्लॉटधारकांना बजावण्यात येणाऱ्या नोटिसा आणि त्यानंतरची सुनावणी निर्णायक ठरणार आहे. भूदानाच्या अटींचा भंग सिद्ध झाल्यास संबंधित जमिनींवर महसूल प्रशासन कोणती कठोर भूमिका घेते, याकडे जिल्ह्याचे लक्ष लागले आहे.**

या ले-आउटमधील तब्बल ८०० प्लॉट धारकांना नोटिसा बजावण्याची प्रक्रिया सुरू करण्यात आली आहे. एसडीओ गोपाळ देशपांडे यांच्या स्तरावर सुरू असलेल्या पडताळणीत भूदान जमिनींच्या हस्तांतरणा पासून अकृषक परवानगीपर्यंतच्या नोंदी तपासल्या जात आहेत. ले-आउट मधील प्रत्येक प्लॉट धारकाची माहिती संकलित करण्याची जबाबदारी तलाठ्यांवर सोपविण्यात आली आहे. त्यामुळे केवळ मूळ जमीनधारकच नव्हे, तर भूदान जमिनीचे तुकडे करून प्लॉट विकणारे आणि ते खरेदी करणारेही महसूल प्रशासनाच्या चौकशीच्या कक्षेत आले आहेत. मोहा येथील काही प्रकरणांत नोटिसा बजावून सुनावणी सुरू झाली आहे. भूदान जमिनीच्या वाटपाच्या अटींचा भंग झाला का, हस्तांतरण अथवा खरेदी-विक्री नियमबाह्य झाली का, तसेच अकृषक परवानगी आणि सनद कोणत्या आधारावर देण्यात आली, याची तपासणी केली जात आहे. शर्तभंग सिद्ध झाल्यास महसूल कायद्यानुसार पुढील कारवाई होण्याची शक्यता आहे.पडताळणीत आतापर्यंत आठ शर्तभंगाची प्रकरणे समोर आल्याची माहिती आहे. मृत्यूपत्राच्या आधारे हक्क हस्तांतरण तसेच जमीन खरेदी-विक्रीचे व्यवहार झाल्याचा ठपका ठेवण्यात आला आहे. विशेष म्हणजे, मोहा येथील एका प्रकरणात ३२ हेक्टर भूदान जमीन ज्या ‘मोहा सर्वोदय ग्राम परिवार सहकारी शेती संस्था’ला देण्यात आली होती, ती संस्था अस्तित्वातच नसल्याचे पडताळणीत आढळले आहे. त्यामुळे जमीन वाटपापासून पुढील व्यवहारापर्यंतच्या संपूर्ण प्रक्रियेवर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे.

# आर्थिक संकटातही बैलांवरील प्रेम कायम..!

## ‘ना नफा ना तोटा’ दरामुळे शेतकऱ्यांना दिलासा

✦जनमाध्यम | प्रतिनिधी



**महागाव, दि. ९ :** दुष्काळसदृश्य परिस्थिती, नापिकी आणि आर्थिक संकटामुळे शेतकरी अडचणीत असतानाही महागाव शहरात बैलपोळ्याचा उत्साह ओसंडून वाहताना दिसत आहे. वर्षभर शेतीच्या कामात शेतकऱ्याला साथ देणाऱ्या बैलांप्रती कृतज्ञता व्यक्त करण्यासाठी शेतकऱ्यांनी आर्थिक अडचणी बाजूला ठेवून पोळ्याची जय्यत तयारी सुरू केली आहे.

गेल्या दोन दिवसांपासून शहरातील बाजारपेठेत बैलांच्या सजावटीसाठी आवश्यक असलेले विविध साहित्य खरेदी करण्यासाठी शेतकऱ्यांची मोठी गर्दी होत आहे. गोंडे, झूल, शिंगांची सजावट, दोर, रंग तसेच विविध आकर्षक साहित्याला मागणी वाढली आहे. आर्थिक परिस्थिती बिकट असतानाही कुटुंबातील सदस्याप्रमाणे जपलेल्या बैलांचा सन्मान करण्याची ग्रामीण संस्कृतीतील परंपरा आजही कायम असल्याचे चित्र बाजारपेठेत पाहायला मिळत आहे. शेतकऱ्यांची आर्थिक परिस्थिती लक्षात घेऊन विलास खिरे यांनी बैल सजावटीचे साहित्य ‘ना नफा ना तोटा’ या तत्त्वावर उपलब्ध करून दिले आहे. त्यामुळे अल्प खर्चात बैलांची सजावट करता येत असल्याने शेतकऱ्यांना मोठा दिलासा मिळाला आहे.

“बैलपोळा हा केवळ सण नसून शेतकऱ्याच्या कष्टात वर्षभर साथ देणाऱ्या बैलांप्रती कृतज्ञता व्यक्त करण्याचा दिवस आहे,” अशी भावना शेतकऱ्यांनी व्यक्त केली. दरम्यान, दुष्काळ व नापिकीच्या संकटाला शेतकऱ्यांनी एकजुटीने सामोरे जावे, असे आवाहन जन आंदोलन आधार संघर्ष समितीचे संस्थापक अध्यक्ष जगदीश भाऊ नरवडे यांनी केले. त्यांनी महागाव परिसरातील शेतकऱ्यांना बैलपोळ्याच्या शुभेच्छाही दिल्या.

## थोडक्यात



### माहेश्वरी युवा संगठन पुसदची कार्यकारिणी बिनविरोध निवड

**पुसद :** माहेश्वरी युवा संगठन पुसदच्या सत्र २०२६-२९ साठी नवीन कार्यकारिणीची निवड नुकतीच बिनविरोध पार पडली. संघटनेच्या निवडणुकीत सर्व पदाधिकाऱ्यांची एकमताने निवड करण्यात आली. नवीन कार्यकारिणीत अध्यक्षपदी गोपाल सोमानी, सचिवपदी कन्हैया भंडारी, कोषाध्यक्षपदी सूरज भांगडे तर प्रचार-प्रसार मंत्रीपदी उमेश जाजू यांची बिनविरोध निवड करण्यात आली. संघटनेच्या एकजुटीचे आणि परस्पर सहकार्याचे दर्शन घडवत सर्व निवडणुका बिनविरोध पार पडल्याने समाजबांधवांमध्ये आनंदाचे वातावरण आहे. नवनिर्वाचित पदाधिकारी आगामी काळात माहेश्वरी युवा संगठनाच्या माध्यमातून सामाजिक, शैक्षणिक, सांस्कृतिक तसेच समाजोपयोगी उपक्रमांना अधिक गतिमान करण्यासाठी प्रयत्नशील राहतील, असा विश्वास यावेळी व्यक्त करण्यात आला. सर्व नवनिर्वाचित पदाधिकाऱ्यांचे समाजबांधवांकडून हार्दिक अभिनंदन व पुढील कार्यासाठी शुभेच्छा देण्यात आल्या. ही निवडणूक प्रक्रिया तालुका निवडणूक अधिकारी ॲड. सतीश भंडारी यांच्या मार्गदर्शनाखाली पार पडली.



### शिवभक्ताच्या मृत्यूचे दुःख मनात,दहीहंडीची परंपरा मात्र खंडित होणार नाही!

**नितीन भुतडा यांची घोषणा यंदा ११ लाख ११ हजार १११ रुपयांचे बक्षीस**

**उमरखेड :** मागील वर्षी अतिवृष्टीने शेतकरी संकटात सापडल्याने दहीहंडी उत्सव रद्द करून त्यासाठीची ११ लाख ११ हजार १११ रुपयांची रक्कम मुख्यमंत्री सहाय्यता निधीस देण्यात आली होती. यंदा कावड यात्रेदरम्यान शिवभक्ताचा अपघाती मृत्यू झाल्याने त्याच्या कुटुंबाप्रती संवेदना व्यक्त करत एक लाख रुपयांची मदत करण्यात येणार आहे. मात्र, संकटांच्या मालिकेमुळे पूर्वजांनी सुरू केलेली दहीहंडीची परंपरा खंडित होऊ देणार नाही, अशी ठाम भूमिका भाजपा जिल्हा समन्वयक नितीन भुतडा यांनी जाहीर केली.

कृषी उत्पन्न बाजार समितीच्या सभागृहात आयोजित पत्रकार परिषदेत ते बोलत होते. दि.१३ सप्टेंबर रोजी दहीहंडी उत्सव पारंपरिक पद्धतीने उत्साहात साजरा करण्यात येणार असून, विजेत्या पथकासाठी ११ लाख ११ हजार १११ रुपयांचे बक्षीस ठेवण्यात आले आहे.

स्व. प्रमोद महाजन चॅरिटेबल ट्रस्ट व स्वातंत्र्यसैनिक बंकटलालजी भुतडा चॅरिटेबल ट्रस्टच्या वतीने हा उत्सव आयोजित करण्यात आला आहे. सिद्धेश्वर मित्र मंडळाची मानाची दहीहंडीही यंदा उत्साहात होणार असल्याचे भुतडा यांनी सांगितले.

दरम्यान, आगामी उत्सवांच्या पार्श्वभूमीवर विजेच्या लपंडावाने नागरिक त्रस्त असून, याबाबत महावितरण अधिकाऱ्यांसोबत आमदार किसनराव वानखेडे यांनी बैठक बोलावली आहे. शेतकऱ्यांच्या प्रश्नांना प्राधान्य देणार असल्याचेही त्यांनी स्पष्ट केले.

### मुख्यमंत्री पांदन रस्ते योजना कागदावरच तातडीने कामे सुरू करण्याची मागणी

**दारव्हा :** भूमिहीन शेतमजूर आणि शेतकऱ्यांसाठी महत्त्वाचे असलेले पांदन रस्ते तातडीने सुरू करण्याची मागणी राष्ट्रव्यापी मातृभूमी भेदभाव निर्मूलन समितीचे राष्ट्रीय अध्यक्ष भीमराव राठोड यांनी जिल्हाधिकारी यांच्याकडे केली आहे. मुख्यमंत्री पांदन रस्ते योजनेंतर्गत जिल्हा नियोजन समिती, यवतमाळ कडून कोट्यवधी रुपयांची शासकीय मान्यता झाली असतानाही राळेगाव व वणी तालुक्यांतील काही रस्त्यांची कामे सुरू असून अन्य तालुक्यांमध्ये मात्र कामांना विलंब होत असल्याचा आरोप त्यांनी केला. सध्या पावसाने दडी मारल्याने ग्रामीण भागातील शेतमजुरासमोर रोजगाराचे संकट निर्माण झाले आहे. त्यामुळे ग्रामपंचायत, पंचायत समिती, जिल्हा परिषद, कृषी, वन, सार्वजनिक बांधकाम व महसूल विभागांनी तांत्रिक व प्रशासकीय मान्यता प्रक्रिया तत्काळ पूर्ण करून महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेंतर्गत पांदन रस्त्यांची कामे सुरू करावीत, अशी मागणी राठोड यांनी केली आहे.

# गोर बंजारा (तांडा) घाटंजी येथे तिज विसर्जन व गुणगौरव सोहळा उत्साहात

✦जनमाध्यम | प्रतिनिधी



**घाटंजी, दि. ९ :** गोर बंजारा (तांडा) घाटंजी येथे तिज उत्सवानिमित्त तिज विसर्जन सोहळा, गुणवंत विद्यार्थ्यांचा गुणगौरव तसेच निवृत्त कर्मचारी व नव्याने तांड्यात आलेल्या मान्यवरांचा सत्कार सोहळा उत्साहपूर्ण वातावरणात पार पडला. घाटंजी परिसरातील या गोर बंजारा तांड्याचे नायक सुधाकर राठोड,कारभारी काशिनाथ आडे,डाव सुनील जाधव, नसाबी बाबुलाल चव्हाण यांच्या मार्गदर्शनाखाली कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. तिज विसर्जन सोहळ्यात तांड्यातील महिला व समाजबांधवांनी मोठ्या संख्येने सहभाग घेतला.

पारंपरिक वेशभूषा, डफड्यांच्या गजर आणि सांस्कृतिक वातावरणामुळे संपूर्ण तांड्यात उत्साहाचे वातावरण निर्माण झाले होते. तिज उत्सवाच्या माध्यमातून बंजारा समाजाची संस्कृती, परंपरा व सामाजिक एकोपा जपण्याचा संदेश देण्यात आला.कार्यक्रमात शैक्षणिक क्षेत्रात उल्लेखनीय यश संपादन करणाऱ्या गुणवंत विद्यार्थ्यांचा गुणगौरव व सत्कार करण्यात आला. विद्यार्थ्यांनी शिक्षणाच्या माध्यमातून प्रगती साधून समाजाचे नाव उज्ज्वल करावे, असा संदेश यावेळी देण्यात आला.तसेच तांड्यातील सेवेतून निवृत्त झालेल्या कर्मचाऱ्यांचा विशेष सत्कार करून त्यांच्या प्रदीर्घ सेवाकार्याबद्दल कृतज्ञता व्यक्त करण्यात आली. आपली संस्कृती आणि परंपरा जपत असतानाच शिक्षणाला प्रोत्साहन, गुणवंतांचा सन्मान, ज्येष्ठांचा आदर आणि नव्याने येणाऱ्या व्यक्तींचे स्वागत या माध्यमातून समाजाला नवी दिशा देण्याचे काम या कार्यक्रमातून होत असल्याचे दिसून आले. त्यामुळे तिज उत्सवाला केवळ धार्मिक व सांस्कृतिक स्वरूप न राहता सामाजिक एकोपा आणि शैक्षणिक प्रगतीची जोड मिळाल्याचे चित्र यावेळी पाहायला मिळाले.कार्यक्रमाला तांड्यातील समाजबांधवांसह ज्येष्ठ नागरिक, महिला, युवक व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी तांड्यातील समाजबांधवांनी विशेष परिश्रम घेतले.

# गोविंदा आला रे आला...’च्या गजरात टाकळी शाळेत दहीहंडी उत्सव.!

## जि. प. उ. प्रा. शाळेतील चिमुकल्यांचा उत्साह पाहण्यासाठी ग्रामस्थांची उपस्थिती.!

✦जनमाध्यम | प्रतिनिधी



**झरी, दि. ९ :** तालुक्यातील टाकळी येथील जिल्हा परिषद उच्च प्राथमिक शाळेत गोकुळ अष्टमी निमित्त विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले. यावेळी शाळेतील चिमुकल्यांनी उत्साहात सहभाग घेतला. विद्यार्थ्यांच्या आनंदात सहभागी होण्यासाठी गावातील ग्रामस्थांनीही कार्यक्रमाला उपस्थिती दर्शविली.

गोकुळ अष्टमीच्या पार्श्वभूमीवर शाळेच्या परिसरात उत्साहाचे वातावरण निर्माण झाले होते. भगवान श्रीकृष्णाच्या बाललीलांची आठवण करून देणाऱ्या या उत्सवात विद्यार्थ्यांनी आनंदाने सहभाग घेतला. यावेळी शाळेत दहीहंडीचा कार्यक्रम घेण्यात आला. दहीहंडीच्या कार्यक्रमासाठी विद्यार्थ्यांमध्ये विशेष उत्साह पाहायला मिळाला. चिमुकल्यांनी एकत्र येत दहीहंडी फोडण्याचा आनंद घेतला. यावेळी उपस्थित ग्रामस्थांनी विद्यार्थ्यांचा उत्साह वाढविला. शाळेतील या छोटेखानी कार्यक्रमामुळे परिसरात आनंदाचे वातावरण निर्माण झाले. या कार्यक्रमाच्या निमित्ताने विद्यार्थ्यांना श्रीकृष्णाच्या बाललीला, गोकुळ अष्टमीचे महत्त्व आणि भारतीय सण-उत्सवांची माहिती मिळाली. शाळेत अशा प्रकारचे सांस्कृतिक कार्यक्रम आयोजित केल्यामुळे विद्यार्थ्यांमध्ये एकोपा, सहकार्याची भावना आणि उत्सवाबद्दलची आवड निर्माण होते. गावातील चिमुकल्यांचा हा कार्यक्रम पाहण्यासाठी ग्रामस्थांनी मोठ्या संख्येने उपस्थिती दर्शविली. विद्यार्थ्यांचा उत्साह, त्यांचा आनंद आणि दहीहंडीचा कार्यक्रम पाहताना ग्रामस्थांनीही आनंद व्यक्त केला. शाळा आणि गाव यांच्यातील आपुलकीचे नाते या कार्यक्रमातून पुन्हा एकदा अधोरेखित झाले. गोकुळ अष्टमी निमित्त आयोजित करण्यात आलेल्या या कार्यक्रमामुळे टाकळी जिल्हा परिषद उच्च प्राथमिक शाळेतील विद्यार्थ्यांना आनंदाचा आणि उत्साहाचा अनुभव मिळाला. शाळेतील चिमुकल्यांच्या सहभागामुळे कार्यक्रमाला विशेष रंगत आली. एकंदरीत, गोकुळ अष्टमी निमित्त टाकळी शाळेत आयोजित करण्यात आलेल्या दहीहंडी कार्यक्रमामुळे विद्यार्थ्यांमध्ये उत्साहाचे वातावरण निर्माण झाले, तर ग्रामस्थांच्या उपस्थितीमुळे या कार्यक्रमाला आणखी शोभा आली.

# ६४ ग्रामपंचायतींचे आरक्षण जाहीर, ३२ ग्रामपंचायतींवर ‘महिला राज’!

## आरक्षण सोडतीनंतर राजकीय वेग,इच्छुकांच्या हालचाली वाढल्या

✦जनमाध्यम | प्रतिनिधी



**बाभूळगाव, दि. ९ :** बाभूळगाव तालुक्यातील आगामी ग्रामपंचायत निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर ६४ ग्रामपंचायतींचे आरक्षण बुधवारी येथील तहसील कार्यालयात सोडतीद्वारे जाहीर करण्यात आले. आरक्षणाच्या या सोडतीमुळे गावागावातील राजकीय समीकरणांना कलाटणी मिळण्याची शक्यता असून, इच्छुक उमेदवारांच्या हालचालींना आता वेग येणार आहे.

तालुक्यातील ६४ ग्रामपंचायतींपैकी तब्बल ३२ ग्रामपंचायतींचे सरपंचपद महिलांसाठी आरक्षित झाले आहे. त्यामुळे तालुक्यात यंदा ५० टक्के ग्रामपंचायतींच्या नेतृत्वाची धुरा महिलांच्या हाती जाणार आहे. आरक्षण जाहीर होताच अनेक इच्छुकांच्या आशा पल्लवित झाल्या, तर काहींच्या राजकीय गणितांना मात्र धक्का बसला आहे. तहसील कार्यालयात झालेल्या आरक्षण सोडतीवेळी निवडणूक विभागाचे उपजिल्हाधिकारी अविनाश शिंगटे, तहसीलदार मीरा पागोरे, निवडणूक विभागाचे नायब तहसीलदार आय. एम. कांबळे, महसूल सहाय्यक सुजाता तायडे तसेच ऑपरेटर अमित मोगरकर उपस्थित होते. आरक्षणाची ईश्वरचिठ्ठी पूजा सहारे यांच्या हस्ते काढण्यात आली. आरक्षण जाहीर झाल्यानंतर आता प्रत्येक गावात संभाव्य उमेदवारांची चाचपणी, गटबांधणी आणि राजकीय मोर्चेबांधणीला सुरुवात होणार आहे. त्यामुळे आगामी ग्रामपंचायत निवडणुकांची रंगत आतापासूनच वाढली आहे.

# मराठा सेवा संघाने समतेचा पाया रचत बहुजन समाज जोडला.!

✦जनमाध्यम | प्रतिनिधी



**पुसद, दि. ९ :** मराठा सेवा संघाने एका समाजापुरते मर्यादित न राहता, महाराष्ट्रात सामाजिक समतेचा भक्कम पाया रचला आहे, अशा शब्दांत महाराष्ट्र व गोवा बार कौन्सिलचे माजी अध्यक्ष ॲड. आशिष देशमुख यांनी गौरवोद्गार काढले. मराठा सेवा संघाच्या वर्धापन दिनानिमित्त पुसद येथे आयोजित विशेष कार्यक्रमात सत्कारमूर्ती म्हणून ते बोलत होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी श्री शिवाजी शिक्षण संस्थेचे अध्यक्ष अनिरुद्ध पाटील चोंढीकर होते, तर मुख्य वक्ता म्हणून सामाजिक विचारवंत डॉ. स्नेहाताई टॉपे यांनी मार्गदर्शन केले.

सत्काराला उत्तर देताना ॲड. आशिष देशमुख म्हणाले, "छत्रपती शिवरायांनी अठरापगड जातीतील मावळ्यांना सोबत घेऊन स्वराज्याची निर्मिती केली. त्यांच्या स्वराज्यात कोणताही भेदभाव नव्हता, तर कर्तृत्वाला मान होता. याच समतेच्या विचारांचा वसा इंजि. पुरुषोत्तम खेडेकर साहेबांनी मराठा सेवा संघाच्या माध्यमातून जोपासला आहे. आज नवतरुणांनी सेवा संघातून प्रेरणा घेऊन समाजकार्य, प्रशासन आणि इतर क्षेत्रात उल्लेखनीय कार्य सुरू केले आहे, ही अत्यंत अभिमानास्पद बाब आहे. ते पुढे म्हणाले, "मराठा सेवा संघाचे प्रदेश अध्यक्ष इंजि. विजय घोगरे यांची प्रेरणा आणि मार्गदर्शन सर्व पदाधिकारी व कार्यकर्त्यांना मिळत असून, त्यांच्या नेतृत्वाखाली संघटन अधिक मजबूत होत आहे." मुख्य वक्ता डॉ. स्नेहाताई टोम्पे म्हणाल्या, "संघटन आणि समूहमान टिकवणे हे मोठे आव्हान आहे. राष्ट्रमाता जिजाऊंनी दिलेला संस्कार आणि संघटनाचा मंत्र आज मराठा सेवा संघाने जपला आहे. याप्रसंगी मराठा सेवा संघाचे पदाधिकारी संजय आसोले लिखित पुस्तकाचे मान्यवरांच्या हस्ते विमोचन करण्यात आले. तसेच वैद्यकीय क्षेत्रात PG पूर्ण केल्याबद्दल डॉ.तृप्ती कदम व डॉ. आदित्य महल्ले यांचा मान्यवरांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. यावेळी मराठा सेवा संघाचे प्रदेश उपाध्यक्ष दिगंबर जगताप, केंद्रीय कार्यकारीणी सदस्य वसंतराव देशमुख, जिल्हा सचिव डॉ.संदीप शिंदे,ॲड.रमेश पाटील न.प. सभापती राजेश साळुंखे, नगरसेवक दीपक काळे, अनिल चव्हाण, संजय पाटील संभाजीराव टेटर आदी मान्यवर उपस्थित होते.कार्यक्रमाचा प्रारंभ तालुकाध्यक्ष हरगोविंद कदम यांनी जिजाऊ वंदनेने केला.प्रास्ताविक दिगंबर जगताप यांनी केले. सूत्रसंचालन प्रा. गजानन जाधव यांनी केले तर आभार शहराध्यक्ष डॉ. चंद्रशेखर खेडकर यांनी मानले.या वर्धापदिन कार्यक्रमास मराठा सेवा संघ, जिजाऊ ब्रिगेड, संभाजी ब्रिगेडचे पदाधीकारी व शेकडो समाज बंधू भगीनी मोठया संखेने उपस्थित होते.

# यवतमाळ- वाशिममध्ये दुष्काळ जाहीर करा - खा.संजय देशमुख

## शेतकऱ्यांना तातडीची मदत द्या!पिकांचे तातडीने पंचनामे करण्याचे आवाहन

✦जनमाध्यम | प्रतिनिधी



**यवतमाळ, दि. ९ :** यवतमाळ व वाशिम जिल्ह्यांतील प्रतिकूल हवामान आणि दुष्काळजन्य परिस्थितीमुळे खरीप पिकांचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले असून, शासनाने परिस्थितीचे गांभीर्य ओळखून दोन्ही जिल्ह्यांत तातडीने दुष्काळ जाहीर करावा, अशी मागणी यवतमाळ-वाशिम लोकसभा मतदारसंघाचे खासदार संजय उत्तमराव देशमुख यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे केली आहे.

मुख्यमंत्र्यांना पाठविलेल्या पत्रात खासदार देशमुख यांनी कापूस, सोयाबीन, तूर, मूग, उडीद यांसह विविध खरीप पिकांना मोठा फटका बसल्याचे नमूद केले आहे. पेरणी, बियाणे, खते, औषधे आणि मजुरीवर मोठा खर्च करूनही हातातोंडाशी आलेले पीक संकटात सापडल्याने शेतकरी आर्थिक विवंचनेत असल्याचे त्यांनी म्हटले आहे.शेतकऱ्यांच्या नुकसानीचे केवळ पंचनामे करून चालणार नाही, तर त्यांना प्रत्यक्ष आर्थिक मदत मिळणे गरजेचे आहे. अशी ठाम भूमिका देशमुख यांनी मांडली. नुकसानग्रस्त पिकांचे तातडीने पंचनामे करून शासनाच्या निकषानुसार मदत, तसेच पीकविमा व नैसर्गिक आपत्तीअंतर्गत मिळणारी भरपाई त्वरित देण्याच्या सूचना संबंधित विभागांना द्याव्यात, अशी मागणी त्यांनी केली. शेतकरी आत्महत्यांच्या पार्श्वभूमीवर यवतमाळ जिल्हा अत्यंत संवेदनशील असल्याने शासनाने विलंब न करता विशेष संवेदनशीलतेने निर्णय घ्यावा, असेही खासदार देशमुख यांनी स्पष्ट केले.

# पावसाने दांडी मारली,खरीप पिके करपण्याच्या मार्गावर..!

## बेंबळाचे पाणी कॅनॉलद्वारे तातडीने सोडा

**बाभूळगाव, कळंब, राळेगाव, मारेगावच्या शेतकऱ्यांना दिलासा देण्याची मागणी**

✦जनमाध्यम | प्रतिनिधी



**यवतमाळ, दि. ९ :** जिल्ह्यात पावसाने मोठा खंड दिल्याने खरीप हंगामातील पिके संकटाच्या छायेत आली आहेत. बाभूळगाव, कळंब, राळेगाव व मारेगाव तालुक्यासह परिसरात जमिनीतील ओलावा झपाट्याने कमी होत असून सोयाबीन, कापूस, तूर यांसह अन्य पिकांना सध्या पाण्याची नितांत गरज आहे.

अशा परिस्थितीत बेंबळा प्रकल्पातील उपलब्ध पाणी कॅनॉलद्वारे तातडीने सोडण्यात यावे, अशी मागणी यवतमाळ जिल्हा काँग्रेस कमिटीने केली आहे. खरीप पिकांच्या वाढीसाठी हा अत्यंत महत्त्वाचा कालावधी असताना पावसाने पाठ फिरवल्याने पिकांची वाढ खुंटण्याची आणि उत्पादनात मोठी घट होण्याची भीती निर्माण झाली आहे. पाणी सोडण्यास आणखी विलंब झाल्यास शेतकऱ्यांचे नुकसान वाढण्याची शक्यता आहे.बेंबळा प्रकल्पात उपलब्ध पाण्याचे योग्य नियोजन करून गरजू भागातील कॅनॉलमध्ये तातडीने पाणी सोडल्यास पिकांना आवश्यक ओलावा मिळू शकतो. त्यामुळे सिंचन विभागाने परिस्थितीचे गांभीर्य ओळखून तातडीने निर्णय घ्यावा आणि कॅनॉलद्वारे पाणी सोडण्याची कार्यवाही करावी, अशी मागणी काँग्रेसकडून करण्यात आली आहे. शेतकरी संकटात असताना प्रशासनाने कागदी नियोजन न करता प्रत्यक्ष शेतात पाणी पोहोचवावे, अशी अपेक्षा शेतकरी वर्गातून व्यक्त होत आहे.

# मेळघाट व्याघ्र प्रकल्प:बदलत्या जंगलात मानव-वन्यजीव संघर्ष तीव्र

**मेळघाट/प्रतिनिधी**

मेळघाट व्याघ्र प्रकल्प हा महाराष्ट्राच्या निसर्गसंपदेतील समृद्ध ठेवा आहे. सातपुडा पर्वतरांगांच्या कुशीत वसलेले हे जंगल शेकडो प्रजातींच्या जीव-जंतूंनी समृद्ध आहे. वाघ आणि अस्वल हे प्रमुख प्राणी असले तरी चितळ, सांभर, नीलगाय, बिबट्या, लांडगा, सियार, रानडुक्कर आणि शेकडो पक्षी-प्रजाती या परिसंस्थेचा महत्त्वाचा भाग आहेत.




मागील काही वर्षांत मानव-वन्यजीव संघर्ष वाढला आहे. संरक्षण प्रयत्नांमुळे वाघांची संख्या वाढली हे यश आहे, परंतु हरण, चितळ, सांभर आणि जंगली म्हशीची संख्या हळूहळू कमी होत असल्याचे दिसते. त्यामुळे वाघांना भक्ष्यासाठी अधिक अंतर कापावे लागते आणि ते कधीकधी गावांच्या आसपास येतात, ज्यामुळे टकरावाची शक्यता वाढते.

## ताडोबा पॅटर्न राबवण्याची मागणी

अस्वलांची संख्याही वाढत आहे. अस्वल मुख्यतः फळे, मध आणि रायमुनिया झाडांवर अवलंबून असतात. रायमुनिया झाडांची मुळे मातीला धरून ठेवतात, मात्र या झाडांची संख्या कमी झाल्याने अस्वलांना अन्नासाठी गावाकडे वळावे लागत आहे.

मेळघाट परिसर फक्त वाघ आणि अस्वलापुरता मर्यादित नाही. बिबट्या, सोनकुत्रे, लांडगे यांसारखे शिकारी प्राणीही येथे सक्रिय आहेत. वाघांची वाढती संख्या त्यांच्यावर दबाव आणत असून त्यांचे नैसर्गिक प्रदेश बदलत आहेत.गेल्या चार-पाच महिन्यांत मेळघाट परिसरात दुर्दैवी घटना घडल्या आहेत. वाघ आणि अस्वलांच्या हल्ल्यांमध्ये काही नागरिक गंभीर जखमी झाले, तर काहींना प्राण गमवावे लागले आहेत. ही परिस्थिती ग्रामीणांसाठी भीतीदायक असून वन विभागासाठी मोठे आव्हान बनली आहे. हवामान बदलामुळे नाले-तलाव कोरडे पडल्याने प्राणी पाण्याच्या शोधात गावाकडे येत आहेत.

मेळघाटातील आदिवासी समाज पूर्णपणे जंगलावर अवलंबून आहे. वन्यजीव गावात आल्यास पाळीव प्राण्यांवर हल्ले आणि पिकांचे नुकसान होते, त्यामुळे त्यांच्या सुरक्षिततेचा आणि उपजीविकेचा प्रश्न निर्माण झाला आहे.या पार्श्वभूमीवर स्थानिक नागरिकांनी महत्त्वाची मागणी केली आहे की ज्या प्रमाणे ताडोबाच्या जंगलामध्ये वनविभागाने जंगली जनावरांचा जिथे जास्त अधिवास आहे त्या संवेदनशील भागात तार फेन्सिंग केली आहे, त्याच प्रमाणे मेळघाटच्या संवेदनशील भागात सुद्धा वनविभागाने तार फेन्सिंग करावी, अशी मागणी नागरिकांमधून होत आहे.

समस्या सोडवण्यासाठी शाकाहारी जंगली जनावरांचे संरक्षण व त्याच्या प्रजातीचे संवर्धन, फळझाडांची लागवड, पाणवठ्यांचे संवर्धन, गावांमध्ये सुरक्षितता उपाय आणि स्थानिक समुदायाला सहभागी करून घेणे आवश्यक आहे. तसेच नियमित वैज्ञानिक निरीक्षण करून परिस्थितीवर लक्ष ठेवणे गरजेचे आहे.

मेळघाट हा फक्त व्याघ्र प्रकल्प नाही, तर एक समृद्ध परिसंस्था आहे. योग्य उपाययोजना केल्यास मेळघाट येणाऱ्या पिढ्यांसाठी सुरक्षित आणि समृद्ध राहू शकतो व मानव-वन्यजीव संतुलन टिकवता येऊ शकते.

# आमदार तायडे यांनी घेतली कृषिमंत्री भरणे यांची भेट

## शेतकऱ्यांना मदत मिळण्याची केली मागणी

**अचलपूर/वार्ताहर**

पावसाचा खंड हा सर्वाधिक यावर्षी जिल्ह्यासह अचलपूर विधानसभा मतदारसंघात पडला आहे.खरीप हंगाम पूर्ण हातातून निघून गेला तरी पावसाचा थेंब नाही. या अनुषंगाने अचलपूर मतदार संघाचे आ.प्रवीण तायडे यांनी राज्याचे कृषिमंत्री दत्तात्रय भरणे यांची भेट घेतली.

यावेळी आ.तायडे यांनी राज्याचे कृषी मंत्री दत्तात्रय भरणे यांच्या कडे अचलपूर विधानसभा मतदारसंघातील बाधित शेतकऱ्यांच्या पिकांचे तातडीने पंचनामे करून वस्तुनिष्ठ नुकसान नोंदविणे,पात्र शेतकऱ्यांना शासकीय मदत व पीक विम्याचा लाभ मिळवून देणे, तसेच अडचणीत आलेल्या शेतकऱ्यांना



सुलभ व तातडीने कर्जसुविधा उपलब्ध करून देण्याची मागणी केली आहे.अमरावती जिल्ह्यातील अचलपूर तालुक्यासह सर्व तालुक्यात सरासरीपेक्षा यंदा पाऊस कमी झाला.अचलपूर विधानसभा मतदारसंघातील धरणे अद्यापही भरली नाही.खरीप हंगामात पाऊस न पडल्यामुळे शेतकऱ्यांच्या हातातील तूर,कपाशी,सोयाबीन निघून गेली आहे.या खरीप हंगामात शेतकऱ्यांनी मोठ्या प्रमाणात कर्ज घेतले आहे. यामुळे पुढील काळात दिवाळी साजरा कधी करायची?असा प्रश्न शेतकरी वर्गासमोर निर्माण झाला आहे. या पार्श्वभूमीवर राज्याचे कृषीमंत्री दत्तात्रय मामा भरणे यांची भेट घेऊन अचलपूर मतदार संघाचे आमदार प्रवीण तायडे यांनी विविध मागण्याचे पत्र दिले. आणि अचलपूर विधानसभा मतदारसंघातील बाधित शेतकऱ्यांच्या पिकांचे तातडीने पंचनामे करून वस्तुनिष्ठ नुकसान नोंदविण्याची मागणी या निवेदनाद्वारे करण्यात आली आहे.सोबतच पात्र शेतकऱ्यांना शासकीय मदत व पीक विम्याचा लाभ मिळवून देण्याचा मागणीचा सुद्धा या निवेदनात समावेश आहे.आणि अडचणीत आलेल्या शेतकऱ्यांना सुलभ व तातडीने कर्जसुविधा उपलब्ध करून देण्याची मागणी सुद्धा आ.प्रवीण तायडे यांनी केली आहे.शेतकऱ्यांच्या पाठीशी शासनाने ठामपणे उभे असून संकटग्रस्त शेतकऱ्यांना दिलासा शासनस्तरावरून देण्यासाठी आमदार प्रवीण तायडे यांचा पाठपुरावा सुरू आहे.

# युवक काँग्रेस कमिटीची आढावा बैठक

**अचलपूर/वार्ताहर**



काँग्रेस पक्षाचे महाराष्ट्र प्रदेश प्रभारी नवजोतसिंग संधु यांच्या प्रमुख उपस्थितीत व राहुल येवले जिल्हाध्यक्ष युवक काँग्रेस कमिटी अमरावती यांच्या अध्यक्षतेखाली मेळघाट विधानसभा ग्रामीणची आढावा बैठक कांडली येथे आयोजित करण्यात आली होती.

कार्यक्रमाला उपस्थित नामदेवराव तनपुरे तालुकाध्यक्ष काँग्रेस कमिटी अचलपूर, ओम घोरे माजी सभापती अचलपूर पंचायत समिती, प्रमोद वासनकर,रवींद्र पाटील संचालक कृषी उत्पन्न बाजार समिती यांच्या उपस्थितीत आढावा बैठक पार पडला.यावेळी जय घोरे, विजय बेलसरे,धीरज वासनकर, विशाल खांनजोडे, असीम,मोनीश, शैलेश लव्हाळे,योगेश वानखडे,धम्मानंद देवडेकर,उमेश येवले, चिंटू काटेकर, नितीन घोरे, तेजस मडघे, रोशन घोरे, राजेश सगणे, गिरीश खंडारे, सुदेश मोहोळ,रामदास बेलसरे,सुरेश बेठेकर, विजय शिंदे, सुनील गायकवाड, प्रकाश वाकोडे आदी काँग्रेसचे कार्यकर्ते उपस्थित होते.यावेळी प्रामुख्याने उपस्थितीत नवजीतसिंह संधु व राहुल येवले यांनी कार्यकर्त्यांना मार्गदर्शन केले.प्रास्ताविक नामदेव तनपुरे आणि संचालन जय घोरे यांनी केले.

# गोविंदा रे गोपाळाच्या गजराने दुमदुमली एकलव्य गुरुकुल स्कूल

**नांदगाव खंडेश्वर/वार्ताहर**

एकलव्य गुरुकुल स्कूल येथे गोविंदा रे गोपाळाच्या जयघोषाने आणि राधा कृष्णाच्या भक्तीमय वातावरणात नांदगाव खंडेश्वर येथील एकलव्य गुरुकुल स्कूल परिसर दुमदुमून गेला श्रीकृष्ण जन्माष्टमी निमित्त आयोजित विविध सांस्कृतिक कार्यक्रमा सोबतच भारताचे माजी राष्ट्रपती डॉक्टर सर्वपल्ली राधाकृष्णन यांच्या जयंतीनिमित्त शिक्षक दिन ही उत्साहात साजरा करण्यात आला अध्यापन करणाऱ्या सर्व शिक्षकांचा पुष्पगुच्छ देऊन सदानंद जाधव यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला.विद्यार्थ्यांनी सादर केलेली कृष्णलीला आकर्षक वेशभूषा नृत्यविष्कार आणि दहीहंडीचा थरार यामुळे संपूर्ण वातावरण भक्तीमय व उत्साह पूर्ण झाला होता.



शाळेच्या वतीने श्रावण महिन्यातील कृष्ण अष्टमीनिमित्त जन्माष्टमी महोत्सवाचे आयोजन करण्यात आले होते. शाळेच्या प्रवेशद्वारावर काढण्यात आलेली रांगोळी आकर्षक ठरली तसेच सजविण्यात आलेली दहीहंडी विशेष आकर्षण ठरले. अनेक विद्यार्थी राधा कृष्णाच्या रंगीबेरंगी वेशभूषा सहभागी झाले होते. कार्यक्रमाला प्रमुख मान्यवर यांच्या हस्ते डॉक्टर सर्वपल्ली राधाकृष्णन यांच्या प्रतिमेचे पूजन एकलव्याचे मुख्य मार्गदर्शक सदानंद जाधव (राष्ट्रपती पुरस्कार प्राप्त) विशाल ढवळे एकलव्य अकादमी अध्यक्ष. शाळेचे व्यवस्थापक अनुप काकडे. मुख्याध्यापक विलास मारोटकर, पालक प्रतिनिधी जयश्री सुहागपुरे, तसेच या कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी शिक्षक, शिक्षिका,प्रा.गजानन काकडे, हर्षल रिठे, प्रमोद सुरजुसे,ईश्वर जाधव,प्रकाश लोहांडे,जनार्दन शेलारे,सीमा पोहनकर,सुनिता मारोडकर, आरती काळे, पूजा ठाकरे, सुरेखा लोंदे, रेवती परसनकर, आदिती बोरकर,पूनम तिखीले, अक्षय काळमेघ, राधिका दुधे, नीलिमा देवघरे,अपर्णा चव्हाण, रेखा पंचगडे, वैशाली मोरे, सविता सुने,गुंजा खंडरे, पल्लवी गाडेकर,गुंफा उके, सिद्धीका सोनलकर,अश्विनी शिरभाते, किरण गुल्हाने,प्रिया मेश्राम, लतिका जुनघरे,सोपान ढगे, दिगंबर घोडे, अर्चना लवंगकर, गायत्री चौधरी यांनी परिश्रम घेतले.

# गावकऱ्यांनी केला शिक्षकांचा सन्मान

**अमरावती/का.प्र.**

राष्ट्रीय शिक्षक दिनाचे औचित्याने पळसखेड गावकरी व पीएमश्री शाळा व्यवस्थापन समिती, पळसखेड द्वारा गावातील शिक्षकांचा यथोचित सन्मान व्हावा म्हणून दिनांक ८ सप्टेंबर रोजी जिल्हा परिषद प्राथमिक शाळा पळसखेड येथे शिक्षक सन्मान सोहळ्याचे आयोजन करण्यात आले. माजी गटशिक्षणाधिकारी मुरलीधर राजनेकर यांचे अध्यक्षतेत झालेल्या या कार्यक्रमाचे उद्घाटन विस्तार अधिकारी तथा केंद्र समन्वयक किरण पाटील यांचे हस्ते करण्यात आले.



यावेळी प्रमुख अतिथी म्हणून विस्तार अधिकारी रवींद्र दिवाण, केंद्रसमन्वयक विजय सगणे, सुभाष सहारे, विषयतज्ज्ञ श्रीनाथ वानखडे, वर्षा गादे, शिक्षणतज्ज्ञ श्रीकृष्ण ढोमणे, संत गाडगेबाबा विद्यालयाचे मुख्याध्यापक उमेंद्र ढगे, जिल्हा परिषद शाळा पळसखेडचे मुख्याध्यापक संजय शेलोकर, माध्यमिक विद्यालय पळसखेड प्रफुल्ल थोटे, अनिल गोडसे आदींची प्रामुख्याने उपस्थिती होती.यावेळी गावकरी व शाळा व्यवस्थापन समिती यांचे वतीने पळसखेड गावात उत्तम शैक्षणिक कार्य केल्याबाबत दरवर्षी शिक्षक सन्मान व कृतज्ञता सोहळ्याचे आयोजन करण्यात येते. यावेळी शाळेचे मुख्याध्यापक संजय शेलोकर, तुळशीराम चव्हाण, सुशील देशमुख, प्रीती सपकाळ, अजय दाभेराव, तसेच शालेय पोषण आहार शिकवणाऱ्या सुधा ठाकरे व सीमा धानोरकर आदींना शाल श्रीफळ देऊन सन्मानित करण्यात आले.यावेळी आंतरराष्ट्रीय साक्षरता दिनाचे औचित्याने गावातील माजी विद्यार्थी मेळाव्याचे आयोजन यावेळी करण्यात आले. यामध्ये शाळेसाठी व गावासाठी योगदान देणारे जय शिवाजी क्रीडा मंडळ, वीर अहिल्या बहुउद्देशीय संस्था, तारामाता मंडळ, डॉ.बाबासाहेब आंबेडकर विचार मंडळ ह्या मंडळाचे पदाधिकारी व सदस्यांचा सन्मान करण्यात आला.

कार्यक्रमाच्या यशस्वितेसाठी शाळा व्यवस्थापन समिती अध्यक्ष सुनील पुनसे, उपाध्यक्ष दीपाली गाढवे, योगेश मुकुर्णे, विजय थोटे, अफसरखा पठाण, मंगेश पुंड, स्वाती रुमणे, रोहिणी म्हात्रे, रश्मी इंदुरकर, मनिषा महाणर, अनिता वानखेडे, परिश्रम घेतले. संचालन योगेश मुकुर्णे, तर आभार अजय दाभेराव यांनी मानले.

## खांद्यावर कावड,मनात माणुसकी

# चिंचोली बु.मध्ये हिंदू-मुस्लिम ऐक्याचा अनोखा सोहळा

## मशीद परिसरात यात्रेकरूंचे उत्स्फूर्त स्वागत

**अंजनगाव सुर्जी/वार्ताहर**

एका खांद्यावर कावड, दुसऱ्या खांद्याला माणुसकीची साथ आणि मनात बंधुभावाची भावना...असा अनोखा अनुभव चिंचोली बु. येथे 'जय श्री महाकाल कावड यात्रा, चिंचोली बु.'च्या निमित्ताने पाहायला मिळाला. लाखपुरी येथील जीवेश्वर मंदिरापासून चिंचोली बु.पर्यंत तब्बल ४७ किलोमीटरचा पायी प्रवास शेकडो कावडधारकांनी केला. विशेष म्हणजे, या यात्रेत चिंचोली बु. येथील मुस्लिम समाजातील शेख तोहीद आणि शेख फरजान या दोन तरुणांनी खांद्यावर कावड घेत उत्स्फूर्त सहभाग नोंदविला.धर्म वेगळा असला तरी श्रद्धेचा सन्मान करण्याची आणि एकमेकांच्या सुख-दुःखात सहभागी होण्याची चिंचोली बु.ची परंपरा या यात्रेत पुन्हा एकदा दिसून आली.

कडक ऊन, पायात पडलेले फोड आणि ४७ किलोमीटरचा अंगाचा थरकाप उडवणारा खडतर पायी प्रवास... लाखपुरीहून निघालेल्या



कावडधारकांच्या चेहऱ्यावर थकवा स्पष्ट दिसत होता. पण जेव्हा ही कावड यात्रा चिंचोली बु. गावातील मशीदीजवळ पोहोचली, तेव्हा तिथे घडलेल्या एका दृश्याने प्रवासातील सर्व थकवा क्षणार्धात पळून गेला आणि उपस्थितांचे डोळे प्रेमाने भरून आले.मशीदीच्या अंगणात उभे असलेले मुस्लिम बांधव हातामध्ये पाण्याचे तांबे, चहा आणि नाश्त्याचे ताट घेऊन कावडधारकांची वाट पाहत होते. कावड खांद्यावर घेऊन येणाऱ्या हिंदू बांधवांना आपुलकीने कुरवाळत, त्यांच्या पायावर थंड पाणी टाकत त्यांची सेवा करतानाचा तो क्षण केवळ एका धार्मिक सोहळ्याचा राहिला नाही, तर तो दोन धर्मांमधील नात्याचा एक हळवा आणि भावूक अध्याय बनला.

शेकडो कार्यकर्त्यांसोबत शेख तोहीद आणि शेख फरजान यांनीही ४७ किलोमीटरचा पायी प्रवास करत कावड यात्रेत सहभाग घेतला. त्यामुळे ही यात्रा केवळ धार्मिक सोहळा न राहता हिंदू-मुस्लिम ऐक्याचे प्रतीक ठरली.कावड यात्रा गावात दाखल होत असताना मशीद परिसरात मुस्लिम बांधवांनी यात्रेकरूंचे उत्स्फूर्त स्वागत केले. कावडधारकांसाठी चहा, नाश्ता आणि पिण्याच्या पाण्याची व्यवस्था करण्यात आली. कावडधारकांचा जयघोष सुरू असताना मुस्लिम बांधवांकडून त्यांची सेवा केली जात होती. हे दृश्य उपस्थितांसाठी विशेष आकर्षण ठरले.

'तुमची श्रद्धा तुमची असली, तरी तुमचा आनंद आमचाही आहे,' असा संदेशच जणू या स्वागतामधून देण्यात आला.

विशेष म्हणजे, या संपूर्ण उपक्रमात जिल्हा पोलीस अधीक्षक यांच्या 'ऑपरेशन कवच' अभियानाच्या अनुषंगानेही जनजागृती करण्यात आली. नागरिकांनी सामाजिक शांतता, कायदा व सुव्यवस्था आणि परस्पर सलोखा कायम ठेवावा, याबाबत पोलिसांकडून उपस्थितांमध्ये जागृती करण्यात आली. धार्मिक उत्सव आनंदाने आणि शांततेत साजरे करताना अफवा, गैरसमज व सामाजिक तेढ टाळण्याचे आवाहन करण्यात आले.

### 'ऑपरेशन कवच'चा मेळ

कावड यात्रा गावात पोहोचताच मशीद परिसरात मुस्लिम समाजातील ज्येष्ठांनी व तरुणांनी यात्रेकरूंवर पुष्पवृष्टी करत चहा-नाश्त्याची सोय केली. यावेळी अमरावती जिल्हा पोलिसांच्या 'ऑपरेशन कवच' या अभियानांतर्गत सामाजिक शांतता आणि कायदा सुव्यवस्था राखण्याबाबत जनजागृतीही करण्यात आली.

जय श्री महाकाल कावड यात्रा'ने यंदा ४७ किलोमीटरचे अंतर पार केले; पण या यात्रेने त्यापेक्षाही मोठा प्रवास केला— तो म्हणजे मनामनांमधील अंतर कमी करण्याचा!

कावड एक होती... खांदे अनेक होते.श्रद्धा वेगवेगळी होती... पण माणुसकी एक होती!

धर्माच्या पलीकडे माणुसकीचा सेतू

आजच्या काळात धार्मिक तेढ निर्माण करणाऱ्या घटनांची चर्चा होत असताना चिंचोली बु. येथील चित्र मात्र सकारात्मक संदेश देणारे ठरले. एका धार्मिक यात्रेत मुस्लिम तरुणांचा सहभाग आणि मशीद परिसरात मुस्लिम बांधवांकडून कावडधारकांचे स्वागत, यामुळे सामाजिक सलोखा आणि परस्पर सन्मानाची भावना अधिक दृढ झाली.

**तुमची यात्रा, आमची जबाबदारी!**

कावड यात्रेकरूंना कोणतीही गैरसोय होऊ नये, यासाठी मुस्लिम बांधवांनी केलेली व्यवस्था विशेष ठरली. यात्रेकरूंना आपुलकीने चहा-नाश्ता देत त्यांचे स्वागत करण्यात आले. या प्रेमळ स्वागतामुळे कावडधारकांच्याही चेहऱ्यावर समाधान दिसून आले.चिंचोली बु.मध्ये हिंदू-मुस्लिम बांधवांमध्ये असलेला सामाजिक सलोखा काही नवीन नाही. सण कोणाचाही असो, आनंद मात्र संपूर्ण गावाचा असतो, अशी येथील परंपरा असल्याचे या घटनेतून पुन्हा अधोरेखित झाले.

## संक्षिप्त

### संघर्ष योद्धा बहुउद्देशीय संस्थेतर्फे सत्कार सोहळा



**अमरावती**-महाजनपुरा येथील श्री गजानन महाराज मंदिरात संघर्ष योद्धा बहुउद्देशीय संस्था, अमरावती च्या वतीने शिक्षक दिनाचे औचित्य साधून विशेष गुणगौरव व सत्कार सोहळा अत्यंत उत्साहात आणि भावूक वातावरणात पार पडला.सोहळ्यात अत्यंत संघर्षातून यशाला गवसणी घालत सातारा येथील नामांकित 'रयत शिक्षण संस्थेत' गणित शिक्षकपदी निवड झालेले मनोज विजयकर आणि देशाच्या सीमेवर प्रदीर्घ सेवा बजावून निवृत्त झालेले माजी सैनिक संदीप सावरकर (५८ आर्मर्ड टँक रेजिमेंट) यांचा पुष्पगुच्छ व मानचिन्ह देऊन विशेष सन्मान करण्यात आला. कार्यक्रमाला गडगडेश्वर रवीनगर प्रभागाचे माजी नगरसेवक. योगेश विजयकर तसेच महाजनपुरा परिसरातील ज्येष्ठ नागरिकांनी वेळेत वेळ काढून विशेष उपस्थिती दर्शवली.प्रास्ताविक संस्थेचे सचिव रुपेश पद्माकर नांदुरकर यांनी केले. अध्यक्षीय भाषणात संस्थेचे अध्यक्ष शुभम सावरकर यांनी संस्थेची ध्येयधोरणे आणि भविष्यातील सामाजिक कार्याची दिशा स्पष्ट केली. सदर सोहळ्याचे उत्कृष्ट संचालन संस्थेच्या स्वयंसेवक वैष्णवी घोरे हिने केले, तर उपस्थितांचे आभार ऋतुजा हिरपुरकर हिने मानले.कार्यक्रम यशस्वीरीत्या पार पाडण्यासाठी संस्थेचे अध्यक्ष शुभम सावरकर यांच्या नेतृत्वाखाली उपाध्यक्ष अतुल बोरकर, सचिव रुपेश नांदुरकर, सहसचिव मनोज विजयकर, कोषाध्यक्ष मुकेश बोरकर तसेच सदस्य कुणाल नांदुरकर, सागर बोरकर, जय सावरकर, आदित्य सावरकर, नयन विजयकर, आयुष सावरकर, विकी गायकवाड आणि चेतन नांदुरकर यांनी परिश्रम घेतले. या सोहळ्यास परिसरातील ज्येष्ठ नागरिक, नागरिक आणि विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

### नगराध्यक्षा यांच्या वाढदिवसानिमित्त सामाजिक कार्यक्रम



**चांदूर रेल्वे**-नगराध्यक्षा प्रियंका विश्वकर्मा यांच्या वाढदिवसानिमित्त जय हिंद मंडळा च्या वतीने शहरात विविध सामाजिक कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. सर्वप्रथम शहरातील राम मंदिर येथे नगराध्यक्ष यांचे हस्ते महाआरतीचे आयोजन करण्यात आले, तर सोनगाव येथील मूकबधिर शाळेतील विद्यार्थ्यांना भोजन देण्यात आले. त्यानंतर ग्रामीण रुग्णालयात रुग्णांना फळ वाटपाचा उपक्रम राबविण्यात आला. या उपक्रमातून देण्यात आला. जय हिंद मंडळाच्या या सामाजिक उपक्रमाचे उपस्थित नागरिकांकडून कौतुक करण्यात आले.

### प्रा. प्रिती देशमुख यांना पीएचडी पदवी प्रदान

**अमरावती**-शहरातील नामांकित शासकीय विदर्भ ज्ञान विज्ञान



संस्थेच्या गृहशास्त्र विभागात प्राध्यापक म्हणून कार्यरत असलेल्या प्रा. प्रिती देशमुख यांना संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठाद्वारे पीएचडी पदवी प्रदान करण्यात आली.विद्यापीठाच्या गृह अर्थशास्त्र विभागामार्फत 'जंक फूडच्या अति सेवनाचा उत्तरबाल्या वस्तेतील विद्यार्थ्यांच्या शारीरिक व मानसिक विकासावर होणारा परिणाम एक अध्ययन, (विशेष संदर्भ: अमरावती जिल्हा)' या विषयावर त्यांनी सखोल संशोधन केले. या संशोधनातील उल्लेखनीय कार्याबद्दल त्यांना संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठाचा हा बहुमान प्रदान करण्यात आला.त्यांनी स्व. दत्तात्रय पुसदकर कला महाविद्यालय, नांदगावपेठ, तालुका व जिल्हा अमरावती येथील गृह अर्थशास्त्र विभागाच्या विभाग प्रमुख डॉ. सुनीता श्री. बाळापूरे यांच्या बहुमूल्य मार्गदर्शनाखाली आपले संशोधन कार्य पूर्ण केले. या यशाबद्दल शासकीय विदर्भ ज्ञान विज्ञान संस्थेच्या गृहशास्त्र विभागप्रमुख डॉ. साधना खंडार, प्राचार्य डॉ. विजय दरणे सर, प्रा. हर्षल देशमुख तसेच संत गाडगे महाराज ट्रस्ट, दादर (पूर्व) चे संचालक प्रशांत देशमुख, डॉ. संयोगिता विलास देशमुख, प्रतिभा गोविंदराव देशमुख, डॉ. ए. डी. चव्हाण यांनी त्यांचे अभिनंदन व कौतुक केले.

### पोदारचे विद्यार्थी डान्स मध्ये प्रथम



**अमरावती**-स्थानिय पोदार इंटरनॅशनल स्कूल ची वर्ग तीसरीची विद्यार्थिनी ओवी खिराडे हीने 'ऑल इंडिया नॅशनल आर्ट टॅलेन्ट सर्च स्पर्धे' च्या कथ्थक सोलो कॅगेटरी मध्ये उत्कृष्ठ नृत्यविष्कार दाखवित प्रथम स्थान प्राप्त केले. दुसरीकडे वर्ग नववीची निवेदिता अंबाडकर हिने मुंबई महोत्सव-२०२६, नॅशनल डान्स कॉन्टेस्ट ॲन्ड फेस्टीवल च्या कथ्थक सोलो कॅटेगरी मध्ये प्रथम राहुन स्पर्धा आपल्या नावे केली. यासोबतच स्वरा पाचपोर तसेच मार्गशी देशमुख हिने नॅशनल डान्स ॲन्ड म्युजिक कॉम्पिटीशन मध्ये उत्कृष्ठ यश प्राप्त करून व्दितीय तसेच तृतीय स्थान प्राप्त केले. वर्ग सातवी की मनारा खोडके हिने ऑल इंडिया नॅशनल डान्स कॉन्टेस्ट मध्ये सेमी क्लासीकल कॅटेगरीत तृतीय स्थान प्राप्त केले. सोबतच शाळेच्या नृत्य शिक्षिका वैभवी बोडे यांना मुंबई महात्सवामध्ये 'राष्ट्रीय कला विभुषण अवार्ड' ने सन्मानित केले गेले. देशातील वेगवेगळ्या शहरांमध्ये आयोजित वेगवेगळ्या प्रतिष्ठीत नृत्य स्पर्धेमध्ये यश प्राप्त विद्यार्थ्यांना शुभेच्छा देवुन शाळेच्या प्राचार्या मनिषा संगर यांनी विद्यार्थ्यांना त्यांच्या उज्वल भविष्यासाठी शुभच्छा दिल्या.

# मेळघाटातील कोरकू आदिवासींचा पोळा : संस्कृती, परंपरा आणि निसर्गपूजा



मानववंशशास्त्रज्ञ आणि समाजशास्त्र यांच्या अभ्यासात सण, उत्सव हे केवळ करमणुकीची साधने नसून ते समाजाची अंतर्गत रचना, मूल्य व्यवस्था आणि सामाजिक एकोपा टिकवून ठेवणारे महत्त्वाचे घटक मानले जातात.

सातपुड्याच्या कुशीत वसलेला मेळघाटचा विस्तीर्ण परिसर हा निसर्ग सौंदर्य आणि समृद्ध आदिवासी संस्कृतीने नटलेला आहे. या भूमीमध्ये अनादी काळापासून वास्तव्य करणारी मुख्य जमात म्हणजे कोरकू. कोरकू जीवनशैलीचा पाया निसर्ग, शेती आणि पशुधन यावर आधारित आहे. त्यामुळे त्यांच्या जीवनक्रमात सण उत्सवाला अत्यंत पवित्र आणि आनंदाचे स्थान आहे. वर्षभरात साजरा होणाऱ्या विविध सणांपैकी पोळा हा सण कोरकू समाजात अतिशय महत्त्वाचा मानला जातो. मेळघाटातील कोरकू जमातीत या सणाला केवळ प्राण्यांबद्दलची कृतज्ञता नव्हे तर निसर्ग पूजा, लोकनृत्य, संगीत आणि सामाजिक एकतेचे एक अद्वितीय स्वरूप प्राप्त झालेले दिसते. पोळा सण जवळ आला की, संपूर्ण मेळघाटातील कोरकू पाड्यांमध्ये अत्यंत चैतन्यपूर्ण व उत्साही वातावरण पाहायला मिळते.पोळा सनापूर्वी काही दिवस आधीच आदिवासी धारणी आणि चिखलदरा येथे घुंगरू बाजार भरतो. या बाजारामध्ये कोरकू बांधव आपल्या बैलाच्या श्रृंगार यासाठी लागणाऱ्या विविध वस्तू जसे शिंगांचे रंग पाठीवरील झुली, रंगीबेरंगी दोऱ्या, याची खरेदी करतात त्याचप्रमाणे पोळ्याच्या दिवशी पारंपारिक खोडियार व दंडा नृत्य सुद्धा केले जाते. पोळ्याच्या दिवशी कोरकू शेतकरी आपल्या बैलाला गावाजवळील नदी वर नेऊन तेथे त्याची स्वच्छ आंघोळ घालून देतो. त्याला मालिश केली जाते तसेच त्याच्या शिंगाला विविध आकर्षक रंगाने सजवले जाते. गळ्यामध्ये घुंगराच्या माळा टाकून बैलाला नटवले जाते. आपापल्या बैलाला सुंदर रित्या सजवल्यानंतर संध्याकाळी एका विशिष्ट ठिकाणी आणले जातात. त्याला स्थानिक भाषेमध्ये पोळ्याची हेड किंवा मिरवणूक म्हटले जाते.पोळ्याच्या विधीमध्ये गावातील पारंपारिक पुजारी म्हणजेच भुमका मध्यवर्ती भूमिकेत असतो. भुमका ही केवळ एक धार्मिक पदवी नसून ती कोरकू समाजातील सामाजिक नियंत्रणाची आणि निर्णयाची संस्था आहे. भुमका द्वारा केला जाणारा मुठवा (ग्रामदेवता) आणि निसर्गातील पूजा विधी हा संपूर्ण गावाला एका नैतिक आणि सामाजिक बंधनामध्ये बांधून ठेवतो.

पोळ्याच्या दिवशी ढोल, टीमकी, बासरीच्या तालावर बैलाची गावातून भव्य मिरवणूक काढली जाते. घरातील महिला बैलांची पूजा करतात त्यांना ओवाळणी घालतात व त्याच्या पाया पडतात. मेळघाट मधील पोळ्यांचे मुख्य आकर्षण म्हणजे कोरकू-पुरुषांचे' होरोरिया नृत्य' पोळ्याच्या दिवशी रात्रीपासून या नृत्याला सुरुवात होते. या नृत्यामध्ये ११ ते २२ किंवा त्याहून अधिक पुरुष हातात लाकडी काठ्या घेऊन वर्तुळाकार उभे राहतात. तालबद्ध रीतीने काठ्या जमिनीवर ठोकून टीमकी आणि ढोलकाच्या तालावर एक अनोखा वर्तुळ निर्माण केला जातो. पोळ्याच्या दिवशी घरोघरी गव्हापासून बनवलेले स्थानिक पारंपारिक गोड अन्नाचा पहिला घास हा निसर्ग आणि प्राण्यांच्या नावाने बाजूला काढून प्रसाद ग्रहण केला जातो. पोळ्याच्या दुसऱ्या दिवशी लहान मुले लाकडी किंवा मातीचे बैल बनवून घरोघरी फिरतात. कोरकू समाजामध्ये पोळ्यापासून पुढे काही दिवस गावोगावी सामूहिक झुल्याची किंवा नृत्याची परंपरा चालू राहते. भावा बहिणीच्या प्रेमाचे प्रतीक म्हणून श्रावणात सुरू झालेली डोलार गीते आणि पोळ्याच्या काळातील उत्सव वातावरण पुढील काही दिवस कायम राहते. मेळघाटातील पोळा हा केवळ एका दिवसाचा सण नसून तो मनुष्य, प्राणी आणि निसर्ग यांच्यातील परस्पर सहकार्याचे आणि आदराचे प्रतीक आहे. कोरकू समाजाची लोककला त्यांची नृत्य, संगीत आणि निसर्ग पूजक जीवनशैलीचे दर्शन घडवणारा हा उत्सव मेळघाटच्या लोकसंस्कृतीचा अनोखा ठेवा आहे. समाजशास्त्रीय दृष्टिकोनातून मेळघाटातील कोरकू आदिवासींचा पोळा हा केवळ एका दिवसाचा धार्मिक विधी नसून तो कोरकू समाजाच्या अस्तित्वाचा, निसर्ग स्नेहाचा आणि सामाजिक रचनेचा पाठीचा कणा आहे. आधुनिकतेच्या आणि जागतिकीकरणाच्या प्रवाहातही कोरकू समाजाने आपली ही सांस्कृतिक मुळे घट्ट धरून ठेवली आहे. हा उत्सव मानव, प्राणी आणि पर्यावरण यांच्यातील समतोलाची जाणीव करून देणारा एक अनमोल सामाजिक ठेवा आहे, ज्याचे जतन करणे हे केवळ आदिवासी समाजाच्या नव्हे तर संपूर्ण मानवी संस्कृतीच्या दृष्टिकोनातून आवश्यक आहे.

**डॉ. रोहिणी देशमुख**
समाजशास्त्र विभाग
संत गाडगे बाबा अमरावती

# जीवन पुन्हा नाही..



**जागतिक आत्महत्या प्रतिबंध दिन**

जीवनाचे मोल केवळ एका गोष्टीवरून समजून घ्या की, एखादे मृत शरीर आहे; जगातील सर्व संपत्ती खर्च करून, अत्याधुनिक रुग्णालये, सरकारे, धार्मिक कर्मकांड या सर्वांनी मिळून प्रयत्न केले, संपूर्ण ब्रह्मांडाची ताकद पणाला लावली, तरी मृत शरीरात एका सेकंदासाठीही प्राण आणता येत नाहीत. म्हणजेच जीवन अनमोल आहे. ते संपविण्याचा अधिकार आपल्याला स्वतःला पण नाही, कारण हे जीवन पालकांची देन आहे. दरवर्षी १० सप्टेंबर रोजी 'विश्व आत्महत्या प्रतिबंध दिवस' जगभरात जनजागृतीसाठी साजरा केला जातो. लोकांच्या मनातील आत्महत्येसारखे वाईट विचार दूर करून सुखद आणि सकारात्मक विचारांचे वातावरण निर्माण करण्यावर भर देणे हा त्याचा उद्देश आहे. 'आत्महत्येबद्दलचा विचार बदलूया आणि संवादाची सुरुवात करूया' ही त्याची संकल्पना असून, २०२४ ते २०२६ या कालावधीसाठी हीच संकल्पना ठेवण्यात आली आहे.

आजच्या आधुनिक युगात आत्महत्यांच्या घटनांमध्ये झालेली मोठी वाढ आपल्याला संकेत देत आहे की, आपण अनुचित वातावरणात वावरतोय.जेव्हा आत्महत्या होते, तेव्हा केवळ एका व्यक्तीचा जीव जात नाही, तर त्या कुटुंबात, नातेवाईकांमध्ये, कार्यस्थळी, समाजात आणि संबंधित संपूर्ण समुदायामध्ये कायमस्वरूपी एक जागा रिकामी होते; तसेच सामाजिक, भावनिक आणि आर्थिक परिणाम होतात. आत्महत्या रोखण्यासाठी परस्पर संबंधांमध्ये सहानुभूतीपूर्वक संवादाला प्रोत्साहन देणे अत्यंत गरजेचे आहे. गैरसमज दूर करणे, समस्या सांगणे, मोकळेपणाने आपले म्हणणे मांडणे, सहानुभूती आणि सहकार्याचे वातावरण निर्माण करणे, या गोष्टी अत्यंत आवश्यक आहेत. सरकार आणि सामाजिक संस्थांनीही समाजात आनंददायक, सकारात्मक वातावरण टिकवून ठेवण्यासाठी अमूल्य भूमिका बजावली पाहिजे.

जागतिक आरोग्य संघटनेच्या मानसिक आरोग्य ॲटलस २०२४ अहवालानुसार, वर्ष २०२१ मध्ये आत्महत्येमुळे ७,२७,००० मृत्यू झाले. तरुणांमध्ये मृत्यूचे तिसरे सर्वात मोठे कारण आत्महत्या हेच आहे. जागतिक स्तराच्या तुलनेत भारतात आत्महत्यांचे प्रमाण अधिक आहे.

महाराष्ट्रातील शेतकरी वर्गाच्या आत्महत्या हा सर्वाधिक चिंतेचा विषय आहे. महाराष्ट्र सरकारच्या आकडेवारीनुसार, राज्यात वर्ष २०२३ मध्ये एकूण ६,६६९ शेतकरी आणि शेतमजुरांनी आत्महत्या केली, तर संपूर्ण भारतात १०,७८६ शेतकऱ्यांनी आत्महत्या केली होती.

अनेक वेळा आपल्याला माहीत असते की, एखादी गोष्ट आपल्यासाठी नुकसानकारक आहे, तरीही आपण सुधारत नाही. पुष्कळदा छोट्या-छोट्या निरुपयोगी गोष्टींना अधिक महत्त्व दिले जाते, ज्याचा थेट वाईट परिणाम आपल्या आरोग्यावर होतो. आजकाल स्वतःला दुःख देण्यासाठी आपण स्वतःच अधिक जबाबदार आहोत. लवकर राग येणे, मनासारखे काम न झाल्यास आपला संयम गमावणे, इतरांना दोष देणे किंवा द्वेष करणे, इतरांवर आंधळा विश्वास ठेवणे, भावनांच्या भरात वाहून जाणे, स्वार्थ, लोभ, खोटा देखावा करणे आणि प्रतिकूल परिस्थितीतही तो देखावा कायम ठेवणे, समाधानाचा अभाव, सतत जीवनाच्या स्पर्धेत धावत राहणे, वाईट संगत, इतरांच्या आनंदात दुःखी होणे आणि दुःखात आनंदी होणे, मत्सर, लोकांकडून जास्त अपेक्षा ठेवणे, परावलंबी असणे, मानसिक खेळांचे बळी ठरणे, मेहनतीपासून दूर पळणे आणि शॉर्टकटचा अवलंब करणे अशा अनेक गोष्टी माणसाने स्वतःच निर्माण केलेल्या आहेत. माणूस इच्छित असल्यास या गोष्टींवर नियंत्रण ठेवून अधिक चांगले, आरोग्यदायी आणि समाधानी जीवन जगता येऊ शकते. आपल्या चुकांचे परिणामच अनेकदा आपल्याला आत्महत्येच्या विचारांपर्यंत घेऊन जातात. त्यामुळे असे काम किंवा वर्तन करावे, ज्यामुळे आपण अडचणी आणि चुकांपासून दूर राहू शकू.

शारीरिक आणि मानसिक आरोग्याच्या तंदुरुस्तीसाठी दररोज व्यायाम करा. निसर्ग, पर्यावरण, पशू-पक्ष्यांचे संरक्षण आणि परोपकाराची भावना जागृत करा, असहाय्यांना मदत करा. आयुष्य नवचैतन्याने जगायचे आहे, केवळ वेळ घालवायचा नाही आहे. चारित्र्य जपा, आपल्या माणसांच्या प्रेमाची, भावनांची कदर करा आणि आपल्या अनमोल जीवनाचे मोल समजून घ्या.

जगात आपल्यापेक्षाही अधिक वाईट परिस्थितीत लोक जगत आहेत आणि वेळ थांबत नाही. काळ बदलतोच; आपलाही काळ बदलेल नक्कीच.

**डॉ. प्रितम भि. गेडाम**
मो.८२३७४१७०४१

# आजार वाढत आहेत पण नेमके का?

**आरोग्य रक्षण**



आपल्या आजूबाजूला एक गोष्ट आपण सतत पाहत आहोत. मधुमेह, उच्च रक्तदाब, लठ्ठपणा, फॅटी लिव्हर, थायरॉईडचे विकार, पीसीओएस, हृदयविकार आणि पचनाचे आजार आता फक्त वाढत्या वयातच होत नाहीत. आज वीस-पंचवीस वर्षांच्या तरुणांमध्येही हे आजार वाढताना दिसत आहेत.हा प्रश्न अनेकांच्या मनात पडतो-वैद्यकीय क्षेत्र इतके प्रगत झाले, आधुनिक तपासण्या उपलब्ध झाल्या, उपचारपद्धती सुधारल्याष्ठ तरीही जीवनशैलीशी संबंधित आजार इतक्या वेगाने का वाढत आहेत?

जीवनशैलीत झालेला बदल

गेल्या काही दशकांत आपल्या जगण्याच्या पद्धतीत मोठा बदल झाला आहे. आज बहुतेक कामे बसून केली जातात. मोबाईल, संगणक आणि स्क्रीनसमोर तासन्तास वेळ जातो. घरचे ताजे अन्न कमी होत आहे, तर प्रक्रिया केलेले आणि अतिप्रक्रिया केलेले अन्न सहज उपलब्ध झाले आहे.कामाचा ताण वाढला आहे. झोपेचा वेळ कमी झाला आहे. चालणे, धावणे, मैदानी खेळ किंवा नियमित व्यायाम कमी झाला आहे. या प्रत्येक गोष्टीचा परिणाम शरीरावर त्वरित दिसत नाही. पण अनेक वर्षे अशाच सवयी राहिल्या, तर त्या आरोग्यावर परिणाम करू शकतात.

**फक्त आहारच पुरेसा नाही**

अनेकांना वाटते की चांगला आहार म्हणजे चांगले आरोग्य. निश्चितच योग्य आहार महत्त्वाचा आहे. पण तो संपूर्ण चित्रातील फक्त एक भाग आहे. निरोगी राहण्यासाठी यासोबतच आवश्यक आहेत-नियमित शारीरिक हालचाल, पुरेशी आणि गुणवत्तापूर्ण झोप, ताणाचे योग्य व्यवस्थापन, तंबाखू व धूम्रपानापासून दूर राहणे, मद्यपानावर नियंत्रण, चांगले सामाजिक संबंध, वेळोवेळी आरोग्य तपासणी, गरजेनुसार योग्य वैद्यकीय सल्ला या सर्व गोष्टी मिळून आरोग्य घडवतात.

शरीर सवयींना प्रतिसाद देते

आपण दररोज जे निर्णय घेतो, त्यानुसार शरीर सतत बदलत असते. नियमित व्यायामामुळे स्नायू मजबूत राहतात, हृदयाचे आरोग्य सुधारते आणि चयापचय संतुलित राहण्यास मदत होते. पुरेशी झोप स्मरणशक्ती, मानसिक आरोग्य, रोगप्रतिकारक शक्ती आणि अनेक हार्मोन्सच्या कार्यासाठी महत्त्वाची असते. भाज्या, फळे, कडधान्ये, संपूर्ण धान्ये, सुका मेवा आणि योग्य प्रमाणातील प्रथिने यांचा समावेश असलेला संतुलित आहार दीर्घकालीन आरोग्यासाठी उपयुक्त ठरतो.याउलट, दीर्घकाळ शारीरिक निष्क्रियता, अपुरी झोप, धूम्रपान, जास्त मद्यपान आणि अतिप्रक्रिया केलेल्या अन्नाचे वारंवार सेवन यांचा अनेक दीर्घकालीन आजारांच्या वाढलेल्या धोक्याशी संबंध आढळतो.

याबाबत जागतिक आरोग्य संघटना तसेच अनेक आंतरराष्ट्रीय वैद्यकीय संस्थांनी सातत्याने संशोधन प्रकाशित केले आहे. ताण हा देखील आरोग्याचा महत्त्वाचा भाग आहे.मर्यादित ताण आपल्याला आव्हानांना सामोरे जाण्यास मदत करतो. परंतु सततचा आणि नियंत्रणाबाहेर गेलेला ताण झोप, आहार, व्यायाम, मनःस्थिती आणि जीवनमानावर परिणाम करू शकतो. नियमित व्यायाम, ध्यान, श्वसनाचे व्यायाम, छंद, कुटुंबासोबत वेळ घालवणे आणि आवश्यक असल्यास तज्ज्ञांचा सल्ला घेणे—या गोष्टी ताणाचे व्यवस्थापन करण्यास मदत करू शकतात.

**प्रतिबंधात्मक आरोग्यसेवा का महत्त्वाची आहे?**

बहुतेक जीवनशैलीशी संबंधित आजार एका दिवसात होत नाहीत.ते अनेक वर्षांच्या सवयींचा परिणाम असतात. म्हणूनच नियमित आरोग्य तपासणी, योग्य वजन राखणे, संतुलित आहार, नियमित हालचाल, पुरेशी झोप आणि वेळेवर वैद्यकीय सल्ला घेणे या सवयी आजारांचा धोका कमी करण्यासाठी महत्त्वाच्या ठरू शकतात. आरोग्य ही आयुष्यभराची गुंतवणूक आहे चांगले आरोग्य एका औषधाने, एका तपासणीने किंवा एका डाएटने मिळत नाही. ते दररोजच्या निर्णयांनी घडते. पौष्टिक जेवण. प्रत्येक चाललेले पाऊल. प्रत्येक चांगली झोप. प्रत्येक ताण कमी करण्याचा प्रयत्न. प्रत्येक वेळेवर केलेली तपासणी. हे निर्णय त्या दिवशी लहान वाटू शकतात, पण भविष्यात त्यांचा परिणाम मोठा असू शकतो.

आरोग्य क्षेत्रात काम करणाऱ्या प्रत्येकाची जबाबदारी फक्त आजारांवर उपचार करणे नाही, तर लोकांना आजार होण्यापूर्वीच स्वतःच्या आरोग्याची काळजी कशी घ्यावी हे समजावून सांगणेही आहे.या आठवड्याचा विचार जर आजार एका कारणामुळे होत नसतील, तर त्यावर एकच उपाय कसा असू शकेल? आरोग्याचा विचार करताना स्वतःला हा प्रश्न नक्की विचारा.



**डॉ. ऋतुजा देशमुख**
अमरावती
मो.८२३७१९१६६२

# पिंकी:जिची भीती वाटली, पण उपस्थित झालेले प्रश्न

गेल्या जवळपास वीस दिवसांपासून वर्धा आणि लगतच्या जिल्ह्यांतील नागरिक एका अस्वस्थ भीतीच्या छायेत जगत होते. एक वाघीण वर्धा जिल्ह्यात दाखल झाली आणि त्यानंतर गावागावांत, शेतशिवारांत आणि जंगलालगतच्या परिसरात तिचा वावर सुरू राहिला.ती कधी दिसायची, कधी अचानक अदृश्य व्हायची. तिच्यासाठी हा परिसर तिच्या नैसर्गिक अधिवासाचाच एक भाग होता. मात्र स्थानिक नागरिकांसाठी तिची उपस्थिती भयाचे कारण बनली होती.तिचे नाव होत-पिंकी.

या संपूर्ण घटनाक्रमाचा शेवट होईपर्यंत चार जणांचा बळी गेला होता. गावागावांत भीतीचे वातावरण होते. शेतकरी शेतात जाण्यास घाबरत होते. संध्याकाळनंतर घराबाहेर पडणे टाळले जात होते. भारताच्या समृद्ध वन्यजीवनाचे प्रतीक असलेला वाघ लोकांसाठी दहशतीचे प्रतीक बनला होता.अखेर शिरजगाव कसबा येथे पिंकीला भूल देऊन पकडण्यात आले.पण तिची कथा तिथे संपत नाही. उलट तिथूनच अशा अनेक प्रश्नांची सुरुवात होते, ज्यांची उत्तरे शोधणे आवश्यक आहे.

वीस दिवस, चार मृत्यू आणि सतत प्रवास करणारी वाघीण

माहितीनुसार पिंकीने आष्टीच्या दिशेने वर्धा जिल्ह्यात प्रवेश केला. त्यानंतर ती मोर्शी, चांदूर बाजार आणि परिसरातील अनेक भागांत फिरत राहिली.एका वाघिणीने इतक्या विस्तीर्ण भूभागात केलेली हालचाल आपल्याला विचार करायला भाग पाडते. वाघाला जिल्ह्यांच्या सीमा माहीत नसतात. महसुली नकाशे, राजकीय मतदारसंघ किंवा प्रशासकीय हद्दी त्याला समजत नाहीत. तो शिकार, पाणी, आसरा आणि स्वतःच्या क्षेत्राच्या शोधात भटकत असतो.

आपण कागदावर आखलेल्या सीमा वन्यप्राण्यांसाठी अर्थहीन असतात. पण एखादा वन्यप्राणी मानवी वस्तीत आला की आपण त्याच्याकडून आपल्या सीमांचा आदर करण्याची अपेक्षा करतो. याच विरोधाभासातून भारतातील वाढता मानव-वन्यजीव संघर्ष निर्माण होत आहे. पिंकी ही एखाद्या सकाळी अचानक गावात दिसलेली वाघीण नव्हती. ती अशा भूभागातून जात होती, जिथे मानवी वस्ती, शेती, रस्ते आणि इतर विकासकामांमुळे नैसर्गिक अधिवास सातत्याने बदलत चालला आहे.

**रेस्क्यू ऑपरेशन आणि काही महत्त्वाचे प्रश्न**

वन विभाग आणि एका स्वयंसेवी संस्थेच्या मदतीने पिंकीला पकडण्याची मोहीम राबविण्यात आली. दीर्घ प्रयत्नानंतर तिला भूल देण्यात यश आले. विशेष म्हणजे या मोहिमेदरम्यान तिला दोन वेळा भूल देण्यात आल्याचे सांगितले जाते. पहिल्या हस्तक्षेपानंतर मोर्शी येथील एका शाळेच्या परिसरात तिला प्राथमिक उपचार देण्यात आले. इथे एक महत्त्वाचा प्रश्न उपस्थित होतो. जर पिंकीला अखेरीस टायगर ट्रीटमेंट सेंटर (टीटीसी) मध्ये नेण्याचे नियोजन होते, तर प्राथमिक उपचारासाठी शाळेच्या परिसराची निवड का करण्यात आली? तो निर्णय आपत्कालीन परिस्थितीत घेण्यात आला होता का? तिला थेट विशेष उपचार केंद्रात नेणे शक्य नव्हते का? जवळपास अशी सुविधा उपलब्ध होती का? हे प्रश्न वन विभाग किंवा रेस्क्यू पथकावर आरोप करण्यासाठी नाहीत.



मोठ्या मांसाहारी वन्यप्राण्यांचे रेस्क्यू हे अत्यंत गुंतागुंतीचे आणि जोखमीचे काम असते. प्रत्येक निर्णय घेताना नागरिक, अधिकारी, पशुवैद्यकीय तज्ज्ञ आणि स्वतः प्राण्याची सुरक्षितता यांचा समतोल साधावा लागतो. परंतु जिथे दावावर इतके काही लागलेले असते, तिथे प्रत्येक निर्णयात पारदर्शकता आणि उत्तरदायित्व अपेक्षित असते.

**आणि मग पिंकीने अखेरचा श्वास घेतला...**

पुढील उपचारासाठी नागपूरकडे नेत असताना पिंकीचा मृत्यू झाला. अनेक गावांच्या भीतीचे केंद्र बनलेली वाघीण अचानक कायमची निघून गेली. चार मानवी जीव गमावलेल्या कुटुंबांचे दुःख अमूल्य आहे. कोणतेही आर्थिक नुकसानभरपाई त्यांची हानी भरून काढू शकत नाही. शासनाने पीडित कुटुंबांना नुकसानभरपाई दिली, हे योग्यच आहे. परंतु एक दुसराही प्रश्न आहे, जो आपण सहसा विचारत नाही. वन्यप्राण्याच्या मृत्यूची पर्यावरणीय किंमत काय?

मानव-वन्यजीव संघर्षात आपण सामान्यतः मानवी जीवितहानी, पशुधन आणि मालमत्तेचे नुकसान मोजतो. पण प्रजननक्षम वयातील एका वाघिणीचा मृत्यू केवळ आर्थिक मूल्यात मोजता येईल का? पिंकी ही केवळ एक वाघीण नव्हती. ती एका संपूर्ण परिसंस्थेचा भाग होती. सर्वोच्च शिकारी म्हणून तिची भूमिका जंगलातील जैविक संतुलनाशी निगडित होती. आधीच अनेक आव्हानांना सामोरे जाणाऱ्या वन्यजीव व्यवस्थेसाठी तिचा मृत्यू ही केवळ एका आकड्याची भर नाही. मृत व्यक्तीच्या कुटुंबाला आर्थिक मदत देता येते, पण नष्ट झालेल्या परिसंस्थेत एखादा सर्वोच्च शिकारी पुन्हा निर्माण करता येत नाही. हा कदाचित अस्वस्थ करणारा प्रश्न आहे, पण त्यावर चर्चा सुरू होणे आवश्यक आहे.

सर्व प्रोटोकॉलचे पालन झाले होते का?

या प्रकरणातील आणखी एक महत्त्वाचा मुद्दा म्हणजे राष्ट्रीय व्याघ्र संवर्धन प्राधिकरण (एनटीसीए) च्या मानक कार्यपद्धती आणि इतर निर्धारित नियमांचे प्रत्येक टप्प्यावर पालन झाले होते का? याचे उत्तर सोशल मीडियावर, राजकीय आरोप-प्रत्यारोपांत किंवा वेगवेगळ्या कथनांत शोधता कामा नये. उत्तर अधिकृत नोंदींमधून मिळाले पाहिजे. पिंकीची प्रकृती नेमकी कशी होती? तिला किती प्रमाणात भूल औषध देण्यात आले? बेशुद्ध झाल्यानंतर कोणते उपचार करण्यात आले? तिला मोर्शीत का नेण्यात आले? जवळपास विशेष उपचार केंद्र उपलब्ध होते का? आणि अखेरीस तिच्या मृत्यूचे खरे कारण काय होते? हे प्रश्न वैरभावनेतून विचारलेले नाहीत. हे जबाबदारी आणि उत्तरदायित्वाचे प्रश्न आहेत. जर सर्व नियमांचे पालन झाले असेल, तर त्याबाबतची पारदर्शक माहिती जनतेचा विश्वास अधिक दृढ करेल. आणि जर काही त्रुटी राहिल्या असतील, तर त्यातून भविष्यासाठी धडा घेता येईल. दोन्ही परिस्थितींमध्ये मौन कोणाच्याही हिताचे नाही.

**वन विभागालाच खलनायक ठरविणे योग्य ठरणार नाही**

अशा घटनांनंतर दोषारोपासाठी एखादा सोपा लक्ष्य शोधले जाते. अनेकदा वन विभाग त्याचे केंद्र बनतो. मात्र एक व्यापक आणि अस्वस्थ करणारे सत्यही स्वीकारावे लागेल. आपण माणसांनी सातत्याने वन्यजीवांच्या अधिवासावर अतिक्रमण केले आहे. जंगलालगत वसाहती वाढल्या, शेतीचा विस्तार झाला, रस्ते बांधले गेले आणि नैसर्गिक अधिवास तुकडे-तुकडे होत गेला. जेव्हा एखादा वन्यप्राणी अशा बदललेल्या परिसरात येतो, तेव्हा आपण त्याला 'वन्यजीवांची घुसखोरी' म्हणतो. पण वाघाच्या दृष्टीकोनातून पाहिले, तर कदाचित कथा वेगळी असेल. कदाचित तो त्याच्या जुन्याच मार्गाने चालला असेल आणि आपण त्याच्या वाटेत आलो असू.

**राजकारण आणि वन्यजीव व्यवस्थापन यांचे मिश्रण धोकादायक**

या प्रकरणातील आणखी एक महत्त्वाचा पैलू म्हणजे राजकीय आणि सार्वजनिक दबाव. वन्यजीव रेस्क्यू मोहिमा स्वतःमध्येच अत्यंत अवघड असतात. त्यात राजकीय मागण्या, जनतेची अस्वस्थता, माध्यमांचा दबाव आणि विविध हितसंबंध यांचा हस्तक्षेप झाला, तर परिस्थिती अधिक गुंतागुंतीची बनते. वाघ पकडण्याची मोहीम ही राजकीय कार्यक्रमासारखी चालवता येत नाही. वाघाला राजकारण समजत नाही. निवडणुका समजत नाहीत. त्याच्या आजूबाजूला गर्दी का झाली आहे, याचाही त्याला अंदाज नसतो. रेस्क्यू मोहिमेदरम्यान सर्वात महत्त्वाची गोष्ट असते ती म्हणजे मानवी सुरक्षितता आणि प्राण्याचे कल्याण. म्हणून प्रत्येक निर्णय हा तज्ज्ञांच्या वैज्ञानिक मतांवर आधारित असला पाहिजे; सर्वाधिक आवाज करणाऱ्यांच्या दबावावर नव्हे.

**पिंकीची कथा फक्त एक बातमी ठरू नये**

आज भीतीचे वातावरण कमी झाले आहे. बॅरिकेड्स हटतील. गावकरी पुन्हा शेतात जातील. माध्यमे पुढच्या बातम्यांकडे वळतील. आणि पिंकीचे नाव भारतातील मानव-वन्यजीव संघर्षातील आणखी एका घटनेत जमा होईल. पण तसे झाले, तर आपण काहीही शिकलो नाही असेच म्हणावे लागेल.

पिंकीच्या मृत्यूने आपल्याला काही मोठे प्रश्न विचारण्यास भाग पाडले पाहिजे. मानव आणि मोठे मांसाहारी वन्यप्राणी यांच्यातील संघर्ष वाढत का आहे? वन्यजीव मार्गिका (कॉरिडॉर) पुरेशा प्रमाणात संरक्षित आहेत का? जंगलालगतच्या गावांचे आणि कृषी क्षेत्रांचे नियोजन वन्यप्राण्यांच्या हालचाली लक्षात घेऊन केले जाते का? रेस्क्यू प्रोटोकॉल सर्वत्र एकसारखे आणि वैज्ञानिक पद्धतीने राबविले जातात का? विशेष उपचार केंद्रे आणि प्रशिक्षित पशुवैद्यकीय सुविधा पुरेशा प्रमाणात उपलब्ध आहेत का? आणि सर्वांत महत्त्वाचे, राजकीय आणि सार्वजनिक दबावामुळे व्यावसायिक वन्यजीव व्यवस्थापनावर परिणाम होत आहे का?

**संवर्धनाची सुरुवात रेस्क्यूपूर्वीच होते**

वन्यजीव संवर्धनाची सुरुवात तेव्हा होत नाही, जेव्हा एखादा वाघ गावात येतो आणि त्याला पकडण्यासाठी पथक पाठविले जाते. संवर्धनाची खरी सुरुवात होते ती अधिवास संरक्षण, वन्यजीव मार्गिका सुरक्षित ठेवणे, जबाबदार भू-वापर नियोजन आणि वन्यजीवांना आवश्यक असलेल्या जागेचा आदर राखणे यापासून. ज्यांनी आपल्या कुटुंबीयांना गमावले, त्यांना न्याय, मदत आणि आधार मिळालाच पाहिजे. ज्यांचे पशुधन गेले, त्यांना सहाय्य मिळाले पाहिजे. भीतीच्या वातावरणात राहिलेल्या गावकऱ्यांना सुरक्षितता मिळाली पाहिजे. आणि पिंकीलाही उपलब्ध सर्वोत्तम विज्ञान, तज्ज्ञता आणि पशुवैद्यकीय सेवांवर आधारित रेस्क्यू मिळणे अपेक्षित होते.

या परस्परविरोधी मागण्या नाहीत. त्या आपल्या सामूहिक जबाबदारीचे वेगवेगळे पैलू आहेत. पिंकीला वाचविण्याच्या प्रयत्नात तिचा मृत्यू झाला. पण तिच्या मृत्यूने या चर्चेचा शेवट होता कामा नये. कदाचित हीच चर्चेची खरी सुरुवात असावी. कारण पुढचा वाघ पिंकीबद्दल काहीच जाणत नसेल.

पुढचे गावही ही घटना विसरलेले असेल. आणि जर आपण या घटनेतून धडा घेतला नाही, तर एखाद्या दिवशी पुन्हा एखाद्या भूल दिलेल्या वाघाभोवती कॅमेरे, गर्दी, राजकीय दबाव आणि प्रश्न यांचेच वलय दिसेल. आणि तेव्हा आपण पुन्हा तोच प्रश्न विचारत असू,

यापेक्षा आपण अधिक चांगले का करू शकलो नाही?



**ॲड. प्रथमेश तिवारी**
वन्यजीव अभ्यासक
मो.८९९९६७२५३०

# अकोट-खंडवा रेल्वे मार्गाचे काम प्रगतीपथावर

## दोन वर्षांत बोगद्याचे काम पूर्ण होण्याची शक्यता

### डीआरएम प्रदीप कांबळे यांची माहिती



■ प्रतिनिधी | अकोट ■

अकोट-खंडवा रेल्वेच्या विस्तारित लोहमार्गाचे काम प्रगतीपथावर असून, आगामी दोन वर्षांत बोगद्याचे काम पूर्ण झाल्यानंतर या मार्गाबाबत चांगली बातमी देता येईल, अशी माहिती दक्षिण मध्य रेल्वेच्या नांदेड विभागाचे विभागीय रेल्वे व्यवस्थापक (डीआरएम) प्रदीप कांबळे यांनी दिली. कांबळे यांनी १ सप्टेंबर रोजी दुपारी अकोट रेल्वे स्थानकाला भेट देऊन पाहणी केली. यावेळी अकोट रेल्वे प्रवासी संघटनेच्या वतीने अध्यक्ष रमण अग्रवाल व सचिव विजय जितकर यांच्या नेतृत्वाखाली त्यांचे स्वागत करण्यात आले. संघटनेने प्रवाशांच्या विविध समस्यांबाबत कांबळे यांना तोंडी तसेच लेखी निवेदन दिले.


अकोट रेल्वे स्थानकावर शुद्ध पिण्याच्या पाण्याची सुविधा, ऑनलाइन संगणकीकृत आरक्षण तिकीट व्यवस्था, स्थानक मास्तर व रेल्वे कर्मचाऱ्यांची नियुक्ती, स्थानकाकडे जाण्यासाठी पक्का रस्ता, प्रवाशांसाठी प्रतीक्षालय, आसन व प्रकाश व्यवस्था, स्वच्छतागृह आदी सुविधा उपलब्ध करून देण्याची मागणी करण्यात आली.

तसेच रेल्वे स्थानकाच्या सुरक्षेसाठी रेल्वे पोलीस चौकी स्थापन करणे, नियमित सुरक्षा गस्त वाढविणे, सीसीटीव्ही यंत्रणा बसविणे, स्थानकाला कुंपण करणे आणि रात्री धावणाऱ्या रेल्वे गाड्यांसाठी विशेष सुरक्षा व्यवस्था करण्याची मागणीही करण्यात आली. व्यापारी व व्यावसायिकांसाठी माल चढविणे-उतरविण्याची सुविधा तसेच मालधक्का उपलब्ध करून देण्याची मागणी संघटनेने केली.अकोट-खंडवा मार्ग लवकर सुरू करण्याबरोबरच, हा मार्ग सुरू होईपर्यंत अकोट-अकोला डेमू रेल्वेच्या फेऱ्या वाढविण्याची मागणीही करण्यात आली. या सर्व मागण्यांचा सकारात्मक विचार केला जाईल, असे आश्वासन डीआरएम कांबळे यांनी दिले.

दरम्यान, अकोट रेल्वे प्रवासी संघटनेच्या वतीने उन्हाळ्यात प्रवाशांसाठी रेल्वे स्थानकावर मोफत जलसेवा उपक्रम राबविण्यात आल्याची माहितीही कांबळे यांना देण्यात आली.डीआरएमच्या भेटीच्या पार्श्वभूमीवर अकोट रेल्वे स्थानकाची स्वच्छता करण्यात आली होती. स्थानकावर पोहोचल्यानंतर कांबळे यांनी स्थानकाची पाहणी केली आणि प्रवासी संघटनेच्या पदाधिकाऱ्यांचे म्हणणे शांतपणे ऐकून घेतले. यावेळी नारायण श्रीवास्तव, दिलीप कुमार दास, कुमार गौरव, एम. रामकृष्णा राजू, कमल नयन मृणाल, श्याम मीना, एस.एस. खतीब, संजय बालखांडे आदी रेल्वे अधिकारी उपस्थित होते.

# चार नगरसेवकांच्या अपात्रतेसाठी १२ नगरसेवकांचा अर्ज

### विशेष सभा बोलावून ठराव घेण्याची नगराध्यक्षांकडे मागणी



■ प्रतिनिधी | हिवरखेड ■

नगरपरिषदेच्या सर्वसाधारण व विशेष सभांमध्ये गदारोळ घालणे, सभांचे व्हिडिओ शूट करून सोशल मीडियावर आक्षेपार्ह पोस्ट प्रसारित करणे, विविध मागण्यांसाठी वारंवार अर्ज देऊन आंदोलनाचा इशारा देणे, तसेच नागरिकांना कर न भरण्याचे आवाहन करणारे व्हिडिओ प्रसारित करणे, अशा विविध आरोपांवरून शिवसेना शिंदे गटाच्या चार नगरसेवकांना अपात्र ठरविण्याची मागणी करण्यात आली आहे. यासंदर्भात १२ नगरसेवकांनी नगराध्यक्ष सुलभा रमेश दुतोंडे यांच्याकडे अर्ज सादर केला आहे.

या अर्जात शिवसेना शिंदे गटाचे रवी मधुकर घुंगड, ऋषिकेश श्रीकृष्ण पंचबुद्धे, रामेश्वर पुंडलिक हागे तसेच स्वीकृत नगरसेवक श्यामशील सहदेवराव भोपळे यांच्यावर नगरपरिषदेच्या सभांमध्ये गैरवर्तन केल्याचा आरोप करण्यात आला आहे.

महाराष्ट्र नगरपरिषदा, नगरपंचायती व औद्योगिक नगरी अधिनियम १९६५ मधील

### सभेतील गदारोळ भोवणार?

कलम ८१(२) अन्वये विशेष सभा बोलावून कलम ४२(१) व सहकलम ४२(३) नुसार या चार नगरसेवकांच्या अपात्रतेचा ठराव पारित करावा, अशी मागणी अर्जातून करण्यात आली आहे.अर्जदार नगरसेवकांनी केलेल्या आरोपांनुसार, संबंधित नगरसेवकांकडून नगरपरिषदेच्या सर्वसाधारण व विशेष सभांमध्ये वारंवार गदारोळ केला जातो. तसेच सभांचे व्हिडिओ शूट करून ते व्हॉट्स?प ग्रुपवर प्रसारित करण्यात येतात. नगरपरिषद प्रशासनाला विविध मागण्यांसंदर्भात अर्ज देऊन आंदोलने करण्याचे इशारे देणे, नगरपरिषद कार्यालयात स्वतंत्र कॅबिनची मागणी करणे आणि ती उपलब्ध न झाल्यास आंदोलनाचा इशारा देणे, असे प्रकारही झाल्याचा दावा करण्यात आला आहे.

याशिवाय नागरिकांनी नगरपरिषदेचा कर भरू नये, अशा आशयाचे व्हिडिओ तयार करून ते सोशल मीडियावर प्रसारित करण्यात आल्याचाही आरोप अर्जात करण्यात आला आहे. या अर्जावर आता नगराध्यक्ष काय निर्णय घेतात, विशेष सभा बोलावून चार नगरसेवकांच्या अपात्रतेचा ठराव मांडला जातो का, याकडे हिवरखेडवासीयांचे लक्ष लागले आहे.

### प्रभावी उपाय योजना राबवा

**अकोला :** जिल्ह्यातील सद्यस्थितीतील पीक परिस्थितीचा अचूक व सविस्तर अहवाल तात्काळ तयार करून शासनास सादर करावा, असे निर्देश जिल्हाधिकारी वर्षा मीना यांनी दिले. जिल्ह्यात सद्यस्थितीत असलेले कमी पर्जन्यमान आणि पावसामुळे पडलेला खंड या पार्श्वभूमीवर निर्माण झालेल्या परिस्थितीचा सविस्तर आढावा घेण्यासाठी बैठक झाली.

# चार महिने उलटले, तरी विद्यार्थ्यांच्या अंगावर गणवेश नाही!

### ▫ नगर परिषद शाळांतील विद्यार्थ्यांना मोफत गणवेशाची प्रतीक्षा; पंधरा दिवसांत वाटप न झाल्यास आंदोलनाचा इशारा



■ प्रतिनिधी | तेल्हारा ■

शहरातील नगर परिषद शाळांमध्ये शिक्षण घेणाऱ्या आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकातील विद्यार्थ्यांना शासनाकडून मिळणाऱ्या मोफत गणवेशाचे शैक्षणिक वर्ष सुरू होऊन तब्बल चार महिने उलटूनही वाटप झालेले नाही. त्यामुळे विद्यार्थ्यांना मागील वर्षीचे जुने गणवेश परिधान करून शाळेत जावे लागत असून, नगर परिषद प्रशासनाच्या कारभाराविरोधात पालकांमध्ये नाराजी व्यक्त होत आहे.

नगर परिषद शाळांमध्ये प्रामुख्याने गोरगरीब कुटुंबातील विद्यार्थी शिक्षण घेतात. शासनाकडून मिळणारा मोफत गणवेश हा या विद्यार्थ्यांसाठी महत्त्वाचा शैक्षणिक लाभ आहे. मात्र, चार महिने उलटूनही गणवेश उपलब्ध न झाल्याने प्रशासनाच्या कार्यपद्धतीवर प्रश्नचिन्हे उपस्थित करण्यात येत आहे.

**पिण्याच्या पाण्याची टाकी अस्वच्छ; आरओ फिल्टर बंद**

गणवेशाच्या प्रश्नासोबच नगर परिषद शाळांमधील मूलभूत सुविधांचीही दुरवस्था असल्याचा आरोप पालकांनी केला आहे. विद्यार्थ्यांसाठी असलेली पिण्याच्या पाण्याची टाकी अस्वच्छ असून आरओ फिल्टरही बंद असल्याचे पालकांचे म्हणणे आहे. विद्यार्थ्यांच्या आरोग्याशी निगडित सुविधांकडे प्रशासनाचे दुर्लक्ष होत असल्याने संताप व्यक्त होत आहे.

मोफत गणवेश वाटपासाठी पालकांकडून अनेकदा मागणी करण्यात आली.

मात्र, अद्याप ठोस कार्यवाही झालेली नसल्याचा आरोप करण्यात आला आहे. त्यामुळे नगराध्यक्षा आणि शिक्षण सभापती यांनी या प्रश्नात तातडीने लक्ष घालून विद्यार्थ्यांना गणवेश उपलब्ध करून द्यावा, अशी मागणी करण्यात आली आहे.

**१५ दिवसांची मुदत; अन्यथा आंदोलन**

यासंदर्भात संबंधित प्रशासनाला निवेदन देण्यात आले असून, पुढील १५ दिवसांच्या आत सर्व पात्र विद्यार्थ्यांना मोफत गणवेशाचे वाटप करावे, अशी मागणी करण्यात आली आहे. या मुदतीत गणवेश वाटप न झाल्यास नगर परिषद प्रशासनाविरोधात तीव्र आंदोलन छेडण्याचा इशारा निवेदनातून देण्यात आला आहे. 'चार महिने झाले, आता तरी विद्यार्थ्यांच्या अंगावर गणवेश चढवा; अन्यथा नगर परिषद प्रशासनाविरोधात रस्त्यावर उतरू,' असा इशारा देण्यात आला. यावेळी सुरज साळुंके, प्रा. सचिन थाटे, गौरव धुळे, विनोद वाघ, मनीष गवळी, विठ्ठल चव्हाण, सुनील हिवराळे यांच्यासह पालक व विद्यार्थी उपस्थित होते.

# नगराध्यक्षांचा पुढाकार : पालिकेच्या प्रवेशद्वारांना महापुरुषांची नावे

## अकोट पालिकेच्या मुख्य प्रवेशद्वाराला 'छत्रपती शिवाजी महाराज' तर सभागृहाला 'फुले-शाहू-आंबेडकर' नाव

■ प्रतिनिधी | अकोट ■

अकोट नगरपालिकेच्या मुख्य इमारतीचे प्रवेशद्वार आणि मुख्य सभागृहाला महापुरुषांची नावे देण्याचा महत्त्वपूर्ण निर्णय मंगळवारी, ८ सप्टेंबर रोजी झालेल्या सर्वसाधारण सभेत घेण्यात आला. नगराध्यक्षा माया धुळे यांच्या पुढाकाराने मांडण्यात आलेल्या प्रस्तावाला सभेत मंजुरी देण्यात आली.

निर्णयानुसार, पालिकेच्या मुख्य प्रवेशद्वाराला 'श्री छत्रपती शिवाजी महाराज प्रवेशद्वार', दुसऱ्या प्रवेशद्वाराला 'श्री नरसिंग महाराज प्रवेशद्वार', तर मुख्य सभागृहाला 'फुले-शाहू-आंबेडकर सभागृह' असे नाव देण्यात येणार आहे. पालिकेच्या नव्या वास्तूला महापुरुषांची नावे देण्यात यावीत,



अशी मागणी नागरिक तसेच विविध सामाजिक संघटनांकडून करण्यात येत होती. या मागणीची दखल घेत नगराध्यक्षा माया धुळे यांनी हा विषय सर्वसाधारण सभेसमोर मांडला. यावर सभेत सविस्तर चर्चा झाल्यानंतर प्रस्तावाला सर्वानुमते मंजुरी देण्यात आली.

या नामकरणामुळे छत्रपती शिवाजी महाराजांच्या शौर्यपरंपरेचा, नरसिंग महाराजांच्या आध्यात्मिक कार्याचा तसेच महात्मा ज्योतिबा फुले, राजर्षी शाहू महाराज आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या सामाजिक न्यायाच्या विचारांचा गौरव होणार आहे. पालिकेच्या वास्तूला महापुरुषांची नावे देण्याच्या निर्णयाचे शहरातील नागरिक, सामाजिक कार्यकर्ते आणि विविध संघटनांकडून स्वागत करण्यात येत आहे.

# पंचायत समितीसमोर ताले यांचे आमरण उपोषण सातव्या दिवशीही सुरू

### खातेनिहाय चौकशीसह वृक्षलागवड निधीच्या वापराची तपासणी करण्याची मागणी



■ प्रतिनिधी | पातूर ■

पंचायत समिती पातूरच्या कामकाजाची पंचायत राज कमिशनमार्फत खातेनिहाय चौकशी करावी, तसेच गेल्या पाच वर्षांत पंचायत समितीअंतर्गत झालेल्या वृक्षलागवडीच्या कामांची प्रत्यक्ष स्थळ पाहणी करून निधीच्या वापराची चौकशी करावी, या मागणीसाठी विजयकुमार बळीराम ताले यांचे पंचायत समिती कार्यालयासमोर सुरू असलेले आमरण उपोषण सातव्या दिवशीही सुरूच आहे.

गेल्या पाच वर्षांत पंचायत समितीअंतर्गत आलेगाव, तुलंगा बुद्रुक, तुलंगा खुर्द, मळसूर, बोडखा, सस्ती, खेट्री, शिरपूर, पिंपळगुटा, राहेर आणि शिरला आदी गावांमध्ये करण्यात आलेल्या वृक्षलागवडीच्या कामांमध्ये अनियमितता झाल्याचा संशय असल्याचा आरोप ताले यांनी केला आहे.

काही ठिकाणी प्रत्यक्ष वृक्षलागवड न करता अथवा कामाची वस्तुस्थिती तपासणी न करताच निधी काढण्यात आल्याचा आरोपही त्यांनी केला आहे. त्यामुळे संबंधित गावांतील वृक्षलागवडीच्या कामांची प्रत्यक्ष पाहणी करून मंजूर निधी, प्रत्यक्ष खर्च, लागवड केलेल्या वृक्षांची संख्या तसेच सध्या उपलब्ध असलेल्या वृक्षांची संख्या याची तपासणी करावी, अशी मागणी त्यांनी केली आहे.

पंचायत समितीअंतर्गत झालेल्या कथित गैरव्यवहाराची सखोल चौकशी करून दोषी आढळणाऱ्यांकडून शासनाचा निधी वसूल करावा. तसेच संबंधितांवर नियमानुसार फौजदारी कारवाई करावी, अशी मागणी ताले यांनी केली आहे.

दरम्यान, आमरण उपोषणाला सात दिवस पूर्ण झाले असूनही मागण्यांवर अद्याप ठोस कार्यवाही झालेली नसल्याने आंदोलन सुरूच ठेवण्याचा निर्धार विजयकुमार ताले यांनी व्यक्त केला आहे.

# ज्ञानज्योती सावित्रीबाई फुले आधार योजना व पंडित दीनदयाळ उपाध्याय स्वयंम योजनेला मुदतवाढ

■ प्रतिनिधी | अकोला ■

उच्च शिक्षण घेणाऱ्या इतर मागास प्रवर्ग, विमुक्त जाती-भटक्या जमाती आणि विशेष मागास प्रवर्गातील विद्यार्थ्यांसाठी शासकीय वसतीगृह योजना, ज्ञानज्योती सावित्रीबाई फुले आधार योजना आणि पंडित दिनदयाळ उपाध्याय स्वयंम योजनेंतर्गत २०२६-२०२७ या शैक्षणिक वर्षाच्या ऑनलाईन प्रवेश प्रक्रियेला आता १५ सप्टेंबरपर्यंत मुदतवाढ देण्यात आली आहे, अशी माहिती इतर मागास बहुजन कल्याण विभागाचे सहायक संचालक अभिजित काळे यांनी प्रसिध्दी पत्रकाव्दारे दिली आहे.

१२ वी नंतर व्यावसायिक आणि अव्यावसायिक अभ्यासक्रमांसाठी प्रवेश घेऊ इच्छिणाऱ्या नवीन विद्यार्थ्यांना ऑनलाईन अर्ज करताना अनेक तांत्रिक अडचणींना सामोरे जावे लागत होते.

संकेतस्थळावरील तांत्रिक समस्या आणि ओटीपी पडताळणीमध्ये येणाऱ्या अडथळ्यांमुळे अनेक विद्यार्थ्यांचे अर्ज प्रलंबित राहिले होते. या समस्येचे निराकरण करण्यासाठी आणि विद्यार्थ्यांचे अर्ज यशस्वीरीत्या पूर्ण व्हावेत, यासाठी महाआयटीच्या प्रकल्प व्यवस्थापकांनी केलेल्या विनंतीनुसार प्रशासनाने हा मुदतवाढीचा निर्णय घेतला आहे.

या योजनेंतर्गत ओबीसी, व्हीजेएनटी व एसबीसी प्रवर्गातील उच्च शिक्षण घेणारे विद्यार्थी पात्र राहणार. ऑनलाईन अर्ज सादर करण्यासाठी १५ सप्टेंबर २०२६ अंतिम तारीख असून शासकीय वसतीगृह प्रवेश योजना, ज्ञानज्योती सावित्रीबाई फुले आधार योजना, पंडित दिनदयाळ उपाध्याय स्वयंम योजना या योजनेतून पात्र विद्यार्थ्यांना लाभ दिला जाणार आहे. विद्यार्थ्यांनी अंतीम मुदतीचा (१५ सप्टेंबर) लाभ घेत लवकर आपले ऑनलाईन अर्ज पूर्ण करावेत, असे आवाहन प्रशासनाकडून करण्यात आले आहे.

**Change In Name**

I Have Changed My Name From
**GITA RAJKUMAR SINGAL** -TO-
**GEETABAI RAJKUMAR SINGHAL**
Passport No :- M4513182 My Residential
Address in:- Gupta Bhavan sadhuram tolaram jin near
dagdi pool Akola - 444001

**Change In Name**

I Have Changed
My Name From
**UJJWALA
CHHANG
SUDOKAR**
-TO-
**UJWALA AJAY
TANKAR**
My Residential
Address in:-At.
Botha. Po.
Warwand Dist.
Buldhana-443304

**जाहीर नोटीस**

**वि.०३ रे सह दिवाणी न्यायाधीश (क. स्तर) अकोला यांचे न्यायालयात**

एम. जे. सी. नं. १४२७/२०२६ प्रोसेस नं.१०८७७/२०२६
चौ.ता. ०५/१०/२०२६ दिनांक : २५/०८/२०२६

**अर्जदार :** १. दिपाली सचिन चव्हाण २. माही सचिन चव्हाण दोघेही रा. वेद मंगल कार्यालयाच्या मागे, भगिरथी नगर, मोठी उमरी, अकोला. ता. जि. अकोला.

**विरुध्द**

**गैरअर्जदार :** निल.
**मयताचा पत्ता :-** मयत : सचिन पंजाबराव चव्हाण
**पत्ता :-** रा. वेद मंगल कार्यालयाच्या मागे, भगिरथी नगर, मोठी उमरी, अकोला. ता. जि. अकोला.

या अर्थीउपरोक्त अर्जदार हयांनी मुंबई विनिमय अधिनियम १८२७, कलम २ अन्वये या न्यायालयात वारसा प्रमाणपत्र मिळण्यासाठी अर्ज केला आहे. त्या अर्जामध्ये असे नमूद केले आहे की, मयत सचिन पंजाबराव चव्हाण यांचे दि. २०/०६/२०२६ रोजी निधन झाले आहे. वरील अर्जदार त्यांचे कायदेशिर वारस आहेत, त्याशिवाय इतर कोणीही मयतास वारस नाही. सबब वारस प्रमाणपत्र मिळण्यास अर्जदारांनी अर्ज दाखल केला आहे.

त्याअर्थी सदर अर्जामध्ये कोणाची कसल्याही प्रकारची हरकत असल्यास दिनांक ०५/१०/२०२६ रोजी सकाळी ११:०० वाजता स्वतः जातीने अगर निर्दीष्ट केलेल्या वकीला मार्फत न्यायालयामध्ये हजर होउन आपली लेखी हरकत दाखल करावी. अन्यथा कोणाची कसल्याही प्रकारची हरकत नाही. असे गृहीत धरुन सदर अर्ज निकाली काढण्यात येईल. हयाची नोंद घ्यावी. आज दिनांक २५/०८/२०२६ रोजी माझे सही व न्यायालयाचे शिक्क्यानिशी दिले.

शिक्का

**आदेशानुसार**
प्र. अधिक्षक
दिवाणी न्यायालय (व-स्तर), अकोला

# अग्निसुरक्षा सुविधांशिवाय व्यापारी संकुलाचा लिलाव नको!

### छत्रपती संभाजी महाराज व्यापारी संकुलातील दुकानांच्या लिलावाला स्थगिती देण्याची मागणी

■ प्रतिनिधी | तेल्हारा ■

नगरपरिषदेने उभारलेल्या छत्रपती संभाजी महाराज व्यापारी संकुलातील दुकानांचा प्रस्तावित लिलाव करण्यापूर्वी इमारतीमध्ये आवश्यक अग्निसुरक्षा व जीवितसंरक्षक सुविधा उपलब्ध करून द्याव्यात. या सुविधा पूर्ण होईपर्यंत दुकानांचा लिलाव, भाडेपट्टा अथवा ताबा देण्याची कोणतीही कार्यवाही करू नये, अशी मागणी प्रा. सचिन थाटे यांनी नगरपरिषदेच्या मुख्याधिकाऱ्यांकडे निवेदनाद्वारे केली आहे.

व्यापारी संकुलात नागरिक, व्यापारी, कर्मचारी आणि ग्राहकांची मोठ्या प्रमाणात ये-जा होणार आहे. अशा परिस्थितीत आग, शॉर्टसर्किट किंवा अन्य आपत्कालीन घटना घडल्यास जीवितहानी तसेच मालमत्तेचे नुकसान होण्याची शक्यता आहे. त्यामुळे लिलावापूर्वी संकुलातील अग्निसुरक्षा व्यवस्थेची सक्षम प्राधिकरणामार्फत तपासणी करून आवश्यक उपाययोजना पूर्ण करणे गरजेचे असल्याचे थाटे यांनी निवेदनात म्हटले आहे.

**अग्निशामक यंत्रणेसह आवश्यक सुविधांची तपासणी करा**

संकुलात आवश्यकतेनुसार अग्निशामक यंत्रणा, फायर अलार्म सिस्टीम, फायर हायड्रंट सिस्टीम, आपत्कालीन बाहेर पडण्याचे मार्ग, इमर्जन्सी लाइटिंग, विद्युत सुरक्षाव्यवस्था तसेच इतर



जीवितसंरक्षक सुविधा कार्यान्वित आहेत किंवा नाहीत, याची तपासणी करण्याची मागणी करण्यात आली आहे. आवश्यक असल्यास संबंधित अग्निशमन प्राधिकरणाकडून प्रमाणपत्र व अग्निसुरक्षा अनुपालन प्राप्त करून घेण्यात यावे, असेही निवेदनात नमूद आहे.ष्महाराष्ट्र आग प्रतिबंधक व जीवसंरक्षक उपाययोजना अधिनियम, २००६, नियम २००९, २०२३ मधील सुधारित तरतुदी तसेच १२ जून २०२५ रोजीच्या सुधारित नियमांचा संदर्भ देण्यात आला आहे. यासोबतच नॅशनल बिल्डिंग कोड ऑफ इंडिया, लागू यूडीसीपीआर व संबंधित बांधकाम नियमांनुसार व्यापारी इमारतीत आवश्यक फायर अँड लाइफ सेफ्टी सुविधांची पूर्तता करणे आवश्यक असल्याचे थाटे यांनी निदर्शनास आणून दिले. अग्निसुरक्षा उपाययोजनांची पूर्तता करून सक्षम प्राधिकरणाकडून आवश्यक तपासणी व अनुपालन पूर्ण झाल्यानंतरच दुकानांच्या लिलावाची प्रक्रिया सुरू करावी, अशी ठाम मागणी करण्यात आली आहे.

या निवेदनाच्या प्रती जिल्हाधिकारी, अकोला, संचालक महाराष्ट्र अग्निशमन व आणीबाणी सेवा, जिल्हा अग्निशमन अधिकारी, अकोला, तेल्हारा नगरपरिषदेचे नगराध्यक्ष तसेच संबंधित नगररचना व बांधकाम विभागाकडे देण्यात आल्या आहेत. निवेदनावर नगरपरिषदेने केलेल्या कार्यवाहीची लेखी माहिती देण्यात यावी, अशी मागणीही प्रा. सचिन थाटे यांनी केली आहे.

जनमाध्यम

जनमाध्यम न्युज अँड पब्लीकेशन प्रा.लि.च्या मालकीचे हे वृत्तपत्र मुद्रक, प्रकाशक प्रदीप देशपांडे यांनी प्लॉट नं. बी -५०, सातुर्णा औद्योगिक वसाहत, बडनेरा रोड, अमरावती-४४४६०७ येथे छापून बी-२४ दोरकर हाऊस, महसुल कॉलनी, एसटी स्टॅण्डच्या मागे अकोला - ४४४००१ येथे प्रकाशित केले.

**संपादक - प्रदीप देशपांडे**
संचालक (वृत्त) - अभिराम देशपांडे
(Responsible for selection of News Under PRB Act)

**अकोला आवृत्ती वर्ष - ३० अंक २७१**
आर.एन.आय.रजी.नं. MAHMAR/1997/04048 पोस्टल लायसन क्र. AKL/HO/03/2004

**मुख्य कार्यालय :–** अंबापेठ, राजकमल चौक, अमरावती - ४४४६०१
फोन - ९८२३०१६३००, ९४२२९५६२६८
ई-मेल - atimadhyam@gmail. com, abhiram.deshpande70@gmail.com

# मुलींच्या आरोग्याला 'संरक्षणकवच', आर्वीत गर्भाशयाच्या कर्करोगाविरोधात मोहीम

## खा.अमर काळेंच्या पुढाकाराने ११ हजार मुली-महिलांना मोफत लसीकरणाचा संकल्प

**आर्वी/जनमाध्यम**

घरासाठी आयुष्य झिजवणाऱ्या आणि कुटुंबाच्या आरोग्याची काळजी घेताना स्वतःच्या आरोग्याकडे दुर्लक्ष करणाऱ्या मुली-महिलांच्या आरोग्यासाठी आर्वीत आता मोठे पाऊल उचलण्यात आले आहे. गर्भाशयाच्या मुखाच्या कर्करोगापासून प्रतिबंधासाठी लसीकरण मोहिमेला आर्वी येथे प्रारंभ झाला असून, खा.अमर काळे यांच्या संकल्पनेतून समुद्रपूरनंतर आर्वी तालुक्यात या उपक्रमाचा दुसरा टप्पा सुरू करण्यात आला आहे. ९ ते २६ वयोगटातील अंदाजे ११ हजार मुली-महिलांना या मोहिमेचा लाभ मिळणार आहे. स्वास्थ्य वृक्ष फाऊंडेशन आणि मॅनकाईंड फार्मा यांच्या संयुक्त विद्यमाने तसेच जिल्हा आरोग्य विभागाच्या



सहकार्याने हा उपक्रम राबविण्यात येत आहे.घर सांभाळणारी स्त्री स्वतःला कधी सांभाळणार हा मूलभूत प्रश्न या मोहिमेच्या केंद्रस्थानी आहे. कुटुंबाच्या सुखासाठी महिला स्वतःच्या वेदना दडपतात. आजाराची लक्षणे दुर्लक्षित करतात आणि उपचार पुढे ढकलतात. याच दुर्लक्षातून गंभीर आजाराचे संकट वाढते. ही वस्तुस्थिती लक्षात घेऊन डॉ. दीपिका चंडोल आणि डॉ. अभिषेक चावला यांनी पुढाकार घेत लसीकरणाची संकल्पना मांडली. खासदार अमर काळे यांनी ही संकल्पना स्वीकारून ती मतदारसंघात प्रत्यक्षात आणण्यासाठी पुढाकार घेतला. आरोग्य हा अधिकार आहे, आर्थिक ऐपतीचा विषय नाही,या भूमिकेतून मोफत लसीकरणाचा निर्णय घेण्यात आला. खा. काळे यांनी मॅनकाईंड फार्माशी संपर्क साधून लस उपलब्ध करून देण्यासाठी प्रयत्न केले. समुद्रपूर तालुक्यातील यशस्वी अंमलबजावणीनंतर आता आर्वी तालुक्यात दुसरा टप्पा सुरू झाला आहे. खा.अमर काळे म्हणाले की, गर्भाशयाच्या मुखाच्या कर्करोगाचा धोका ही गंभीर बाब असून प्रतिबंधात्मक लसीकरणाबाबत समाजात जागृती होणे आवश्यक आहे. लसीची किंमत सर्वसामान्य कुटुंबांना परवडणारी नसल्याने अनेक मुली लसीकरणापासून वंचित राहतात. त्यामुळे सामाजिक दायित्वाच्या माध्यमातून ही लस मोफत उपलब्ध करून देण्याचा प्रयत्न करण्यात आला आहे.यावेळी जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. स्वप्नील बेले, जिल्हा शल्यचिकित्सक डॉ. पवार, डॉ. नितीन धांडे, शिक्षणाधिकारी राऊत, डॉ. दीपिका चंडोल, अभिषेक चावला, डॉ. अग्रवाल, नगरपरिषद मुख्याधिकारी वाघमारे, नगरसेवक व गटनेता, मुख्याध्यापिका देशपांडे यांच्यासह आरोग्य व शिक्षण विभागाचे अधिकारी, अंगणवाडी सेविका, गटप्रवर्तक, तपस्या कॉन्व्हेंटचे कर्मचारी आणि नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. राजकारणाच्या पलीकडे आरोग्याचा मुद्दा पुढे नेण्याचा संदेश या मोहिमेतून देण्यात आला आहे. समुद्रपूरनंतर आर्वी आणि पुढे मतदारसंघातील इतर भागांतही प्रतिबंधात्मक आरोग्य मोहिमांना चालना देण्याचा संकल्प यानिमित्ताने पुढे आला आहे.

# पोळा आज; पण बळीराजाच्या डोळयांत पाणी

## सर्जा-राजाचा सण उत्साहात, मात्र पावसाच्या दडीने शेतकऱ्यांच्या आनंदावर विरजण; खरीप पिके संकटात

**वर्धा/जनमाध्यम**

वर्षभर शेतात राबणाऱ्या सर्जा-राजाप्रती कृतज्ञता व्यक्त करण्याचा बैलपोळा आज जिल्ह्यात उत्साहात साजरा होत आहे. बैलांच्या अंगावर रंगीबेरंगी झूल, गळ्यात घुंगुरमाळा आणि शिंगांना रंग लावून शेतकरी आपल्या सर्जा-राजाची पूजा करीत आहेत. मात्र दुसरीकडे पावसाने ओढ दिल्याने खरीप पिकांची अवस्था चिंताजनक झाली असून पोळ्याच्या उत्साहावर दुष्काळाचे सावट स्पष्टपणे जाणवत आहे.

वर्धा शहरासह जिल्ह्यातील बाजारपेठांमध्ये गेल्या काही दिवसांपासून पोळ्याच्या साहित्याची दुकाने सजली होती. बाशिंग, मोरखी, कासरे, घुंगुरमाळा, पैंजण, खोंड, अत्तर यासह बैलांच्या शृंगाराचे साहित्य खरेदी करण्यासाठी शेतकरी बाजारात दाखल झाले. महागाईमुळे साहित्याच्या किमती वाढल्या असल्या तरी वर्षभर शेतात कष्ट करणाऱ्या बैलांप्रती असलेली कृतज्ञता व्यक्त करण्यासाठी शेतकरी आपल्या ऐपतीप्रमाणे खरेदी करीत आहेत.

मात्र सणाच्या आनंदापेक्षा शेतकऱ्यांच्या मनात खरीप पिकांची चिंता अधिक आहे. पावसाने वेळेवर साथ न दिल्याने कापूस, सोयाबीनसह विविध पिकांवर संकट निर्माण झाले आहे. काही भागांत पिके सुकण्याच्या मार्गावर आहेत. उत्पादन हातात येईल की नाही, याची धाकधूक बळीराजाला लागली आहे. त्यामुळे घरासमोर सर्जा-राजाची पूजा होत असताना शेतकऱ्यांचे लक्ष मात्र आभाळाकडे लागले आहे.

बैलाच्या गळयात आज घुंगरांचा नाद आहे; पण बळीराजाच्या मनात पावसासाठी आर्त हाक आहे! पोळा हा शेतकरी आणि बैलाच्या अतूट नात्याचा सण आहे. शेतकऱ्याचा खरा साथीदार असलेल्या बैलाला आज मानाचे स्थान दिले जात आहे. मात्र या सणामागील शेतकऱ्याची आर्थिक घुसमट आणि निसर्गाच्या लहरीपणाशी सुरू असलेली झुंजही दुर्लक्षित करता येणार नाही. सर्जा-राजाचा सण साजरा झाला; आता बळीराजाच्या शेतातही हिरवाई परतू दे, एवढीच आजची आर्त प्रार्थना पाऊस वेळेत बरसला तरच पोळ्यानंतरच्या दिवसांत शेतकऱ्याच्या चेहऱ्यावर खऱ्या अर्थाने समाधान फुलेल.

## संक्षिप्त

### घराच्या वाटणीवरून वडील मुलात वाद

**आष्टी-** घर व शेतीच्या हिस्सेवाटणीच्या कारणावरून झालेल्या वादात मुलाला काठीने मारहाण करून जखमी केल्याप्रकरणी आष्टी पोलिसांनी तिघांविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे. विक्रम मनोहरराव कोल्हे (३०), रा. पेठअहमदपुरा, यांनी तक्रार दिली. त्यानुसार त्यांचे वडील मनोहर शंकरराव कोल्हे, चुलत भाऊ धिरज वसंतराव कोल्हे आणि सावत्र आई वैशाली मनोहरराव कोल्हे हे घरात आले. घरात राहण्यासाठी हिस्सा मागितल्याने वाद झाला. यावेळी वडिलांनी शिवीगाळ करून विक्रम यांना मारहाण केली. चुलत भावाने बांबूच्या काठीने डोक्यावर वार केल्याने जखम होऊन रक्तस्राव झाला. हाताच्या कोपरालाही दुखापत झाली. विक्रम यांच्या पत्नीला वाद सोडविताना वैशाली यांनी मारहाण केल्याचे तक्रारीत म्हटले आहे. पोलिसांनी तिघांविरुद्ध गुन्हा नोंदवून तपास सुरू केला आहे.

### घरातून निघालेला पती बेपत्ता; अपहरणाचा संशय

**समुद्रपूर-** घरातून बाहेर पडल्यानंतर पतीचा शोध लागत नसल्याने पत्नीने पोलिसांत धाव घेतली. ज्योती योगेश चंदगडे (३१), रा. परडा, यांनी समुद्रपूर पोलिसांत तक्रार दाखल केली आहे. तक्रारीनुसार त्यांचे पती योगेश चंदगडे (३५) हे कोणालाही काही न सांगता घरातून निघून गेले. बराच वेळ उलटूनही ते घरी परतले नाहीत. त्यामुळे पत्नीने गाव परिसरात तसेच नातेवाईक आणि परिचितांकडे त्यांचा शोध घेतला. मात्र त्यांचा ठावठिकाणा लागला नाही. अखेर त्यांनी पोलिसांकडे तक्रार दिली. अज्ञात व्यक्तीने योगेश यांना फूस लावून पळवून नेल्याचा संशय तक्रारीत व्यक्त करण्यात आला आहे. त्यावरून समुद्रपूर पोलिसांनी अज्ञात व्यक्तीविरुद्ध अपहरणाचा गुन्हा दाखल करून तपास सुरू केला आहे. बेपत्ता योगेश यांची उंची सुमारे पाच फूट असून हातावर 'योगेश' नावाचा गोंदना आहे.

### फायनान्स कंपनीचा शाखा व्यवस्थापक अचानक बेपत्ता

**देवळी-** फायनान्स कंपनीत शाखा व्यवस्थापक म्हणून कार्यरत असलेला तरुण अचानक बेपत्ता झाल्याने खळबळ उडाली आहे. कालीदास पुंडलिक जांबोडे (२४), रा. मोटेगाव, ता. कळंब, हे संपदा मायक्रो फायनान्सच्या शाखेत शाखा व्यवस्थापक म्हणून कार्यरत होते. कामानिमित्त शाखेत आल्यानंतर काही वेळात ते एमएच ३५ एपी ६४९३ क्रमांकाच्या पल्सर मोटारसायकलने बाहेर गेले. त्यानंतर त्यांनी मोबाईलवरील फोन कॉल स्वीकारला नाही. कुटुंबीयांनी तसेच नातेवाईकांनी त्यांचा शोध घेतला; मात्र ते मिळून आले नाहीत. त्यामुळे त्यांना अज्ञात व्यक्तीने फूस लावून पळवून नेल्याचा संशय व्यक्त करण्यात आला. तक्रारीवरून देवळी पोलिसांनी अज्ञात व्यक्तीविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे. कालीदास यांची उंची, सावळा रंग, काळा शर्ट, पांढरी पॅन्ट आणि काळे शूज असे वर्णन देण्यात आले असून पोलिसांकडून शोध सुरू आहे.

### बकऱ्यांच्या मृत्यूवरून वाद

**हिंगणघाट-** बकऱ्या मृत्युमुखी पडल्याच्या कारणावरून संशय घेत झालेल्या वादाचे पर्यवसान मारहाणीत झाले. सातेफळ येथे हा प्रकार घडला. याप्रकरणी ज्ञानेश्वर गोविंदराव दांडकर यांच्या तक्रारीवरून सुधीर लहुजी राऊत आणि लहरजी किसनाजी राऊत यांच्याविरुद्ध हिंगणघाट पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला.आरोपींच्या दोन बकऱ्या मृत्युमुखी पडल्याने त्यांनी फिर्यादीच्या भावावर संशय घेत वाद घातला. त्यानंतर फिर्यादीच्या पत्नीला शिवीगाळ करून लाकडी काठीने कमरेवर मारहाण केली. पत्नीला वाचविण्यासाठी ज्ञानेश्वर दांडकर गेले असता त्यांच्या डोक्यावर काठीने वार करण्यात आला. त्यानंतर एका आरोपीने घरातून सत्तूर आणून त्यांच्या डोक्यावर मारला. वाद सोडविण्यासाठी आलेल्या फिर्यादीच्या भावालाही सत्तूर व काठीने मारहाण करण्यात आली. जखमींवर रुग्णालयात उपचार करण्यात आले.

### बकऱ्यांना दूध पाजताना महिलेवर हल्ला

**हिंगणघाट-** अंगणात बकऱ्यांच्या पिलांना दूध पाजत असलेल्या महिलेवर दोन जणांनी काठी व हातबुक्क्यांनी मारहाण केल्याची घटना सातेफळ येथे घडली. याप्रकरणी लहु किसनाजी राऊत यांच्या तक्रारीवरून शंकर दांडेकर आणि ज्ञानेश्वर दांडेकर यांच्याविरुद्ध हिंगणघाट पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.फिर्यादीच्या म्हणण्यानुसार, ते अंगणात बकऱ्यांच्या पिलांना दूध पाजत असताना आरोपी तेथे आले. यावेळी वाद घालत एका आरोपीने काठीने फिर्यादीच्या हातावर मारले. त्यानंतर ज्ञानेश्वर दांडेकर याने फिर्यादीच्या छातीवर हातबुक्क्यांनी मारहाण केली. अचानक झालेल्या या हल्ल्यामुळे परिसरात गोंधळ उडाला. जखमी झाल्यानंतर फिर्यादीने पोलिस ठाण्यात धाव घेत तक्रार दाखल केली. तक्रारीवरून पोलिसांनी संबंधितांविरुद्ध गुन्हा नोंदवून पुढील तपास सुरू केला आहे.

## भाविकांच्या श्रद्धेने आर्वीत गोगा नवमीला भक्तीचा जागर

# २१ दिवसांच्या उपवासानंतर निशान मिरवणूक

**आर्वी/जनमाध्यम**

वाल्मिकी समाजाच्या वतीने वाल्मिकी वॉर्ड येथे लोकदेवता गोगाजी जाहरवीर महाराजांचा जन्मोत्सव अर्थात गोगा नवमी मोठ्या उत्साहात साजरी करण्यात आली. २१ दिवस उपवास, पूजन अर्चना आणि धार्मिक विधी करून समाजबांधवांनी श्रद्धा व्यक्त केली. त्यामुळे परिसरात भक्तिमय वातावरण निर्माण झाले होते.

अष्टमीच्या रात्री गोगाजी महाराजांचा निशान ध्वज आणि शिवशंकर मंदिराची आकर्षक प्रतिकृती साकारून रात्रभर जागरण करण्यात आले. गोगा नवमीला ढोल ताशांच्या गजरात शहरातील प्रमुख मार्गांवरून भव्य निशान व झांकी मिरवणूक काढण्यात आली. महिला पुरुष भाविक मोठ्या संख्येने सहभागी झाले. लकडगंज येथे गुरू गोरक्षनाथ महाराजांची पूजा करण्यात आली. त्यानंतर पंचायत समितीजवळील माता मंदिराच्या पटांगणात निशानाचे विसर्जन झाले. गांधी चौकात खासदार अमर काळे, आ. सुमित वानखेडे, नगराध्यक्ष स्वाती गुल्हाने यांच्यासह नगरसेवकांनी दर्शन घेतले.गौरव जाजू, अमित साखरे, गजानन वानखेडे, दिलीप पोटफोडे, विनोद राजपुरोहित व शनी मंदिराच्या वतीने भाविकांना चहा, नाश्ता, मिठाई व पाण्याचे वाटप करण्यात आले. गोगाजी महाराजांच्या चरणी सुख, समृद्धी, आरोग्य आणि सामाजिक एकोपा नांदावा, अशी प्रार्थना करण्यात आली.



# किराणा आणण्यासाठी गेली महिला परतलीच नाहा

**हिंगणघाट/जनमाध्यम**

किराणा सामान आणण्यासाठी घराबाहेर गेलेली ४० वर्षीय महिला घरी परतली नसल्याने तिचे अपहरण झाल्याचा संशय व्यक्त करण्यात आला आहे. याप्रकरणी रमेश सुधाकर लकडे यांच्या तक्रारीवरून हिंगणघाट पोलिस ठाण्यात अज्ञात व्यक्तीविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, रमेश लकडे हे किराणा सामान आणण्यासाठी बाहेर गेले होते. ते घरी परतल्यानंतर पत्नी निता लकडे घरी दिसून आली नाही. परिसरात तसेच नातेवाइकांकडे शोध घेतला असता तिचा ठावठिकाणा लागला नाही.

बराच वेळ उलटूनही ती घरी न परतल्याने फिर्यादीने पोलिसांकडे धाव घेतली. कोणीतरी महिलेचे अपहरण करून तिला अज्ञात ठिकाणी डांबून ठेवले असावे, असा संशय तक्रारीत व्यक्त करण्यात आला आहे. पोलिसांनी तक्रारीवरून गुन्हा दाखल करून महिलेचा शोध सुरू केला आहे.

## घरफोडी,शिक्षकाच्या घरातून ११ हजारांची चोरी

**वर्धा-** प्रताप नगर परिसरातील नवीन इंदिरा गार्डन भागात घरफोडी करून चोरट्याने ११ हजार रुपयांची रोकड लंपास केल्याची घटना उघडकीस आली. घनश्याम गोविंदराव राऊत (७४), सेवानिवृत्त शिक्षक, यांच्या घराला कुलूप असल्याची संधी साधून अज्ञात चोरट्याने घराचे कुलूप तोडून प्रवेश केला. राऊत कुटुंबीयांसह बाहेर गेले होते. घरी परतल्यानंतर घराच्या दरवाजाचे कुलूप व कडीकोंडा तुटलेला आढळला. घरात प्रवेश करून पाहणी केली असता हॉलमधील छोटी अलमारी उघडी होती. कागदपत्रे अस्ताव्यस्त पडली होती. अलमारीत ठेवलेल्या ५०० रुपयांच्या २२ नोटा, अशी एकूण ११ हजार रुपयांची रोकड गायब असल्याचे आढळले. मधल्या खोलीतील कपाटातील साहित्यही अस्ताव्यस्त करण्यात आले होते. राऊत यांच्या तक्रारीवरून रामनगर पोलिसांनी अज्ञात चोरट्याविरुद्ध गुन्हा दाखल केला असून तपास सुरू आहे.

## रस्ता अडवून मारहाण करणाऱ्यास न्यायालयाची शिक्षा

**वर्धा/जनमाध्यम**

बैलगाडीने शेताकडे जाणाऱ्या व्यक्तीचा रस्ता अडवून त्याला लाथाबुक्क्यांनी मारहाण करणाऱ्या आरोपीस न्यायालयाने कोर्ट उठेपर्यंत साधा कारावास आणि १० हजार रुपयांचा दंड ठोठावला. प्रथम श्रेणी न्यायालय क्रमांक ९च्या न्यायाधीश एम. आर. चव्हाण (हिवराळे) यांनी हा निकाल दिला.

रविंद्र बजरंगजी गोमासे (६०, रा. पवनार, जि. वर्धा) असे शिक्षा झालेल्या आरोपीचे नाव आहे. ही घटना २०१५ मध्ये पवनार परिसरात घडली होती. फिर्यादी शेषराव तानबाजी शेंडे (४०, रा. पवनार) हे बैलगाडी घेऊन शेताकडे जात असताना आरोपीने त्यांची बैलगाडी अडवून रस्ता रोखला. यावेळी फिर्यादीने आरोपीला हटकले असता त्याने लाथाबुक्क्यांनी मारहाण करून शेंडे यांना जमिनीवर पाडले. एवढ्यावरच न थांबता आरोपीने त्यांच्या डाव्या गालाचा चावा घेतल्याचे तक्रारीत नमूद करण्यात आले होते.

फिर्यादीच्या तोंडी तक्रारीसह वैद्यकीय प्रमाणपत्राच्या आधारे सेवाग्राम पोलिस ठाण्यात गुन्हा क्रमांक २०२/२०१५ नुसार भादंवि कलम ३४१, ३२४, ३२३ व ५०४ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पोलिस हवालदार सतीश पांडे यांनी तपास करून न्यायालयात दोषारोपपत्र दाखल केले.

सरकारतर्फे सरकारी अभियोक्ता डी. पी. कोठारी यांनी बाजू मांडली. पैरवी अंमलदार पोअं. चंद्रकांत कोहचडे यांनी साक्षीदारांना न्यायालयात वेळोवेळी हजर केले. तत्कालीन ठाणेदार सपोनि. ठाकूर यांनी साक्षीदारांना मार्गदर्शन केले. न्यायालयाने आरोपीस भादंवि कलम ३२३ अंतर्गत कोर्ट उठेपर्यंत साधा कारावास आणि १० हजार रुपये दंडाची शिक्षा सुनावली. दंड न भरल्यास तीन महिने साधा कारावास भोगावा लागणार आहे.

## शौचालयाच्या पाण्यावरून वाद; महिलेवर काठीने हल्ला

**समुद्रपूर-** घरासमोर साचणाऱ्या शौचालयाच्या पाण्यावरून झालेल्या वादातून शेजारी महिलेने काठीने मारहाण केल्याची घटना हिवरा येथे घडली. पुष्पा मोरेश्वर मुंगल (६२) यांनी पोलिसांत तक्रार दाखल केली आहे. तक्रारीनुसार, त्यांच्या शेजारी राहणाऱ्या रेखा सहारे यांच्या घरातील संडास-बाथरूमचे पाणी त्यांच्या घरासमोर साचत असल्याने दुर्गंधी येत होती. याबाबत जाब विचारला असता वाद वाढला. यावेळी आरोपीने शिवीगाळ करत काठीने पुष्पा यांच्या हातावर मारहाण केली. त्यांना दुखापत झाली. त्यानंतर पुष्पा यांच्या मुलालाही शिवीगाळ करण्यात आली. आरोपी तेथून निघून गेल्यानंतर तलवार घेऊन परत आला आणि जीवे मारण्याची धमकी दिल्याचे तक्रारीत नमूद आहे. या प्रकरणी गिरड पोलिसांनी संबंधित कलमान्वये गुन्हा दाखल करून तपास सुरू केला आहे.

## हद्दपार अमन बावणे शहरात सापडला; पोलिसांची कारवाई

**वर्धा-** जिल्ह्यातून हद्दपार करण्यात आलेला अमन रमेश बावणे हा कोणतीही पूर्वपरवानगी न घेता शहरात आढळून आल्याने रामनगर पोलिसांनी त्याच्याविरुद्ध कारवाई केली. संविधान चौक परिसरात तो चायनीज सेंटरजवळ बसलेला पोलिसांच्या निदर्शनास आला.

पोलिसांना मिळालेल्या खात्रीशीर माहितीवरून पंचांसह पथकाने परिसरात पाहणी केली. यावेळी अमन बावणे आढळून आला. चौकशी केली असता त्याने आपले नाव व पत्ता सांगितला. पोलिसांनी त्याच्याकडे जिल्ह्यात प्रवेश करण्यासाठी संबंधित अधिकाऱ्याची लेखी परवानगी आहे का, अशी विचारणा केली.

मात्र त्याच्याकडे कोणतीही परवानगी नसल्याचे समोर आले. उपविभागीय दंडाधिकाऱ्यांच्या आदेशानुसार त्याला सहा महिन्यांसाठी जिल्ह्यातून हद्दपार करण्यात आले होते.

आदेशाचे उल्लंघन करून शहरात प्रवेश केल्याप्रकरणी रामनगर पोलिसांनी त्याच्याविरुद्ध महाराष्ट्र पोलीस कायद्यानुसार गुन्हा दाखल केला आहे.

### शेतकऱ्याचा मृत्यू

**सेलू -** शेतात विषारी औषध प्राशन केलेल्या ३३ वर्षीय शेतकऱ्याचा उपचारादरम्यान मृत्यू झाला. सेलू तालुक्यातील अदशी येथील ही घटना आहे. याप्रकरणी सेलू पोलिस ठाण्यात अकस्मात मृत्यूची नोंद करण्यात आली आहे.मिळालेल्या माहितीनुसार, संबंधित व्यक्तीने स्वतःच्या शेतात विषारी औषध प्राशन केले होते. प्रकृती गंभीर झाल्यानंतर त्याला उपचारासाठी कस्तुरबा रुग्णालय, सेवाग्राम येथे दाखल करण्यात आले. मात्र उपचार सुरू असतानाच त्याचा मृत्यू झाला. या प्रकरणी सुरुवातीला सेवाग्राम पोलिस ठाण्यात अकस्मात मृत्यूची नोंद करण्यात आली होती. घटनास्थळ सेलू पोलिस ठाण्याच्या हद्दीत असल्याने संबंधित कागदपत्रे व मर्ग अहवाल सेलू पोलिसांना प्राप्त झाला. त्यानंतर सेलू पोलिसांनी अकस्मात मृत्यूची नोंद करून तपास सुरू केला आहे. मृत्यूचे नेमके कारण आणि घटनेमागील परिस्थितीचा तपास पोलिसांकडून करण्यात येत आहे.

## चोरी करणाऱ्यास एक वर्ष सश्रम कारावास

**वर्धा/जनमाध्यम**

नालंदा नगरातील घराचे कुलूप तोडून मोबाईल, रोख रक्कम व सोन्याचे दागिने असा १४ हजार ५०० रुपयांचा मुद्देमाल चोरून नेणाऱ्या आरोपीस न्यायालयाने एक वर्ष सश्रम कारावासाची शिक्षा सुनावली. प्रथम श्रेणी न्यायालय क्रमांक ९च्या न्यायाधीश एम. आर. चव्हाण (हिवराळे) यांनी हा निकाल दिला. ओमप्रकाश रंगनाथ खांदवे (२४, रा. तुळशीनगर सागवान, जि. बुलढाणा) असे शिक्षा झालेल्या आरोपीचे नाव आहे. प्रकरणातील फिर्यादी राजश्री प्रमोदराय शिंदे (४८, रा. नालंदा नगर, वर्धा) या २६ ऑक्टोबर २०१४ रोजी रात्री घरातील हॉलमध्ये पाहुण्यासोबत झोपल्या होत्या. मध्यरात्री दीड ते सकाळी सहा वाजण्याच्या दरम्यान अज्ञात चोरट्याने घराच्या मुख्य दरवाजाचे कुलूप तोडून आत प्रवेश केला. त्यानंतर मधल्या खोलीतील लोखंडी अलमारीतून दोन मोबाईल, २ हजार रुपये रोख आणि एक ग्रॅम सोन्याचा नेकलेस असा एकूण १४ हजार ५०० रुपयांचा मुद्देमाल लंपास केला. पोलिस हवालदार ज्ञानेश्वर निशाने यांनी तपास करून न्यायालयात दोषारोपपत्र दाखल केले.सरकारतर्फे सरकारी अभियोक्ता डी. पी. कोठारी यांनी कामकाज पाहिले. पैरवी अंमलदार मपोहवा वर्षा अंभोरे यांनी साक्षीदारांना न्यायालयात हजर केले. ठाणेदार पोनि. नागेश चतरकर यांनीही साक्षीदारांना मार्गदर्शन केले. न्यायालयाने आरोपीला एक वर्ष सश्रम कारावास व १० हजार रुपये दंड ठोठावला. दंड न भरल्यास तीन महिने साधा कारावास भोगावा लागणार आहे.

# रसनेवर संयम ठेवला तरच जीवन निरोगी


## मुनिश्री कंचनतिलक विजयजी; चातुर्मास प्रवचनातून संतुलित जीवनशैलीचा संदेश

**हिंगणघाट/जनमाध्यम**

शरीर, मन, वाणी आणि श्वास यांचे संतुलन राखले तर जीवन निरोगी आणि अर्थपूर्ण होते. या चारही गोष्टींचा आहाराशी जवळचा संबंध असल्याने संयमित आहार, तप आणि त्यागाला जीवनात महत्त्व द्यावे, असे प्रतिपादन मुनिश्री कंचनतिलक विजयजी म.सा. यांनी केले.

श्री जैन श्वेतांबर पार्श्वनाथ मंदिर ट्रस्टच्या वतीने आयोजित चातुर्मास प्रवचनात ते बोलत होते. मानवी शरीर हे भौतिक तसेच आध्यात्मिक साधनेसाठी मिळालेले अमूल्य साधन आहे. त्यामुळे भूक लागल्यावरच भोजन करावे, प्रकृतीला प्रतिकूल पदार्थ टाळावेत आणि आवश्यकतेपेक्षा अधिक अन्न सेवन करू नये, असे आवाहन त्यांनी केले. सध्याच्या बदलत्या जीवनशैलीत फास्ट फूड, हॉटेल संस्कृती, उशिराचे भोजन आणि अनियमित खानपानामुळे शारीरिक तसेच मानसिक समस्या वाढत आहेत. चवीच्या मोहापेक्षा आरोग्याला प्राधान्य देऊन आहार-विहारात संयम ठेवणे आवश्यक आहे, असे त्यांनी सांगितले.

भारतीय संस्कृतीतील आई-वडील, वृद्ध, रुग्ण, साधू-संत आणि अतिथींना भोजन दिल्यानंतर स्वतः भोजन करण्याची परंपरा ही माणुसकी आणि संस्कारांचे प्रतीक असल्याचेही त्यांनी नमूद केले.प्रवचनाला दिनेश कोचर, अनिल कोठारी, भागचंद ओस्तवाल, श्रीचंद कोचर, अभय कोठारी यांच्यासह मोठ्या संख्येने श्रावक-श्राविका उपस्थित होते.



जनमाध्यम न्युज अँड पब्लीकेशन प्रा.लि.च्या मालकीचे हे वृत्तपत्र मुद्रक, प्रकाशक प्रदीप देशपांडे यांनी प्लॉट नं.बी.-५०, सातुर्णा औद्योगिक वसाहत, बडनेरा रोड, अमरावती-४४४६०७ येथे छापून जनमाध्यम कार्यालय, हवालदारपुरा,वर्धा-४४२२२१ येथे प्रकाशित केले.

**संपादक-प्रदीप देशपांडे**
**संचालक (वृत्त) - अभिराम देशपांडे**
(Responsible for selection of News Under PRB Act)

**वर्धा आवृत्ती वर्ष-१४ अंक २८४**
**आर.एन.आय.रजी.नं. MAHMAR/२०१३/५१०९३**

**मुख्य कार्यालय**– अंबापेठ, राजकमल चौक, अमरावती-४४४६०१
फोन - ९८२३०१६३००, ९४२२९५६२६८
ई-मेल-atimadhyam@gmail.com,
abhiramdeshpande@gmail.com

# रोही, रानडुकरांच्या त्रासावर सात दिवसांत ठोस उपाययोजना करा; अन्यथा जिल्हास्तरीय आंदोलन - यशोमती ठाकूर

**अमरावती** - तिवसा विधानसभा मतदारसंघासह अमरावती जिल्ह्यातील शेतकऱ्यांना रोही (नीलगाय), रानडुकरांसह वन्यप्राण्यांच्या वाढत्या उपद्रवामुळे मोठ्या प्रमाणात शेतीपिकांचे नुकसान सहन करावे लागत आहे. या गंभीर प्रश्नावर माजी मंत्री तथा तिवसा विधानसभा मतदारसंघाच्या माजी आमदार ॲड. यशोमती ठाकूर यांनी मुख्य वनसंरक्षक ज्योती बॅनर्जी तसेच उपवनसंरक्षक के. योजना यांच्यासोबत सकारात्मक चर्चा करून शेतकऱ्यांच्या मागण्यांवर तातडीने कार्यवाही करण्याची आग्रही मागणी केली. शेतकऱ्यांच्या निवेदनातील मागण्यांनुसार, वन्यप्राण्यांपासून पिकांचे संरक्षण करण्यासाठी प्रभावी व कायमस्वरूपी उपाययोजना करणे, नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना तातडीने नुकसानभरपाई मिळण्यासाठी पंचनामा व अर्जाची प्रक्रिया सुलभ व गतिमान करणे, तसेच वन्यप्राण्यांच्या हल्ल्यात जखमी किंवा मृत्यूमुखी पडलेल्या व्यक्तींच्या कुटुंबीयांना शासन नियमानुसार तातडीने



मदत देण्याची मागणी करण्यात आली. विशेषतः श्यामाप्रसाद मुखर्जी योजनेअंतर्गत शेतकऱ्यांना सोलार फेंसिंग मटेरियल पुरविण्याची निविदा प्रक्रिया पूर्ण झालेली असतानाही १२ जानेवारी २०२५ पासून संबंधित पोर्टल बंद असल्यामुळे शेतकऱ्यांना योजनेचा प्रत्यक्ष लाभ मिळत नसल्याचा गंभीर मुद्दा यावेळी उपस्थित करण्यात आला. योजना सुरू असल्याचे सांगितले जात असले तरी पोर्टल बंद असल्याने शेतकरी लाभापासून वंचित राहत आहेत. त्यामुळे पोर्टल तातडीने सुरू करून पात्र शेतकऱ्यांना सोलार फेंसिंगचा लाभ देण्याची मागणी करण्यात आली. तसेच रोही व रानडुकरांच्या उपद्रवामुळे बाधित गावांमध्ये विशेष गस्त, जनजागृती व प्रतिबंधात्मक उपाययोजना, वन्यप्राण्यांच्या हल्ल्यांच्या घटनांना तातडीने प्रतिसाद देण्यासाठी "pid Response Team (RRT) प्रभावीपणे कार्यरत करणे, वन विभागामार्फत बाधित शेतकऱ्यांसाठी मार्गदर्शन शिबिरे घेऊन नुकसानभरपाई व विविध कुंपण योजनांची माहिती देणे, तसेच संवेदनशील गावांमध्ये प्रायोगिक तत्त्वावर ठोस उपाययोजना राबविण्याची मागणी करण्यात आली. 'शेतकऱ्यांच्या पिकांचे संरक्षण करणे ही शासनाची जबाबदारी आहे. रोही व रानडुकरांच्या उपद्रवामुळे शेतकऱ्यांचे होणारे नुकसान आता सहन केले जाणार नाही. पुढील सात दिवसांत प्रायोगिक तत्त्वावर ठोस व परिणामकारक उपाययोजना सुरू न झाल्यास शेतकऱ्यांच्या प्रश्नासाठी जिल्हास्तरीय आंदोलन करण्यात येईल,' असा स्पष्ट इशारा यावेळी देण्यात आला. यावेळी यशोमती ठाकूर, हरीश मोरे, पंकज देशमुख, श्रीकांत बोंडे, वैभव वानखडे, गजानन देशमुख, रणजित तिडके, राजू कुऱ्हेकर, अभय देशमुख, शैलेश काळबांडे, सतीश गोटे, आशुतोष देशमुख, डॉ. नरेंद्र निर्मळ, दिलीप सोनवणे, रामचंद्र कांडलकर, गंगाधर श्रीखंडे, अरुणराव तडस, सर्वेश खांडे, हर्षल देशमुख, मुरलीधर डहाणे, अतुल यावलीकर, मनीष धुर्वे, बाबुराव उभाळ, राजकुमार इंगळे, अल्पेश काळबांडे, मनीष भुयार, दीपक पडळकर, शरद तालन, संजय चौधरी, विश्वजित बाखडे, वासुदेव चोपकर, यश करडे यांच्यासह शेतकरी व कार्यकर्ते उपस्थित होते.

# श्री बेंडोजी बाबा विद्यालयात 'शिक्षक दिन' उत्साहात

## माजी सैनिक अफरोज खा पठाण व मित्रमंडळातर्फे नव्या विद्यार्थ्यांना मोफत स्पोर्ट्स टी-शर्टचे वाटप



**चांदूर रेल्वे** - घुईखेड येथील श्री बेंडोजी बाबा विद्यालयात ५ सप्टेंबर रोजी 'शिक्षक दिन' उत्साहपूर्ण वातावरणात साजरा करण्यात आला. शिक्षक दिनाचे औचित्य साधून विद्यालयात सामाजिक, शैक्षणिक, पर्यावरणपूरक तसेच जनजागृतीपर विविध उपक्रमांचे आयोजन करण्यात आले होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी विद्यालयाचे प्राचार्य सुमंत अंबुलकर होते. प्रमुख पाहुणे म्हणून तळेगाव दशासर पोलीस ठाण्याचे ठाणेदार किरण औटे, विद्यालयाचे माजी विद्यार्थी तथा माजी सैनिक अफरोज खा पठाण व त्यांचे मित्रमंडळ, कला विभागप्रमुख मनोज सोनपराते तसेच एमसीव्हीसी विभागप्रमुख श्री. उमेकर उपस्थित होते. विद्यालयाचे माजी विद्यार्थी व माजी सैनिक अफरोज खा पठाण आणि त्यांच्या मित्रमंडळाच्या वतीने इयत्ता पाचवीतील नव्याने प्रवेशित विद्यार्थ्यांना मोफत स्पोर्ट्स टी-शर्टचे वाटप करण्यात आले. माजी विद्यार्थ्यांनी शाळेशी असलेली नाळ जपत विद्यार्थ्यांसाठी राबविलेल्या या उपक्रमाचे उपस्थितांनी कौतुक केले. कार्यक्रमातील प्रमुख आकर्षण ठरले ते अमली पदार्थांच्या दुष्परिणामांबाबत आयोजित जनजागृती सत्र. ठाणेदार किरण औटे यांनी विद्यार्थ्यांना अमली पदार्थांच्या आहारी जाण्यापासून स्वतःचे संरक्षण कसे करावे, याबाबत मार्गदर्शन केले. 'सुरक्षा कवच' या संकल्पनेतून विद्यार्थ्यांना व्यसनमुक्त जीवनाचे महत्त्व पटवून देण्यात आले. यावेळी तळेगाव पोलीस ठाण्याच्या वतीने अमली पदार्थविरोधी चित्रकला स्पर्धेचे आयोजन करण्यात आले. स्पर्धेतील प्रथम, द्वितीय व तृतीय क्रमांकाच्या विजेत्यांसह सहभागी विद्यार्थ्यांना पोलीस प्रशासनाच्या वतीने प्रमाणपत्र व स्मृतिचिन्ह देऊन गौरविण्यात आले. पर्यावरण संवर्धनाचा संदेश देत 'हरित सेना'च्या माध्यमातून शाळा परिसरात मान्यवरांच्या हस्ते वृक्षारोपण करण्यात आले. तसेच ज्ञानदानाचे पवित्र कार्य करणाऱ्या विद्यालयातील सर्व शिक्षकांचे गुलाबपुष्प देऊन आदरपूर्वक स्वागत व सत्कार करण्यात आला. कार्यक्रमाचे नियोजन कार्यक्रमप्रमुख श्री. वाकोडे यांनी केले, तर सूत्रसंचालन श्री. नवलकर यांनी प्रभावी व रंजक शैलीत केले.

# सफाई ठेका रिकॉल करणे हाच एकमेव मार्ग, अन्यथा मनपावर वाढणार आर्थिक बोजा - अनिल अग्रवाल

## रेड्डींना ठेका दिल्यास वार्षिक २० ते २२ कोटी रुपयांचा अतिरिक्त भार पडण्याचा दावा

**अमरावती** - कोणार्क इन्फ्रास्ट्रक्चरला देण्यात आलेल्या कचरा संकलन व वाहतूक ठेक्याबाबत नागपूर खंडपीठाने दिलेल्या निर्णयानंतर महापालिकेत राजकीय प्रतिक्रिया तीव्र झाल्या आहेत. काँग्रेस नगरसेवक अनिल अग्रवाल यांनी हायकोर्टाच्या निर्णयाचे स्वागत करत सध्याची निविदा प्रक्रिया रिकॉल करून नव्याने निविदा काढण्याची मागणी केली आहे. पी. गोपीनाथ रेड्डी यांना थेट ठेका देण्याऐवजी महापालिकेने आपले आर्थिक हित आणि शहराची स्वच्छता व्यवस्था या दोन्ही बाबींचा विचार करून निर्णय घ्यावा, असे त्यांचे म्हणणे आहे. नगरसेवक अनिल अग्रवाल यांनी दावा केला की, रेड्डी कंपनीचे दर कोणार्कच्या तुलनेत प्रतिटन २ हजार रुपयांपेक्षा अधिक होते. त्यांच्या मते, रेड्डींना ठेका दिल्यास महापालिकेचा एकूण खर्च सध्याच्या अंदाजे ३५० कोटी रुपयांवरून ५५० ते ६०० कोटी रुपयांपर्यंत पोहोचू शकतो. त्यामुळे महापालिकेवर दरवर्षी सुमारे २० ते २२ कोटी रुपयांचा अतिरिक्त आर्थिक भार पडण्याची शक्यता आहे.



**झोननिहाय ठेका पद्धतीची मागणी**

नगरसेवक अनिल अग्रवाल यांनी सात वर्षांच्या एकत्रित सफाई ठेका पद्धतीवरही प्रश्न उपस्थित केले. शहरातील पाचही झोन एकाच ठेक्यात समाविष्ट करूनही स्वच्छता व्यवस्थेत अपेक्षित सुधारणा झालेली नाही, असे त्यांनी म्हटले. त्यामुळे पूर्वीप्रमाणे झोननिहाय ठेके देण्याची मागणी त्यांनी केली आहे. यामुळे जबाबदारी निश्चित करणे सोपे होईल, देखरेख अधिक प्रभावीपणे करता येईल आणि एखाद्या ठेकेदाराच्या कार्यक्षमतेचा परिणाम संपूर्ण शहराच्या स्वच्छता व्यवस्थेवर होणार नाही, असा त्यांचा युक्तिवाद आहे. हायकोर्टाच्या निर्णयानंतर महापालिकेने रेड्डी यांच्या निविदेचा विचार केल्यास केवळ आर्थिक दर हा पुरेसा आधार ठरू शकत नाही, असेही अग्रवाल यांनी स्पष्ट केले. वाहनांची संख्या व प्रकार, आरसी, वाहनांची मालकी, यंत्रसामग्री, मनुष्यबळ तसेच अन्य तांत्रिक अटींची स्वतंत्रपणे तपासणी करणे आवश्यक आहे. त्यांच्या मते, हायकोर्टाने रेड्डींना थेट ठेका देण्याचे आदेश दिलेले नसून नियमानुसार त्यांच्या पात्रतेचा विचार करण्यास सांगितले आहे.

**पहिल्याच आमसभेत उपस्थित केले होते प्रश्न**

नगरसेवक अनिल अग्रवाल यांनी सांगितले की, २८ फेब्रुवारी रोजी झालेल्या महापालिकेच्या पहिल्या विशेष आमसभेतच त्यांनी कोणार्कला देण्यात आलेल्या सात वर्षांच्या एकत्रित सफाई ठेक्याच्या प्रक्रियेवर प्रश्न उपस्थित केले होते. निर्वाचित सभागृह अस्तित्वात येण्याच्या अगदी आधी तत्कालीन आयुक्त तथा प्रशासक सौम्या शर्मा चांडक यांच्या कार्यकाळात जानेवारीच्या शेवटच्या आठवड्यात ही प्रक्रिया घाईघाईने अंतिम करण्यात आल्याचा त्यांचा आरोप आहे. त्यानंतर सर्वपक्षीय स्वच्छता अभ्यास समिती स्थापन करण्यात आली होती आणि या समितीत ते स्वतःही सदस्य होते. नगरसेवक अनिल अग्रवाल यांच्या दाव्यानुसार, समितीच्या तपासणीत निविदेतील अटी आणि त्यानंतर करण्यात आलेल्या करारामध्ये अनेक महत्त्वपूर्ण तफावती आढळून आल्या होत्या. काही तरतुदी आणि जबाबदाऱ्यांमध्ये बदल करण्यात आल्याचा आरोप करत त्यांनी सांगितले की, समितीने जबाबदार अधिकाऱ्यांची चौकशी करून कारवाई करण्याची शिफारस केली होती. मात्र, अद्याप कोणतीही ठोस कारवाई झालेली नाही.

**पार्ट-बीच्या मंजुरीलाही केला होता विरोध**

नगरसेवक अनिल अग्रवाल यांनी दावा केला की, सफाई ठेक्याच्या पार्ट-बीला स्थायी समितीकडून मंजुरी देण्यास त्यांनी आणि अन्य नगरसेवकांनी विरोध केला होता. वाद कायम असतानाही पार्ट-बीला मंजुरी मिळाल्यामुळे कोणार्कच्या प्रलंबित देयकांच्या भुगतानाचा मार्ग मोकळा झाल्याचा त्यांचा आरोप आहे. हायकोर्टाच्या निर्णयानंतर आता निविदेपासून ते अंतिम करारापर्यंतच्या संपूर्ण प्रक्रियेचा नव्याने आढावा घेण्याची मागणी त्यांनी केली आहे.

**केवळ करार रद्द नको, जबाबदारीही निश्चित करा**

नगरसेवक अनिल अग्रवाल यांनी म्हटले की, हायकोर्टाच्या निर्णयानंतर केवळ कोणार्कचा करार रद्द करणे पुरेसे ठरणार नाही. निविदा तयार करणे, तांत्रिक मूल्यांकन करणे आणि अंतिम करारात बदल करण्याच्या प्रक्रियेत सहभागी असलेल्या अधिकाऱ्यांच्या भूमिकेची निष्पक्ष चौकशी झाली पाहिजे. संबंधित कागदपत्रे, तांत्रिक मूल्यांकन आणि निविदेच्या अटींमध्ये करण्यात आलेल्या बदलांची सखोल चौकशी करून जबाबदारी निश्चित करण्याची मागणी त्यांनी केली.

**आयुक्त गोंदावले यांच्या कार्यशैलीवर विश्वास**

काँग्रेस नगरसेवक अनिल अग्रवाल यांनी महापालिका आयुक्त डॉ. मंगेश गोंदावले यांच्या कार्यशैलीचे कौतुक करत ते प्रशासनात पारदर्शकता आणण्यासाठी आणि व्यवस्था सुधारण्यासाठी प्रयत्नशील असल्याचे म्हटले. हायकोर्टाच्या निर्णयानंतर आयुक्त या संपूर्ण प्रकरणाचा निष्पक्षपणे आढावा घेतील आणि कोणत्याही स्तरावर प्रशासकीय अथवा कायदेशीर जबाबदारी निश्चित झाल्यास नियमानुसार कारवाई करतील, अशी अपेक्षा त्यांनी व्यक्त केली. नगरसेवक अनिल अग्रवाल यांच्या मते, महापालिकेसमोर आता केवळ सफाई ठेका कोणत्या कंपनीला द्यायचा एवढाच प्रश्न नाही, तर शहराची स्वच्छता अधिक चांगली होईल आणि महापालिकेवर अनावश्यक आर्थिक बोजा पडणार नाही, अशी पारदर्शक आणि स्पर्धात्मक निविदा व्यवस्था निर्माण करण्याचीही मोठी जबाबदारी आहे.

# अमरावती स्त्री रुग्णालयातील आगप्रकरणी दोषींवर कारवाईचे निर्देश

## तीन बालकांच्या मृत्यूची चौकशी पूर्ण; अधिकाऱ्यांच्या निलंबनासह दोन कंपन्यांवर 'ब्लॅकलिस्ट'ची कारवाई

**मुंबई** - अमरावती जिल्हा स्त्री रुग्णालयातील नवजात शिशु विशेष काळजी कक्षात (एसएनसीयू) २४ ऑगस्ट २०२६ रोजी लागलेल्या आगीत तीन बालकांचा दुर्दैवी मृत्यू झाल्याच्या घटनेची उच्चस्तरीय चौकशी पूर्ण झाली आहे. चौकशी अहवाल शासनास सादर झाल्यानंतर अहवालाच्या आधारे दोषींवर कठोर कारवाई करण्याचे निर्देश सार्वजनिक आरोग्य विभागाने दिले आहेत. या दुर्घटनेत ३६ बालकांना तातडीने अन्य रुग्णालयांमध्ये सुरक्षित हलविण्यात आले होते. चौकशी समितीच्या अहवालानुसार व्हेंटिलेटरची वेळोवेळी आवश्यक देखभाल व दुरुस्ती न होणे, फायर अलार्म व स्प्रिंकलर यंत्रणा कार्यान्वित नसणे, फायर पंप हाऊस कुलूपबंद स्थितीत असणे तसेच उपकरणांच्या देखभाल व तांत्रिक तपासणीत गंभीर त्रुटी आढळून आल्या आहेत. या प्रकरणी कामकाजातील हलगर्जीपणा, बेजबाबदार वर्तन, पर्यवेक्षीय नियंत्रणातील त्रुटी आणि अक्षम्य दुर्लक्ष यासाठी संबंधित अधिकारी व कर्मचाऱ्यांविरुद्ध महाराष्ट्र नागरी सेवा (शिस्त व अपील) नियम, १९७९ मधील नियम ८ नुसार शिस्तभंगाची कारवाई सुरू करण्याचे निर्देश देण्यात आले आहेत. कंत्राटी कर्मचाऱ्यांवरही प्रशासकीय कारवाई करण्याचे आदेश देण्यात आले असून सार्वजनिक बांधकाम विभागातील दुर्घटनेस जबाबदार अधिकाऱ्यांवर कारवाई करण्याबाबतही निर्देश देण्यात आले आहेत. पर्यवेक्षीय निष्काळजीपणा व त्रुटींसाठी प्रथमदर्शनी जबाबदार ठरविण्यात आलेले उपसंचालक, आरोग्य सेवा, अकोला परिमंडळ; रुग्णालय वैद्यकीय अधीक्षक, स्त्री रुग्णालय अमरावती; अतिरिक्त जिल्हा शल्यचिकित्सक, अमरावती; प्रशासकीय अधिकारी आणि जीवजंत्री, स्त्री रुग्णालय अमरावती यांच्यावर निलंबनाची कारवाई करण्याचे निर्देश शासनाने दिले आहेत.

संबंधित कंपन्यांवरही कारवाई

चौकशी समितीच्या अहवालात मेसर्स/एओव्ही इंटरनॅशनल एलएलपी ही कंपनी दोषी आढळल्याने तिला काळ्या यादीत टाकण्याची कारवाई करण्याचे निर्देश देण्यात आले आहेत. तसेच शिलार कंपनीच्या सेवांमध्येही प्रथमदर्शनी दोष आढळून आल्याने फॉरेन्सिक अहवाल तातडीने प्राप्त करून संबंधित कंपनीलाही काळ्या यादीत टाकण्याची कारवाई करण्याचे निर्देश देण्यात आले आहेत.

रुग्णालयांच्या सुरक्षेसाठी व्यापक उपाययोजना

भविष्यात अशा दुर्घटना टाळण्यासाठी शासनाने राज्यातील शासकीय रुग्णालयांमध्ये सुरक्षा उपाययोजनांना अधिक बळ देण्याचा निर्णय घेतला आहे. एसएनसीयू आणि एनआयसीयूमध्ये सीसीटीव्ही यंत्रणा बसविण्याचे, तसेच सर्व रुग्णालयांमध्ये अग्निसुरक्षा मॉक ड्रिल अनिवार्य करण्याचे निर्देश देण्यात आले आहेत. अग्निसुरक्षा, विद्युत सुरक्षा आणि वैद्यकीय उपकरणांची देखभाल याबाबत मानक कार्यपद्धती (एसओपी) काटेकोरपणे लागू करण्याचे निर्देश देण्यात आले आहेत. आरोग्य सेवा आयुक्त संजय काटकर यांनी सार्वजनिक बांधकाम, विद्युत, अग्निशमन, जैव-तांत्रिक आणि देखभाल-दुरुस्ती यंत्रणांच्या नियमित बैठका घेऊन रुग्णालयांच्या सुरक्षेचा आढावा घ्यावा, तसेच आवश्यक त्या उपाययोजनांवर प्रभावी नियंत्रण ठेवावे, अशा सूचना देण्यात आल्या आहेत. राज्यातील सर्व जिल्हाधिकारी, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी आणि महानगरपालिका आयुक्तांना त्यांच्या कार्यक्षेत्रातील सर्व रुग्णालयांचे विद्युत व अग्निसुरक्षा ऑडिट तीन महिन्यांच्या आत पूर्ण करण्याचे निर्देश देण्यात आले आहेत. सार्वजनिक तसेच खाजगी रुग्णालयांमध्ये फायर ऑडिटची अंमलबजावणी, देखरेख आणि अनुपालन अहवाल सादर करण्याची जबाबदारी जिल्हा शल्य चिकित्सक यांच्या माध्यमातून सुनिश्चित करण्याच्या सूचनाही आरोग्य सेवा आयुक्तांना देण्यात आल्या आहेत. दरम्यान, दुर्घटनेच्या वेळी आगीचा धोका निर्माण झालेल्या बालकांना तातडीने सुरक्षितस्थळी हलवून आपले कर्तव्य बजावणाऱ्या अधिकारी व कर्मचाऱ्यांनी स्वतःचा जीव धोक्यात घातल्याबद्दल त्यांचा गौरव करण्याचे निर्देशही शासनाने दिले आहेत.


**Sant Gadge Baba Amravati University, Amravati**
**Department of Computer Science**
**NOTIFICATION FOR ADMISSION TO FIRST YEAR OF FULL TIME POST GRADUATE DEGREE COURSE IN MASTER OF COMPUTER APPLICATION (MCA) AGAINST VACANT SEAT AFTER CAP 2026-27**


Application are invited for admission to **FIRST YEAR MASTER OF COMPTER APPLICATION PROGRAMME (MCA) 2026-27** against vacant seat after CAP. Desirous eligible candidates as p er CAP 2026-27 of State Common Entrance Test Cell, Maharashtra State, Mumbai should submit application in hard copy in the Department along with photocopies of essential documents as per schedule given on University website (www.sgbau.ac.in)

**Registrar**


# जुन्या वाहनांना हाय सिक्युरिटी नंबर प्लेट अनिवार्य

## दंडात्मक कारवाईसह परिवहन विभागाची कामे बंद होणार

**अमरावती** - प्रादेशिक परिवहन कार्यालयाद्वारे दि. १ एप्रिल २०१९ पूर्वी नोंदणी झालेल्या सर्व जुन्या वाहनांवर उच्च सुरक्षा नोंदणी क्रमांक पाटी



बसवणे अनिवार्य करण्यात आले आहे. एचएसआरपी बसविली नसल्यास दंडात्मक कारवाईसह परिवहन विभागाची कामे बंद होणार आहे. केंद्र सरकारच्या केंद्रीय मोटार वाहन नियम १९८९ च्या नियम ५० नुसार हा निर्णय घेण्यात आला आहे. जुन्या वाहनांवर एचएसआरपी बसवण्यासाठी शासनाकडून दि. ३० जूनपर्यंत मुदतवाढ देण्यात आली होती. ही मुदत संपल्यामुळे वाहनधारकांनी किंवा शासकीय कार्यालयांनी अद्याप नंबर प्लेट बसवलेली नाही अथवा अपॉइंटमेंट घेतलेली नाही, अशा वाहनांवर दि. १ जुलैपासून कारवाईचे निर्देश देण्यात आले आहे. वायुवेग पथकाद्वारे १ जुलैपासून मोटार वाहन अधिनियमातील नियम ५० व कलम १७७ नुसार थेट कारवाई केली जाणार आहे. तसेच एचएसआरपी बसविलेली नाही अशा वाहनांची परिवहन विभागाद्वारे कामे पूर्णपणे थांबवली जातील. यात वाहन हस्तांतरण, नोंदणी प्रमाणपत्रात बदल, फायनान्सचा बोझा चढवणे किंवा उतरवणे, ना-हरकत प्रमाणपत्र जारी करणे, दुय्यम नोंदणी प्रमाणपत्र देणे यांचा समावेश राहणार आहे. मात्र ज्या वाहनधारकांनी एचएसआरपी बुकिंग केल्याची पावती कार्यालयात सादर केली आहे किंवा ज्यांनी आधीच अपॉइंटमेंट घेतली आहे, त्यांच्यावर कोणतीही कारवाई केली जाणार नाही. त्यांची कामे केली जातील, अशी माहिती प्रादेशिक परिवहन अधिकारी उर्मिला पवार यांनी दिली.


जनमाध्यम न्यूज ॲण्ड पब्लिकेशन प्रा.लि. च्या मालकीचे हे वृत्तपत्र मुद्रक, प्रकाशक प्रदीप देशपांडे यांनी प्लॉट क्र.बी-५०, सातुर्णा औद्योगिक वसाहत, बडनेरा रोड, अमरावती-४४४६०७ येथे छापून जनमाध्यम कार्यालय, रेल्वे पुलाजवळ, राजकमल चौक, अमरावती-४४४६०१ येथे प्रकाशित केले.

संपादक- प्रदीप देशपांडे
संचालक (वृत्त) - अभिराम देशपांडे
(Responsible for selection of News Under PRB Act)

अमरावती आवृत्ती वर्ष - ३८ अंक ०७
आर.एन.आय.रजी.नं. 49763/89 पोस्टल रजिस्ट्रेशन क्र. ATI/RNP/47/2017-2020

मुख्य कार्यालय :- अंबापेठ, राजकमल चौक, अमरावती - ४४४६०१
फोन - ९८२३०१६३००, ९४२२९५६२६८
ई-मेल - atimadhyam@gmail.com, abhiramdeshpande@gmail.com



दिवाणी न्यायालय, वरिष्ठ स्तर,
वि.श्री.एस.एस.भिंगारदेव, ८ वे सह दिवाणी न्यायाधीश (क.स्तर) अमरावती
किरकोळ दिवाणी अर्ज क्र.१७५२/२०२६
Rajesh Atmaramji Tobre - Vs - Nil
पुढील ता.०६.१०.२०२६

जाहीरनामा/सायटेशन

[illegible]

दिवाणी न्यायालय, वरिष्ठ स्तर,
वि.श्री.आर.आर.खामतकर, ३रे सह दिवाणी न्यायाधीश (क.स्तर) अमरावती
किरकोळ दिवाणी अर्ज क्र.१६४६/२०२६
निलेश अधिक दोन - विरुद्ध - निरंक
पुढील ता.०५.१०.२०२६

जाहीरनामा/सायटेशन

[illegible]

दिवाणी न्यायालय, वरिष्ठ स्तर,
वि.श्री.एस.एस.भिंगारदेव, ८ वे सह दिवाणी न्यायाधीश (क.स्तर) अमरावती
किरकोळ दिवाणी अर्ज क्र.१६९१/२०२६
Anil S/o Suresh Sakarkar + 2 - Vs - Nil
पुढील ता.१५.१०.२०२६

जाहीरनामा/सायटेशन

अर्जदार : 1. Anil S/o Suresh Sakarkar, Aged about 51 Yrs. Occu.: Service
2. Aradhya Anil Sakarkar, Aged about 14 Yrs. Occu.: Education
R/o At Po. Sureshrao Sakarkar, Shirbhate Layout Mankarna Nagar, Benada, Amravati. Tq. Dist. Amravati. OR
S/o Sureshrao Sakarkar Flat No.CA-7, Tanalin Pride Paithan Road, T-Point Aurangabad (Sambhaji Nagar) Maharashtra-431001

[illegible]

दिवाणी न्यायालय, वरिष्ठ स्तर,
विद्यमान श्री.आर.आर.खामतकर, ४ थे सह दिवाणी न्यायाधीश (क.स्तर) अमरावती यांचे न्यायालयात

[illegible]

दिवाणी न्यायालय, वरिष्ठ स्तर,
वि.श्री.एस.एस.भिंगारदेव, ७ वे सह दिवाणी न्यायाधीश (क.स्तर) अमरावती
किरकोळ दिवाणी अर्ज क्र.१६३०/२०२६
Gajanan Pandurang Saksule + 2 - Vs - Nil
पुढील ता.१६.१०.२०२६

जाहीरनामा/सायटेशन

[illegible]

## संक्षिप्त



### आरोग्य तपासणी शिबीर

**अमरावती-**महाराष्ट्र होमिओ फिमेल डॉक्टर्स असोसिएशन फॉउंडर प्रेसिडेंट डॉ रुपाली गोसावी, जनरल सेक्रेटरी डॉ आरती नल्लू, स्टेट कोर कमिटी मेंबर डॉ स्वाती लबडे - पडोळे यांच्या मार्गदर्शनाखाली महाराष्ट्र होमिओ फिमेल डॉक्टर्स असोसिएशन अमरावती अंतर्गत शांतीनिकेतन इंटरनॅशनल स्कूल न्यू गणेश कॉलनी ड्रीम्स पार्क जवळ गडगडेश्वर परिसर मध्ये शाळेतील विद्यार्थ्यांसाठी आरोग्य तपासणी शिबीर घेण्यात आले.या वेळी MHFDA च्या अमरावती जिल्हा अध्यक्षा डॉ प्रिया मोहोड सचिव डॉ स्नेहा पिंजणी, सहसचिव डॉ वैशाली टेम्भे, डॉ शीतल आचार्य, समिती सदस्य डॉ राणी चौधरी, डॉ प्रज्ञा घाटोळ, डॉ स्नेहल खेरडे, डॉ राणी टावरी, डॉ सुजाता भगत यांनी आपली उपस्थिती दर्शवून विद्यार्थ्यांची आरोग्य तपासणी केली.या वेळी शाळेचे संचालक अमोल भोयर, प्रिंसिपल पूनम वानखडे, शिक्षक वृंद यांचे विशेष सहकार्य लाभले.अतिशय उत्कृष्टरित्या,सुनियीजोत पद्धतीने हा उपक्रम यशस्वीपणे पार पडला.या कार्यक्रमाच्या प्रोजेक्ट डायरेक्टर म्हणून MHFDA अमरावती जिल्हा सहसचिव डॉ वैशाली टेम्भे यांनी आपली जवाबदारी पार पडली.

### पोळा पाडव्याला मिरवणुकीचे आयोजन

**अंजनगाव बारी-**मोतीराम सत्संग मंडळ, अंजनगाव बारीच्या वतीने पोळा पाडव्याच्या निमित्ताने शुक्रवार,११ सप्टेंबर रोजी भव्य मिरवणुकीचे आयोजन करण्यात आले आहे. मिरवणुकीची सुरुवात धनगवळी महाराज मंदिरापासून होऊन ती संपूर्ण गावातून मार्गक्रमण करणार आहे. या मिरवणुकीत अंजनगाव बारीसह बाहेरगावातील विविध भजन मंडळी सहभागी होणार असून, परिसरात भक्तिमय वातावरण निर्माण होणार आहे. यानंतर आझाद मंगल कार्यालय, अंजनगाव बारी येथे किर्तनकार ह.भ.प. नरेंद्र चौधरी (सावरबंद) यांच्या उपस्थितीत धार्मिक कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे.तसेच ११ सप्टेंबर रोजी आझाद मंगल कार्यालय येथे महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले आहे. या धार्मिक सोहळ्याचा व महाप्रसादाचा लाभ भाविकांनी मोठ्या संख्येने घ्यावा, असे आवाहन मोतीराम सत्संग मंडळाच्या आयोजकांनी केले आहे.

### 'नर्मदामाई आणि परिक्रमा' या पुस्तकाचे प्रकाशन

**अमरावती-**एअर इंडियाचे निवृत्त व्यवस्थापक केशव चेरकू यांनी लिहिलेले 'नर्मदामाई आणि परिक्रमा' हे पुस्तक वाशी, नवी मुंबई येथे प्रकाशित झाले.चेरकू परिवारातील केशव चेरकू, छाया चेरकू,मयुरी चेरकू यांनी पाहुण्यांचे स्वागत केले. लेखक केशव चेरकू यांनी पुस्तकाची पार्श्वभूमी मांडली. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी नागपूरचे डॉ. प्रवीण महाजन, प्रमुख पाहुणे डॉ. अजित मगदूम,तर विशेष अतिथी आभा कुलकर्णी आणि गज अनन म्हात्रे होते. आपल्या अध्यक्षीय भाषणात, डॉ. महाजन यांनी अचलपूरच्या साहित्यिक वारशाची उदाहरणे देत आपल्या विनोदी शैलीने श्रोत्यांना मंत्रमुग्ध केले.कार्यक्रमाचे संचालन सुचित्रा कुंचुमवार यांनी केले आणि आभार छाया चेरकू यांनी केले. केशव यांचे साहित्यिक मित्र, तसेच अचलपूरचे त्यांचे बालपणीचे मित्र सुधीर भारतीय, विनोद शिदिंकर, बाळासाहेब सोनाक यांचे सुपुत्र निखिल आणि एअर इंडियाचे अनेक सेवानिवृत्त कर्मचारी उपस्थित होते. अखेरीस, स्वादिष्ट भोजनाने कार्यक्रमाची सांगता झाली.

### धबधब्यात पोहण्याच्या प्रयत्नात १६ वर्षीय कृष्णाचा बुडून मृत्यू


**बेलोरा-**मित्रांसोबत धबधबा पाहण्यासाठी गेलेल्या १६ वर्षीय



युवकाचा पाण्यात बुडून दुर्दैवी मृत्यू झाल्याची ही घटना चांदूरबाजार पोलीस ठाण्याच्या हद्दीतील धाराखोर लांबघाटी, मध्य प्रदेश येथे घडली. मिळालेल्या माहितीनुसार, कृष्णा बोबडे हा ८ सप्टेंबर रोजी मित्रांसोबत बेलोरा येथून धाराखोर लांबघाटी येथील धबधबा पाहण्यासाठी गेला होता. धबधबा पाहताना त्याला पाण्यात पोहण्याची इच्छा झाली. त्याने पाण्यात उडी घेतली; मात्र त्यानंतर तो पाण्याबाहेर आला नाही. मित्रांनी त्याचा शोध घेण्याचा प्रयत्न केला, मात्र उशिरापर्यंत त्याचा ठावठिकाणा लागला नाही. घटनेची माहिती मिळाल्यानंतर शोधमोहीम राबविण्यात आली.आज ९ सप्टेंबर रोजी दुपारी सुमारे १२ वाजता गोताखोरांच्या मदतीने कृष्णाचा मृतदेह धबधब्यातून बाहेर काढण्यात आला. या घटनेमुळे बेलोरा गावावर शोककळा पसरली असून, संपूर्ण गावात हळहळ व्यक्त होत आहे.त्याच्या अकाली निधनामुळे गावकऱ्यांमध्ये मोठी पोकळी निर्माण झाली आहे.

### दर्यापुरात कावड यात्रेचे उत्साहात स्वागत

**खल्लार-**दर्यापूर शहरात आयोजित भव्य-दिव्य कावड यात्रेचे



उत्साहपूर्ण आणि भक्तिमय वातावरणात स्वागत करण्यात आले. शिवसेना (उबाठा), शिवसेना (शिंदे गट) राष्ट्रवादी (अजित पवार) राष्ट्रवादी (शरद पवार) भारतीय जनता पक्ष, काँग्रेस या विविध राजकीय पक्षांचे पदाधिकारी व कार्यकर्ते पक्षीय मतभेद बाजूला ठेवून यात्रेच्या स्वागतासाठी एकत्र आल्याने सर्वपक्षीय एकतेचे दर्शन घडले. यामध्ये छत्रपती संभाजी महाराज, भगवान शंकर यांच्यासह भारताचे माजी राष्ट्रपती व महान शास्त्रज्ञ डॉ. ए.पी.जे. अब्दुल कलाम यांच्या झांकीने विशेष लक्ष वेधून घेतले. दरम्यान प्रशासकीय सेवेत आपल्या कडक शिस्तीच्या कार्यपद्धतीसाठी चर्चेत राहिलेले तुकाराम मुंडे यांचा 'वाघ' असा उल्लेख करणारी झाकी विशेष चर्चेचा विषय ठरली. या झाकीकडे नागरिकांचे विशेष लक्ष गेले. कावड यात्रेदरम्यान शहरातील प्रमुख मार्गांवर नागरिकांची मोठी गर्दी झाली होती. ढोल-ताशांचा गजर, धार्मिक घोषणा आणि उत्साही वातावरणामुळे संपूर्ण दर्यापूर शहर भक्तिमय झाले होते. यात्रेदरम्यान कायदा व सुव्यवस्था अबाधित राहावी तसेच वाहतूक सुरळीत सुरू राहावी यासाठी दर्यापूर पोलिसांकडून ठिकठिकाणी चोख बंदोबस्त ठेवण्यात आला होता. पोलिसांच्या नियोजनामुळे कावड यात्रा शांततेत आणि उत्साहपूर्ण वातावरणात पार पडली.

# ज्या वाघाला पाहायचे स्वप्न होते, त्याच वाघाने घेतला उर्मिला इवनेचा जीव

**अचलपूर/हरीश पुरोहित**

ज्या वाघाला पाहण्यासाठी उर्मिला इवने उत्सुक होती, ज्या जंगलावर आणि वन्यजीवांवर तिचं मनापासून प्रेम होतं, त्याच वाघानं अखेर तिचा जीव घेतला. ज्या वाघाचा फोटो तिनं अभिमानानं आपल्या व्हॉट्सॲप डीपीवर लावला होता.त्याच वाघाच्या हल्ल्यात तिचा दुर्दैवी मृत्यू झाला. चांदूर बाजार तालुक्यातील सोनोरी गावातील उर्मिलाच्या मृत्यूने इवने कुटुंबावर दुःखाचा डोंगर कोसळला आहे.

उर्मिला ही कुटुंबासाठी मोठा आधार होती. शेतात राबण्यासोबतच घरची जबाबदारी ती खंबीरपणे सांभाळत होती. बहिणींच्या शिक्षणासाठीही ती आधार देत होती. त्यामुळे तिच्या अचानक झालेल्या मृत्यूने कुटुंबाचा आधारच हिरावला असून, शिक्षणाच्या जोरावर पुढे जाण्याची धडपड करणाऱ्या कुटुंबाच्या स्वप्नांनाही मोठा धक्का बसला आहे.

घरात कोणीही नव्हते, म्हणून ती शेतात गेली.सोनोरी परिसरात वाघाचा वावर असल्यानं गावात आधीपासूनच भीतीचं वातावरण होते. वाघाला पकडण्यासाठी वनविभागाची मोहीम सुरू होती. त्याचदरम्यान उर्मिलाची मोठी बहीण लीला आणि आई मातिया या काकांच्या घरी गेल्या होत्या. लहान बहीण पुष्पा अमरावतीला शिक्षणासाठी होती, तर भाऊही गावाबाहेर गेला होता. त्यामुळे घरात उर्मिला एकटीच होती.नेहमीप्रमाणे उर्मिला शेजारी राहणाऱ्या कला महादेव कासदेकर यांच्यासोबत घरापासून काही अंतरावर असलेल्या शेतात गवत कापण्यासाठी गेली. दोघी शेतात असताना त्यांना वाघाची चाहूल लागली. वाघ जवळ असल्याचं लक्षात येताच दोघींच्याही काळजाचा ठोका चुकला.कला यांनी जीवाच्या आकांतानं तेथून पळ काढला. मात्र, उर्मिलानं जवळच असलेल्या एका छोट्याशा संत्र्याच्या झाडाचा आधार घेतला. तिला वाटले की झाडाच्या आडोशाने आपण वाचू शकतो. मात्र, वाघाने क्षणार्धात तिच्यावर झडप घातली. वाघाने संत्र्याच्या झाडाजवळून उर्मिलाला पकडलं आणि फरफटत लगतच्या नाल्याकडे नेलं. काही क्षणांतच कुटुंबाचा आधार असलेल्या उर्मिलाचा दुर्दैवी अंत झाला. उर्मिलाच्या मृत्यूमुळे इवने कुटुंबावर मोठं संकट कोसळलं आहे. तिच्या जाण्यानं केवळ एका कुटुंबाचा आधार हिरावला नाही, तर तिच्या बहिणींच्या शिक्षणासाठी आणि कुटुंबाच्या भविष्यासाठी पाहिलेली अनेक स्वप्नंही आता अधुरी राहिली आहेत.

**वाघ तिच्या व्हॉट्सॲप डीपीवर होता**

उर्मिलाला वाघ आणि जंगलाचं विशेष आकर्षण होतं. वन्यजीवांविषयी ती सतत कुतूहलानं विचारायची. मित्र-परिचितांना ती अनेकदा, 'मला एकदा वाघ पाहायचा आहे,' असं सांगायची. काही दिवसांपूर्वी तिनं आपल्या व्हॉट्सॲप डीपीवर चक्क वाघाचा फोटो लावला होता. वाघाबद्दल इतकं प्रेम असलेल्या उर्मिलाच्या आयुष्यातील हा सर्वात मोठा विरोधाभास ठरला.ज्या वाघाचा फोटो तिनं आपल्या मोबाईलच्या स्क्रीनवर जपला, त्याच वाघानं तिचं जीवन हिरावून घेतलं.

**६ वर्षांची असताना वडिलांनी सोडून दिले**

उर्मिलाचं आयुष्य सुरुवातीपासूनच संघर्षाचं होतं. ती ६ वर्षांची असताना तिचे वडील कुटुंबाला सोडून निघून गेले. त्यानंतर ते पुन्हा कधीच परतले नाहीत. ते कुठे आहेत, कसे आहेत, याचीही कुटुंबाला माहिती नाही. मूळचं मध्य प्रदेशातील असलेलं हे आदिवासी कुटुंब घरातील प्रमुख व्यक्ती निघून गेल्याने हादरलं.अशा



## इवने कुटुंबाचा आधार कायमचा हरपला...

परिस्थितीत आई मातिया यांनी स्वतःला सावरलं आणि मुलांना घेऊन सोनोरी गाव गाठलं. पार्वती, सरस्वती, तुळशीराम, लीला, पुष्पा आणि उर्मिला या मुलांना घेऊन त्यांनी शेतमजुरी केली. मिळेल ते काम केलं आणि संसाराचा गाडा ओढला. आई अशिक्षित होती, मात्र तिचं एक स्वप्न मोठं होतं. आपल्या मुलींनी शिकावं आणि स्वतःच्या पायावर उभं राहावं.

**हातात कोयता, मनात शिक्षणाचं स्वप्न**

लहानपणापासूनच उर्मिला आणि तिच्या भावंडांनी शेतात मजुरी केली. परिस्थिती कठीण होती. मात्र त्यांनी शिक्षणाची वाट सोडली नाही. मोठ्या दोन बहिणींची लग्नं झाली. त्यानंतर लीला हिने समाजकार्य विषयातील पदव्युत्तर पदवी मिळवली, तर पुष्पानेही याच विषयात पदव्युत्तर शिक्षण पूर्ण केलं.

उर्मिलाने बीएससीनंतर डीएड केलं. गरिबी होती, साधनं कमी होती. मात्र शिक्षणाची जिद्द मोठी होती. हातात कोयता घेऊन शेतात राबतानाच उर्मिलाच्या मनात शिक्षणाच्या जोरावर पुढे जाण्याचं स्वप्न होतं.

**बहिणीला अधिकारी बनवण्याचं उर्मिलाचं स्वप्न**

लीला हुशार होती. तिच्यात काहीतरी मोठे करण्याची क्षमता आहे, हे उर्मिलानं ओळखलं होतं. २०२३ मध्ये समाजकल्याण विभागातील उपायुक्त पदाची जाहिरात आली. जाहिरात पाहताच उर्मिलानं लीलाला परीक्षा देण्यासाठी प्रोत्साहित केलं. लीलानं अभ्यास सुरू केला. मात्र घरची परिस्थिती तिच्या अभ्यासाच्या आड येऊ नये, यासाठी उर्मिला स्वतः राबत होती.ती शेतात काम करायची, घर सांभाळायची आणि बहिणीच्या अभ्यासासाठी पुस्तकं व इतर साहित्य आणून द्यायची. लीलाला अभ्यास करता यावा म्हणून उर्मिलानं अमरावतीच्या तपोवन परिसरात भाड्यानं एक खोलीही करून दिली होती. तिथं लीलानं ऑनलाइन पद्धतीनं अभ्यास केला. लीलाचा अभ्यास म्हणजे जणू उर्मिलाचं स्वतःचं स्वप्न होतं.

**२०२५ मध्ये लीला ही परीक्षा उत्तीर्ण**

समाजकल्याण विभागात तिची नियुक्ती होणार होती. नियुक्ती आदेशाची प्रतीक्षा सुरू होती. मात्र बहिणीच्या हातात नियुक्तीचं पत्र पाहण्याआधीच उर्मिलाचं आयुष्य संपलं.

**२५ लाखांत सोनं परत येणार का?**

वाघाच्या हल्ल्यात उर्मिलाचा मृत्यू झाल्यानं शासनाकडून कुटुंबाला २५ लाख रुपयांची आर्थिक मदत मिळणार आहे. मात्र आई मातिया यांच्या डोळ्यांसमोर पैशांपेक्षा मुलीचं रूप उभं राहतं. 'माझी मुलगी सोनं होती. २५ लाख रुपये घेऊन आम्ही सोनं गमावलं,' या त्यांच्या शब्दांत पैशांनी कधीही भरून न निघणारी पोकळी दडलेली आहे. उर्मिला गेल्यानंतर बहिणीच्या नोकरीचा आनंदही कुटुंबाला उरलेला नाही. लीलाला नोकरी लागावी, तिचं आयुष्य उभं राहावं, यासाठी सर्वाधिक उत्साह उर्मिलाचाच होता.

**'मी शून्य झालेय', लीलाची व्यथा**

उर्मिलाच्या जाण्यानं तिची बहीण लीला अक्षरशः कोलमडून गेली आहे. ज्या बहिणीनं तिला अधिकारी बनण्यासाठी उभं केलं, तिच्याच मृत्यूनं लीलाच्या आयुष्यातील सगळा आनंद हिरावून घेतला आहे.वनविभागाच्या कारवाईवरही ती प्रश्न उपस्थित करते. या वाघानं यापूर्वीही दोन बळी घेतले होते, मग त्याला आधीच का पकडण्यात आलं नाही? आणखी किती जीव जाण्याची वनविभाग वाट पाहत होता, असे प्रश्न तिच्या मनात आहेत. मात्र सध्या हे प्रश्न विचारण्याची ताकदही तिच्यात उरलेली नाही.

**घरातली सगळ्यात लहान, पण आधार सगळ्यात मोठा**

उर्मिला ६ भावंडांमध्ये सगळ्यात लहान होती. मात्र घरात तिची भूमिका मोठ्या भावासारखी होती. ती शेतात काम करायची, घर सांभाळायची, उत्तम स्वयंपाक करायची, बकऱ्या पाळायची आणि बहिणीच्या शिक्षणाचीही काळजी घ्यायची.'आपण या बकऱ्या विकू आणि चांगल्या उत्पन्न देणाऱ्या बकऱ्या घेऊ,' असं उर्मिला नेहमी म्हणायची. काही दिवसांपूर्वी अभ्यासाचा खर्च भागवण्यासाठी बकऱ्या विकण्याचाही विचार ती करत होती, असं लीला सांगते.

**मृत्यूच्या दिवशीही नव्या शिक्षणाचा विचार**

उर्मिलाच्या मनात स्वतःच्या भविष्याचंही स्वप्न होतं. तिला कम्प्युटर सॉफ्टवेअरचा डिप्लोमा करायचा होता. मृत्यूच्या दिवशी सकाळीच तिनं एक वर्षाच्या डिप्लोमा अभ्यासक्रमाची जाहिरात व्हॉट्स?पवर पाठवली होती, असं लीला हिनं सांगितलं. या अभ्यासक्रमासाठी २४ हजार रुपयांची शिष्यवृत्ती मिळणार असल्याचंही ती म्हणाली होती. त्या सकाळी शिक्षणाचं स्वप्न सांगणारी उर्मिला काही तासांतच कायमची निघून जाईल, याची कुणालाही कल्पना नव्हती.

**घराची जबाबदारी उर्मिलाच्या खांद्यावर**

उर्मिलाच्या बहिणी बाहेर राहून शिक्षण घेत होत्या. कुणी अमरावतीत राहून अभ्यास करत होतं, तर कुणी स्पर्धा परीक्षेची तयारी करत होतं. अशा वेळी घराची संपूर्ण जबाबदारी उर्मिला सांभाळत होती. दुसऱ्याच्या शेतातील कामं, घरातील कामं, बकऱ्यांची देखभाल आणि कुटुंबातील प्रत्येकाची काळजी, हे सगळं ती सहजपणे करायची. दुचाकी बिनधास्त चालवणारी, संकटाला न घाबरणारी आणि इतरांना धीर देणारी



उर्मिला वयाने सगळ्यात लहान होती. मात्र कुटुंबासाठी ती एखाद्या मोठ्या भावासारखी होती.

**'मुलगी शिकली पाहिजे', एवढंच आईचं स्वप्न**

उर्मिलाची आई अशिक्षित. हातात शिक्षणाची पदवी नाही. मात्र मुलींना शिक्षण मिळावं यासाठी आयुष्यभर तिनं शेतात राबून घाम गाळला. या कुटुंबानं मुलींच्या लग्नापेक्षा त्यांच्या शिक्षणाला महत्त्व दिलं. समाजात मुलगी वयात आली की लग्नाची चर्चा सुरू होते. मात्र या घरात चर्चा होती ती शिक्षणाची, नोकरीची आणि स्वतःच्या पायावर उभं राहण्याची. कष्टातून कुटुंबानं छोटंसं घर उभं केलं. बकऱ्या घेतल्या आणि मुलींना शिकवलं. संघर्षातून उभं राहत असलेल्या या कुटुंबाचा कणा अखेर वाघाच्या हल्ल्यानं मोडला आहे.

**उर्मिलाला होती जंगलाची आवड**

चांदूरबाजार येथील स्वराज्य सेवा प्रतिष्ठानच्या माध्यमातून आयोजित करण्यात आलेल्या चिखलदरा येथील गाविलगड किल्ला मोहिमेत उर्मिला रविवारी सहभागी झाली होती. जंगलभ्रमंती, वन्यजीव, झाडं-पानं याविषयी तिला विशेष उत्सुकता होती. अशा मोहिमांमध्ये ती उत्साहाने सहभागी व्हायची. रविवारी ज्या सहकाऱ्यांसोबत उर्मिला जंगलभ्रमंती करत होती, त्यांच्यासोबत आज ती नाही. तिच्या सहकाऱ्यांसाठी हीच बाब अस्वस्थ करणारी ठरली आहे.

**टोपी होती तिची ओळख**

उर्मिला नेहमी टोपी घालायची.ती टोपीच तिची वेगळी ओळख बनली होती.वाघानं हल्ला केला त्या दिवशीही तिच्या डोक्यावर टोपी होती. वाघानं तिला संत्र्याच्या झाडावरून पकडून नाल्याकडे फरफटत नेलं. घटना समजल्यानंतर मित्र आणि परिचित घटनास्थळी पोहोचले. उर्मिलाचा मृतदेह दिसण्याआधी त्यांना दिसली ती तिची टोपी. क्षणभर सगळ्यांचे पाय थांबले. ओळखीची टोपी समोर होती. मात्र ती घालणारी उर्मिला आता कधीच परत येणार नव्हती.उर्मिलाच्या अंत्ययात्रेला राजकीय आणि सामाजिक क्षेत्रातील व्यक्तींसह नातेवाईकही मोठ्या संख्येनं उपस्थित होते. सुखाच्या दिवसांत घरात कधी न दिसलेले अनेक नातेवाईकही या दुःखाच्या प्रसंगी आले. मात्र या गर्दीतही उर्मिलाची उणीव प्रत्येक क्षणी जाणवत होती, अशी भावना लीला व्यक्त करते.

**'उर्मिला पुढे जाणारी मुलगी होती'**

स्वराज्य सेवा प्रतिष्ठानचे शिवा काळे यांच्या आठवणीत उर्मिला एक जिज्ञासू, उत्साही आणि सतत काहीतरी शिकण्याची धडपड करणारी तरुणी म्हणून राहिली आहे. जंगल, झाडं, पानं आणि वन्यजीवांविषयी तिला विशेष कुतूहल होतं. वाघांविषयी ती वारंवार विचारायची. काही दिवसांपूर्वी तिनं आपल्या व्हॉट्सॲप डीपीवर वाघाचा फोटोही लावला होता. ज्या वाघाबद्दल ती इतक्या उत्सुकतेनं बोलायची, त्याच वाघानं तिचा जीव घेतला. ही विडंबनात्मक शोकांतिका आज सोनोरी गावाच्या मनावर कायमची कोरली गेली आहे.

## प्रा.राम मेघे कॉलेज ऑफ इंजीनियरिंग अँड मॅनेजमेंट येथे
## 'एक पेड़ माँ के नाम ३.०' सामाजिक उपक्रमा अंतर्गत गोविंदपूर व महाविद्यालय परिसरात वृक्षारोपण

**अमरावती/का.प्र.**

भारत सरकार व महाराष्ट्र शासनाच्या 'एक पेड़ माँ के नाम ३.०' उपक्रमा अंतर्गत प्रा राम मेघे कॉलेज ऑफ इंजीनियरिंग अँड मॅनेजमेंट बडनेरा (स्वायत्त संस्था) महाविद्यालयाच्या राष्ट्रीय सेवा योजनेच्या वतीने दत्तकग्राम गोविंदपुर बडनेरा व महाविद्यालय परिसरात रासेयो च्या स्वयंसेवक व शिक्षक आणि शिक्षकेत्तर कर्मचारी मार्फत मोठ्या प्रमाणात वेगवेगळ्या प्रजातीची वृक्ष लागवड करण्यात आली. या अभियानाचे मुख्य उद्दिष्ट आईच्या प्रेमाचा आणि त्यागाचा सन्मान करत पर्यावरणाचे रक्षण करणे हा आहे. याप्रसंगी ७० हुन अधिक वृक्षांची लागवड करण्यात आली त्यामध्ये वड, पिंपळ, कडुबदाम, जांभूळ, चिंच, कडुलिंब, सीताफळ, हिरडा व काही फुलांचे झाडे लावण्यात आली. कार्यक्रमासाठी



उपस्थित महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. अजय ठाकरे यांनी विद्यार्थ्यांना, वृक्ष लागवड व वृक्ष संवर्धनाचे आवाहन केले. या कार्यक्रमाचे नियोजन राष्ट्रीय सेवा योजने द्वारे करण्यात आले. यावेळी उपप्राचार्य प्रा. प्रवीण खांडवे विभागप्रमुख सीविल, डॉ.अमित मोहोड विभागप्रमुख इलेक्ट्रिकल, गोविंदपूर शाळेचे मुख्याध्यापक थोटांगे व सहाय्यक शिक्षिका गुल्हाने व विद्यार्थी, रासेयो कार्यक्रम अधिकारी प्रा. अतुल डहाणे, महिला कार्यक्रम अधिकारी प्रा. अपर्णा खैरकर, प्रा. सारंग धावडे व इतर शिक्षक आणि शिक्षकेत्तर कर्मचारी मोठ्या प्रमाणात उपस्थित होते. कार्यक्रमाच्या यशस्वी नियोजनाकरता महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. अजय ठाकरे यांचे मार्गदर्शन लाभले. तसेच संस्थेचे अध्यक्ष डॉ. नितीन धांडे, उपाध्यक्ष ॲड. उदय देशमुख, कोषाध्यक्ष प्रा.डॉ. हेमंत देशमुख, सचिव युवराजसिंगजी चौधरी, सदस्य नितीन हिवसे, डॉ. पूनम चौधरी,पंकजजी देशमुख,प्रा. विनय गोहाड, प्रा.गजानन काळे यांनी शुभेच्छा दिल्या.

## भगवंतराव महाविद्यालयाच्या महिला क्रॉस-कंट्री संघाला अजिंक्यपद

**परतवाडा-**येथील भगवंतराव शिवाजी पाटील महाविद्यालयाच्या महिला क्रॉस-कंट्री संघाने सलग तीसऱ्यांदा संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठात प्रथम स्थान प्राप्त करून संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठाचे अजिंक्यपद प्राप्त केले.या अजिंक्यपद प्राप्त करण्याऱ्या महिला क्रॉस-कंट्री संघात महाविद्यालयाच्या स्वाती पळसकर,पायल नागे,वैदवी सिडाम,समीक्षा मुंडे,महिमा भक्ते,सार्थिका काटोले,सर्वदा काटोले या विद्यार्थ्यांनींचा सहभाग होता.या संस्थेचे अध्यक्ष प्राचार्य डॉ. आराधना वैद्य व संपूर्ण कार्यकारिणी सदस्य तसेच महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.अनिल




खांडेकर व शारिरीक शिक्षण संचालक प्रा.डॉ.सतिश भागवत तसेच सर्व प्राध्यापकवृंद आणि शिक्षकेत्तर कर्मचारी वर्गाने व शुभेच्छा दिल्या. या अजिंक्यपद प्राप्त करण्याऱ्या संघाला विदर्भ युथ वेलफेअर सोसायटीचे कार्यकारी सदस्य पंकज देशमुख, प्राचार्य डॉ.सुभाष गावंडे, प्रा.डॉ.तनुजा राऊत, प्रा.डॉ.डबीर कुरेशी, प्रा. डॉ.संदीप चावक, सलीम शेख, अनिल इंगळे, आर.डी. आय.के., प्राचार्य डॉ.राजेश देशमुख व प्रा.डॉ.अतुल पाटील, प्रा. डॉ.सुमेरसिंग ठाकूर, प्रा.डॉ.मनोज गाथे, प्रा.डॉउमेश राठी, यांच्या हस्ते अजिंक्यपद चषक देऊन गौरविण्यात आले. बी.एस.पाटील महाविद्यालयाच्या महिला क्रॉस-कंट्री संघाला शारीरिक शिक्षण संचालक प्रा.डॉ.सतिश भागवत व प्रशिक्षक गजानन जयस्वाल यांचे मार्गदर्शन लाभले.

## मातोश्री विमलाबाई देशमुख महाविद्यालयामध्ये स्वयंशासित विद्यालय

**अमरावती/का.प्र.**

श्री शिवाजी शिक्षण संस्था द्वारा संचालित मातोश्री विमलाबाई देशमुख महाविद्यालयामध्ये शिक्षक दिनानिमित्त स्वयंशासित विद्यालयाचे आयोजन करण्यात आले.या उपक्रमा अंतर्गत महाविद्यालयातील विद्यार्थ्यांनी एक दिवस शिक्षकाची भूमिका बजावली.कार्यक्रमाची सुरुवात भारताचे माजी राष्ट्रपती डॉक्टर सर्वपल्ली राधाकृष्णन तसेच डॉक्टर पंजाबराव उपाख्य भाऊसाहेब देशमुख व त्यांच्या सुविद्य पत्नी मातोश्री विमलाबाई देशमुख यांच्या प्रतिमेला माल्यार्पण करून करण्यात आली. याप्रसंगी महाविद्यालयाच्या प्राचार्य डॉ. स्मिता देशमुख यांनी



आपल्या अध्यक्षीय भाषणामध्ये स्वयंशासित शाळा हा केवळ उपक्रम नसून, विद्यार्थ्यांमध्ये आत्मविश्वास, नेतृत्व आणि व्यवस्थापन कौशल्य विकसित करण्याचे प्रभावी माध्यम आहे. तसेच महाविद्यालयाच्या पर्यवेक्षक प्रा. ममता राऊत यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना शिक्षकांनी केलेल्या मार्गदर्शनानुसार आपल्या ध्येयाकडे वाटचाल केल्यास त्याला निश्चितच योग्य मार्ग सापडू शकतो, विद्यार्थ्यांना कोणतीही अडचण असो, शैक्षणिक किंवा वैयक्तिक शिक्षकांशी चर्चा करावी असे मत व्यक्त केले. सांस्कृतिक समितीकडून घेण्यात आलेल्या या कार्यक्रमाचे संचालन ममता पाटील यांनी केले. कार्यक्रमाच्या यशस्वीते करिता सांस्कृतिक समितीचे सर्व सदस्य, महाविद्यालयातील सर्व शिक्षक यांनी सहकार्य केले. कार्यक्रमाला शिक्षक व विद्यार्थी बहुसंख्येने उपस्थित होते.

'४८ कोटींचे' दंडवसुली प्रकरण

# तहसीलदारांच्या संशयास्पद 'मेहेरबानी'ची आता विभागीय आयुक्तांमार्फत होणार कोंडी!

## विभागीय आयुक्तांच्या आदेशाने अकोला महसूल विभागात भूकंप!

**ॲड. समीर ठाकूर**


**अकोला :** अकोट तालुक्यातील मौजे गाजीपूर येथील गट नंबर २७ आणि ३८ वरील अतिरिक्त उत्खनन केल्याप्रकरणी तब्बल ४८ कोटी रुपयांचा महसूल प्रलंबित ठेवून मोकाट फिरणारे अवैध उत्खननदार संतोष चांडक आणि त्यांना अप्रत्यक्षपणे पाठीशी घालणारी अकोटची महसूल यंत्रणा आता वरिष्ठ पातळीवर रडारवर आली आहे. अकोट तालुक्यातील मौजे गाजीपूर येथील गौण खनिज घोटाळ्यातील दंडाची वसुली जाणीवपूर्वक रखडवल्याप्रकरणी अमरावती विभागीय आयुक्त कार्यालयाने थेट अकोला जिल्हाधिकाऱ्यांना चौकशीचे 'सणसणीत' आदेश जारी केले आहेत. या आदेशामुळे गेल्या अनेक दिवसांपासून या प्रकरणावर पडदा टाकण्याचा प्रयत्न करणाऱ्या स्थानिक अधिकाऱ्यांचे धाबे दणाणले आहेत.




अकोट तालुक्यातील मौजे गाजीपूर येथील आदिवासी समाज बांधव विलास कालू चिमोटे यांच्या मालकीच्या गट नंबर २७ आणि ३८ वर झालेल्या गौण खनिजाचो अतिरिक्त उत्खनना प्रकरणी सन २०२४ मध्ये तब्बल ४८ कोटींचा दंड ठोठावण्यात आला होता. तेव्हापासून मात्र या दंडवसुलीत महसूल विभागाच्या अधिकारी वर्गाकडून झालेल्या हालचाली, उच्च न्यायालय नागपूर खंडपीठाने दिलेले निर्देश, त्यानंतरही झालेली कथित दिरंगाई, दंड वसुली प्रकरणात चाललेल्या सर्व नोटीस, प्रशासकीय कागदपत्रे, वेळेच्या मर्यादेचा झालेला भंग, होत असलेली कथित दिरंगाई, उद्योगांना दिलेली मोकळीक, आदिवासी जमिनीवर असलेली उद्योगधंदे, कारवाईतून वगळलेली कंत्राटी देयके, अनधिकृत भाडेपट्टे/करारनामे यांमुळे अकोट महसूल विभाग हाच संशयाच्या भोवऱ्यात अडकला आहे. दंडवसुलीचा कागदी देखावा उभा करणारे महसूलचे अधिकारी मात्र आदिवासी जमिनीवर उभारण्यात आलेल्या चांडक यांच्या स्टोन क्रशर व डांबर हॉट मिक्स प्लांट बाबत मात्र कमालीची चुप्पी साधून बसले असून यापूर्वी पण जिल्हाधिकारी यांना सादर केलेल्या अहवालात या आदिवासी जमिनीबाबत एक शब्दाचा उल्लेखही महसुलच्या अधिकारी वर्गाकिडून करण्यात आला नाही हे विशेष !

दरम्यान, आता या प्रकरणी विभागीय आयुक्त कार्यालयाने ' इंटरेस्ट ' घेतल्याने अकोट महसूल विभागाची चांगलीच कोंडी झाली आहे. आता याप्रकरणी अकोला जिल्हाधिकारी सदर प्रकरणाचा अहवाल सादर करण्यासाठी कोणत्या अधिकाऱ्यांना आदेश देतात ?

की अकोट महसुलच्या अधिकारी वर्गाने स्वतः ला निर्दोष दाखविणारा सादर केलेला अहवालालाच ' पॉलिश ' करून विभागीय आयुक्त, कार्यालयाला सादर करतात याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.



### 'आरोप असलेलेच तपास अधिकारी' ठरू नयेत

' जनमाध्यम' ने पुरवलेल्या पुराव्यांवरून आणि प्रकाशित केलेल्या वृत्तमालिकेवरून विभागीय आयुक्तांनी १ सप्टेंबर २०२६ रोजी डिजिटल स्वाक्षरी करून जिल्हाधिकाऱ्यांना 'उलट-टपाली' अहवाल मागवला आहे. मात्र, या चौकशीत पुन्हा एक मोठी 'गोम' निर्माण होण्याची शक्यता आहे. जर अकोला जिल्हाधिकाऱ्यांनी या चौकशीची जबाबदारी नेहमीप्रमाणे अकोटचे उपविभागीय अधिकारी आ आणि अकोट तहसीलदार यांच्यावरच सोपवली, तर चौकशी निष्पक्ष कशी होणार? ज्या अधिकाऱ्यांवर दिरंगाईचे, चुकीचे प्रस्ताव पाठवण्याचे आणि चांडक यांना अप्रत्यक्ष मदत करण्याचे थेट आरोप आहेत, तेच अधिकारी स्वतःच्या हाताने स्वतःविरुद्ध अहवाल कसा लिहिणार? असे झाल्यास, पुन्हा एकदा 'मागच्या पानावरून पुढे' या न्यायाने स्वतःचा बचाव करणारा आणि कारवाईचा केवळ देखावा उभा करणारा बोगस अहवाल वरिष्ठ कार्यालयापुढे सादर करून विभागीय आयुक्तांची दिशाभूल केली जाईल, हे स्पष्ट आहे.

### जिल्हाधिकाऱ्यांच्या भूमिकेकडे जिल्ह्याचे लक्ष!

हा कोट्यवधी रुपयांच्या शासकीय महसुलाचा आणि आदिवासी जमिनींच्या कथित अनधिकृत भाडेपट्ट्याचा गंभीर घोटाळा आहे. त्यामुळे अकोला जिल्हाधिकाऱ्यांनी अकोट उपविभागातील एसडीओ आणि तहसीलदार या अधिकारी वर्गाला या चौकशीतून पूर्णपणे दूर ठेवावे. या प्रकरणाचा तपास निवासी उपजिल्हाधिकारी किंवा अन्य तालुक्यातील सक्षम त्रयस्थ अधिकाऱ्यामार्फत करून घ्यावा, तरच या ४८ कोटींच्या 'महसूल गळती'चे खरे सुत्रधार समोर येतील. आता जिल्हाधिकारी निष्पक्ष चौकशीचे धाडस दाखवणार की स्थानिक अधिकाऱ्यांच्या 'बचाव अहवाला'वर शिक्कामोर्तब करणार, याकडे संपूर्ण जिल्ह्याचे लक्ष लागले आहे.

### 'नमुना' चुकला की जाणीवपूर्वक चुकवला?

गौण खनिजाचे अतिरिक्त उत्खनन केल्याप्रकरणी संतोष चांडक यांना ४८ कोटींचा ऐतिहासिक दंड ठोठावण्यात आला होता. नियम असं सांगतो की, दंड वसुलीसाठी तत्काळ मालमत्ता जप्ती आणि लिलावाचा प्रस्ताव विहित नमुन्यात जिल्हाधिकाऱ्यांकडे अथवा उपजिल्हाधिकारी महसूल यांच्याकडे पाठवणे आवश्यक होते. मात्र, अकोट तहसील स्तरावरून हा प्रस्ताव विहित नमुन्यात न पाठवता, तांत्रिक त्रुटी ठेवून जिल्हा खनिकर्म विभागाला पाठवित रेंगाळत ठेवण्यात आला. तदनंतर सदर प्रस्ताव विहित नमुन्यात पाठविण्याचे मौखिक आदेश मिळाल्यानंतरही तब्बल पंधरा दिवसांच्या वर कालावधी उलटल्यानंतरही हा प्रस्ताव पाठविल्या गेला नसल्याची माहिती प्राप्त आहे. हा निव्वळ योगायोग नसून, दंडग्रस्त चांडक यांना कायदेशीर कारवाईपासून वाचवण्यासाठी आणि वेळ काढू पणा करण्यासाठी स्थानिक महसूल अधिकाऱ्यांनी खेळलेली ही 'फिक्स मॅच' असल्याचा संशय आता बळावला आहे.

### चांडक यांच्या 'उद्योग साम्राज्याला' तहसीलदारांचे कवच?

सर्वात धक्कादायक आणि संशयास्पद बाब म्हणजे, दंडाची वसुली करण्यासाठी चांडक यांच्या केवळ निवडक मालमत्तांवर जुजबी बोजा चढवण्याचा देखावा करण्यात आला. दुसरीकडे, चांडक यांचे इतर कोट्यवधींचे उद्योग साम्राज्य आणि त्यांची शासनाकडून येणारी कंत्राटी देयके गोठवण्याची हिंमत अकोट तहसीलदारांनी का दाखवली नाही? शासकीय महसूल बुडवणाऱ्या व्यक्तीची कंत्राटी देयके तात्काळ रोखणे शक्य असतानाही, तहसीलदारांनी तिथे दाखवलेली मवाळ भूमिका कोणाच्या इशाऱ्यावर होती? हा प्रश्न आता उपस्थित केला जात आहे.

धोत्रा शेतशिवारात

## बिबट्याने केली बोकुडाची शिकार

### गावकऱ्यांमध्ये भीतीचे वातावरण

**तिवसा /प्रतिनिधी:-** तालुक्यातील धोत्रा शेतशिवारात बिबट्याचा वावर असून रात्रीच्या दरम्यान बिबट्याने बोकड्याची शिकार केल्याची घटना बुधवारी सकाळी उघड झाली. चांदूर रेल्वे परिक्षेत्रातील आरएफओ शीतल धुते यांच्याशी फोनद्वारे माहिती देऊन तातडीने वन विभागाला पाचारण करण्यात आले. चांदूर रेल्वे वनपरिक्षेत्रातील माळेगाव बीटचे वनरक्षक निलेश पवार , हरीश देशमुख यांनी घटनास्थळी भेट दिली. त्यावेळी ग्रामस्थांची गर्दी झाली होती. शेतकऱ्यांनी सुद्धा तातडीने बिबट्या शोधण्याची मागणी यावेळी केली. घटनेचे स्थळ वनपरिक्षेत्रात येत असल्याने त्याठिकाणी सर्च ऑपरेशन राबवण्या ऐवजी ट्रॅक कॅमेरे लावण्यात येणार असल्याचे आश्वासन यावेळी वनकर्मचारी यांनी दिले. विशेष म्हणजे घटनेच्या १० फुटावर शेतकऱ्यांचा शेतात जाण्याचा पांधन रस्ता असल्याने शेतकऱ्यांची, ☞(पान २ वर)




## सहकारी संस्था नियमाला बच्चू कडू यांचा आवाहन

### उच्च न्यायालयात दाखल केली याचिका

**अमरावती /प्रतिनिधी :-** महाराष्ट्र सहकारी संस्था कायद्यात नुकत्याच समाविष्ट करण्यात आलेल्या एका तरतुदीला आमदार बच्चू कडू यांनी मुंबई उच्च न्यायालयाच्या नागपूर खंडपीठात आव्हान दिले. सहकारी संस्थांचे वर्गीकरण अधिसूचनेद्वारे करण्यात आले असताना, त्या वर्गीकरणाच्या आधारे कायद्यात स्वतंत्र तरतूद करता येईल का, असा प्रश्न याचिकेत उपस्थित करण्यात आला आहे. न्यायालयाने याप्रकरणी राज्य सरकारसह संबंधितांना नोटीस बजावली तसेच राज्याचे महाधिवक्ता यांनाही भूमिका स्पष्ट करण्याचे निर्देश दिले.न्या. अनिल किलोर आणि न्या. रजनीश व्यास यांच्या खंडपीठा समक्ष याचिकेवर सुनावणी झाली. महाराष्ट्र सहकारी संस्था सुधारणा अधिनियम, २०२६ मधील कलम ७३एएए(३) च्या वैधतेला याचिकेत आव्हान देण्यात आले आहे. याचिकाकर्त्यांच्या म्हणण्यानुसार, सहकारी संस्थांचे वर्गीकरण विधि मंडळाने केलेल्या कायद्या व्दारे केलेले नसून ते अधिसूचनेद्वारे करण्यात आले आहे. त्यामुळे नियमांतील या वर्गीकरणाच्या आधारे कायद्यात स्वतंत्र तरतूद करणे योग्य आहे का, हा मुद्दा☞(पान २ वर)





## शेत विहिरीत आढळला मनोरुग्ण तरुणाचा मृतदेह


### काट आमला येथील घटना

**अमरावती/ प्रतिनिधी:** - बडनेरा पोलीस ठाणे हद्दीत येणाऱ्या काट आमला मध्ये शेत विहिरीत संशयास्पद परिस्थितीत एका तरुणाचा मृतदेह आढळल्याने संपूर्ण परिसरात खळबळ उडाली आहे.तेजस नंदकिशोर हिंगणकर ( मूर्तिजापूर) मृतक तरुणाचे नाव आहे. ही घटना समोर आल्यानंतर परिसरात विविध चर्चा सुरू झाल्या असून पोलीस प्रत्येक बाजूने सखोल तपास करत आहेत. माहितीनुसार, मृत तेजस हा मानसिक आजाराने त्रस्त होता आणि ☞(पान २ वर)

## आरोग्य उपसंचालक, सीएस, प्रशासकीय अधिकारी निलंबित

### उच्चस्तरीय चौकशी समितीच्या अहवालावर कारवाई - डफरीन अग्निकांड प्रकरण

**अमरावती/ प्रतिनिधी:** - जिल्हा स्त्री रुग्णालयात २४ ऑगस्ट रोजी पहाटेच्या सुमारास नवजात शिशु निगा कक्षात घडलेल्या भीषण अग्निकांडाच्या दुर्घटने प्रकरणी आरोग्य आयुक्त संजय काटकर यांच्या अध्यक्षते खालील उच्चस्तरीय चौकशी समितीने आपला अहवाल शासनाला सादर केला आहे. या अहवालाच्या आधारे आरोग्य उपसंचालक डॉ. सुशीलकुमार वाकचोरे, जिल्हा शल्य चिकित्सक डॉ. विनोद पवार, अतिरिक्त सीएस डॉ. अरुण साळुंके, प्रशासकीय अधिकारी संदीप तारगे तर एका इलेक्ट्रीशियन वर ठपका ठेवत शासनाने आज बुधवार ९ सप्टेंबर रोजी त्यांना निलंबित केले आहे.२४ ऑगस्ट २०२६ रोजी पहाटे ३.०० ते ३.३० च्या दरम्यान डफरिन रुग्णालयातील एसएनसीयूच्या 'आऊटबॉर्न' विभागात अचानक आग लागली. त्यावेळी संपूर्ण 'एसएनसीयू'मध्ये ३९ नवजात बालके भरती होती. आऊटबॉर्न युनिटमधील व्हेंटिलेटरमध्ये अचानक स्फोट होऊन ही आग भडकली. या दुर्घटनेत तीन बालकांचा दुर्दैवी मृत्यू झाला. ☞(पान २ वर)



## अमरावतीतील वाघिणीच्या हल्ल्याच्या पार्श्वभूमीवर वन विभागाची यंत्रणा अधिक सक्षम करा - वनमंत्री नाईक

**मुंबई/ प्रतिनिधी:** - अमरावती वन विभागातील वाघिणीच्या हल्ल्याच्या पार्श्वभूमीवर वन्यप्राण्यांच्या हल्ल्यांमुळे होणारी जीवितहानी टाळण्यासाठी वन विभागाची यंत्रणा अधिक सक्षम करण्याचे निर्देश वनमंत्री गणेश नाईक यांनी दिले. राज्यातील वाघ आणि बिबट्यांची वाढती संख्या लक्षात घेता भविष्यात अशा घटना घडू नयेत, यासाठी केंद्रीकृत यंत्रणा उभारून अतिरिक्त पथके तसेच स्वतंत्र टास्क फोर्स तयार करण्याची कार्यवाही करावी, असे त्यांनी सांगितले. वनमंत्री गणेश नाईक यांच्या अध्यक्षतेखाली आणि महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांच्या उपस्थितीत अमरावती वन विभागातील वाघिणीच्या हल्ल्याबाबत बैठक झाली. यावेळी आमदार रवी राणा, गजानन लवटे, उमेश यावलकर, विधान परिषदेचे आमदार प्रवीण पोटे-पाटील, वन विभागाचे अपर मुख्य सचिव मिलिंद म्हैसकर उपस्थित ☞(पान २ वर)



### रेस्क्यू व सुरक्षिततेला प्राधान्य द्यावे - महसूल मंत्री बावनकुळे

बाधित परिसरात तातडीने पथक पाठवून परिस्थितीचा आढावा घ्यावा. सध्या इतर प्रक्रियांपेक्षा वन्यप्राण्यांचा बचाव आणि नागरिकांची सुरक्षितता यांना प्राधान्य द्यावे, अशा सूचना महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी दिल्या. वन्यप्राण्यांच्या हालचालींबाबत माहिती मिळालेल्या परिसरात तातडीने रेस्क्यू पथक पाठवावे. संपूर्ण कारवाई ☞(पान २ वर)

## आझाद हिंद मंडळात साकारणार खाटू श्याम मंदिर

### ९९ वर्षाची गणेशोत्सवाची परंपरा

**अमरावती/ प्रतिनिधी:** - सामाजिक, सांस्कृतिक, शैक्षणिक आणि सार्वजनिक क्षेत्रात आपला वेगळा ठसा उमटवणाऱ्या आझाद हिंद मंडळाकडून गेल्या ९९ वर्षांपासून गणेशोत्सवाची परंपरा जपली जात आहे. या वर्षी ९९ व्या वर्षानिमित्त मंडळात खाटू श्याम बाबा मंदिराची भव्य झांकी साकारण्यात येणार असल्याची माहिती पदाधिकाऱ्यांनी आज बुधवार ९ सप्टेंबर रोजी आयोजित पत्रकार परिषदेत दिली. त्यांनी सांगितले की,स्व.सोमेश्वर पुसदकर यांच्या प्रेरणेतून ही झांकी साकारली जात असून, प्रसिद्ध कलाकार अनिल वाठ हे गेल्या तीन महिन्यांपासून मंदिराची निर्मिती करत आहेत. त्यांना साज सज्जा व इतर व्यवस्था सांभाळण्या साठी मिक्स मास्टर इव्हेंटचे सचिन ठाकरे सहकार्य करत आहेत. तर श्याम बाबा आणि बाप्पाची मूर्ती गजानन सोनसळे साकारत आहेत. उत्सवासाठी रमेश काठोळे यांनी डोम उभारला आहे. यापूर्वी मंडळाने लाल किल्ला, ताजमहाल, अक्षरधाम, कोणार्क सूर्य मंदिर, स्वामी विवेकानंद स्मारक, अजिंठा-वेरूळ लेणी, लासूर मंदिर, पद्मनाभ मंदिर, तिरुपती बालाजी, पंढरपूर विठ्ठल मंदिर, बारा ज्योतिर्लिंग, कृष्णलीला, शिर्डी साईबाबा मंदिर अशा अनेक धार्मिक व अध्यात्मिक झांक्या ☞(पान २ वर)



## अमरावतीच्या विद्यार्थ्याचा पुण्यात रस्ते अपघातात मृत्यू

### दोन दिवसांपूर्वी घेतली होती नवीन बाईक

**अमरावती /प्रतिनिधी:-** शहरातील चिमोटे लेआऊट निवासी आणि संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठात अधिकारी पदावर कार्यरत प्रवीण येवतीकर यांचा मुलगा अर्पित येवतीकर याचा पुणे येथे झालेल्या भीषण रस्ते अपघातात मृत्यू झाला. हा अपघात मंगळवारी रात्री सुमारे २ वाजता झाला. अर्पित पुण्यात अभियांत्रिकीच्या तृतीय वर्षात शिक्षण घेत होता. माहितीनुसार, अर्पित आपली बाईक घेऊन राईडवर निघाला होता. ही बाईक त्याने अवघ्या दोन दिवसांपूर्वीच तीन लाख रुपये मध्ये खरेदी केली होती. रात्री सुमारे २ वाजता अचानक एक टिप्पर समोर आल्याने बाईकची त्याला धडक बसली. अपघात इतका भीषण होता की अर्पित गंभीर जखमी ☞(पान २ वर)



## विज काम करतांना ५५ वर्षीय इसम पडून जखमी

**खल्लार /प्रतिनिधी:-** खल्लार पोलीस स्टेशन हद्दीतील नाचोना येथे विज काम करीत असतांना ५५ वर्षीय इसम खाली पडून जखमी झाल्याची घटना आज (९)दुपारी १२ वाजताच्या सुमारास घडली. श्रीकृष्ण आकाराम नागे (वय. ५५) रा. लेहेगाव रेल्वे असे जखमी इसमाचे नाव असून श्रीकृष्ण नागे हे महावितरण कंपनीच्या कर्मचाऱ्यांसोबत खाजगी हेल्पर म्हणून काम करतात.

आज नाचोना येथिल डी. पी. वर काम करीत असतांना डी. पी. चा भडका उडाला यात ते खाली पडून जखमी झाले. त्यांना उपचारासाठी दर्यापूर येथे खाजगी रुग्णालयात हलविले खाजगी रुग्णालयातील उपचारानंतर अमरावती येथिल जिल्हा सामान्य रुग्णालय पुढील उपचारासाठी हलविण्यात आले. जिल्हा सामान्य रुग्णालयात त्यांची प्रकृती स्थिर असल्याची माहिती आहे.

## पॅराडाईज कॉलनी मध्ये आढळला तरुणाचा मृतदेह

### परिसरात उडाली खळबळ

**अमरावती /प्रतिनिधी:--** शहरातील पॅराडाईज कॉलनी मध्ये आज बुधवार ९ सप्टेंबर रोजी एका ४० वर्षीय युवकाचा मृतदेह आढळून आल्याने परिसरात एकच खळबळ उडाली. मृतदेहाची माहिती मिळताच घटनास्थळी मोठ्या संख्येने नागरिकांनी गर्दी केली होती. नितीन कबसे (४०,मजल गाव, जिल्हा बीड ) मृतक तरुणाचे नाव आहे. माहिती अनुसार मृतक नितीन कबसे दोन वाहनांचा मालक होता.तो काही ☞(पान २ वर)



